## प्रस्तावना

सर्व सुसंस्कृत समजली जाणारी जी राष्ट्रे पहिल्या महायुध्दात सामिल होती, त्यांच्यात युद्धानंतर एक अस्वस्थता आणि आत्मपरिक्षणाची गरज निर्माण झाली. १९१४ पर्यंत ज्या लोकांना आपल्या समाजात सर्व काही आलबेल आहे असे वाटत होते. आपला समाज उत्तरोत्तर अधिकाधिक चांगल्या अवस्थेकडे चालला आहे असे वाटत होते. त्यांना हा महाभयंकर विनाशकारी उद्रेक का झाला हा प्रश्न सतावू लागला. त्यानंतर पश्चातापाचा जोर वाढला. युध्दानंतर नव्या स्वप्नभूमिची रचना करण्याचे संकल्पही युद्धकाळात केले गेले होते. त्याचाही आशावादाने शोध सुरू झाला.

साहजिकच काहींनी आपल्या पारंपारिक शिक्षण व्यवस्थेत तर काही दोष नाही ना? याची तपासणी सुरू केली. दोन विश्वयुद्धांच्या दरम्यानच्या काळात सर्व सरकारांनी आपापल्या जाणीवेच्या विकासानुसार शिक्षणाला सहाय्य केले. नवीन शिक्षणाची चळवळ पसरत गेली. या क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रयोगशील लोकांकडे आता नव्याने लक्ष दिले जाऊ लागले. त्यांची नक्कल नाही पण अनुकरण केले जाऊ लागले. पायाभूत बदल करू इच्छिणा-यांची संख्या वाढली. न्यूझीलँडमध्ये १९३० च्या उत्तर काळातील सिल्व्हीया ॲस्था वॉर्नर ही त्यापैकीच एक. ती तिच्या वैशिष्ट्यपूर्णतेने वेगळी किंवा खरे तर एकटीच उठून दिसते. आंतराष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रे आणि संमेलने होत असूनही वेगवेगळ्या ठिकाणी पायाभूत काम करणा-यांना एकमेकांविषयी फारशी काही माहिती नव्हती. तरीही माझा असा तर्क आहे की, न्यूझीलँडमधील सरकारने मावरीमुलांसाठी काही शिक्षण योजना राबवायला सुरूवात केली या मागे आंतरराष्ट्रीय पातळीवरील नवीन शैक्षणिक भ्रातृभावाची प्रेरणा होती. याच योजनेत १९३७ साली सिल्व्हीया व तिचे पती किथ हँडरसन यांनी आपल्या सृजनात्मक शिक्षणाच्या प्रयोगाला प्रारंभ केला. तिने दिलेल्या माहितीनुसार तिचे काम चोवीस वर्ष चालले. पण त्या कामावर आधारित तिच्या टीचर या पुस्तकास तिच्या मायभूमित शेवट पर्यंत प्रकाशक मिळू शकला नाही. शेवटी १९६३ तो अमेरिकेत लाभला ! पुरोगामी शिक्षण चळवळीतील माणसाला आंतरराष्ट्रीय पातळीवर काही संपर्क प्रस्थापित करणे. मान्यता मिळवणे. हे खूपच अवघड गेले असणार पण त्यांच्या स्वतःच्या समाजात तर त्यांना कधीच मान्यता मिळू शकली नाही हे विशेष!

सिल्व्हीयाचे बालपण अतिशय हलाखीत गेले. तिचे वडील अपंग व आजारी होते. ते सदैव चाकाच्या खुर्चीत वा अंथरूणावरच असत. तिच्या आईने ९ मुलांना जन्म देण्याबरोबरच सतत असंख्य शाळेत शिकवण्याचे काम केले. तिची मुलं तिच्या मागोमाग त्या शाळेत जात. हे एकत्र कुटुंब होते. त्यात दुस्वास नव्हता. वाटून घेण्याची वृत्ती होती. घरकाम सर्व मिळून केले जात होते. त्यांच्याकडे एक सदैव सज्ज असा पियानोही होता असे दिसते. पियानो वादन आईला आवडत असे. त्याला ती प्राधान्य देत असे. संगीत, चित्रकला, लेखन हे

सिल्व्हीयाचे छंद बनले. तिला शिक्षक बनणे नकोसे वाटत होते. पण असे दिसते की तिचे शिक्षण व सामाजिक रचना यांनी याच कामासाठी तिची नियुक्ती केली होती.

१९२८ मध्ये १९ व्या वर्षी शिक्षक बनण्याचे प्रशिक्षण संपवल्यावर तिच्यात व्यवस्थे विषयीचा संताप आणि तारुण्याचा आवेग भरलेला होता. लग्नानंतर कदाचित शिक्षकी पेशातून आपली सुटका होईल अशी आशा तिला वाटत होती. त्यासाठी तिने काही पुरूष मित्रांबरोबर या दृष्टीने मैत्री वाढवली. पण त्यांना लग्नात रस नव्हता. काहींना शिक्षिकेशी लग्न करणे नको होते. शेवटी तिने तिच्याच व्यवसायातील एकाशी लग्न केले. या काळातील तिची प्रतिमा साधारणपणे एक गतिमान व्यक्तीमत्वाची आत्ममग्न स्त्री अशी दिसते. दोन विश्वयुद्ध दरम्यानच्या काळातील अनंत असंतोषाच्या लाटा तिच्याही उरात धडकत होत्या. ज्यांना काही विशेष करावेसे वाटत होते. त्यांना संधी नव्हती. स्त्रियांमध्ये त्यांच्या पारंपारीक स्थानाविषयी बंडखोरपणा वाढू लागला होता. परंपरा व अधिकारवादाने मांडलेल्या सर्व गोष्टींविषयी पुरता भ्रमनिरास झालेला होता. असे काय घडले असेल ज्याच्या परिणामी सिल्व्हीयाने शिक्षण क्षेत्रातच सृजनात्मक विकासाची वाट चोखाळण्याचा निर्णय घेतला असेल? आपल्या आयुष्याची पुढची सर्व वर्ष, सर्व शक्ती शिक्षणकार्याला अर्पण केली असेल? काही वर्षांनंतर लिहिलेल्या तिच्या पुस्तकातील मजकूरावरून याचा अंदाज करणे कठीण आहे . तिची स्वतःची मुले हेच पहिले कारण असू शकेल हे उघडच आहे.

लहानपणी सहज उपलब्ध असलेल्या यांत्रिक खेळण्यांमुळे शुष्क झालेली कल्पना शक्ती, पुढे तारूण्यात रेडीओ व सिनेमाव्दारे घेतलेली जीवनाची उसनी ऐट अशा बाह्य कारणाने ज्यांच्या सृजनाचे स्रोतच पूर्णपणे आटले आहेत अशा न्यूझीलँडमधील तरूणांचे वर्णन सिल्व्हीया यात करते. ते खरे तर तिच्या १९३० च्या काळापेक्षा आजच्या काळालाच जास्त लागू पडणारे आहे. न्यूझीलँड असो वा अमेरिका आज सर्वत्र हीच स्थिती आहे. तिला याची चाहूल लागली असणार, जशी मला वा आमच्या सारख्याच मुक्तीवादी शिक्षण पद्धतीच्या पुरस्कर्त्यांना लागली होती.

तीने टॉल्स्टॉयचा उल्लेख केला आहे. रूसोचा शोध घेतल्याचेही ती सांगते. रूसो आम्हा सर्वच मुक्तीवादी शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांचा आद्य प्रणेता आहे. फ्रॉईड व इतर मानसशास्त्रज्ञाचे अबोध मनाचे तत्व दोन विश्वयुद्धा दरम्यानच्या सर्व सामाजिक सिध्दांतांच्या मागे उभे होते. सिल्व्हीयाही डॉ. एरीक फ्रॉमचा व बर्ट्रांड रसेलचा उल्लेख करते. ए.एस. नीलच्या शाळेविषयी तिने ऐकले आहे. तिच्या पुस्तकाला हर्बर्ट रिड यांनी प्रस्तावना लिहिली आहे . त्यांचे कलेतून शिक्षण हे पुस्तक १९४३ ला प्रकाशित झाले होते.

१९२७ पासून १९४३ पर्यंत मीही शिक्षणक्षेत्रातच काम करीत होते. त्यातील पहिली पांच वर्ष बर्ट्राड रसेल बरोबर. मीही लहान मुलांना शिकवण्याचेच काम करीत होते. ज्याला सिल्व्हीया सहज शिक्षण म्हणते त्याच धर्तीवर माझेही काम सुरु होते. आमच्या पद्धतीतील साम्य हा नकलेचा परिणाम नाही किंवा अपघातही नाही. मात्र

हे साम्य मूलभूत आणि लक्षणिय आहे एवढे नक्की. परिस्थितीने सिल्व्हीयाला आम्हा इंग्लडवासियांपेक्षा काही जास्त फायदे मिळवून दिले. ती व तिचे पती यांची मावरीशाळेत शिक्षक म्हणून नेमणूक झाल्याने ती सरकारी मदतीने रचनात्मक काम करू शकत होती. याउलट इंग्लडमधील प्रागतिक शिक्षणवाद्यांना स्वतःचे आर्थिक आधार स्वतःलाच उभे करावे लागत होते. मावरी शाळा कितीही दूरवर वा अडचणीच्या ठिकाणी असल्या तरी गो-यांच्या शिक्षणव्यवस्थेत मावरींना शिक्षण देण्याने संस्कृती संघर्षाची ठिणगी पडतच असे. ज्यामुळे सजग मन त्याकडे ओढले जाणे अपरिहार्य होते.

वसाहतवादी आक्रमक गो-या समाजाला सर्व स्थानिक भिन्नवंशियांना पचवून टाकून त्यांच्यावर आपला धर्म, परंपरा लादायच्या होत्या. गो-यांचा इतिहास बेधडकपणे मावरींच्याही माथी मारला जात होता. असे करतांना या कम अस्सल वंशाच्या, बेबंद जीवन जगणा-यांच्या भूतकाळात शिकण्यासारखे काही असणे शक्यच नाही असा उर्मट आत्मविश्वास गो-यांमधे पुरेपुर भरलेला स्पष्ट दिसत होता. सिल्व्हीया याला अपवाद होती. आपल्या वर्गात प्रवेश करणा-या या मुक्त, स्वच्छंद टोळी समाजातील मुलांमधून तिला न्यूझीलँडचे नागरीक घडवायचे आहेत. पण आपल्या समाजाच्या समकालीन मूल्यांविषयी तिच्या मनात विश्वास नव्हता. ती म्हणते,

“काळे आणि गोरे हे कधीतरी खरोखर समरस होतील अशी मला आशाच नाहीये. त्यांच्यात निदान सामंजस्याचे वातावरण निर्माण व्हावे एवढीच माझी प्रार्थना आहे. आध्यात्मिक, बौद्धिक वा शारीरिक पातळीवर ते एकत्र येऊच शकत नाहीत असे नाही. ते तर मी स्वतःही करून पाहिले आहे. पण हितसंबंधाच्या क्षेत्रात मात्र ते विभागले जातात. प्रत्येकाच्या हितसंबंधाची मांडणी व उभारणी मागील कैक शतकातून झालेली आहे. सर्वसाधारणपणे मावरीना सामूहीक संमेलने आवडतात. खाणेपिणे असो की अध्यात्मिक उपासना. त्यांचे सर्व काही सामूहीक असते. याउलट आम्ही बौद्धिक अंगाने विचार करण्याचे कारण दर्शवत कायमचे एकाकी झालो आहोत. अर्थात हे सर्वसाधारण वर्णन आहे. माझा अनुभव अगदी वेगळा आहे. माझा अगदी जिव्हाळ्याचा संबंध आला तो एका काळ्या व्यक्तीशीच. ”

वर्गात नव्याने प्रवेश करणा-या मावरी मुलां विषयी ती म्हणते.

“पाच वर्षाच्या मावरी मुलांच्या एकदम ओघ सुरू झालाय. ज्यांनी अगदी लहान मुलांना सांभाळले आहे अशा दाईंनाच खरे म्हणजे माझ्या थकव्याचे कारण समजू शकेल. त्यांचे बूट एकेक टन वजनाचे आहेत. आणि त्यांचे चित्त एका ठिकाणी रहाण्याचा काळ फक्त दहा मिनीटे आहे. त्यांचे आवाज जंगली बैलासारखे आहेत. आणि त्यांना शिकवणे ही अजब अनुभूती आहे. अनेक आठवडे त्याने तुमचे ऐकावे हे शिकवण्यातच जातात. प्रत्यक्ष शिकवणे तर दूरच ! युरोपियन शिस्तीच्या चिमट्यात पकडण्यापूर्वी मावरी योद्धे कसे असतील याची कल्पना यावी असेच ते आहेत. अर्थात ते सर्वची सर्व याच प्रकारचे आहेत असे नाही. ”

ती ज्या परिस्थितीचा सामना करते ती समजण्यासाठी तिने लिहिलेले बारकाईने वाचायला हवे. सर्व पुरोगामी शिक्षक हे जाणतात की लहान मुल ही लहान प्राण्यासारखीच असतात. स्फोटक शक्ती सामावलेली, उर्जेने रसरसलेली. सर्व जग आपल्या पंचेद्रियांव्दारे जाणून घेण्याची अनावर ओढ त्यांना असते. त्यांना स्पर्श करायचा असतो. संवाद करायचा असतो. सिल्व्हीया म्हणते, “पाच वर्षाच्या मुलाचे मन साचेबंद प्रतिमांमध्ये अडकलेले नसते हा विचारच किती उत्तेजित करणारा आहे. ” त्या बेबंद योद्धयांच्या हाती ती माती, खडू, फळा देते आणि त्यांच्या स्वैर कल्पनांशी त्यांना भरपूर खेळू देते.ती आत्मविश्वाासाने सांगते, “शाळेत युद्ध आणि शांतता यांची स्पर्धा सुरू असते. खेळण्यांची दुकान बंदुकांनी भरलेली असली. मुलांच्या हातात रणगाडे वा लढाऊ विमाने असली. फळ्यावर चित्र फलकावर, मातीच्या खेळण्यात सर्वत्र युद्ध भडकलेले असले तरी मी त्याची पर्वा करीत नाही. विचलीत होत नाही. माझा संबंध सृजनात्मक शक्तीचा विकास करण्याशी आहे. कारण शाळेतच माणसाला बदलणे शक्य आहे. त्याची सृजनशक्ती एवढी विकसित व्हावी की त्यापुढे संहाराची शक्ती पराभूत झाली नाही तरी किमान तीने त्याला रोखावे तरी. ”

तिचे बछडे वस्तू बनवित, विणकाम करीत, शिवणकाम करीत, गाणी म्हणत, नाच करत, बास्केट बॉल खेळत, चित्र काढत, रंगवित, पियानो वाजवित या सर्वाला दिलेला वेळ अनिश्चित असे. हे सर्व एकाच वेळी सुरू असल्यासारखे असे.

पण ते लिहायला वाचायला शिकत का ? लिहिण्या वाचण्याची विशिष्ट पातळी गाठू शकत का ? यात तिची सहज शिक्षण पद्धती ही अतिशय पायाभूत आहे. कुणाही खेळणा-या मुलाला वाचावे असे का वाटेल? बहुतेक वेळा शिक्षक वा पालक एखादे सुटे अक्षर मुलाला देतात. किंवा एखादा सोपा शब्द, एखाद्या कार्डावर चित्राचित्रासह रंगवून दिलेला. याचा मुलाच्या मनाशी खरेच काही संबंध आहे की नाही याची त्यांना मुळीच कल्पना नसते! सिल्व्हीया मात्र प्रत्येक मुलाला कुठला शब्द कार्डावर लिहून हवा आहे. हे विचारते. तासंतास त्याच्याशी बोलते. मुलाच्या अंतचक्षूपुढे असलेले अक्षर, शब्द तो निवडतो हा शब्द तो ज्याच्या विषयी मनात विचार करीत असतो. त्यातील असतो. चांगला किंवा वाईट, सुखदायक वा दु:खदायक, आई वडील घरी काय करीत असतील त्या विषयीचा विचार असेल. या त-हेने निवडलेले शब्द नेहमीच स्वाभाविकपणे लक्षात रहातात. शिवाय त्यातून त्यांच्या भावनांचेही दर्शन घडत असते. भिती व लैंगिकता याचा प्रभाव खूप जास्त असतो. असे ती सांगते. त्यामुळेच भूत, चुंबन हे शब्द सर्वांकडून जास्त वेळी येतात. दारूड्या हा शब्द बहुधा पालकांच्या वर्तनाची आठवण करून देणारा असतो. शब्द संख्या वाढली की आपोआपच लेखन सुरू होते. लादलेले वाचन हे तिला कृत्रीम वाटते. वाचकाच्या एकसंधपणाला ते खंडीत करते. आणि एकसंध व्यक्तीमत्त्वावरच सर्व गोष्टींची उभारणा होत असते. आतून फु टणारे पाझरच आम्ही गमावून बसतोय याचे तिला दुखः वाटते . कुठल्याही मुलाचे जगाशी

संवाद साधण्याचे सूत्र असते. बाह्य जगाशी जोडणारा त्याचा स्वतःचा पूलच असतो जणू तो. इतर कुठल्याही साधनांपेक्षा त्याचे हे सूत्र अधिक भरवशाचे असते. महत्वाचे असते. हेच आहे सहज शिक्षण, सृजनात्मक शिक्षण. हे नसेल तर मग अगदी साचेबद्ध ठाशीव मनाचे आकार घडतात. न्यूझीलँड वा अमेरिका दोन्हीकडे हेच आढळते. मावरी मुलांसाठी खास सहज शिक्षणाची वाचनमाला तयार करण्याचा तिचा प्रयास अयशस्वी झाला. जेनेट आणि जॉनचे कृत्रीम जगच तेथे मुलांवर राज्य करते आहे. मुलांच्या सृजनशक्तींना गुदमरून टाकते आहे.

तिच्या पुस्तकात तीव्र भावनावेग आढळतो. त्यामुळेच ते विस्कळीतही वाटते. तिच्या शाळेचे रूपही असेच असणार. अगदी छोट्या छोट्या गोष्टीत तीने जे शेरे मारले आहेत तेही लक्षणीय आहेत. उदा. तिच्या वर्गातील मुलांनी काढलेली चित्रे आणि रेखाटने ही परिपूर्ण नाहीत असे ती सांगते. त्याचवेळी इतर शाळेत तयार केल्या जाणा-या सुबक व रेखीव शिक्षण साहित्याविषयी ती तिटकाराही व्यक्त करते. असे प्राणहीन शिक्षण साहित्याचे ढीग फेकून देऊन नव्याने काही करण्याची गरज आहे. असेही सांगते. जगणे हे शिक्षणापेक्षा, ज्ञान मिळवण्यापेक्षा जास्त महत्वाचे आहे. खरे तर जगणे आणि ज्ञान मिळवणे एकच असायला हवे.

मुले भावी काळात युद्ध वा शांतता यापैकी कशासाठी तयार होतील याची पायाभरणी शिक्षणव्यवस्थेत होते. सिल्व्हीयाच्या पद्धतीने मुले शांततेच्या दिशेने वळतील असा विश्वास सर हर्बर्ट रिड यांनी आपल्या प्रस्तावनेत व्यक्त केला आहे. बर्ट्रांड रसेल यांनीही अशीच आशा प्रकट केली होती. “मुलांना आनंदी वातावरणात स्वातंत्र्य व सृजनाच्या दिशेने जाणारे शिक्षण दिले तर मग भावनात्मक प्रगल्भतेने, आत्मविश्वासाने ही मुले आपल्या समाजातील शोषण, जुलूम, आर्थिक विषमता, भाषण स्वातंत्र्याची गळचेपी, युद्ध आणि पोकळ ढोंगी मूल्ये यांचा अंत घडवतील. ”

या दोन लक्षणीय बुद्धीवंताचा पाठींबा हा भावना व बुद्धीच्या संगमातूनच उगम पावला. मी व सिल्व्हीया दोघीही आदीम मातृत्व शक्तीच्या प्रेरणेतून आपल्या पुढील पिढीला फुलवण्याचे काम करीत आलो. दोघींनाही सहज प्रेरणांना दडपणारी बौद्धीक शिस्त नकोशी वाटत आली. हा काही बुद्धीच्या वापरावरील हल्ला नाही. आमचा विरोध बुद्धीच्या गैरवापराला आहे. नैसर्गिक प्रेरणांच्या बंधनातून सुटण्याचा निश्चय केल्यापासून माणूस नैसर्गिक प्रेरणांपासून दूर असलेल्या उद्योगात गुंतत गेला. स्त्रिया जेव्हा पुरूषांचे अनुकरण करू लागल्या तेव्हा त्यांनीही असेच केले. पण नैसर्गिक सहज प्रेरणांपासून दूर जाण्याच्या या प्रयत्नाने आम्ही एका आंतरीक संघर्षाला जन्म दिला. त्यातूनच मग आमचा इतरांशीही संघर्ष सुरू झाला. ही चूक अन्य प्राण्यांनी केलेली नाही. आता तर आपल्या अपत्यांची जोपासना करण्याच्या मूलभूत प्रेरणेपासूनही मनुष्य दुरावू लागला आहे.

आपली उत्पत्ती ज्या प्राणी जीवनातून झाली त्यातच माणसातील वाईटाचा उगम आहे असे आपण मानले आहे. पण खरे तर यातूनच आपल्यातील सदगुणांचा आविष्कार झाला आहे. सेवाभाव, सामाजिक ऐक्य,

विध्वंसापेक्षा सृजनात्मक प्रेरणांचा भावनांचा विकास हे यातूनच आले. प्राणीही त्यांच्या आक्रमकतेला आवर घालण्याचे मार्ग अवलंबतात. शिक्षणातून यंत्रमानव तयार होऊ नयेत अशी सिल्व्हीयाची आंस होती. शिक्षणातून मनुष्यत्वाचा विकास करण्यावर तिचा विश्वास होता. तिच्याशी जे सहमत असतील त्यांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की, हे त्याच वेळी साध्य होईल ज्यावेळी आम्ही मनुष्यमात्रांना सर्व विश्वाचा एक भाग समजू .विश्वाचा एक भाग, श्रेष्ठ भाग नव्हे! कारण या सृष्टींची रचना सर्वच प्राणीमात्रांना आधार देण्यासाठी झाली आहे. केवळ मनुष्यमात्रांसाठी नव्हे.

डोरा रसेल कार्नवॉन १९८०

## भूमिका

हे एक महत्वाचे पुस्तक आहे. इतिहासात आजच्या क्षणी एखादे पुस्तक जितके महत्वाचे असू शकेल तितके महत्वाचे. सिल्व्हीया ॲस्टन वॉर्नर यांचा असा विश्वास आहे की त्यांनी अशी शिक्षण पद्धती शोधली आहे. जिच्यामुळे मानवजात उत्स्फूर्तपणे, स्वाभाविकपणे शांततावादी बनेल, असा त्यांना विश्वाास आहे. आक्रमकता हे माणसाचे उपजत वैशिष्ट्य आहे. ज्याच्या शिवाय युद्ध उदभवूच शकत नाहीत. व उदभवले तर फार काळ चालूही शकत नाही. आक्रमकता ही बालपणीच्या काळातील वैफल्याची भावनिक प्रतिक्रिया आहे. हे वैफल्य बालकामधील दोन सहज प्रेरणांचा दमनातून जन्मते. या दोन सहजप्रवृत्ती आहेत. आत्मरक्षण व लैंगिक समाधान. जगभर शिक्षण म्हणून जे काही सुरू असते त्यात या दोन प्रमुख प्रवृत्तींची पूर्ण उपेक्षा केली जात असते. खरे तर या दोन प्रवृत्तीचे सहज अस्तित्व मान्य करायला हवे. एवढेच नाही तर पुढे जाऊन त्यांचे दमन न करता स्वागत करून त्यालाच सहज शिक्षणाचा पाया बनविला तर या दोन प्रेरणांना वाट तर मिळेलच व उलट त्याला सृजनात्मक आकारही देता येईल. सृजन व विध्वंस या दोन परस्पर विरोधी शक्ती आहेत. रचना करणे म्हणजे निर्माण करणे ही प्रक्रिया अन्यांच्या सहकार्यावर अवलंबून असते. त्यामुळे सहकार्यावर आधारीत समाजरचना होऊ शकेल.

आपल्या समाजात आढळणा-या अनेक समस्यांची चिकित्सा करतांना अशा कल्पना मांडल्या जातात. यात नवीन काही नाही. फ्रॉईड व युंगच्या मानसशास्त्रीय संशोधनातही हे अनुस्यूत आहे. त्यांच्या शिष्यांनी याचे इतके पुरावे गोळा केले आहेत की ते आपल्या समाजावरचे बिनतोड आरोपपत्र बनले आहे. पण या जागतिक पातळीवरील मनक्षोभावरील उपायाची सुरूवात कुठून करायची हा खरा प्रश्न आहे. शिशुवर्गात. ( मी तर म्हणेन याहून आधी सुरूवात करा. पण जोपर्यंत मुलांची मन अजून मऊ मातीसारखी आहेत तोपर्यंत तरी उशीर करू नका )

सर्जनशील शिक्षणाचे खूप मार्ग प्रचलित आहेत. पण ते बहूधा अपयशी ठरले आहेत. कारण ते सहजपणे उदभवलेले नव्हते. हेतुतः लागू केलेले होते. शिक्षकांच्या दृष्टीकोनातून लागू केलेले. सिल्व्हीया वॉर्नर यांनी हे ओळखले की शिक्षण ही सहज अभिव्यक्ती आहे. शिक्षकांचे वर्तन कसे असावे. या संबंधी त्या विवेचन करतात. मर्यादा आखून देतात आणि परिणामकारक शिक्षणाचा धडा घालून देतात. शिक्षकाकडे स्वतःमागे रहाण्याची वृत्ती असायला हवी. किंवा त्याने ती विकसित करायला हवी. किटस जसे कवींबाबत म्हणतो, “कवीने काव्यात उपस्थित असू नये”, तसे शिक्षकाने वर्गात असूनही वर्गात असू नये. विद्यार्थ्यामधील क्षमतांचे प्रकटीकरण होण्यासाठी त्याला जागे करण्यासाठी तेथे असावे पण जोपर्यंत त्याचा स्वतःचा शब्द त्याला सापडत नाही तोपर्यंत शिक्षकाने वाट पहावी. त्याला खूपच धीराची वृत्ती हवी. ऐकण्याची तयारी हवी. वाट पहावी लागेल निरिक्षण

करीत रहावे लागेल. जोपर्यंत मुलाला त्याच्या विचारांची अचूक अभिव्यक्ती करता येत नाही तोपर्यंत ही अभिव्यक्ती कधीकधी वेड्यावाकड्या शब्दात होईल, कारण तो ज्या कौटुंबिक पार्श्वभूमितून आला आहे त्याचा तो परिणाम असेल. शिवाय पालकांकडून त्याला जसा शारीरिक रचनेचा वारसा मिळालाय तसाच मानसिक ठेवणीचाही वारसा मिळाला आहे. पण या अबोध पातळीवरील प्रेरणाच्या जोमामुळेच शिक्षण खूपच सोपे होते. सहज होते. त्याच्या व्यक्तीत्वातून ते उलगडत जाते. अपरिहार्यपणे. एखाद्या भौतिकशास्त्राच्या नियमाप्रमाणे.

शिक्षकाचे काम या कार्यान्वित सृजनशक्तीच्या प्रवाहाला योग्य दिशेने नेणे एवढेच उरते. अर्थातच ही काही नवीन कल्पना नाही. जुनीच आहे. अगदी प्लेटोच्या काळाइतकी जुनी. परंतु माणसांनी ही संकल्पना शिक्षण क्षेत्रात लागू करण्याची इच्छाशक्ती वा प्रग्लभता कधी दर्शविली नाही. परंतु खरेतर ही अंतर्दृष्टी प्रत्यक्षात यशस्वीरित्या वापरता येते. या पुस्तकात याचे प्रत्यक्ष दर्शन आपल्याला घडते. इथे याचा वापर एक विशिष्ट जमातीसाठी क्रमाक्रमाने केलेला दिसतो.

मिस वॉर्नरने ज्याला शिकवले आहे अशा कुठल्याही मावरीमुलाला प्रत्यक्ष भेटण्याचे भाग्य मला दुदैवाने लाभले नाही. पण पुस्तकाच्या दुस-या भागात मिस वॉर्नर यांनी कथन केलेल्या अनेक गोष्टीतून यातील तथ्य आपल्या समोर अगदी स्पष्टच होते. लेखिकेला कथनाची सुरेख शैली आहे. हे तिच्या या आधीच्या Spinster या कादंबरीवरून दिसते आहेच. इथेही ती शैली तर प्रभावी ठरते आहेच पण ... ...

... पण इथे तिचे कथन काही वास्तव घटनांवर आधारीत आहे. हे पुस्तक म्हणजे शिक्षणशास्त्रावरील, बालशिक्षणावरील शोध प्रबंध नाही तर एक समाजशास्त्रीय आरसा आहे. हे हलवून टाकणारे पुस्तक आहे. ज्याचा सर्व शिकवणा-यांना फायदा होईल. मी शिकवणा-यांना म्हटले. शिक्षणाला, शिक्षणव्यवस्थेला नाही. शिक्षणाने आपला संदर्भ कधीच गमावला आहे. अर्थही गमावला आहे. (दुस-याच्या मनातले काही वर आणण्याबाबतचे सामर्थ्य गमावले आहे हेच मिस वॉर्नर सांगत आहेत. ) लेखिकेच्या परिभाषेत शाळा काय असायला हवी ? ती एखाद्या शिशुवर्गासारखी असावी जिथे माणसांना बदलायला, घडायला अजून संधी असेल. सृर्जनशील क्रियेमधून हा बदल वास्तवात येऊ शकेल. मनुष्य जातीला काहीतरी भवितव्य असायला हवे असेल तर या सर्वांचा विचार करायलाच हवा. म्हणूनच हे पुस्तक कितीही विस्कळीत वाटले अशास्त्रीय वाटले तरी ते पायाभूत काम करणारे महत्त्वाचे पुस्तक आहे. आत्मनाशापासून मानवतेचा बचाव करण्याचा मार्गच लेखिकेने शोधला आहे. असे म्हणण्यात जराही आतिशयोक्ती नाही. आपण तिच्या पद्धतीची उपेक्षा करता कामा नये. तीच्यात दिखावू आकर्षकता नाही. त्यामुळे असे होवू शकते. पण आपण हे लक्षात ठेवले पाहिजे माणसाच्या नियतीला बदलण्याचे सामर्थ्य फक्त लहान मुलाच्या मनात असते.

हरबर्ट रिड

## हिंदी आवृत्तीची प्रस्तावना

मुलांच्या शिक्षणाविषयी विसाव्या शतकात लिहिल्या गेलेल्या पुस्तकांमध्ये सिल्व्हीया एश्टन वॉर्नर यांच्या पुस्तकाचे स्थान विशेष वेगळे खास आहे. हिंदीत याचा अनुवाद होण ही निश्चितच महत्वपूर्ण घटना आहे पण त्याचे महत्व जाणण्याइतकी संवेदनशीलता, जागरूकता, सजगता मात्र हिंदी भाषिकांमध्ये आढळत नाही. किंबहूना पूर्ण भारतभरच या संवेदनशीलतेचा अभाव जाणवतो. आमच्या देशात शिक्षणा विषयीची संवेदनहिनता खूपच खोलवर गेलेली आहे. चैतन्यशून्य दगडासारखी ही व्यवस्था अचल बनली आहे. त्यामुळे सृजनात्मक नव विचारांचे संवर्धन तर सोडाच त्याचे स्वागत करणेही काही मूठभरांचेच स्वप्न होऊन बसले आहे. अर्थात व्यापक परिवर्तनाचे बीज नेहमीच छोट्या छोट्या गटातच रुजते हेही खरे आहे. रचनात्मक शक्तीचा जन्म आणि विकास हे एक गूढच आहे, असे सिल्व्हीया वॉर्नर म्हणतात. त्याची साक्ष त्यांच्याच पुस्तकांत आपल्या मिळतेही.

तस पाहिल तर हे पुस्तक एका शैक्षणिक प्रयोगाची कहाणी आहे. याच रूपात ते पाश्चिमात्य देशात प्रसारीत झाले आहे. पण हे पुस्तक कहाणीच्या स्वरूपात लिहिलेले नाही किंवा तो एक अहवाल तर मुळीच नाही. हे वाचकांना जाणवतेच. एका मूलभूत विचारांच्या आधारे आपल्या शिशुवर्गाच्या पाठ्यपुस्तकांची रचना लेखिकेने कशी केली याचे उत्तर या पुस्तकात मिळते. कधी छोट्या छोट्या टिपण्यांतून, कधी डायरीतील उता-यातून, कधी संवादातून. सिल्व्हीयाची शिकवण्याचीच नव्हे तर पुस्तक लिखाण्याची शैलीही वाचकांना धक्का देणारी आहे. विस्मयचकीत करणारी आहे. विशेषत: शिक्षण क्षेत्राशी कुठल्यानकुठल्या रूपाने जोडलेल्यांना तर ती धक्कादायक वाटेलच.

आमच्या समाजात शिक्षक एका बौद्धीक पारतंत्र्यात काम करत असतात. शिक्षण क्षेत्रामधील कुठल्याच निर्णयात त्यांचा सहभाग नसतो. त्यांना मत नसते. ना पाठ्यक्रम निर्धारणात,ना शाळेसाठीच्या पुस्तक खरेदीत, ना शाळेच्या दैनंदीन कार्यक्रम आखणीत. कुठेच त्याला स्थान नसते. हे सर्व निर्णय अध्यापकांच्या डोक्यावर स्वार झालेले अधिकारी घेतात. खरंतर हे निर्णय एका गूढ प्राचीन लिपीत लिहिलेल्या शिलालेखा सारखे आहेत. अपरिवर्तनीय व अनाकलानीय. काही किरकोळ दुरूस्त्या करून हे नियम वर्षानुवर्ष कोट्यवधी विद्यार्थी व शिक्षक यांचे जीवन नियंत्रित करीत असतात ही एक क्रूर थट्टाच आहे.

या पार्श्वभूमिवर लहान मुलांना शिकवण्यासारखे मूलभूत महत्त्वाचे कामही एखाद्या शुष्क कर्मकांडासारखे बनून जाते. सिल्व्हीयाच्या शिक्षण शास्त्राचे केंद्र खरे तर लहान मुलांना लेखन वाचन शिकवणे हेच आहे. मावरी या न्यूझीलँडमधील आदिवासी मुलांना लेखन वाचन शिकवण्याचा सिल्व्हीयाचा हा रोमांचक अनुभव वाचता वाचता आपल्यालाही हा साक्षात्कार होतो की, लिहिणे वाचणे ही किती सहज होणारी घटना आहे. किती रोचक आहे. एरवी वर्णमाला शिकवण्याबरोबरच मुलांच्या व्यक्तीमत्वाची अवहेलना करण्याची ही साखळी कशी सुरू होते. हे

आपल्या समोर उलगडते. बी एड, डी एड या सारख्या शिक्षणशास्त्रातील नित्य चालणा-या वितंडवादाचे वैयर्थ्य क ळते. अपुरे व विकृत शिक्षण हे मनुष्य जीवनाला कसे शापवत ठरते हे सत्यही आपल्यासमोर प्रकटते. सिल्व्हीया वॉर्नर म्हणतात त्या प्रमाणे रचना व संहार या मनुष्याच्या उर्जेच्या दोन दिशा आहेत. जी उर्जा रचनेच्या दिशेने जात नाही ते विध्वंसाचा मार्ग पत्करते.या निवडीचा पाया लहानपणीच घातला जातो. लिहिण्यावाचण्याची एक अगदी सहज, मुक्त व उर्जस्वल अशी पद्धती सिल्व्हीया यांनी तयार केली आहे.

इंग्रजी भाषेत हे पुस्तक ३५ वर्षापूर्वी प्रकाशित झाले होते. लेखिकेच्या स्वतःच्या देशात न्यूझीलँडमध्ये या पुस्तकाचे फारसे स्वागत झाले नाही. पण इंग्लड व अमेरिकेन याचा परिणाम खूप दूरवर पसरला. लेखन वाचन शिकवण्याच्या रूढ पद्धती उखडून नव्या पद्धती स्थापन करण्याबरोबरच बालकांशी संवाद कसा प्रस्थापित करावा हेही यातून शिक्षकांना शिकायला मिळते. मुलांचा विश्वास मिळविल्याशिवाय त्यांना शिकवता येत नाही हा सिद्धांत आणि असा विश्वास प्राप्त करण्याचे विविध मार्ग याचे दिग्दर्शन ही या पुस्तकाची मुख्य दोन आकर्षणे आहेत. आपल्या शिक्षण व्यवस्थेतच्या संदर्भात हे आग्रह आपल्याला स्वप्नवत वाटले तरी काही जणांच्या हातून तरी याचे सार्थक होईल अशी आशा आहे.

कृष्णकुमार

“वाचणे हीच केवढी प्रलयंकारी गोष्ट आहे. आणि शिकवणे ही देखिल तशीच भयंकर गोष्ट आहे.  परक्या गोष्टी थापण्याचे हे काम. हे लिंपणे थापणे का चालले आहे? खरे तर आत किती तरी आश्चर्य ओतप्रोत भरलेली आहेत. आत बंदिस्त केलेली ही शक्ती मी बाहेर काढून वापरू शकले तर ? बाहेरही काढायची गरज नाही. त्याला स्पर्श करणेही पुरे आहे. एखाद्या ज्वालामुखीसारखे ते उसळून बाहेर येईल. मानसिक शक्ती ही जगातील कुठल्याही शक्तीपेक्षा जास्त मोठी असते असे मी नुकतेच सकाळी वाचले होते. काय उत्तेजित करणारा आणि थरकाप उडवणारा अनुभव असेल तो. जे आज नुसते झिरपते आहे. ते ही किती विस्मयचकीत करणारे आहे. कुणाही निरिक्षकाची छायाही पडणार नाही अशा ठिकाणी माझ्या पापण्याआड मी शिशुवर्गाचे जे रूप पहाते. ते विस्फोटक ज्वालामुखीचेच असते. ज्यातून सृजनाची धडधड ऐकू येते आहे. सर्व विषय क्रियावान सृजनशील वाहिनीतून येणारे. किती सुरेख चित्र आहे त्या चंचल मनोवस्थेचे ! रेशमी ढगांचे किती मोहक वर्तन.

एक उत्स्फूर्त आकार, वाढता, बदलता आकार. एक निरोगी आणि सहज आकार, भावनारहित, प्रक्षुब्ध निष्ठूर आणि भितीदायक वाटावे इतके सुंदर दृष्य! ”

स्पिंस्टर

## प्रस्तावने नंतर सात वर्षांनी

सात वर्षांनी मी शांतपणे ते पुन्हा आठवू शकत नाही. सात वर्षांनी त्या डुगडुगत्या शिशुशाळेत घडलेल्या घटनांकडे पहातांना मला शांतपणे त्याचा आंनद लुटता येईल असे मला वाटले होते. किंवा मला त्यात खूप चुका दिसतील ज्या दुरूस्त कराव्यात असे वाटेल. पण यापैकी काहीच घडले नाही. मला जाणवले मी आनंद घेऊ शकत नवहते. तटस्थपणे पाहू शकत नव्हते. त्या निर्मितीचा ताप मला पुन्हा चढत गेला. आणि मी त्या नाट्यात ओढले गेले. रक्तात भिनलेले एक असे नाट्य ज्यात सर्व काही खरेखुरे, जिंवत होते. मोठी माणसे लहान मुले सारे सारे जिवंत. पुन्हा जसेच्या तसे.

पुढील पानांमधून काही गोष्टी वगळल्या गेल्या आहेत. उदा. शिस्तीविषयी मी काहीच लिहिलेले नाही. माझ्या जुन्या शिशु शाळेतील वर्णनावरून शिक्षकांना अव्यवस्थेची रास्त शंका येऊ शकते. ज्यात मुलांना बोलण्याचे आणि हालचालीचे मुक्त स्वातंत्र्य आहे. अव्यवस्थेचे काही फायदे असतातच जे आम्ही शिक्षण व्यवस्थेत येऊ देत नाही. अव्यवस्थेत नियंत्रणाचा अभाव गृहित आहे. उलट नियंत्रण हा माझा मूळ हेतू आहे. एका शाळा तपासनिसाने म्हटल्याप्रमाणे नियंत्रण म्हणजे ‘तुम्हाला हवे तेव्हा तुम्हाला मुलांचे लक्ष वेधून घेता येणे. ’

मला नेहमीच मुलांचे लक्ष वेधून घ्यावे लागे आणि हे करण्यासाठी मी एक वेगळाच उपाय शोधला होता. मी मुलांना जे शिकवले ते फारसे नवीन नसले तरी त्याचा वापर ज्या पद्धतीने केला ते नवीन होते. वर्गाचे लक्ष वेधून घेण्यासाठी सर्वसाधारणपणे शिक्षक काही ठराविक मार्ग वापरतात. काही घंटी वाजवतात. काही टेबलावर रूळ आपटतात. बहुसंख्य जण आपला आवाज वापरतात. पण जिथे कोलाहलावर कुठलेही बंधन नाही अशा या आमच्या शाळेच्या वर्गात त्यासाठी खूपच उंच पट्टीत बोलावे लागेल. आणि हा टिपेचा स्वर शिक्षकाच्या मृदूप्रतिमेशी एकदम विसंगत ठरेल. हे जाणून मी माझ्या आवाजाऐवजी संगीताच्या सुरावटीचा उपयोग करायचे ठरवले. ही सुरावटही तार सप्तकातील नाही. तर एका जगप्रसिद्ध संगीतकाराच्या आठ कोमल स्वर लहरींची. बिथोवेनच्या पाचव्या स्वरमेळातील पहिल्या आठ स्वरलहरी. त्यांच्यासाठी जे उत्तम परिणामकारक ठरले होते ते माझ्यासाठीही ठरू शकते असा मला विश्वास होता. त्यांना तर हजारो लोकांचे लक्ष वेधून पुढची सुरावट वाजवायची असे. मला केवळ माझी काही वाक्य मुलांनी ऐकावी एवढाच अवकाश हवा असे. पुढे या आठ स्वरलहरी दिल्या आहेत. मी माझ्या मुलांना शिकवले होते की या स्वरलहरी ऐकताच ते जे काही करीत असतील ते थांबवून त्यांनी माझ्याकडे लक्ष द्यावे. माझ्या गरजेतून मी त्यांना हे शिकवले होते. पण कधी कधी मी मजेनेही हे करीत असे. आणि त्या प्रफुल्लीत शाळेत ही सुरावट छेडली रे छोडली की इतर सर्व आवाज शाळेबाहेर खेचले जात. एखाद्याच्या शरीरातील रक्त खेचले जावे तसे. हे पाहून मी नेहमीच चकीत होत असे. नुसती शांतता नाही एकदम स्तब्धता. सर्वांची नजर माझ्यावर खिळलेली. हात मी सांगेल ते करण्यास सिद्ध. ही उच्च पातळीवरी शांतता, एका

कोमल सुरावटीतून जन्मलेली.माझे हे लक्षवेधी उपकरण मी कसे लखलखीत करून ठेवले आहे. माझ्या सर्व साहित्यातील सर्वात महत्वाचे आणि अपरिहार्य.

काय सांगतो यापेक्षा कसे सांगतो याला खूप महत्व आहे. तुम्ही कितीही महत्वाची गोष्ट सांगत असलात तरी ती कुणी ऐकलीच नाही तर त्याचा उपयोग काय ? किंवा नुसती ऐकली पण जाणवलीच नाहीतरी उपयोग काय ? ऐकणे आणि जाणवणे यासाठी पूर्ण लक्ष असणे गरजेच असत.

नाच, गाणे, मस्ती यांनी भरलेल्या खोलीत, एका कोप-यात बसलेले मूल ही छोटी सुरावट कशी काय ऐकू शकत असेल ? अस तुम्हाला वाटू शकते. याचे उत्तर कुठलाही शिक्षक देऊ शकतो. पियानो नजीकच्या मुलांना ही सुरावट प्रथम कानी येते. ते तात्काळ इतरांना खुणावतात. आणि ही लाट खोलीभर पसरते, एखाद्या तरंगासारखी. हा तरंग परिघाला स्पर्श करीपर्यंत शेवटी शांतता निर्माण होते. सुरावटीचे शेवटचे सूर विश्राम पावतात, तोपर्यंत मुलांमधील गोंगाट ही विराम पावतो. त्या शांत स्तब्ध वेळा मला अविस्मरणीय वाटतात.

न्यूझीलंडमधील शिक्षकांनी शाळेला भेट देऊन पत्र लिहून दिलेल्या प्रोत्साहना बद्दल मी येथे कृतज्ञता व्यक्त करते. परदेशातील विद्यापीठांनी दाखविलेल्या औत्सुक्या बद्दल व कृतीबद्दलही मी आभारी आहे. माझ्या शाळेत तुम्हाला प्रत्यक्ष शिकवतांना मला जास्त आवडले असते. ते प्रशिक्षण केंद्र झाले असते तर आवडले असते. तुम्ही सर्व जण तेथे मुक्कामी राहून गटागटाने शाळेत येऊन पहाता आहात अशी स्वैर कल्पना मी करते. पण इच्छा कल्पना कितीही स्वैर असली तरी त्यालाही मर्यादा येतात. म्हणून असे प्रत्यक्षात कधी होऊ शकत नाही. पण तरीही इच्छा अमर असतात. आणि म्हणूनच सात वर्षानंतरही त्या माझ्या मनात तशाच आहेत.

ही सृजनात्मक शिक्षण योजना मी परत वाचलेली नाही. जर मी तो धोका पत्करला असता तर पुनर्लेखन, पुनर्घटन, पुनर्चिंतंन असे सारेच पुन्हा करावे लागले असते. मला हे करायच नव्हते. हे मी लिहिले तेव्हा ते या स्वरूपातच मला योग्य वाटल होते.

खरे तर स्मृतिशी कोण खेळू शकतो? त्या काळची ती मोहकता नंतर बदलता कशी येईल ? आणि भूतकाळातल्या उन्मत्त लाटांना परत कोण उठवेल ? त्यांची आठवणच पुरेशी आहे. एक खरा शिक्षक तर फक्त शिकवतो आणि पुढे जातो.

**लिहिणारी बोटे पुढे सरकतात**

**लिहित लिहित पुढे जातात,**

**तुमची सहानुभूती वा चातुर्य त्यांना**

**अर्ध्या ओळीवर थांबवू शकत नाही,**

**तुमचे सगळे अश्रू त्याचा एक शब्दही पुसू शकत नाही.** सिल्व्हीया ॲस्थान वॉर्नर

# माझ्या अमेरिकन प्रकाशकास पत्र

प्रिय बॉब,

आज सकाळी तुझे पत्र मिळाले. प्रस्तावनेचा मी थोडा विस्तार करावा असे तू सुचविले आहेस. पण ते मला शक्य नाही. याची तीन कारणे आहेत. ती प्रस्तावना माझ्या देशात माझे पुस्तक प्रसिद्ध करणा-या प्रकाशकासाठी लिहिली होती. ज्याच्याकडे माझ्या लेखनाविषयी आस्था आणि उत्साह असेल असा न्यूझीलँडमधील प्रकाशक. पण तो मिळूच शकला नाही ! इतर अन्य आशा प्रमाणेच ही देखील वांझच ठरली. जेव्हा कलावंत काही नवजात कल्पना मांडत असतो. तेव्हा त्या लाव्हासारख्या असतात. उष्ण आणि प्रवाही. त्या कुठलाही आकार ग्रहण करू शकतात. विश्वनिर्मितीच्या काळात जसे उष्ण वायूंचे पुंज विश्वातील अन्य शक्ती स्त्रोतांच्या परिणामी काही आकार धारण करतात तसे. पण काही काळाने ते थंडावतात आणि एक निश्चित आकार धारण करून ग्रहमालिकेत स्थापित होतात. त्यांचा आकार आता अपरिवर्तनीय असतो. अंतिम आकार. दुसरेही एक कारण आहे. जे जास्त समजू शकण्यासारखे आहे. मी प्रस्तावनेची पुनर्रचना करू शकत नाही. कारण तसे करायला गेले तर मला अतिशय रडू येईल.

तरीही तुझ्या काही प्रश्नांची मी उत्तरे देऊ शकेन. काही निखळ वास्तविक तपशीलाच्या नोंदी तुला तुझ्या अमेरिकन वाचकांसाठी हव्या आहेत. उदा. हे नक्की कधी सुरू झाले ? तुझा पहिला सवाल.

कधी बर सुरू झाल हे काम ? केव्हा मी माओरींचा बालकडीत पहिल्यांदा डोकावले ? मोजू या का ? चार, आठ, चार अधिक आठ म्हणजे बारा. आणि चार म्हणजे सोळा, आणखी चार म्हणजे वीस, पुन्हा चार बरोबर चोवीस. चोवीस वर्षापूर्वी. आणि सात वर्षापूर्वी ते संपले. जेव्हा मला सहज शब्दावलीची जादूची किल्ली सापडली. मला सापडली की ती माझ्यासमोर प्रकटली ? तो साक्षात्कार विलक्षण होता. वीज चमकल्यासारखा. त्या प्रकाशात मी शिशुशाळतील डागाळलेले, चिरखडलेले टेबल पाहिले, फळे पाहिले आणि पॉलीश उडालेली लाकडी तक्पोशीही पाहिली. सगळे काही वीजेच्या पांड-या शुभ्र प्रकाशात उजळलेले.

माझी त्यावेळची परिस्थिती कशी होती ? ते सगळ तुला यात मिळेल. या प्रश्नांचे उत्तर शेवटी दिलेल्या डायरीतील उता-यांमध्ये मिळेल.

किती काळ हे चालले असेही तू विचारले आहेस. मी सांगितलेच चोवीस वर्ष. किती मुल सहभागी होती ? सुरूवातीला नऊ किंवा दहा. जी नंतर वाढत वाढत सत्तरपर्यंत पोचली. आणि ही सहज शब्दावली जेव्हा माझ्या डुगडुगत्या शाळेत प्रकटली तेव्हा पन्नास मुले होती.

माझ्या कल्पनांचा विकास कसा झाला याचे वर्णन करायला तू पुढे सांगितले आहेस. न्यूझीलँडमधील शिक्षण व्यवस्थेवर त्याचा काय परिणाम झाला ते ही तुला जाणून घ्यायचे आहे. हे अमेरिकन वाचकांसाठी

आवश्यक असल्याने मी नकार देऊ नये असा तुझा आग्रह आहे. न्यूझीलँडमध्ये या कल्पनांचा स्वीकार कसा झाला तेही सांग अस तू म्हणतोस. माझा दीर्घ सुस्कारा तुला प्रशांत महासागराच्या पलिकडेही ऐकू आलाय की काय ?

माझ्या या कल्पनांचा विकास कसा झाला ? कल्पना विकास पावतात हे मला खरच माहित नाही. माझ्या लेखी त्या फक्त अवतीर्ण होतात. आपण अचंबित होतो. कृतज्ञतेने त्याचा स्वीकार करतो. बस एवढेच न्यूझीलँडमध्ये माझ्या कल्पनांचे स्वागत असे झाले. या तुझ्या प्रश्नांच्या उत्तरार्धा बाबत बोलायचे तर .. ..

आमचा देश एका छोट्या कुटुंबासारखा आहे. आम्ही न्यूझीलँडवासी इतर लहान देशांपेक्षा अधिक घट्ट विणीने बांधलेले असतो. महासागराने वेढलेले असल्याने किंवा अगदी जगाच्या तळाशी असल्याने म्हणा. सगळ्याच कुटुंबात निष्ठेचे प्राबल्य असते. काही कुटुंबात कलह माजतात. काहीत नाही. पण सर्वच कुटुंबात एक आलीखित कायदा असतो. जो सर्वांनाच ठावूक असतो. कुटुंबातील कलहाविषयी कुणीही बाहेर बोलायचे नसते. तो निष्ठेचा आणि सन्मानाच मुद्दा असतो.

एकदा एका स्त्रीने मला सांगितले होते की तिच्या कुटुंबात कधीच भांडणे होत नाहीत. त्यावेळी मी तरूण होते. आणि मुले ही लहान होती. तीचे म्हणणे ऐकून मी खूपच प्रभावित झाले. मी जर माझ्या कुटुंबाविषयी असे म्हणू शकले असते तर .. असे मला वाटे पण आता मी प्रौढ स्त्री आहे. आणि मला जास्त उमजतेही आहे. मी जेव्हा त्या भांडण रहित कुटुंबाकडे आता पहाते तेव्हा मला त्याच्यातील थंड क्रियाशून्यता जाणवते. ते जडावलेले डोळे. ज्यात कुठलीच चमक नाही. पालकांच्या चेह-यावर अश्रूंचे ओघळ नाहीत. आता मला उतजले आहे की भांडण करण्यासाठी अनिवार ऊर्जा व ओढ असावी लागते. एकदम भव्य प्रमाणात. मोठी भांडण, उदात्त मीलन, दुखावणे आणि भरून येणे दोन्ही भव्य प्रमाणात.

आम्ही न्यूझीलँडवासी खूप भांडतो. अगदी खरच सकाळ सांयकाळी, दिवस रात्र आम्ही झगडतो. डावीकडून, उजवीकडे, मागेपुढे, उलटसुलट, माथ्यापासून तळापर्यंत, सर्वगामी सर्व दिशाव्यापी.

एक अतिशय गुंतागुंतीचा क्लिष्ट, थकवणारा सतत भांडणाच्या जाळ्यात गुरफटलेला हा आमचा देश आहे. असाच तो पुढेही रहाणार आहे. जोपर्यंत आमच्या या गरम रक्तपेशी काहीशा थंड होत नाहीत. त्यामुळेच इथे तीव्र ओढ आणि तीव्र ऊर्जा आहे. शौर्य आणि वीरत्व आहे. रोज सकाळी येणा-या वर्तमानपत्रा इतक्या नियमितपणे येथे बोटचे पेपणा वा कोमट सामान्यपणावर इथे तीव्र हल्ला होतो. नव्या उन्मादी कल्पना मांडल्या जातात. ज्या एकत्र येऊन स्फोट होतात. आकाशागंगेत होतात तसे. दक्षिण आकाशागंगेत.

बॉब, आम्ही भांडतो, खूप भांडतो. आपल्या गैरसमजुतींसह इतक्या उत्साहाने जगणारा दुसरा देशच मी पाहिलेला नाही. पण आम्ही आमच्या भांडणांविषयी बाहेर बोलत नाही. आमच्या निष्ठा कालातीत आहेत आणि सर्व कालातीत नियमांचे आम्ही पालन करतो. त्यामुळे तू विचारलेल्या काही गोष्टी अशा आहेत की ज्याला मी उत्तर देऊ शकणार नाही.

सर्जनशील शिक्षण व्यवस्था हे खरेच की गेली सात वर्ष मी हे माझ पुस्तक न्यूझीलँडमध्ये प्रकाशित व्हावे यासाठी प्रयत्न करीत होते. गेली सात वर्षे ते माझ्याजवळ आहे आणि मी पुन:पुन्हा आशावादीपणे चिकाटीने प्रयत्न करतेय. कौटुंबिक निष्ठांनी बद्ध होऊन खिळून राहिलेली सात वर्ष. हे सर्व माझ्या देशात माझ्या डोळ्यासमोर प्रकाशित व्हावे अशी माझी दृढ इच्छा होती. अगदी स्वार्थीपणे म्हणा हवे तर किंवा अभिमानाने म्हणा पण मला याची देही याची डोळा. ते पहायचे होते. सर्व शिक्षकांना प्रशिक्षण द्यायचे होते. न्यूझीलँडमधील हुशार बालवाडी शिक्षिकांनी हे तंत्र वापरावे असे मला किती वाटत होते. सृजनाच्या वाटेवर मला अनुभवाला आलेल्या खाचखळग्यांशिवाय आणि मनस्तापा शिवाय शांतपणे त्यांना या तंत्राचा वापर करता यावा असे मला वाटत होते. शिक्षिकांनाही ते हवे होते. याची तत्वे काहीशी स्पिंस्टर मध्ये सापडतात. त्यांचा सर्वांना परिचय होता व ती देशभर वापरली गेली होती. याचे मला समाधान आहे. पण एका प्रकाशकाने मला सांगितले की ही शैली वाचकांना चालणार नाही. ती बदलायला हवी. जरा पारंपारीक प्रथेप्रमाणे अ, ब, क अशी मुद्देसूदपणे मांडणी करायला हवी. क्रमानुसार सर्व काही यायला हवे. थोडक्यात अगदी नीरस पाय-यापाय-यांमध्ये तो मला बांधू इच्छित होता. एकाने हे हस्तलिखित वर्षभर स्वत:जवळ ठेवले आणि मी जेव्हा ते त्याच्याकडे परत मागितले तेव्हा तो भडकलाच आणि मी त्याला वाचनासाठी पुरेसा वेळच देत नाहीय असे माझ्यावरच गुरकावला! अजून एक आठवडाभरच ते हस्तलिखित माझ्याकडे राहू देण्यास काय हरकत आहे ? असाही त्याचा प्रश्न होता एकाने हे त्याला परवडणारे पुस्तक नाही असे स्वच्छपणे सांगितले. तसे अगदी लिहूनच दिले. याच दरम्यान किंवा मला वाटत अगदी सुरूवातीलाच मी हे हस्तलिखित शिक्षण खात्याकडेच पाठविले होते. पण जेव्हा मी याविषयी परत विचारणा केली तेव्हा त्याने सांगितले त्यासोबत काही पत्रच नव्हते. ( खरे तर होते ) हे पुस्तक खूपच छान आहे असा अभिप्रायही त्याने दिला व हे हस्तलिखित तुम्हाला सुखरूप परत मिळेल अशी मला आशा वाटते, असेही तो म्हणाला! हे वाचून आता मलाही हसू येतय. माझ्या छोट्या छोट्या मुलांसाठी मी गुंतागुंतीच्या काल्पनिक कहाण्या सांगत असे. तसेच हे वाटू लागले ! माझ्या एका मित्राने हे माझ्या प्रेमाखातर पुस्तक न्यूझीलँड मध्येच प्रकाशित करायचा निश्चय केला. या छापखान्यात माझ्या पुस्तकाची जेमतेम एक प्रत छापली गेली असेल नसेल तोच तो छापखाना आर्थिक ( व भावनिक !) ओझ्याने पार कोलमडून गेला. त्याचवेळी पुस्तकाचा तयार टाईपसेटही नाहीसा झाला. तो आजतागायत ! हे सर्व घडल्यावर मी कौटुंबिक निष्ठांचा पुनर्विचार करू लागले !

न्यूझीलँडमधील शिक्षण व्यवस्थेने हे स्विकारले आहे. किंवा कसे याविषयीही तुला जाणून घ्यायच झाहे अस तू म्हणतोस. त्यांनी या सर्व प्रक्रिये दरम्यान मला कस वागवल. मी ही पद्धत स्वतः वापरू लागले तेव्हा त्यांना काय वाटलं .. .. आणि नंतर जेव्हा स्पींस्टर प्रकाशित झाले तेव्हा कस वागवल.. ...

न्यूझीलँड ही कलांना वाव न देणारी भूमि आहे. असा आरोप मी करणार नाही. खरे तर या निळ्या आकाशाखाली कुठेच अशी जागा नाही की जिथे कलांना मुक्त वाव आहे. ( झपाटून टाकणा-या कलांना तर

नाहीच नाही ) कला ही सर्व विरोधाला न जुमानता प्रकट व्हावी लागते. किंवा नष्ट व्हावी लागते. मी अशीच धडक देऊन वाट काढली आहे. अर्थातच यात जखमा झाल्या. आयुष्याकडून तुम्हाला हवे ते तुम्ही मिळवू शकता. पण स्वतःच्या रक्ताने त्याची किंमत चुकवावी लागते. मीही मला हवे ते मिळविले आणि त्याची किंमतही दिली. अर्थांत हे सर्व कुटुंबातले अंतर्गत नाट्य आहे. त्याविषयी माझ्या व तुझ्या देशात मी काही बोलू शकत नाही. जोपर्यंत माझ्या देशात माझी कबर शांत होत नाही तोपर्यंत तरी नाहीच. मग माझा आत्मा उठेल आणि त्यांना पछाडेल. त्यावेळी हे न बोललेल सर्व काही मी नक्की बोलेन एवढ लक्षात ठेवा.

तेव्हा माझे हे जिवीतकार्य आता तुझ्या देशातील वाचकांसमोर आहे. माझी आयुष्यभराची कामगिरी आहे ही. मला पत्र लिहिणा-या सर्व शिक्षकांना, आयांना, पत्रकारांना, समीक्षकांना, विद्यापीठातील प्राध्यापकांना आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे माझ्या सुसंस्कृत, रसिक अविवाहीतकरीता ते पाठवित आहे. त्यांनी त्यांच्या व्यक्तीमत्वातील उत्तमाचा आविष्कार पत्रात मला पाठविला होता. मीही त्यांना माझ्यातील उत्तमचा आविष्कार देऊ इच्छिते. यातील काही माझ्याशी सहमत असतील व तर काही नसतीलही. पण अनुभवाने मी हे शिकले आहे की ज्यांना माझे म्हणणे मान्य नसेल तेही उदार बुद्धीनेच त्याचे परिक्षण व परिशीलन करतील. बुद्धीवादी पण उदार. कृपया हे दोन शब्द लक्षात ठेवा. शेवटच्या शब्दावर जरा प्रकाशझोत ठेवा. उदारता. तुमच्या देशात माझ्या वाट्याला काही वेळा कठोर टिका आली आहे पण त्याा धक्कयाने मी काही गोठून गेले नाही कारण सर्व लेखण्या उदारतेनेच भरलेल्या होत्या.

मी ही सर्जनशील शिक्षणाची योजना तुझ्या देशात पाठविले आहे. तिच्या महत्वाविषयी मला पूर्ण विश्वास आहे. ॲना वोनोत्सवा स्पिंस्टरमध्ये म्हणते तसे, “मला ज्याचा विश्वास वाटतो तेच मी केले पाहिजे आणि जे मी करते. त्यावरच माझा विश्वास असतो. इतर काही पद्धतीने जगण्या इतके हे आयुष्य आहेच कुठे ? ” मला वाटते हेच सार्वत्रिक सत्य आहे. काळ्यांसाठी, गो-यासाठी, पिवळ्यासाठी आणि सावळ्यासाठीही. दुस-या संस्कृतीशी जुळवून घेण्यासाठी जीव तोडून धडपडणा-या कुठल्याही अल्पसंख्य समुदायासाठी हेच सत्य आहे.

तू विचारलेला एक प्रश्न आहे. मी ज्या पुस्तकांविषयी सारखी बोलते ते ती पुस्तके कुठे आहेत ?

चोवीस वर्षापूर्वी मी पहिल्या आठवड्यापासून मी ती पुस्तके तयार करू लागले होते. लिहिणे, चित्र काढणे, वापरून पहाणे, तपासणे, वगळणे, सुधारणे, नाकारणे, तपासणे सुधारणे, तपासणे सुधारणे, तपासणे सुधारणे. शेकडो चित्र काढणे. रंगविणे. समर्पक चित्र वर्षानुवर्ष काढणे हे अनेक वर्ष चाललेलेच. शेवटी सात वर्षापूर्वी एका बुक बाईंडरकडे ते बाईंडिंगसाठी नेले. त्याने सुरेख पुठ्याच्या बांधणीत ती बांधली. पहिले पुस्तक पिवळे होते. दुसरे निळे, तिसरे हिरवे व चौथे लाल. प्रत्येकाच्या कोप-यात वर माओरींच्या घरात असतो तसा मोठ्या वासा चित्रित केलेला. सर्व पुस्तकांच्या मुखपृष्ठावर पुस्तकाचा नायक एक मावरीमुलगा ज्याच्या अंगावर

एक अपरा मळका सदरा आणि चड्डी आहे. प्रत्येक मुखपृष्ठावर त्याची वेगळी मुद्रा आहे. चांगला पांढरा शुभ्र कडक व्हिटमनचा कागद. ज्यावर शेकडो जलरंगांतील चित्रे. आणि मजकूर मुलांसाठीच्या मोठ्या टाईपमधील. त्यावेळीतरी मला मी आपल्या स्वप्नानजीक पोचले आहे असे मला वाटत होते ( आता मागे वळून पहाता तसे वाटत नसले तरी ) मी त्याला संक्रमण कालीन वाचनमाला म्हणत असे पण त्यांनंतर एक कौटुंबिक नात्याचा प्रवेश घडला जो मी बाहेरच्यांना सांगू शकत नाही. शेवटी एका पत्रात मी वाचले “माझी सर्व संक्रमण कालीन वाचनमाला जाळून टाकली आहे. ” अर्थात चुकून ... पण माझ्या चुकीने नव्हे!

मी लागलीच दुस-या पुस्तकांच्या तयारीला लागले. पहिली दोन पुस्तके जवळपास पूर्णही झाली पण ती मूळच्या पुस्तकांसारखी नव्हती. हे जाणवले आणि मी थांबले. माझे आता पूर्वीसारखे मन लागत नव्हते. माझ्या चित्रांमध्येही पूर्वीची अचूकता नव्हती. ज्याचा वयाशी काही संबंध नव्हता. हे खरेच की मी ही पुस्तक मी येथील एका प्रकाशकाला दाखविली होती. मी राजीनामा दिल्यानंतर. पण मी खूप रंग वापरले होते. त्यांनी अस सुचविले की मी फक्त दोन रंग वापरावेत किंवा अगदी प्राथमिक रंगांचा वापर करावा. ही सुचना अगदी योग्य आणि विवेकपूर्ण होती हे खरे पण मी कधीच विवेकी नव्हते एवढेच ! त्यांनी या पुस्तकासाठी खूप वेळ दिला. लक्ष घातले. बाहेरच्या देशात छपाई केल्यास प्रत्येक पानाला किती खर्च येईल याचा हिशोब काढला आणि तो निघाला ६५ पौंड ! यानंतर ते फार काही करू शकत नव्हते. आणि हे मोठे पुस्तक ज्यात जोसेफच्या कोटापेक्षाही जास्त रंग वापरलेले होते. ज्यात अनंत प्रतिध्वनि घोंघावत आहेत असे ते माझ्या पुसतकाच्या कपाटात आजही पडून आहे. माझ्या कपाटात दबा धरून बसले आहे. असे का म्हणेना. जाऊ द्या. मी काही फार मोठी प्रतिभांवत चित्रकार तर नव्हतेच.

यातून थंडपणे काढता येणारे काही ठोस निष्कर्ष तुला हवे आहेत. पण माझ्या व्यक्तीमत्वात थंड व ठोस असे काही आहे की नाही मला ठाऊक नाही. खरे तर या विषया संदर्भात थंड असे काही नाहीच आहे !माझ्याकडे सृजनात्मक शिक्षणाबाबत आहेत त्या धगधगीत गोष्टी. ज्यांच्या धगीने मी आणि माझ्या पुस्तकाची पानेही जळाली.

सांयकाळी शेकोटी शेजारी बसून पेन्सीलीने आत्ममग्नपणे मी तुला पत्र हे लिहिते आहे. “उद्या जरा सुधारून, परिष्करण करून, लांबण टाळून ( विसरू नकोस ) टाईप करून पाठवू. ” पण यातले मी काहीही प्रत्यक्षत करणार नाहीय. मी या वहीतून ही पाने फाडून घेईन. एका पाकीटात भरीन आणि (पुन्हा कधीही न वाचण्यासाठी !) साता समुद्रापार पाठवून देईन.

शुभ्रेच्छा आणि आभार. हे एकदाच संपले याचाच मला मोठा आंनद आहे. आणि पुन्हा इतके कठीण काम करायला मला पुन्हा सांगू नकोस. पण आता मला बरे वाटते आहे. जसे चोवीस वर्षापूर्वी वाटत होते तसे. हे पत्र तुला पाठवितांना ( इतक्या भरड भाषेत लिहिलेले मी यापूर्वी काहीही छापायला दिले नव्हते ) आणि माझी सृजन

शिक्षण पद्धती वाचकांकडे सोपवितांना मला माझे जीवनकार्य संपल्याची जाणीव होते आहे. मी काय सांगते आहे ते मला ठावूक आहे. आणि विश्रांति कशाला म्हणतात त्याचीही जाणीव मला आहे.

स्नेहांकित

सिल्विया

**शिक्षिका**

**सिल्विया ॲश्टॉन वार्नर**

***सेतू बांधारे सागरी..***

सहज वाचन पद्धती ही काही आता नवीन बाब उरलेली नाही. प्राचीन इजिप्त मधील चित्रलिपी ही फक्त एका शब्दाने बनलेली एकेक वाक्यच होती. हेलन केलरचा पहिला शब्द “पाणी”, हा तिच्यासाठी एक शब्दयुक्त पुस्तकच होते. टॉलस्टॉयना देखिल त्यांच्या ग्रामशाळांमध्ये हेच सूत्र गवसले होते. आता युनेस्कोच्या कार्यक्षेत्रात सर्वत्र याचाचं वापर प्रारंभिक शिक्षणासाठी केला जातो आहे. कारण अविकसित समूहातील लोकांना लिखित भाषेचा परिचय करुन देण्याचा हाच एकमेव विवेकपूर्ण रस्ता आहे. दुष्काळग्रस्त क्षेत्रातील शिक्षक हा पीके,माती,भूक,खते यासारखे शब्द न वापरता तेथील विद्यार्थ्यांना काही शिकविण्याची कल्पना तरी करु शकेल काय ?

अर्थात फक्त अविकसित आदिवासींना शिकविण्यासाठीच सहज वाचन पद्धती उपयुक्त ठरते असे नाही. जेथे दोन भिन्न संस्कृतीमधील विद्यार्थ्यांना एकाच शिक्षणव्यवस्थेत सामावून घ्यावे लागते तेथे एका संस्कृतीतील मुलांना दुस-या संस्कृतीशी जोडण्यासाठी आम्ही याशिवाय अन्य मार्गाने जाऊच शकत नाही. न्यूझीलंडमध्ये मावरीजमातीतील मुलांना अतिशय कोवळया वयात अशा त-हेच्या संक्रमणातून जावे लागते, तेथे तर हे आवश्यक सूत्र आहेच, पण खरेतर वैश्विक सूत्रचं आहे. पहिले चित्र आणि पहिले शब्द यात फक्त माध्यमाचाच तेवढा फरक आहे. एरवी ते एकच आहेत. न्यूझीलंडमधील मुलांची पहिली चित्रे ही कुठल्याही गतीशील वस्तूची चित्रे असतात. जर तो शहरी लोकवस्तीत रहात असेल तर ट्राम,ट्रक,ट्रेन,विमान अस काहीही. आणि जर तो ग्रामीण भागातील असेल तर मग घोडा. न्यूझीलंडमधील मुली मात्र कुठेही रहात असल्यातरी घरांचीच चित्रे प्रथम काढतात. यावरच आधारीत एक प्रथम वाचनमाला मी तयार केली होती. तोंगण जमातीतील मुलं पहिल्यांदा
झाडे रेखाटतात,सॅमॉनमधील पाच वर्षाची चिमुरडी चर्च चितारतात. आणि चिनी मुलं फुल ! त्यांची अभिव्यक्ती ही किती विलक्षण भुरळ घालणारी आहे !

हे सर्व लक्षात आल्यावर कोण जाणूनबुजून तयार पुस्तकांच्या आधारे मुलांना शिकवायला धजावेल? भले ते पुस्तक किती का चांगले असे ना ! आणि `मुलांसाठी` प्रौढांनी तयार केलेली पुस्तके ही मुलांनी स्वतःच स्वतःसाठी लिहिलेल्या पुस्तकांपेक्षा चांगली असूच कशी शकतील? पहिले वाचन हे केवळ वाचन नसते ती एका सेतूची निर्मिती असते  असेच माझे म्हणणे आहे.

ज्ञाताला अज्ञाताशी जोडणारा सेतू, स्थानिक संस्कृतीला नवीन संस्कृतीशी जोडणारा सेतू,आणि माणसाच्या आंतरीक जगाला बाह्य जगाशी जोडणारा सेतू.

सहज वाचन हा काही नवा सिद्धांत नाहीच.मुलाचे पहिले शब्द हे त्यांच्या प्राथमिक गरजांचेच रुप असते. व्हाल्टेअरने म्हटल्याप्रमाणे `` कुठलेही राष्ट्र निर्माण होण्यापूर्वी त्याची कुठलीतरी एक भाषा स्थापित व्हावी लागते.`` ध्वनिच्या सहाय्याने लोकांनी आपल्या गरजांचीच अभिव्यक्ती प्रथम केली असेल असे निर्विवादपणे म्हणता येईल.ती पहिली ध्वनिचिन्हे एकाक्षरीच असतील.

आजवर जतन केलेल्या अतिप्राचीन संस्कृतीतील भाषांमध्ये असे एकाक्षरी शब्द सापडतात. ज्यांच्या उच्चारणाने नेमकी काय गरज आहे हे तात्काळ उमजते. चिनी भाषा तर आजही चित्रलिपीवरच आधारलेली आहे.

खाल्डीयन संस्कृतीतील लोक त्यांचे नियम व निरिक्षणे चित्रलिपीत विटांवर कोरुन ठेवीत असत. ही ध्वनिचित्र होती. लिखित संवादाची विकसित साधनेच त्यांनी प्रथम चित्रीत केली होती असे म्हणता येईल. त्यानंतर त्यांनी अधिक सांकेतिक चिन्हांचा वापर सुरु केला. जसे बाण म्हणजे युद्ध, डोळा म्हणजे दैवी शक्ती,वगैरे

---

जुलै १८५७ मध्ये टॉलस्टॉय यांनी आपल्या डायरीत लिहिले होते.

“सर्व देशाला सामावून घेंईल अशी एक शाळा उघडण्याची अंतप्रेरणा दिवसेदिवस मनात बळावू लागली आहे”.

त्यानंतर अवघ्या दोन वर्षात, १८५९ पर्यंत, ते त्यांच्या स्वप्नांना निश्चित आकार देण्याच्या जवळपास पोचलाही ! कुठल्याही गोष्टीत झोकून देण्याचा त्यांचा स्वभाव होता. त्यांनी शिक्षणातही स्वतःला तसेच झोकून दिले. इतर सर्व गोष्टी थांबवून त्याने तीन वर्ष ग्रामीण भागातील शेतक-याच्या शाळांमध्ये त्यांनी स्वतःला पुरते गुंतवून घेतले. त्यांच्या शाळामध्ये व तत्कालीन नीटनेटक्या शाळांमध्ये जराही साधर्म्य नव्हते. टॉलस्टॉयनी लिहिल्याप्रमाणे त्यांना त्यांच्या या शाळेंविषयी अनावर ओढ होती. त्यांच्या साहचर्यामुळे त्यांच्या सहाय्यकांमध्येही तशीच अनावर उर्मी तयार झाली.

त्याच्या स्वभावानुसार त्याने सर्व रुढ शिक्षण पद्धती ठोकरल्या,नाकारल्या हे तर उघडच आहे. मुलांच्या मनाचा ठाव घेत त्याने प्रथम शिक्षणातून शिक्षेला बाद करुन टाकले व शिकवावे कसे ही कला मुलांकडून शिकण्यासाठी तो स्वतःच सिध्द झाला. त्याच्या शाळांमध्ये मुलांना शिक्षणाचे विषय निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. हे विषय शिकण्यासाठी शाळेत किती काम करायचे हेही मुलेच ठरवित. प्रत्येक मुलाला त्याच्या ज्ञानमार्गात त्याच्या गरजेनुसार सहाय्य करणे हे तेथील शिक्षकांचे काम मानले जाई. त्यासाठी वेळ पडल्यास स्वतःच्या स्वभावाला व पद्धतीला मुरड घालून काम करणे हेही शिक्षकांचे कर्तव्य मानले जाई, प्रत्येक मूल स्वतंत्र आहे,वेगळे आहे हे लक्षात ठेवून सरसकट पद्धती टाळून व्यक्तीगत मदतीवर भर दिला जाई.

कोणत्याही शिक्षा नसलेल्या, एकसाची अभ्यासक्रम नसलेल्या, मुलांच्या मनाविरुद्ध काही न लादणा-या या टॉलस्टॉयच्या शाळांनी लक्षणिय यश संपादन केले. त्यांच्या शाळेत मुलांचा सर्व वेळ शिक्षणासाठीच खर्च होत असे व शाळा सोडून जाण्यास ती अजिबात तयार नसत.

बेसिल बोरॅसॉव्ह या शेतक-याने पन्नास वर्षानंतर या शाळेविषयी बोलतांना सांगितले होते, "तिथे तास अक्षरशः मिनीटभरासारखे वाटत.जर आयुष्य असेच आनंदी असते तर ते कधी सरले ते कळलेही नसते. आमच्या या आनंदोल्लासात आम्ही काउंट टॉलस्टॉयचे साथीदार बनलो. आमच्याशिवाय काउंट व काउंटशिवाय आम्ही राहूच शकत नव्हतो. आम्ही एका अतूट बंधनात बांधले गेलो होतो.फक्त रात्रीच आम्ही वेगळे होत असू. आमच्या गप्पांना अंत नव्हता. आम्ही त्याला जादूगाराच्या,जंगलातल्या भूतांच्या कितीतरी गोष्टी सांगत असू. "

काकोलीया या अल्जेरीयातील डोंगराळ प्रदेशात काम करणा-या एका स्वयंसेवकाने लिहिले आहे.

"ॲशच्या झाडाखाली वीस मुलांचा एक घोळका बसलेला होता. शिक्षिकेने एका कागदावर लिहून दिलेले आपल्या खेडयाचे नाव ते समूह स्वरात जोरजोरात म्हणत होते. त्याच्या स्वरात विलक्षण अभिमान झळकत होता.

दुस-या दिवशी सायंकाळी गावातील तीन प्रैाढ आमचाकडे आले. त्यांना त्यांचे नाव लिहायला शिकायचे होते.

- तुम्हाला आपले नाव कशासाठी लिहायचे आहे ?
- पोस्ट ऑफिसमध्ये सही करण्यासाठी. जर मी स्वतःसही करुन रजिस्टर पत्र घेऊ शकलो तर साथीदारासाठी मला खर्च करावा लागणार नाही.
- अशी रजिस्टर पत्र तुम्हाला नेहमी येतात ?
- कधी कधी येतात. माझा फ्रांन्सला असलेला मुलगा पाठवतो.

“खरे तर आम्ही शांतपणे हळूहळू वाटचाल करु इच्छित होतो. पण तरीही सायंकाळी मच्छरदाणीत आरामशीर बसण्याचे सोडून आम्ही त्यांना शिकवायला धावलोच. कारण मूलभूत शिक्षणाचा ज्वरच आता आम्हाला चढला होता. ”

नवीन शिकणा-यासाठी सहज वाचनाचा वापर करणे ही काही नवीन गोष्ट नाहीच, नवीन काही असेल तर तो आमच्या प्रचलीत शिक्षण व्यवस्थेने त्याला दिलेला नकार!

***पायाभूत शब्द संग्रह***

***“मस्तकातल पुस्तकात गेल***

***पुस्तकातल मस्तकात आल”- बहिणाबाई***

मावरीं मुलांच्या बालवाडीत कुठलाही विषय शिकवण म्हणजे त्याला दुस-या संस्कृतीशी जोडणा-या पूलाच्या निर्मितीतील एकएक फळी जोडत जाणेच असते. हा पूल जितका बळकट होईल तितकी मावरींची पुढच्या आयुष्यात यशस्वी ठरविण्याची शक्यताही बळकट होत जाईल.

बहुतेक मावरींमुलं या संक्रमणात अपयशी ठरतात.कोवळया वयात एका संस्कृतीतून दुस-या संस्कृतीत ढकलण्याचा धक्क्यातून मूलें सहसा सावरली जातचं नाहीत. त्याचा परिणाम स्पष्टपणे व अबोधपणे जाणवत रहातोच. याचमुळे शिक्षणप्रवाहात येणा-या मावरींची संख्या रोडावते. जे शिकतात, तेही अनेकदा मानसिक दुर्बलतेची शिकार होतात. एकूणच मावरी मुल शिक्षणात मागेच पडत जातात.

मावरींच्या असफलतेचे आणखी एक कारण त्यांच्या जरुरीपेक्षा जास्त काळ बालवाडीत जाणं हे आहे. परक्या भाषेमुळे, परक्या संस्कृतीमुळे त्यांची प्रगती मंदावते. प्राथमिक शिक्षणातच त्यांना जास्त काळ द्यावा लागतो.माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यावर अन्य युरोपियन मुलांपेक्षा ते वयाने मोठे असतात.त्यामुळे त्यांच्या गटात ते वेगळे पडतात.या एकटेपणाने ते आणखीच खचतात.शेवटी शिक्षणाव्यवस्थेबाहेर फेकले जातात.पण बाहेर त्यांचा निभाव लागत नाही.चांगली नोकरी मिळण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण व कौशल्य त्यांच्याकडे नसते.वयही कमी असते,अनुभव नसतो.परिणामी ते एखाद्या सामाजिक उद्रेकात सहज सापडतात.युरोपियन मानदंडानुसार ते पूर्णत:अयशस्वी ठरविले जातात.योग्य वयात येईपर्यंत ते इतके खचतात की आपले सामाजिक स्थैर्यच हरवून बसतात.

प्रत्येक विषयाचे शिक्षण ही त्याला युरोपियन संस्कृतीशी जोडणा-या पूलाची एकएक फळी आहे,असे मी मानते याचे कारण ही पार्श्वभूमी आहे. मावरींच्या बालवाडीत शिकवतांना शिक्षकाला दोन गोष्टी एकदम

करायच्या असतात. त्याला या दोन संस्कृतीतील दरी सांधायची असते.व हे करतांना जास्त वेळ खर्च होऊ नये. याचेही भान ठेवायचे असते.

***"खादल्याची गोडी देखिल्यास नाही, भार धन वाही मजूरीचे"- तुकाराम***

***"अर्थेविण पाठांतर कासया करावे,व्यर्थचि मरावे घोकूनिया;***

***घोकूनिया काय वेगी अर्थ पाहे,अर्थरुप राहे होऊनिया;***

***तुका म्हणे ज्याला अर्थी आहे भेटी , नाहीतर गोष्टी बोलू नये"- तुकाराम .***

मुलांकडे दोन प्रकाराच्या दृष्टी असतात.एक अंतर्दृष्टी व दुसरी बाहयदृष्टी यातील अंतर्दृष्टी ही नेहमीच जास्त प्रखर असते.

प्राथमिक शाळांमध्ये सचित्र पुस्तकांचा वापर करुन मुलांना प्रारंभिक शब्दावली शिकविली जाते.ही सुंदर पुस्तके प्रौढ शिक्षणतज्ज्ञांनी तयार केलेली असतात.मीही वाचनाच्या प्रारंभिक पाठांसाठी चित्रे वापरते.पण ही चित्रे मुलांच्या अंत:प्ररणेने (आंतरीकदृष्टीने) रेखलेली असतात. व त्याला दिलेली शीर्षकेही मुलांनीच दिलेली असतात. प्रौढांनी मुलांसाठी निवडलेली चित्रे व त्याची शीर्षके अधिक अन्बर्थक आणि सुबक असतील हे खरेच आहे.परंतु मुलानी आपल्या चित्रांना दिलेल्या शीर्षकांमध्ये त्यांच्या अंतर्दृष्टीचा प्रकाश भरलेला असतो. व त्याचे सामर्थ्य व चमक लपत नाही. कारण बाह्यदृष्टीने पाहून प्रौढांनी काढलेली चित्रे ही फक्त बहारदारच ठरु शकतात. अंतर्दृष्टीने काढलेली चित्रे ही मात्र त्याच्या जीवनाची प्रतिबिंबे असतात. त्याला त्यांनी स्वत: दिलेली शीर्षके हीच त्यांच्यासाठीची प्रारंभिक शब्दावली असते.

पाच वर्षाच्या मुलाचे मन एखाद्या द्विमुखी ज्वालामुखी सारखे असते असे मला वाटते.त्यातले एक मुख असते सृजनात्मक शक्तीचे तर दुसरे असते विध्वंसात्मक शक्तीचे. या ज्वालामुखीचे सृजनात्मक शक्तीचे द्वार आपण जेवढे रुंद करीत जाऊ तितके त्याचे विध्वंसात्मक मुख अरुंद होत जाईल.स्वरचित चित्रांना त्यानी दिलेला शीर्षके ही त्यांच्या अत्यंत गतिमान जीवनाची प्रतिबिंबेच असल्याने त्यातून या रचनात्मतेची पायवाट स्पष्ट होत जाते. आणि त्याचबरोबर विध्वंसाची वाट पुसली जाऊ लागते. हे केवळ वाचन उरत नाही, ती कलात्मक निर्मितीच होत जाते असे मला वाटते.

*-पहिले शब्द मुलांच्या जीवनातले विशेष शब्द असायला हवेत. ते त्याच्या व्यक्तीमत्वाचे अभिन्न अंग असायला हवेत.*

वाचनाविषयी प्रेम निर्माण होणे.पुस्तक हाती धरण्याची लालसा निर्माण होणे यावरच पुढील सर्वकाही अवलंबून असते.त्याला उत्स्फुर्तता असायला हवी. पुस्तकाकडे हात जाणे ही सहज घडणारी गोष्ट व्हायला हवी. जी या उमलत्या वयातच होऊ शकते.नुसत्या गोड गोड शब्दांनी हे होणार नाही.औपचारीक भारदस्त शब्दांचाही येथे उपयोग नाही. ते शब्द निर्जीव असतील. आपल्याला हवेत मुलांच्या खळाळत्या जीवनातून उगम पावलेले जिवंत शब्द. अमेरिकन पाठयपुस्तकांमधून मुलांना भेटणारे 'जॉन आणि जेनेट' हे आपले मित्रच आहेत असे मुलांना वाटू शकेल, असा प्रयत्न करायला हवा असे म्हटले जाते. पण कशासाठी ? ही परकी मुलं आपली मित्र आहेत अस त्यांना का वाटायला लावायचे? प्रत्यक्षात त्यांना त्यांचे खरे खुरे मित्र असतांना? त्यांच्याविषयी त्याला खरी ओढ वाटत असतांना ? त्यांना या पुस्तकात का स्थान नाही? ही गोष्ट मला सहज भावाच्या विरुद्ध वाटते.हा मला कलात्मकते विरुद्ध, सृजनशीलते विरुद्ध केलेला अपराध वाटतो.जीवनाचा परिध सहजपणे विस्तारण्याच्या प्रक्रियेत येणारा हा अवरोध आहे. एरिक फ्रॉम या सहज विस्ताराविषयीच तर बोलत असतात. न्यूझीलंडमधील गो-या मुलांचे वाचन साहित्य जर अमेरिकन निग्रो मुलांच्या जीवनावर आधारीत निर्माण केले तर त्यांना ते चालेल का ? मावरीनांही त्यांच्या संस्कृतीतून निर्माण झालेली, त्यांचे रंग सामावलेली पुस्तके मिळायला हवीत. ही मागणी अवाजवी म्हणता येणार नाही. हे घडणीचे वय आहे. त्यातच सवयी लागतात व स्थिरावतात. लिखित शब्दांविषयी मुलांना घृणा वाटू लागलेली मी माझ्या वगार्तही काही वेळा पाहिलेली आहे.

सहजतेने फुलणारे लहान मुलाचे विश्व एका परक्या संस्कृतीच्या चौकटीत कोंबणे ही सौंदर्याची हानि आहे. शैशवात वाढीला दिशा देण्याचे व त्यावर काही नवीन कलम करण्याचे अन्य मार्ग उपलब्ध आहेत ना.तिथे अशी दांडगाई कशाला? सहजपणाने फुलणारे जीवन ही सुंदर जीवनाची कल्पना आहे,आणि तीच या त-हेच्या सांस्कृतिक संक्रमणात पणाला लावली जाते. मुल वयाने वाढले,मानसिकदृष्टया सक्षम झाले,आपल्या मुळांनीशी घट्ट उभे राहिले की मग कदाचित एवढया चिंतेचे कारण उरणार नाही. परंतु या देशात हे संक्रमण अगदी कोवळया वयात लादले जाते आणि म्हणून आम्ही ते अतिशय हळूवारपणे ते हाताळू इच्छितो.

परत प्रारंभिक शब्दावलीकडे वळू या. पहिली पुस्तक कशी असावीत ते पाहू या. *मुले ज्या मातीतून जन्मली त्याच मातीतले शब्द हवेत.* मी मुलांच्या मनात हात घालून मूठभर शब्द बाहेर काढते आणि त्याचाच वापर प्रारंभिक शब्दावलीसाठी करते. मग हे शब्द चांगले वा वाईट असतील, हिसंक वा शांत असतील,रंगीत वा रंगहीन असतील.प्रारंभिक शिक्षणाची सुरुवात त्यांच्या जीवनाशी जोडूनच व्हायला हवी, तोडून नाही.

पुस्तकातले हे परिचित व गतिशील वातावरण त्याला आश्वस्त करते. हे शब्द मुलांना अधिक सखोल अर्थ स्पष्ट करतात. ज्यातून सहजपणे वाचनाविषयी जिव्हाळा उत्पन्न होतो. जे शब्द त्यांच्या जीवनातून येतात त्यांच्याविषयीचे त्याचे प्रेम वाढते. वाचनाविषयीचे प्रेम जागे होते. मग पुढे नवीन संस्कृतीतील पुस्तके समोर येतात

तेव्हाही त्याला गंमत वाटते.ओझे वाटत नाही. हे सर्व मी प्रत्यक्ष अनुभवले आहे. त्यातूनच मला पुढील तत्वे प्राप्त झाली आहेत.

थोडक्यात -

१) पहिले शब्द मुलांसाठी अर्थ संपन्न असायला हवेत.

२) ते त्याच्या गतिमान आयुष्यातूनच आलेले हवेत.

३) मुल ज्या मातीतले आहे त्याच मातीतली पुस्तके हवीत.

एका मोठया कार्डवर मी शब्द लिहिते आणि मुलाला देते ( हे शब्द सहज संवादात वापरले जाणारे शब्दच असतात. ) जर हे शब्द योग्य त-हेने निवडलेले असतील तर ते एका नजरेतच मुलांच्या लक्षात रहातात. जर असे झाले नाही तर शब्द शोधण्याचा दुसरा मार्ग पहावा लागतो. सृजनाच्या तासाला मुल जे काही बनवतात त्यातून असा शब्द मिळू शकतो. मुलांसमवेत खूप बोलावे लागते. पण यातूनही त्या मुलासाठीचा नेमका शब्द सापडला नाही तर अशा शब्दांपासून सुरुवात करता येईल जे जगात सर्वच वंशाच्या मुलांमध्ये सारखेच असतात. हे शब्द त्याला एक प्रकारची उब देतात. ते त्याच्या जीवनाशी सर्वात निकटचे नाते असलेले शब्द असतात. हे शब्द आहेत आई , बाबा, भिंती, भूत, पापा(चुंबन) इत्यादी.

मी एका पाच वर्षाच्या बेशिस्त मावरीमुलाला विचारते, “मोही,तुला कोणता शब्द हवा आहे? ”

“जेट. ”

हसून मी तो शब्द एका कार्डावर लिहिते व त्याला देत विचारते, “परत सांग पाहू हे काय आहे ? ”

“जेट. ”

“उद्या सकाळी हा शब्द परत घेऊन ये. तुला काय हवयं गे ? ”

गे ही आईच्या धाकदपटशाची शिकार झालेली शिस्तशीर घरातील मुलगी आहे.

“ घर” ती दबक्या स्वरात म्हणाली. मी तो शब्द लिहून तिच्या हातात सोपविते.

“सेवेन तुला काय हवे आहे? ” सेवेन हा एक दांडगाईने वागणारा मुलगा.

“बॉंब ! बॉंब ! मला बॉब हवा आहे ! ”

कार्डावर बॉंब लिहून मी सेवेनच्या हवाली करते. “हिमंत असेल तर हा बॉंब कुणी आपल्याकडून हिसकाऊन दाखववाा, ” अशी आव्हात्मक घोषणा करीत तो जातो.

अशाच त-हेने उर्वरित मुलांना त्याचे शब्द मिळतात. दर दिवशी सकाळी ते नवा शब्द मागतात. हे शब्द मला परत लिहून द्यावेच लागत नाहीत. दुस-या दिवशी जेव्हा ते आदल्या दिवशीचे शब्द कार्ड परत आणतात.

तेव्हा त्याच्या स्थितीवरुन मला त्याने ते कार्ड किती वेळा हाताळले आहे, ते कळते. म्हणूनच यासाठी वापरली जाणारी कार्ड चिवट व मजबूत असावीत असा माझा आग्रह असतो.

काही दिवसातच प्रत्येकापाशी त्याला हव्या त्या शब्दांचा संच एक  तयार होतो. या दरम्यान त्याचे माझे सूर जुळलेले असतात. मी त्यांना भिती हा शब्द दाखवताच ते सर्व आवेगाने आपल्या मनातील भितीविषयी बोलू लागतात. सर्व एकदम आणि तार स्वरात ! बहुतेक सर्व मावरीमुले भूताला घाबरतात. मुले कशाला घाबरतात हे त्यांच्या वांशिक व सांस्कृतिक परिसराशी निगडीत असते. युरोपियन मुले बहुधा एखाद्या प्राण्याला घाबरतात.जो त्यानी कधीच पाहिलेला नसतो. वाघ  किंवा मगर. प्रतिकात्मकदृष्टया पाहिल तर हे अज्ञाताविषयीचे  भय आहे जे आपल्या सर्वांमध्येच सामावलेलें असते.

"मी कशालाच घाबरत नाही", भविष्यातील माझा 'खुनी' सेवेन ओरडला!

"कशालाच नाही? "

"मुळीच नाही. मी माझ्या सु-याने त्याला भोसकतो. "

"कशाला भोसकणार तू ? "

"मी वाघाला भोसकीन"

वाघ हा शब्द बहुधा युरोपियन मुलांकडून येतो.पण इथे एक मावरी मुलगा हे म्हणत होता. मग मी त्याला वाघ दिला. मला तो शब्द परत कधीही त्याला सांगावा लागला नाही. दुस-या दिवशी त्या कार्डाच्या दुरवस्थेवरुन दिवसभर सेवेनने त्याचा पुरेपुर व आवेशाने वापर केल्याचे मला उमजत !कुणीतरी दार वाजवल्याचा आवाज आला म्हणून मुल जोरात ओरडली "या आत". पण कुणीच आत आलं नाही .म्हणून मग आम्हीच सर्व जण बाहेर गेलो. बाहेर एक अनवाणी मावरी महिला ओसरीमध्ये उभी होती. अंगावर मावरी पद्धतीचे गोदंण.अदबशीरपणे तीने विचारले "माझा छोटा सेवेन आहे ? "

"सेवेन तुमचा मुलगा आहे का? "

"आम्ही त्याला पूर्वी सांभाळलयं. तो आता पाच वर्षाचा आहे. म्हणून मी त्याच्या शिक्षणासाठी परत त्याला त्याच्या कुटुंबाकडे सोपवले होते. आहे का तो? "

मुल आतुरतेनं सेवेनला पुढे ढकलतात. त्या उत्सुक,संवेदनशील निळया डोळयांच्या कोंडाळयात मायलेकरांचे पुर्नमिलन होते.

"तुम्ही याला कुठे सांभाळलेत" मी मुलांच्या डोक्यावरुन त्या स्त्रीला विचारले.

"त्या डोंगराजवळ. अगदी एकटा होता. तुला तुझी आई आठवते का सेवेन" तीने कातरपणे विचारले

मी पहात राहिले.

थोडयावेळानंतर सेवेन हातातील खडू फळयावर घासत बसलेला मी पाहिला.

“तुला कोणती आई हवी सेवेन? नवी की जुनी?. ”

“जुनी आई”

“तुझी भांवड काय करतात? ”

“ते सर्व मला मारतात. ”

जुनी आई ,नवी आई,मारणे, भांवड हे सर्व एका नजरेत लक्षात रहाणारे शब्द सेवेनच्या संग्रहात समाविष्ट झाले होते.

सेवेनच्या हातातील खडूंच्या नष्ट होण्यातून माझ्या मनात काही एक आकार स्पष्ट होत असल्याचे मला जाणवू लागले.यातून मी काही सुंदर कथा निर्माण करु शकले असते. आणि त्या गोष्टीच्या शेवटी मला दाखवता आले असते की सेवेन हा काही आता आक्रस्ताळा मुलगा राहिलेला नाही...

“कोण रडतयं” मी रणांगणावरील घोडयाप्रमाणे आपले नाक त्या दिशेला वळवत विचारले.

“सेवेन गेचा गळ दाबतोय”

माझी ती सुंदर कथा आता बाजूला ठेवावी लागणार, असे माझ्या सहाय्यिकेला म्हणत मी उठले ! पण माझ्या लक्षात आले सेवेनचे शब्द वाचन .वेगाने वाढते आहे.डेनिस हा एका चांगल्या घरातला, चांगले कपडेलत्ते दागदागिने घालणा-या आईच्या हिसंक वागणूकीचा बळी होता.वयाच्या पाचव्याच वर्षी त्याला नैराश्याचा झटका येऊन गेलेला आहे.

“मी कशालाच भित नाही” तो ओरडला.

“डेनिस. कशाला घाबरतो का ? ” मी कारमध्ये बसलेल्या त्याच्या तरुण आईला विचारले.

“डेनिस? अहो तो कोंबडीला सुद्धाजवळ येऊ देत नाही. ”

“तुला काही स्वप्न पडतात डेनिस ? ” मी दुपारच्या सुटीनंतर विचारले.

“हो, पडतात की !”

“ठिक आहे. खडू आणि फळा कुठे आहे बरं ? ” थोडयावेळाने तेथून जातांना मला फळयावर एक भुरकट रंगाचा जांभळया डोळयाचा दैत्य साकारलेला दिसला. रस्त्यात पडलेल्या लाल मगरी कडे तो पहात होता.

माझ्या लक्षात आले की मी डेनिस समोर हरले आहे.मला त्याच्या भितीचे शब्द मिळालेलेच नाहीत.त्याच्या आईनेच माझा पराभव केलायं. सकाळी सृजनाच्या तासात जेव्हा इतर मुल चिकणमातीशी खेळतात,चित्रे

रंगवतात,नाच करतात, गाणी म्हणतात, लिहितात,बोलतात,भांडतात तेव्हा डेनिस मात्र माझ्या वस्तू गोळा करुन ठेवतो. सतरंज्या नीट करतो. त्याच्या भवितव्याचे मला दिसणारे चित्र उदासवाणे आहे. भितीच्या अनामिक छायेने पछाडलेला तणावग्रस्त जीव.

मेरेने कुठलीही प्रांरभिक शब्दावली तयार करण्यासाठी मला अजिबात सहकार्य केले नाही. परंतु एक दिवशी छोटयांना भिती वाटणा-या गोष्टींची चर्चा करतांना तो मध्येच म्हणाला, “मी एका बुलडॉगला गोळी घातली आहे. ” गे ला देखील कुत्र्यांचीच भिती वाटत असे. मुले कुत्र्यांला किती भितात हे आपल्या लक्षात येते आहे का?

पण शेजारच्याच खोलीत काही दंगेखोर बेरडही आढळतील. ही मुले अगदी निर्भय, निडर आहेत. त्यांची प्रारभिंक शब्दावली बाबा,चुंबन,इथून सुरु होते आणि ट्रक, डोंगर, आई, प्रेम, ट्रेन अशी बेछूटपणे लांबते.ही ‘बिघडलेली, बेरड’ मुले खरंच किती लोभसवाणी आहेत!

झ-यासारखे बाहेर पडलेले हे शब्द मुक्तपणे वापरले जातात.सर्व मुलांना वेगाशी नातं सांगणारे शब्द हवे असतात. विमान,टॅक्टर,जेट आणि मुलींना घरसंसाराचे शब्द जसे घर,आई,बाहुली इत्यादी. मग येतात भितीशी संबंधित शब्द जसे भूत,वाघ,सापळे,मगर,बुलडॉग,रानडुक्कर,पोलीस इत्यादी. त्यानंतर लैगिकतेशी जोडलेले शब्द येतात.जसे चुंबन, प्रेम, स्पर्श, हाकानृत्य इत्यादी.सर्व मुलभूत भावनां व्यक्त करणा-या शब्दांशी जुळणारी चित्रही मुलांच्या मनात तयार होतात.जोरकस, स्पष्ट, अर्थवाही चित्रे. असे चित्रे आम्ही काढूच शकत नाही.कारण एकतर मुळात ती आम्हाला दिसतच नसतात. आणि दुसरे म्हणजे ती त्याच्या जीवनाशी निगडीत असतात . आम्ही त्याची काही प्रतिकृती तयार करु शकू ही अशक्य गोष्ट. आम्ही फार तर या चिंत्रांना शीर्षके सुचवू शकतो.

एकदा हा बांध फुटला की शब्दांचा प्रवाहच सुरु होतो.शब्दांशी निगडीत भय संपले की मग मुल अधिकच सामर्थ्यशाली होतात. पण यातही खूप वैविध्य असते.प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वानुसार येणारी विविधता. त्यातही इथे तर जास्तच. कारण इथे मुलांना सर्वांना एकसारखी शब्दावली वापरुन न्यूझीलंडच्या साच्यात ठोकून बसविलेले नसते. त्यांनी त्यांच्या चित्रांना दिलेली शीर्षके ही केवळ शीर्षके नसतात,नामे नसतात.ती केवळ वाक्यही नसतात.त्यात अर्थगर्भ कहाण्याच असतात. त्या चित्रांच्या व्यवस्थित गुंफलेल्या शृखला काही कथन करीत असतात. मला हे ठाकूक आहे. कारण त्यांनीच मला तसे सांगितले आहे.

हे सुंदर झरे खळाळू लागतात. सृचनात्मक वाहिनी एखाद्या रक्तवाहिनीप्रमाणे भरभरुन वाहू लागते. आणि हळुहळू हे जेव्हा स्थिरावते तेव्हा निसर्गाच्या इतर रचनांप्रमाणेच एक सुविहित आकार स्पष्ट होऊ लागतो.भितीच्या शब्दांना या चित्रांत मोठे स्थान असते.काही लैंगिक अभिव्यक्तीचे शब्द असतात. आणि काही या शतकाला साजेसे शब्द असतात. आई,बाबा,भूत,बॉब,चुंबन,भाऊ, खारीक,सुरी,जेल,प्रेम,नृत्य,रडे,लढाई,,बुलडॉग,स्पर्श,
,रानडुक्कर.जर तुम्ही लहान मुल असता तर कोणती शब्दावली तुम्ही पसंत केली असती ? तुमची स्वनिर्मित की

तयार ? जॉन ये,जॉन पहा. ये आणि पहा. या बोटी पाहिल्यास ? इंग्लिश उच्च मध्यम वर्गाची भाषा. केवळ दोनच आयाम असलेली प्रतिष्ठीत पण नीरस भाषा.

हे शब्द आतून उफाळून आलेले असतात.ही कला आहे ? हे सृजन आहे ? हे वाचन आहे ? मला ठाऊक आहे. हे सारेच येथे एकत्र झालेल असते. ही अतिशय जोमदार प्रारंभिक शब्दावली मुलांनी स्वत: तयार केलेली असते. त्यात सहजता असते हे सर्वात महत्त्वाचे. यामुळे वाचन सुलभ होते.या जादूई चावीने मनावरचे बंध गळून पडतात. आणि जिभेवरचे कुलूप निघते. वाचनप्रेमाचा दरवाजा उघडतो.पुढील आयुष्यात करावयाच्या पुस्तक वाचनाचा भक्कम पायाच इथे घातला जातो. हीच जादूई किल्ली मी माझ्या पाच वर्षाच्या नाचत्या बागडत्या मुलांसाठी वापरते आणि त्या सोबत असते चित्र रंगविणे,मातीकाम करणे,गाणे आणि भांडणे सुद्धा !

याचमुळे मुलांचे व्यक्तिमत्व अधिक काळ अभंग रहाते. ही त्याची आधारभूत मुळ शब्दावली आहे.

<u>मावरींच्या बालवाडीत वाचनाच्या तयारीची मार्गदर्शक तत्वे</u>

- मुळ शब्दावली ही भिती आणि लैंगिकता या दोन मुळ उपजत जैविक प्रेरणांशी निगडीत असते.
- मुळ शब्दावली ही वस्तीनिहाय व वंशनिहाय भिन्न असते.
- वाचनात मागे पडलेल्यांचीही स्वत:ची मुळ शब्दावली असतेच व ती हाती लागताच तेही वाचनानंदात सामिल होतात.
- एखाद्या शब्दाच्या सामर्थ्याचा प्रत्यय हा सर्वसामान्य मुलांपक्षा मागे पडलेल्या मुलांना जास्त चांगल्या त-हेने येऊ शकतो.
- मुळ शब्दावलीचे शब्द मुलांना देतांना चित्र देण्याचा मोह टाळायला हवा.
- शब्दाच्या लांबीचा शब्दाच्या सामर्थ्याशी काहीही संबंध नसतो.
- मावरींच्या बालवाडीत शिक्षणाचे दोन मानदंड असतात. एक मावरींचा व दुसरा युरोपियन.

***<u>व्यक्तीगत आधारभूत शब्दावली.</u>***

मी यापूर्वी सांगितलेच आहे की प्रौढांनी बालकांसाठी निवडलेली, योजलेली चित्र अधिक अन्वर्थक असतीलही,परंतु मुलांच्या अंतर्दृष्टीने तयार केलेली चित्रे आणि त्यांची शीर्षके हीच अधिक जोमदार असतात व त्यात खरा प्रकाश भरलेला असतो. तथापि कधी कधी एखादे मुल मानसिकदृष्टया इतके अस्वस्थ असते की ते स्वत:च्या शब्दाचे चित्र शोधू शकत नाही,त्याला शिर्षक देऊ शकत नाही.

रांगी हा असाच एक वाचन कौशल्यात मागे पडलेला मुलगा. आठ मावरीनामे ओळखायला शिकल्यावर` ये, पहा, आणि, यासारख्या शब्दांवर तो अनेक आठवडे अडखळला.शेवटी त्याला कसले भय वाटले हे विचारायचे मला सुचले. तो म्हणाला पोलीस. का असे विचारताच तो म्हणाला, “पोलीस मला पकडून नेतील. रेल्वेने

जेलमध्ये घेऊन जातील. जेथे खाटीक मोठया मोठया सु-यांनी माझी खांडोळी करतील व उरले-सुरले शरीर टांगून ठेवतील. "मी जेव्हा हे मुख्याध्यापकांच्या कानावर घातले तेव्हा ते म्हणाले , "रागीचे वडील एक जुगाराचा अड्डा चालवितात. त्याच्या कुटुंबाचा प्रतिपाळ करण्यासाठी व स्वतःकरिता दारु मिळवण्यासाठीचा त्यांच्या तो एकमेव धंदा आहे. त्यामुळे सर्व कुटुंबच पोलीसांच्या दहशतीखाली रहाते. मुलांनी याविषयी कुठे काही बोलू नये म्हणून कदाचित त्यांना पोलीसांचे भय घातले असावे. "

मी जेव्हा पोलीस,खाटीक,सुरे,कत्तल,जेल हे शब्द रांगीला दिले तेव्हा ते त्याच्यासाठी एक नजरेत लक्षात रहाणारे शब्द ठरले. ये, पहा, यासारखे शब्द तो चार महिन्यातही शिकू शकला नव्हता.पण हे शब्द त्याला चार मिनीटात आले! मी याच शब्दाची कार्डस त्याला बनवून दिली आणि तोही वाचन प्रवाहात आला.

पुकी हा एका हुषार कुटुंबातून आलेला मुलगा. त्याच्या आईवडीलांमध्ये कडाक्याची भांडणे होत.बहुधा प्रकरण हातघाईवरही येई.ते ऐकून मुलं झोपेतून दचकून उठत आणि रडू, ओरडू लागत.हे सर्व मी स्वतःही ऐकलेले आहे. सहा महिन्यात हा मुलगा फक्त दोनच शब्द शिकू शकला होता. पण त्याला आई,बाबा,किंचाळणे, भांडणे, मारणे,झाडू,घाबरणे,फोडणे हे शब्द दिले आणि तो झपाटयाने वाचू लागला.

जॉन,जेनेटच्या पुस्तकातून मिळणारी शब्दावली व स्वरचित्र आणि मुलांची स्वनिर्मित मूळशब्दावली यातले भावनिक अंतर यावर इथे एक नजर टाकणे उचित ठरेल. 'जेनेट व जॉन ' यात मिाळणारे शब्द आहेत, ये पहा,जहाज,टेकडी,पळ,चढ,उतर ...

काही वेळा आम्हाला काही विशेष परिस्थितीला सामोरे जावे लागते. त्यावर मुलांचे शालेय जीवन अवलंबून असते. मुलांची मुळशब्दावली शोधण्यासाठी त्यांच्याशी कितीही वेळ बोलावे लागले तरी बोललेच पाहिजे.कारण याच किल्लीने ते स्वतःवरील बंधनातून मोकळा होणार आहेत.आणि त्याच मूळशब्दावलीत वाचनाचे रहस्य सामावलेले आहे. शब्दांच्या अर्थगर्भतेचे भान, त्याच्या सामर्थ्याची ओळख यातूनच त्यांना होते. ज्या शब्दांना त्यांच्या भावविश्वात स्थान नाही,त्यांच्या उपजत प्रेरणांशी जे निगडीत नाहीत ते लादल्याने त्यांचे नुकसानच जास्त होते.त्यापेक्षा काहीच न शिकवलेले बरे ! कारण अशाने त्याला शब्द हे अर्थशून्य वाटू लागतील आणि वाचन ही गरज नसलेली गोष्ट वाटू लागेल.

काही शब्द सर्वसामान्य मुल शिकू शकतात. मात्र त्यामुळे तेच शब्द मुलांसाठी उचित आहेत असे काही सिद्ध होत नाही. हा तर केवळ एक भ्रम आहे. शब्दाची सार्थकता ही मागास मुलांच्या कसोटीवरच तपासली पाहिजे. आणि मावरींमध्ये तर वाचन कौशल्यात मागासलेली मुल खूप आहेत.त्यांना हे या, पहा,आणि यासारख्या निर्जीव रसहीन शब्दांद्वारे शिकवण्या ऐवजी नवेनवे प्रयोग करण्यासच मी उद्युक्त होते.

भय व लैंगिकलेशी जोडलेल्या शब्दांशिवाय अन्य शब्दही मूळशब्दांवलीत येतात. सर्व जिवंत गोष्टीप्रमाणेच ते नित्यनूतन होत जातात. बदलत जातात. आता बालवाडीत नव्याने दाखल झालेल्या मुलांनी कुठले शब्द जमवले आहेत ते पाहू.ही सर्व मुले मावरी आहेत.

मोही - भूत,जेट,जीप,सांगाडा,मोटर,बदक,विमान,सॉसेज,पॉराज,अडे,कार,बीअर,जर्सी,चुंबन.

जोजो - रॉकेटचा राजा,इंडीयन,फॅंटम,सुपरमॅंन.

गिल्बर्ट - बेडूक,अक्रोड,ट्रक,रॉकेटचा राजा,जेट,जीप,बीअर,टॅक्टर,बॉंब,घोडा.

मोरीन - आई,बाबा,टेप,चुंबन.

पेनी - आई,बाबा,घर,विमान.

रोंगो - शेंगदाणे,केक,भूत,अंथरुन,चुंबन,

फिलीप - टक,टेन,बॉक्सीन,रायफल.

फिलीस - बीअर,पुडींग,बस,डालिंग,चुंबन,भूत.

हे शब्द जेव्हा मी कार्डावर लिहून देते,तेव्हा सर्वांच्या चेह-यावर स्मित झळकते आणि उत्साह संचारतो.

गेल्या दोन वर्षात नवीन सामील झालेल्या मावरीमुलांच्या एका दृष्टीक्षेपात लक्षात राहिलेल्या शब्द संग्रहाचे वर्गीकरण केले तर ते पुढीलप्रमाणे दिसले.

भय - ( सर्वात प्रभावी ) आई,बाबा,भूत,भिती,सापळा,रानडूक्कर,पोलीस,कोळी,कुत्रा,जेल,बैल,मृत्यू,मारणे, कसाई,सुरा,किचांळणे,फटकावणे,तोडणे,मारामारी,वीजेचा गडगडाट,मगर,रडणे.

लैंगीक - चुंबन,प्रेम,हाकानृत्य,प्रियतम,सहवास,मी आणि तू,गाणे.

वेगवान वस्तू - जेट,जीप,विमान,टेन,गाडी,टक,टेलर,बस.

इतर - शाळा,घर,मोजे,बेडूक,अक्रोड,शेंगदाणे,लापशी, चित्र,दारु.

दोन वर्षाच्या निरिक्षणानंतर मावरीबालवाडीत मुलांना कुठल्याही परिस्थितील एका दृष्टीक्षेपात वाचता येणारे दोनच शब्द आहेत. भूत आणि चुंबन. हे त्यांच्या दोन सर्वात बलीष्ट भावप्रवृत्तीचे प्रतिनिधीत्व करतात. कुठलेही मुल मग ते काळे असो वा गोरे वा सावळे या दोन शब्दांना एकदा पाहिले की कधीच विसरत नाही.

असे असले तरी या दोन शब्दांचा समावेश मी प्रथम वाचनाच्या पुस्तकात करु शकते का ? प्रश्न केवळ मानसिक धैर्याचाच नाही. ते जरी कितीही असले तरी प्रश्न प्रवाहाविरुद्ध पोहोण्यासाठी लागणा-या शक्तीचा आहे. ती मात्र मर्यादित आहे. एकदा पुन्हा जॉन आणि जेनेटची शब्दावली पाहू या.

जॉन, जेनेट या, पहा, जहाज, बघा. छोटा कुत्रा, पळा इकडे, खाली वरती, विमान, माझे, स्वतःचे, मांजराचे पिल्लू, एक दोन तीन, खेळा, उडी मारा, घोडेस्वारी.

आपली मुलभूत शब्दावली व जॉन जेनेटची शब्दावली यात काही भावनिक अंतर आहे. हे जाणवते का ? आपली शब्दावली ही मुलांच्या सृजनाच्या वाटेने आली आहे. आणि 'जॉन जेनेट' ची शब्दावली बाहेरुन लादलेली आहे. जीवननिष्ठ मूलभूत शब्दावली व जीवनविन्मुख शब्दावली हाच मुख्य फरक आहे.

***मूलभूत शब्दावली शिकविण्याचे तंत्र-मंत्र***

मूलभूत शब्दावलीचा शोध मी सकाळी पहिल्या तासालाच घेते. यावेळी मुलांची उर्जा उसळत असते.कारण हा शोध ही एक सृजनात्मक कृती असते. सृजन ही माझ्या लेखी सर्वात महत्वाची गोष्ट आहे. त्यामुळे सकाळी ९ ते १०.३० या वेळेत मी सर्व त-हेच्या सृजनात्मक कृतींना वाव देते.

ते येता क्षणीच मी त्यांना या मूळ शब्दावलीच्या शोधात गुंतवते. त्यांनी अन्य कृतींकडे वळण्यापूर्वीच मला त्यांचे लक्ष शब्दावलीकडे ओढावे लागते. कारण एकदा का ते मातीकामात वा चित्र रंगवण्यात गुंतले की मग त्यात व्यत्यय आणणे मला आवडत नाही, शिवाय मला त्यांच्या उत्साहाचा पहिला भरच यासाठी हवा असतो.

याची काही विशेष तयारी करावी लागत नाही. एक फूट लांब व पाच इंच रुंद या आकाराची भरपूर कार्डस हाती असावीत. सामान्य प्रतीचा चित्रकलेचा कागद व काळी क्रेयान. त्यांच्योडीला जुनी कार्डस सतरंजीवर पसरुन द्यावीत.

मी एखाद्या मुलाला माझ्याकडे बोलावून त्याला काय हवे आहे ते विचारते. तो किंवा ती कदाचित सांगेल 'मोजे'. मग मी मोठ्या अक्षरात कार्डावर 'मोजे' लिहिते. माझ्या माहितीसाठी कोप-यात बारीक अक्षरात तिचे नाव टाकते. मी लिहित असतांना तिचे लक्ष असते व मी जसे लिहिते तसे ती वाचू लागते. मग मी ते कार्ड तिला देते. सतरंजीवर बसून बोटाने ते गिरविण्यास सांगते. आणि ते झाले की एका पाकीटात ठेवून देण्यास सांगते. एका मागून एक प्रत्येकाला मी बोलावते. प्रत्येकाला त्या दिवशीचा नवा शब्द मिळतो.

त्यांनी स्वत: निवडलेल्या शब्दाचा एक गठ्ठा तयार होतो. तो एका खोक्यात ठेवण्यात येतो. रोज सकाळी मुले येण्यापूर्वी मी या खोक्यातील शब्द सतरंजीवर पसरवते. यामुळे वर्गात प्रवेश करताक्षणीच ते आपले कालचे शब्द शोधण्यासाठी धाव घेतात. यात भांडणे तर होतातच पण त्याचबरोबर एकाग्रताही होते. समाधानही मिळते. स्वत:चे शब्द मिळवल्यावर ते एक जोडीदार घेऊन एकमेंकांना आपले शब्द ऐकवतात. यासाठी अर्थातच वेळ लागतो. गोंगाटही होतो. मस्ती होते. व्यक्तीगत संबंध जुळतात. प्रत्यक्ष वाचन होते. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांचा एकमेंकांशी संवाद होतो. बहुतेक शाळांमधून मुलांमधील अंतर्गत संवाद बंद करण्यावरच भर असतो. मी तसे करीत नाही. कारण यातून ते एकमेंकांना शब्द शिकवित असतात. आणि त्यांचे शिकवणे माझ्यापेक्षाही उत्तम असते. याचवेळी मी प्रत्येकाला स्वतंत्रपणे माझ्यापाशी बोलावून त्या दिवशीचा नवा शब्द त्याला देते.

'मोजे'हा नवा शब्द मागणारी मुलगी माझ्यापाशी येते तेव्हा ती आपले जुने शब्द घेऊन येते व ते वाचून पुन्हा खोक्यात भरते. जर एखादा शब्द तिला वाचता येत नसेल तर तो शब्द मी काढून घेते व नष्ट करते. जो शब्द एक दृष्टीक्षेपात लक्षात रहात नसेल तो तिच्यासाठी फारसा महत्वाचा नसणार हे उघड आहे. मग तो त्यात ठेवून काय फायदा ? तिला महत्वाचे वाटणारे शब्दच तर मला हवे असतात. कारण त्याच शब्दांद्वारे तिला वाचन ही अर्थपूर्ण कृती वाटू लागणार असते. तिच्या जीवनातून आलेले शब्दच असे असतील जे एका दृष्टीक्षेपात लक्षात रहातील व तेच तिच्या शब्दसंग्रहात ठेवले जातील.

यावेळी मी तिला विचारते "आज तुला काय हवे आहे ? " कधीकधी ती उत्साहाने ओरडते 'टोस्ट'. पण कधी कधी ती इकडे तिकडे बघत पायाची बोट मोडत विचार करुन सांगते. 'खिडक्या'. आणि बहुसंख्य वेळी असे शब्द ती सायंकाळी परत ओळखू शकत नाही. मग तिच्याशी संवाद केल्यावर ती मॉडला कुशीत घेवुन झोपल्याचे सांगते. वडील मेंढयाची लोकर कातरण्याच्या शेडमध्ये गेले आहेत हेही सांगते. मी पुनःपुन्हा विचारुन मग 'शेड' वा 'मॉड' हा शब्द देते. जो उपयुक्त सिद्ध होतो. परंतु बहुद्या मी त्यांनी मागितलेला शब्दच कार्डवर लिहिते. मी लिहित असतांनाच त्यांचे वाचन सुरु असते. मग मी ते कार्ड त्यांना देते व सतरंजीवर बसून बोटाने गिरवायला सांगते.

कधी कधी हे शब्द निवडतांना माझ्या हातून चुकाही होतात. काही नवागतांचे मूल्यमापन करण्यास मला थोडावेळ लागतो. पाच वर्षाच्या मुलांमध्येही तेच वैविध्य असते जे निसर्गात असते. योग्य शब्द निवडीच्या आड याशिवायही अनेक अडथळे येऊ शकतात.उदा. दुस-याची नक्कल करण्याची प्रवृती, त्यावेळची मनोवस्था, मनावरील दबाव आणि भय जे त्यांना पंगु करुन टाकते. यामुळे अंतःस्फूर्तीचा झरा अवरुद्ध होतो व योग्य शब्द बाहेर येत नाही.

पण हे सर्व तुम्हाला लवकरच उमगले. मग लवकरच हा अवरोध निघतो आणि अंतःस्फूर्तीतून निघालेला शब्दांचा झरा वाहू लागतो. हे शब्द म्हणजे मुलांच्या मनातील चित्रांची शीर्षकेच असतात.

हे कदाचित अवघड वाटेल पण वाचन सुरु करण्याचा हाच सर्वात सोपा व जवळचा मार्ग आहे,असा माझा अनुभव आहे. या पध्दतीमुळे सर्वात महत्वाचा फायदा हा होतो की वाचनासाठी त्यांच्या मागे लागावे लागत नाही! **मी कधीच काहीच शिकवित नाही.** फळयावर काहीही लिहिलेले नसते. कुठलेही तक्ते, आराखडे, कोष्टके नसतात, मुलांनी शिकण्यासाठी शांत बसावे अशीही अपेक्षा नसते. शिक्षण त्यांच्या आपसताच सुरु असते. त्यांच्या मित्रसंबंधीं बरोबर इतर अनेक गोष्टी ते करीत असतात व त्या बरोबरच शिकतही असतात. मी फक्त माझी कार्ड्स हाताशी ठेवते, काही क्रेयानचे खडू घेते आणि त्याच्या जवळ बसते. मला जे साधायचे आहे ते कितपत

साध्य होते आहे ते न्याहाळण्याचे काम करते. मुलांच्या व्यक्तीमत्वाचे इंद्रधनुष्य तुमच्या समोर उलगडत जाते. ते न्याहाळतांना कुणालाही कंटाळा येऊच शकत नाही.

मधल्या सुटी नंतरचा तास हा साधनेचा तास (Input Period) असतो. यावेळी सकाळी दिलेले नवे शब्द मी पाकीटातून बाहेर काढते. कुणाच्या किती लक्षात आहे ते पहाते. बहुतेक मुलांना आपले शब्द झट्रकन ओळखू येतात. जे ओळखता येत नाहीत ते मी काढून घेते व त्या जागी जुने शब्द परत ठेवते. यामुळे मुले जेव्हा शब्द लिहायला बसतात तेव्हा त्यांच्या समोर असेच शब्द येतात ज्याचे चित्र त्यांच्या अंत:चक्षू समोर स्पष्ट असते.ते त्याच्या जीवनातले शब्द असतात. त्यानंतर शब्द परत खोक्यात भरले जातात. ते आता दुस-या दिवशीच्या सकाळीच लागणार असतात. नवागतांचा छोटा गट असेल तेव्हा खोक्यात साठणारा शब्दांच्या ढीगाला काही मर्यादा नसते. मात्र गटातील मुलांची संख्या वाढली तर मग प्रत्येक मुलाचे ठराविक शब्दच खोक्यात ठेवता येतात. जर गट बारा ते वीस दरम्यान असला तर प्रत्येक मुलाचे शेवटचे काही शब्द खोक्यात ठेवता येतात.

***टीप :-***

- कमीत कमी चाळीस व्यक्तीगत शब्दांचा संग्रह जमलेल्या मुलांनाच दुस-या टप्प्यात प्रवेश द्यावा. पण शब्द संख्ये बरोबरच शब्द आत्मसात करण्याची गती देखिल लक्षात घेणे आवश्यक असते. जर ही गती जास्त असेल तर शब्द संख्या कमी असली तरी त्या मुलाला पुढील टप्प्यावर प्रवेश द्यावा.
- जर मुलाने दुस-याच्या शब्दाची नक्कल केलीतर तो पुन्हा पहिल्यावर तो शब्द ओळखू शकत नाही.
- दर आठवड्याला काही नवे शब्द प्रत्येकजण शिकतोच. मग तो किती का लाजाळू वा अबोल असेना. थोडयाच दिवसात अक्षरांचे वेगवेगळे आकार त्याच्या घ्यानी येऊन लागतात. हेही समजते की प्रत्येक आकाराचा अर्थ वेगळा होतो!

ज्याला मी आपसातले शिक्षण ते कसे चालते? एक जण आपल्या हातातले कार्ड उंच धरतो आणि दुस-याला वाचायला सांगतो, जर त्याला आले नाही तर तो स्वत: त्याला वाचून दाखवतो. शिकणे - शिकवणे दोन्ही एकदम !

-----------------------------------------------------------------------------------------------

## सहज लेखन

'जीवन ही एक अतिशय गुंतागुंतीची घटना आहे. मुलांना त्याविषयी शिकवण ही सुळावरची पोळी आहे. कारण संपूर्ण जीवनाविषयी बोलावे तर काहीच समजत नाही. म्हणून आम्ही जर जीवनाचे छोटे छोटे भाग करुन मुलांना समजावू लागलो तर ते मुलांना समजू शकेल अशी शक्यता आहे, पण असे करतांना एक धोका संभवतोच. तो म्हणजे जीवनाचे छोटे छोटे भाग करतांना जीवनच नष्ट होऊन जायचे! '

- सी.ई.बीवे.

सकाळच्या पहिल्या तासात मूळ शब्दावलीची जमवाजमव केली की मग मुलं इतर उद्योगाला लागतात अर्थातच सृजनात्मक उद्योग.

पायाभूत शब्दावली पाठोपाठ सहज लेखन येते. पायाभूत शब्दावली ही अंतःर्दृष्टीला दिसणा-या चित्राची एका शब्दाची शीर्षके असतात, तर सहज लेखनात ही शीर्षके एका वाक्या एवढी किंवा कथे एवढी होतात, चित्र तेच रहाते. विषयानुसार लिहिण्या कडून मूल वर्णनात्मक लेखनाकडे येऊ लागते.

पाच वर्षाच्या मुलांचे लेखन त्यांच्या स्वतःच्या मूळ शब्दावली पासून सुरु होते. या गिचमिड आकारातून काय अर्थ निघतो हे त्यांना ठावूक असल्याने आपण काय लिहितो आहोत याचे त्यांना माझ्याही पेक्षा जास्त भान असते.

इथून ते लेखनाकडे वळतात. सर्वजण सकाळच्या तासात स्वतःच्या जीवनाविषयी लेखन करतात. या त-हेच्या लेखन सरावातून शैलीचा जन्म कसा होतो ते शिक्षकाला वा लेखकाला समजू शकते. या छोट्यांच्या लिखाणाच्या भिन्न भिन्न शैली असतात. एकाच त-हेची वाक्य वेगवेगळ्या विषयांसाठी,आशयासाठी त्यांना इतक्या वेळा लिहावी लागतात की त्यात वरचेवर येणारे शब्द त्यांना आपोआपच पाठ होतात. यातूनच त्यांची स्वतःची शैली विकसित होऊ लागते. या साठी मला काहीही शिकवावे लागत नाही. स्पेलींग, शब्दाभ्यास, वाक्यरचना हे सर्व प्रश्न अभिव्यक्तीच्या वाटेने सोपे होऊन जातात.

ही स्वतः बनवलेली मूळ शब्दावली त्यांच्या बरोबर कायम रहाते कारण वाचण्या लिहण्यापूर्वीपासून हे शब्द त्यांच्या मनात तर होतेच. पुढे त्याची सहजगत्या सतत उजळणी होते गेल्याने ते लक्षात रहातात. यातून त्यांच्या वहीच्या मागच्या भागात यातील निवडक शब्दांचा संग्रह केला जातो. अधून मधून लिहितांना त्याचे सहाय्य घेतले जाते व एकमेकांचे शब्दही वापरून पाहिले जातात. यामुळे ते इयत्ते अनुरुप पातळीपर्यंत आपोआप पोचतात यासाठी त्यांना जराही शिकवावे लागत नाही.

यातून सर्व सामान्यत: वापरले जाणारे शब्द हळूहळू सर्वांनाच ज्ञात होतात. ती समूहाची शब्दावली बनते. तेव्हा, आणि, ठेव, गेला, काऊबॉय, ट्रक, मी, आत, बाहेर, चित्र, साखरेच्या गोळ्या कडे, ते, वर, स्थळ, सांगितले, बाबा, आई, कारण..

काही काळाने त्यांच्या क्षमता विकसित होतात. मग ते स्वत: विषयी, आसपासच्या घटनांविषयी दोन वाक्य लिहू लागतात. मग तीन लिहितात. सहा वर्षाचे होई पर्यंत ते अर्धापान व सात वर्षाचे होई पर्यंत एक पूर्ण पान रोज लिहिले जावू लागते. पण हे काही मी शिकवले असे मी म्हणून शकत नाही, कारण हे सर्व त्यांच्यात होते तेच प्रकट झालेले असते त्यात माझे काहीच नसते. स्पेलींग, वाक्यरचना हेही अभिव्यक्तीची गरज म्हणून सहज जमू लागते, त्याचे निराळे ओझे बाळगावे लागत नाही.

या लिखाणातले नाट्य कुठल्याही तयार पाठ्यपुस्तकात कसे सापडू शकले? ते कुठल्याही तज्ज्ञाने प्रामणिक प्रयत्नातून तयार केलेल्या पुस्तकातूनही साधणार नाही. आमच्या शाळेत रोज सकाळी जितक्या विषयावरील शब्द जमतात तेवढे विषय कुठल्याही एका पुस्तकात सामावणे शक्यच नाही. त्या शिवाय महत्वाचे म्हणजे हे सर्व त्यांच्या स्वत:च्याच भाषेत लिहिलेले असते. या त्यांनी तयार केलेल्या रचनांमधील नाटय, करुणा, रंग मी कुठल्याही अन्य कुठल्याच पुस्तकांच्या पानांमध्ये पाहिलेलेच नाही !

पण या सर्व गोष्टी गोपनिय असतात. खाजगी असतात. त्यातील आशयावर आम्ही टीकाटिप्पणी करीत नाही. "मला शाळेचा तिटकारा वाटतो, " असे लिहिले किंवा "माझे (शिक्षिकेचे) घर जाळून टाकावे" असे लिहिले किंवा आदल्या रात्री गावात झालेल्या भांडणाच्या विषयी लिहिले तरी आम्ही त्यावर प्रतिक्रिया देत नाही. काय लिहिले हे महत्वाचे नाही, लिखाणाचे स्वातंत्र्य महत्वाचे आहे.

मी कधीही मुलाला काही शिकवून मग त्याविषयी लिहायला सांगत नाही. कले सारखेच लिखाणही मुक्त असायला हवे. त्यावर काहीही लादले जाऊ नये. मुलाचे लिखाण ही त्याची खाजगी बाब आहे. त्याची अभिव्यक्ती ही त्याच्या व्यक्तिमत्वाला एकसंध करते. यातूनच पुढे अधिक चांगले काम होते. लेखन विषय हा त्याच्या, जीवनाचे अंग असेल तेव्हाच हे होईल. लादलेल्या विषयातून यातले काहीच साधणार नाही. एरवी काही सुट्या संकल्पना वा घटनांची जंत्री शब्दांच्या गठ्ठ्यात बांधून ओळींमधून वाढलेली तुम्ही पाहीली असेल. तसे हे नसते. इथे आमची मुले विचारांची एका अतूट साखळी गुंफत असतात. हेच तर आम्ही मोठी माणस आपल्या संवादात व लिखणात आणण्याचा काळजीपूर्वक प्रयत्न करीत असतो.

या प्रकारच्या लिखाणात खपूच उर्जा लागते. इतर माध्यमांपेक्षा यात जास्त मानसिक थकवा येतो. यासाठीच मी हा तास सकाळी पहिला ठेवते. अनेकदा लिहितांना मध्येच आम्ही नाचतोसुध्दा. कारण नाचणे ही देखील संवादाची देह बोलीच आहे. काही मुलांना नाचणे बेहद्द आवडते. यामुळे त्यांना लिखाणाला स्फूर्तीही मिळत

असेल. अर्थात याबद्दल मला निश्चित काही सांगता येणार नाही. आपल्याच व्यक्तीमत्वात डुबकी मारुन त्यातीलच काही बाबींचे निवदेन करणे हा सहज लेखनाचा विचार आहे. अतर्दृष्टीचा वापर करुन मुले स्वतःचीच साधनसामुग्री वापरुन काही नवीन घडवतात. यामुळे ते अधिक काळ आपली ओळख टिकवनू धरु शकतात.

---

**-जीवननिष्ठ सहज लेखनाचे तंत्र - मंत्र**

सकाळचे १० ही पाठदुखीची वेळ आहे. तो पर्यंत अर्धातास तुम्ही वाकून वाकून मुलांचे लेखन पाहिलेले असते. मुलांचे डेस्क उंचीने कमी असल्याने वाकणे भागच पडते. त्याच्या वहीच्या पाठीमागाच्या पानांवर त्यांनी मागितलेला शब्द लिहून द्यावा लागतो. तो शब्द त्यांना परत वाचायचा आहे हे लक्षात ठेवून लिहितांना अक्षरात सुयोग्य अंतर ठेवावे लागते. ते सुवाच्य असावे लागते. व्याकरण काळजीपूर्वक तपासावे लागते, आणि त्या बरोबरच त्यांच्या विचाराची सुसंबध्दता जोपासावी लागते. ते लिहित असतांनाच तुम्ही त्यांच्या चुका दाखवा लिहिल्यानंतर नाही.

आपण टेबलाशी स्वस्थ बसावे आणि मुलांनी रांगा लावून उभे रहावे हे दृष्य चांगले नाही. तुम्ही स्वतःच सर्वत्र फिरले पाहिजे. तुम्ही सर्वांना हवे तेव्हा मिळायला हवेत. सर्वांकडे एकाच वेळी लक्ष ठेवणारी नजर तुम्ही कमावली पाहिजे. कला शिक्षकापेक्षाही सहज लखेन शिक्षकाची उर्जा जास्त खर्च होत असते. त्याला सर्व मुलांना वस्तू वाटत फिरण्याचे पाठदुखी होते तर सहजलेखन शिक्षकाला वाकून वाकून होते, दोन्ही सारखेच !

एक शिक्षकाकडे जास्ती जास्त बाराच विद्यार्थी असणे ठीक असते. खरे तर ८ हीच संख्या योग्य आहे. जेव्हा विकासाच्या तासाला सर्व मुल स्वतःच्या कामात गुंतलेली असतात तेव्हा मी हा लिखाणाचा तास घेते. गोंगाट भरपूर होतो. जेवढी अन्य वेळेला मुल बोलतात तेवढीच ती लिहितांनाही बोलतात ! पण मला ते चालते. सहज लेखनात कुठल्याही त-हेची दडपशाही चालतच नाही.

जेव्हा मला कुणी सहाय्यिका उपलब्ध असते तेव्हा आम्ही दोघीही काम वाटून घेतो. पण जेव्हा ती नसते तेव्हा मग दोन मोठ्या मुलांनाच्या मदतीने आठवडाभराचे पाठ एकाचवेळी लिहून घेतले जातात. मात्र हे करतांना मुलांचे व्याकरण, अक्षरांतील अंतर, अपूर्ण विचार प्रवाहाची अखंडता, यावर मलाच लक्ष ठेवावे लागते. मुलांच्या मनात विचारांची एक सुसंबध्द प्रक्रिया सुरु असते यावर बहुतेक कुणाचाही विश्वास नसतो.

पण अशा त-हेचे काम करायला लागल्यावर थोड्याच दिवसात हे पटते. सहज लेखनात येणारा मुख्य व्यत्यय म्हणजे मुलांच्या आपसातील गप्पा. आपल्याला काय हवे आहे ते मुलें शेजा-याला सांगत असतात. या सांगितलेल्या गोष्टी लिहिल्याही पाहिजेत हे त्याच्या लक्षात येत नाही. त्यामुळे मग 'मी घरी गेलो' अशा त-हेची एकदम शेवटची वाक्य लिहिली जातात. विषयच बंद होतो. म्हणून मी त्यांना अशा त-हेची वाक्य लिहू देत नाही

अर्थात त्याचे कारण त्यांना सांगत नाही, ,एखाद्याने जर 'मी गावी गेलो' असे लिहिले असेल तर मी लागीलच तेथे काय काय झाले ते लिहायला सांगते. त्यांच्या तुटक लिहण्यावर या उपायाने नियंत्रण मिळवता येते. एक दोनदा असे झाल्यावर तो आपोआप आपली विचार शृंखला न तोडता लिहू लागतो.

मुलांनी आपले लिखण एकाच बैठकीत पुरे केले पाहिजे असे मला प्रथम वाटत असे. परंतु वास्तवात वेगळा अनुभव आला. तास संपल्यावर जर विषय अर्धवट राहिला असेल तर दुस-या दिवशी ते आदल्या दिवशीचे सूत्र पटकन पकडून पुढे लिहू लागतात. त्यात काहीही त्रास होत नाही, ते लिहिलेल्या भागावर एक नजर फिरवतात आणि पुढे लिहू लागतात. यात वेळ जास्त लागतो हे मात्र खरे. मुलांची लेखनाची गती तुमचे त्यावर किती लक्ष आहे यावरही अवलंबून असते. तुम्हाला व्यवस्थित लक्ष देता येणे हे गटातील मुलांच्या संख्येवर अवलंबून आहे.

माझ्या वर्गातील मुलांच्या लेखनाची सुरुवात आपोआपच कधीतरी होते. त्यात कुठल्याही औपचारीकता नसते. मुले शब्दावली पासून सुरु करुन मग एक दोन शब्दांची वाक्ये लिहित सहजपणे लेखन सुरुवात करतात. तुला नेमक काय म्हणायच आहे? असे मला कधीकधी विचारावे लागते. पण हळूहळू ही गरज कमी होत जाते. तरीही कदाचित एखादे मूल खरोखरच अडखळले, अडकले तर मग नेहमीचाच उपाय अवलंबणे योग्य ठरते. त्याच्याशी गप्पा मारणे. या गप्पांच्या ओघात त्याच्या मनातील अडसर निघतो. प्रवाह सुरु होतो आणि लिखाण सुरु रहाते.

पण कधी कधी एखादे मुल लिहितच नाही. एखादवेळी स्वारीची लिहण्याची लहरच नसते. लिहिण्याचा तास आहे म्हणून लिहिण्यासारख्या महत्वाच्या गोष्टी मनात जुळतील असेही प्रत्येक वेळी कसे होईल? अशावेळी तो स्वच्छ सांगतो, "मला लिहायचे नाही". ठिक आहे. हेच वाक्य त्याला लिहायला सांगा. मग लिहावेसे न वाटण्याचे कारण विचारा. त्याबरोबर कारणांची एक जंत्रीच सादर होईल. काही तक्रारी काही आक्षेप, असे काही बाही. यातूनही त्याच्या मनातील खंत व्यक्त होते. मनातील अवरोध निघते. हे सर्व लिहितांना त्याचा लेखनाचा सराव जर सुरुच रहातो शिवाय त्याला आवडणा-या विषयात तो रमून जातो.

त्याच्या लेखना विषयी चांगली वा वाईट कुठली शेरेबाजी करुन नका. दुस-याच्या मनातील कल्पनाविषयी टिका टिप्पणी करण्याचा तुम्हाला काहीही अधिकार नसतो. मुलांची बुद्धी ही काही त्यांनी स्वतः घडवलेली नसते. ती त्याच्याजवळ असते एवढेच. त्यात कायकाय दडले आहे हे पहाण एवढच तुमच काम आहे. त्याच्या लेखनात सहजपणे रस दाखण्या पुरताच तुम्हाला त्याच्या लिखणाविषयी बोलण्याचा अधिकार आहे. जसे संवादाचे वेळी आपण करतो. हुंकार देतो. बरं म्हणतो. पुढे काय विचारतो. एवढेच. त्यांच्या वहीत मी कधीही काहीही खुणा करीत नाही. खाडखोड करीत नाही. एखादी स्पेलींगच चूक दुरुस्ती करण्यापुरतीच खाडाखोड चालते. कधीही

बरोबरच्या खुणा करीत नाही, सही करीत नाही. हस्ताक्षरा बद्दल तक्रार करीत नाही. आपल्या मित्राचे भावनेने ओथंबलेल पत्र आपल्याला आले तर आपण काय त्याच्या अक्षराबदल तक्रार करतो ? आशयाकडेच लक्ष द्यावे आकाराकडे नाही !

त्यांच्या लिखाणा विषयी मला काय वाटते याचा संबंध त्यांच्या लेखनाशी असण्याचे काही कारणच नाही. त्यांच्या मनात काय आहे ते त्यांनी लिहायचे आहे व त्यात ते यशस्वी होतात की नाही यावरुन तुम्ही किती चांगले वा वाईट शिक्षक आहेत ते ठरणार आहे! शिक्षक मुलांशी किती चांगल्या त-हेने संवाद साधू शकतो, दुस-याचे ऐकण्याची कला, समज व शहाणपण शिक्षकापाशी आहे की नाही, मुलांच्या मनातील विचारांना वाट देणे व त्यांचा ओघ कायम राखणे त्याला जमते की नाही याची मुलांच्या लेखनावरुन परिक्षा होत असते. शिक्षकाची घडण कशा प्रकारची आहे, स्वभाव कसा आहे हे या वरुन कळते. माझ्या समवेत काम करणा-या सहाय्यकांमधील सर्वोत्तम सहाय्यक नम्र स्वभावाने मुलांमध्ये मिसळून जाणारी, छापपाडू वृत्तीने न वागणारी अशी होती. या उलट सर्वात वाईट सहाय्यक असलेली एक मुलगी अतिशय हुषार पण स्व प्रतिमेत गुंतलेली व खूप बोलणारी अशी होती. ती एरवीही स्वतःच्या जीवना विषयी भडभडा बोलून ती इतरांना भंडावून सोडत असे. त्या वर्षी माझ्या वर्गात लिखाणाची गती सर्वात कमी राहिली !

सकाळचे १० ही पाठ दुखण्याची वेळ आहे. पण कुठलाही फलदायी प्रयत्न व्यक्तीला वाकवतोच. जे श्रम करण्यासाठी आम्ही उद्युक्त होतो त्या श्रमातच या दुःखावरील औषध दडलेले दिसेल.

---

**सहज वाचन**

*"मूल प्रगती करते, ते त्याच्या स्वतःच्या विकासाच्या नियमांना अनुसरुन"* **- डॉ.बरो**

मुलांसाठी बनविलेल्या प्रथम वाचनमाले विषयी बोलतांना मला अगदी दुःखाने म्हणावेसे वाटते की त्यातील सर्व शब्द हे मृत शब्द असतात. हे मला पुनःपुन्हा सांगावेसे वाटते. सतत परिवर्तन हे जीवनाचे मुख्य लक्षण असले तरी ही पुस्तके मात्र अपरिवर्तनीय असतात. शिशिर असो की वसंत, विद्यार्थी गोरे असो वा काळे, वर्गातील मुले प्रसन्न असो दुःखी कष्टी, वर्गातल्या वातावरणाशी संबध न ठेवता तीच ती नीरस श्ब्दावली घेऊन पुस्तक येतात.

वर्गातले वातावरण व पुस्तके या दरम्यान पडणारे अंतर भरुन काढण्यासाठी मी स्वतः नवीन पुस्तके तयार करुन पाहिली. पण तीही अन्य पुस्तकांप्रमाणेच मृत अक्षरांच्या वसाहतीच ठरली ! जरी माझी पुस्तक ही मावरी वातावरणाशी जास्त जवळीक साधणारी होती, इंग्लिश उच्च मध्यम वर्गातील जाणीवांच्या प्रभावापेक्षा वेगळी

होती, तरीही ती होती अचलच! आणि त्यातूनही माझा सहज वाचनाची शब्दावली काय असेल? हा प्रश्न सुटत नव्हताच.

***शेवटी मला हे उलगडले की प्राथमिक शाळेतली मुलं स्वतःची पुस्तक स्वतःच तयार करतात.***

सकाळच्या पहिल्या तासात मुल आपल्या सहज लेखनाला सुरुवात करतात. याच लेखनाचा मी कमी जास्त वापर दिवसभर वाचनासाठी करते. मुलं मूळ शब्दावली घेऊन पुढे प्रगती करतात तेव्हा ती दोन शब्दयुक्त गोष्टी पासून पानभर लिखाणा पर्यंत भराभर लिहू लागतात. यातून माझ्याकडे सर्व स्तरांवरील मुलांना लागणा-या माझ्या गोष्टी तयार होत जातात, सर्व गोष्टी त्यांच्या स्वतःच्या जीवनातून आलेल्या असतात. त्याची चित्र त्यांच्या मनःपटलावर रेखटलेलीच असतात.

जे नवीन शब्द ते सकाळी मागतात व ते त्यांच्या वहीच्या मागच्या पानांवर लिहिले जातात. तेच शब्द ते फळ्यावरही लिहून ठेवतात. ही शब्द संख्या एका पासून १० पर्यंत कितीही असू शकते. या शब्दांवर ते मधल्या सुटी नंतर परंत विचार करतात. त्याचे स्पेलींग काळजीपूर्वक पहातात, वाचतात. हे सर्व साधारण दहा मिनिटे चालते, प्रत्येक शब्द त्याला समजला पाहिजे व त्याचे स्पेलींग त्याला बिनचूक यायला हवे अशी माझी अपेक्षाच नसते. जर ते शब्द त्यांच्यासाठी महत्वाचे असतील तर ते सहजीच लक्षात रहातील. मग त्यांची लांबी कितीही का असेना. कुठला शब्द जास्त महत्वाचा आहे ते ठरवण ही देखील माझी जबाबदारी नसते. “Picture चे स्पेलींग लिहा”, असे मी कधीच सांगत नाही. मी विचारते “पेरी तुझ्या एखाद्या शब्दाचे स्पेलींग सांगशील का ? ” एकमेकांच्या शब्दांचे स्पेलींग एकेतांना आपोआपच नवे शब्दही त्यांना मिळतात आणि त्यांचे स्पेलींग मिळते.

कधी कधी जेवणाच्या सुटीपूर्वी आम्ही शब्द संग्रहाचा आढावा घेतो. सकाळच्या सहज लेखन वाचनानंतर किती नवे शब्द आठवले ते पाहिले तर आश्चर्य वाटते. अधिकाधिक कठीण व नवीन शब्द मुलांच्या पचनी पडू लागलेले दिसतात.

दुपारी सर्व शब्द पुसले जातात. मुलांना येणारे व न येणारे सर्व शब्द फळ्यावरुन पुसले जातात. मग फळ्यावर नवीन शब्द अवतरतात. या नवीन शब्दांविषयी आम्हाला सवांनाच अनिवार औत्सुक्य असते. कारण कुणालाही त्या दिवशीचे शब्द तो पर्यंत माहिती नसतात, भन्नाट शब्द अवतरतात. हेलिकॉप्टर, काऊ बॉय, दुखरा कान, मासा व आणि चिप्स, घाण, कॅप्टन, गोट्या, गालगुंड, सुपरमॅन, रॉकेट मॅनचा राजा.. शब्द. एका मागून एक शब्द. वर्गातील त्यावेळच्या मनावेस्थेचे प्रतिबिंब असणारे शब्द. मावरीच्या दहन संस्काराच्या वेळचे शब्द, रात्री पाहिलेल्या सिनेमा विषयीचे शब्द व गावात, घरात घडलेल्या भांडणातले शब्द.

वर्गातील त्यावेळच्या लहरीनुसार येणा-या लाटां सारखे शब्द येतात. ही वर्गाची मुख्य वाचनासामुग्री असते. ते आधी स्वतःची गोष्ट नीट समजून आत्मसात करतात आणि मग दुस-याच्या गोष्टींकडे वळतात,

स्वतःची गोष्ट मोठ्याने वाचायची त्यांना मुभा असते. यातूनच चर्चा सुरु होते. सर्व गोष्टींची सर्व पाश्वभूमी सर्वांनाच माहित असते. त्यामुळे ती गोष्ट त्यांच्या मनःपटलावर ते पाहू शकत असतात. अशा अवस्थेत होणारी चर्चा ही कधीच कंटाळवाणी होत नाही.

एकमेकांनी लिहिलेल्या गोष्टींचे वाचन करतांना नवा शब्द लिहिणा-याच्या नावाने ओळखला जातो. यामुळे लेखकालाही मजा वाटते. माझ्या मदती शिवाय आपोआप त्यांचा शब्द संग्रह फुलत जातो.

मुलांनी स्वतः होऊन वाचनात एवढा रस घेणे ही शिक्षकांसाठी किती सुखद घटना असते. प्रत्येक मुलाच्या मनात असणारी सळसळती चित्र दृगोचर व्हायला लागतात. शब्दांतून निर्माणा होणा-या चित्रात मुलं इतकी रमतात की शब्दांची लांबी, वाक्याची लांबी, अक्षरांची वळणे यासारंख्या गोष्टी त्यांच्या वाचनात कधीच आडथळा ठरत नाहीत. इतर कुठल्याही तंत्रपेक्षा या त-हेने शब्दांची वारंवार सहजगत्या उजळणी होते. मुलांना हवासा वाटतो तो पर्यंत कुठलाही शब्द कितीही वेळा कुठल्याही निमित्ताने येऊ शकतो. आणि मुलांचा त्यातला रस संपला की तो दूर ढकलला जातो. म्हणूनच मी याला खळाळती शब्दाधारा म्हणते. इथे नेहमी काही तरी घडत असते जिवंतपणे.

हाच शब्दसंग्रह मी लिखणाचा आधार म्हणून वापरते. यामुळेच त्याकडे व्याकरण व शुध्दलेखनाच्या दृष्टीने मी जागरूकतेने बघत असते. हस्ताक्षर कमीत कमी सुवाच्य तरी असावे नाहीतर ते एकमेकांना आपल्या वह्या वाचयला देतात तेव्हा पंचाईत होते ! हा त्यांच्या इज्जतीचा प्रश्न होतो. आपले हस्ताक्षर वाचता आले नाही तर आपल्याला मान खाली घालण्याचा प्रसंग यायचा. त्यामुळ हस्ताक्षरात सुधारणा होत जाते. ही सुधारणा रचनात्मक उर्जेचा भाग म्हणून होते.

परंतु वाचनात कायमसाठी केवळ सहज वाचनाचा समावेश करून खरेतर चालणार नाही. कारण हा प्रवास शेवटी अनौपचारीक सहज वाचनाकडून औपचारीक पुस्तकांच्या वाचनाचे दिशेने पुढे सरकणार असतो. परंतु हा बदल सहजगत्या होतो. मूल आपल्या आंतरीक सृष्टीकडून बाह्यसृष्टीत येते, ज्ञाताकडून अज्ञातकडे जाते, सहज वाचनाकडून निर्धारीत पाठ्यपुस्तकांच्या वाचनाकडे जाते. मात्र या बदलाची गती मुलांसाठी आरामशीर असायला हवी. मूल बालवाडीतल्या रचनात्मक गोष्टींमध्ये जेवढे रमेल तेवढा त्याचा मानसिक विकास सहजसाध्य होईल. त्या बळावर तो हे बदल आत्मसात करु शकेल.

***<u>सहज शब्दलेखनाचे तंत्र व मंत्र</u>***

खेळाच्या तासानंतर अभ्यासाच्या तासाला आम्ही आपले लक्ष नव्या शब्दांवर केंद्रीत करतो. मूलं वह्या घेऊन फळ्याजवळ धाव घेतात. सकाळी त्यांनी मागितलेले शब्द ते फळ्यावर लिहू लागतात. शब्द शिकलेल्या शब्दांचा विसर पडावा इतका काळ लोटलेला नसतो. कधी कधी त्यांनी सकाळच्या तासाला जास्त शब्द मागितले

असतील तर एखाद्यावेळी ते गोंधळतात. मग त्यांना शब्द सापडत नाहीत, अशावेळी ते आपले शब्द शिक्षकांना विचारुन घेतात.

सर्व शब्द फळ्यावर लिहिले जातात त्यामुळे मला ते बसल्या जागेवरुन पहता येतात, ते लिहितात, पुनःपुन्हा वाचतात, मोठी मुलं स्पेलींग लिहितात. लहान मुलं केवळ वाचतात, प्रत्येक मूल त्याच्या आकलन शक्ती नुसार काम करीत असते. फळ्याजवळ जास्तच गर्दी झालीतर काहीजण माझ्या भोवती जमून एकमेकांचे शब्द ऐकतात. मी आणि तू यांचा आवश्यक संबंध विनासायास प्रस्थापित होतो. या सर्व क्रियांमध्ये भरपूर गोंगाट होतो हे खरे पण कामही भरपूर होते हेही खरेच.

कधी कधी मी “कोण एखद्या शब्दाचे स्पेलींग तयार करुन शकतो? ” असे विचारते. मुलांच्या जीव्नातला त्यांना अर्थपूर्ण वाटणारा असा एखादा शब्दा मला त्यांच्या कडूनच मिळतो. तो त्याचे स्पेलींग तयार करुन लागतो. शब्दाशी निगडीत चित्र मनःपटलावर दिसू लागलेले असते त्यामुळे स्पेलींग सहजगत्या व आनंदाने तयार केले जाते. कठीण शब्द स्पेलींगच्या वेळी गळले जातात हे खरे. परंतु ज्या शब्दांना त्यांच्या लेखी भावनात्मक मूल्य असते त्याचे स्पेलींग ते मोठया मेहनतीने तयार करतात. हे आव्हान स्विकारणे त्यांच्या वयोमानावरही अवलंबून असते.

अवकाशयान (sky rocket), सापळा(Skeleton), गोळया(lollies) या सारखे शब्द त्यांना माझ्या मदती शिवाय येऊ लागतात. क्वचित काही मुलांना काऊ-बॉय सारखे शब्द लिहिता येत नाहीत. शिक्षकांसाठी हा सोपा असतो. आत्मसात करण हे त्यांना प्रकट करण्यापेक्षा सोपे वाटत असावे. काहीही गोष्ट बाहेरुन मुलांमध्ये घुसवतांना त्याची नैसर्गिक उर्जा त्याला विरोध करीत असते, तीच उर्जा इथे त्यांना सहाय्यकारी सिध्द होते. ही उर्जा मोठी भयकारी असते. या सर्वामुळे गडबड गोंधळ बेसुमार वाढतो. इतका की शिक्षकामंध्ये व्यावसायिक निपुणताच नाही असही कुणाला वाटेल. पण तसे वाटले तरी चालेल. कारण मी व्यावसायिक दृष्ट्या निपुण शिक्षक आहे असे मी स्वतःही म्हणत नाहीच.

सुमारे ४५ मिनिटे हा लिहिण्याचा कार्यक्रम चालतो. मग मुले वह्या घेऊन पूर्वीच वर्तुळाकार ठेवलेल्या खुर्च्याकडे धावतात. वाचनसाठी आपल्या वह्यांची अदलाबदल करण्यासाठी.

---

## -सहज वाचन शिकविण्याचे तंत्र

४५ मिनिटे वाचनासाठी दिली जातात. वह्यांच्या दशेवरुन सहज वाचन किती व कसे होते आहे हे लक्षात येऊ शकते. वर्ग नीट नेटका असला तरी वह्या पार फाटून गेलेल्या असतात.

माझ्या एका सहाय्यिकेन एकदा मला सुस्थितल्या वह्या दिल्या. तेव्हा माझ्या लक्षात आले की सहज वाचनातील एक महत्वाची पायारी वगळली गेलेली आहे. वह्यांची आदलाबदल करुन वाचणे. एकमेकांच्या लिखाणाची चर्चा करणे. आवश्यक आहे कारण सर्व अभिव्यक्ती हा संवादच असतो. आम्ही कुठलीही रचना केवळ स्वत:साठी थोडीच करतो? वह्यांची अदला बदल व्हायलाच हवी.

हल्ली माझ्या सहाय्यिका अधून मधून वर्गातील मुलांच्या वह्या दुरुस्त करुन देतात. पूर्वी त्या नव्हत्या तेव्हा मीच चिकटपट्टी, पेन्सील रबर, ब्लेड घेऊन वर्गा वर्गातून हिंडत असे. पूर्वी फाटक्या वह्या शाळा तपासनिसांना दाखवतांना मला संकोच वाटत असे. पण लवकरच मी तो संकोच टाकून दिला, एकदा मी वह्यांना ब्राऊन पेपरचे कव्हर घालून, बाईडिंग करुन घेतले होते. त्याला खर्च बराच आला पण त्याही वह्या फाटल्याच! जास्ती जाड ब्राऊनपेपर घेतला असता तर फरक पडला असता. पण ते पैशाअभावी जमणारे नव्हते. अर्थात अजून चिकटपट्टी आणणे परवडते की ब्राऊन पेपर आणणे याचा तुलनात्मक अभ्यास मी केलेलाच नाही. एकदा एका शिक्षेकेने मला सांगितले की वह्यांची अवस्था सुधारल्या शिवाय तिला काम करणे शक्य नाही. तेव्हा मुलांचे शिक्षण योग्य त-हेने चालू आहे याची मला तात्काळ खात्री पटली !

वर्तुळाकार खुर्च्यांमध्ये बसून मुलं वरुन आपला व इतरांचा वह्यांमधून वाचतात, मी नेहमी त्यांना मोठ्या आवाजात वाचायला सांगते. यावेळी शिक्षकाने हळुवारपणे वागणे आवश्यक आहे. नाहीतर वाचना नंतरची चर्चा ठप्प होते. चर्चाच तर अतिशय महत्वपूर्ण असते. तो सर्व सहज वाचनाचा परमोत्कर्षाचा बिंदू असतो. मोठी मुलं अशा चर्चेला बसतात तेव्हा लहान मुलांना मी माझ्या सहाय्यिके बरोबर वा एखाद्या मोठ्या मुला बरोबर बाहेर खेळायला पाठविते. सहज लेखनातून चेर्चेचे असे मुद्दे निाघतात की जे एरवी संभवतच नाहीत.मनोरंजक गोष्टींपासून संतापाचा भडका उडण्यापर्यंतचे विषय या चर्चेत येतात. शिक्षकाने मात्र यावेळी तटस्थ रहाणे गरजेचे आहे. कुणालाही प्रोत्साहित करु नका वा विरोध करुन नका. फक्त पहा. मुलांच्या मनातील सर्व गोष्टी चर्चेत प्रकट होऊ द्या. तोच तर या उपक्रमाचा हेतू आहे.

वाचनाचा ४५ मिनिटांचा तास संपे पर्यंत साडे अकरा वाजतात. त्यानंतर पंधरा मिनिटे चर्चा होते. शाळेत इतका वेळ चर्चेसाठी देणे अशक्य वाटू शकेल.पण हा तसा चर्चेसाठी आवश्यक वेळ आहे. या पाव तासात माझ्या साधन सामुग्री विषयी मी खूप गोष्टी शिकते. या आवेशपूर्ण चर्चेत नीरस शुष्क असे क्षण कधीच येत नाहीत.

अकरा ते बारा दम्यानच्या शेवटच्या पाव तासात मावरी बालवाडीत वाचन सुरु असते. अकरा ते बाराच्या दरम्यान चालणारा गोंगाट, आवेशपूर्ण चर्चा, वह्यांचे आदान प्रदान या सर्व वातावरणाची मला कधीच लाज वाटत नाही.

## -मावरींची सक्रमण वाचनमाला.

मूळ शब्दावली व सहज वाचन यांनी मावरी मुलांच्या मनातील कानाकोप-यांमध्ये डोकावण्याची संधी मला मिळाली. मला वाटते की मी त्यांना अंतर्बाह्य ओळखते. माझ्याकडे त्यांच्या वह्याच वह्या आहेत, ज्यात त्यांनी स्वत:विषयी खूप काही लिहिले आहे. त्यांच्या अंतर्मनातील असंख्य चित्रांची ही नाव आहेत. कधी एक वाक्याची तर कधी कथेसारखी. त्यांचे लेखन हाच एकमेव पुरावा आहे असही नाही. त्यांच्या बरोबर रोज काम करतांना अपोआपच त्यांच्या मनातील इच्छा त्यांची दु:ख आणि कल याची ओळख तुम्हाला होतेच. इच्छा असो ना नसो. याच मातीतून मावरीची संक्रमणकालीन वाचनमाला उमलते. वाढीस लागते. उमलते हेच त्याचे यथार्थ वर्णन होईल. सहा वर्षाचा अनुभव, शेकडो पुस्तकांएवढी वाचनसामुग्री. यातून ही चार पुस्तके तयार झाली आहेत. कितीतरी वेळा मावरी बालकांच्या उत्सुक हातात मी ही पुस्तक दिली. त्यातील चित्रांचा रंगही अद्याप ओलाच होता अशी ती पुस्तक वाचतांना होणा-या त्यांच्या प्रतिक्रिया न्याहाळल्या. अनेकदा मला स्वत:च्या हिंमतीवर अंधा-या गल्लीतून वाट काढावी लागली. कारण हा प्रयोगच सर्वस्वी नवीन होता.

मावरी खेड्याची स्वाभाविक वर्तनशैली या पुस्तकात प्रतिबिंबित होणे आवश्यक होते. जगण्यातील उत्स्फूर्तता, त्यातले नाट्य, समूहातील परस्परां विषयीची आत्मियता व परस्परातील हेवे दावे सर्व काही. मावरी खेड्यातील जीवनात, कोमलता, आसवं, खडाजंगी भांडण, दारु, प्रेम आणि गाणी यांची गुंफणच असते. मी हे जाणते कारण मी त्यांच्या जीवनाचा एक भाग बनून त्यात मिसळून राहात होते. मावरीं मध्ये अश्रूंना असलेले मोल, त्यातून व्यक्त होणा-या, काळजाला भिडणा-या भावनांचे सौंदर्य हे सारे युरोपिअन जीवनातून कधीच हद्दपार झालले आहे.

आमच्या बालवाचनात दु:ख एवढे निषिद्ध का असते? चुंबन आणि आक्रंदन हे जादूई शब्द त्यात का वर्ज्य आहेत? भूत, प्रिये या सारखे भावदर्शी शब्द का नाहीत? युरोपिअन वा मावरी जीवनातले हे तर रोजचे शब्द आहेत. किंग्जलेच्या साहित्यातील वॉटर बेबी, टॉम यांच्या वाट्याला दु:ख आलेच होते. ॲलिस इन वंडर लँड मधील ॲलिस अनेकदा संकटात गुरफटली होती, डेव्हीड कॉपरफिल्ड हा तर अनेकदा अश्रू ढाळतांना भेटतो. मग शाळेच्या वाचन लेखनातूनच हे सर्व काम वगळले गेले आहे? त्यामुळे तेथील शब्दावली निर्जीव , नीरस व एकांगी बनते.

संकट आणि आक्रंदन याशिवाय कुठले आयुष्य असते का? झोडपट्टीतील मुलांना ही कृत्रीमपणे आनंदी जीवनाचे वर्णन करणारी पुस्तके पाहून काय वाटत असेल ? मावरींमध्ये राहून त्यांची पाठ्यपुस्तके पहातांना मला तसेच वाटत होते. या पुस्तकांच्या अशा रचना करतांना शिक्षण तज्ज्ञांना काय साधायचे होते. जीवनाकडे पाठ

फिरवून शांतता व सद्‌भावनेचा जप करणारी पुस्तके निर्माण करुन मुलांच्या हाती दिली की त्यांच्या जीवनात खरोखरचे सौख्य व शांती येईल असे तर त्यांना वाटत नाही ना? उलट ही नीरस, सपक पुस्तके पालकांनी मुलांच्या हाती बळेबळे दिल्यानेच मुल कॉमिक्समधील नाट्य व हिंसा याकडे वळतात मला वाटते.

काही वेळा मी मुलांना डोळे मिटून स्वप्न पहायला सांगते. मग त्यांच्या स्वप्नाविषयी खूप ऐकते. त्यावेळी व्यक्त होणारी हिसा आपण स्वत: ऐकल्याशिवाय आपल्याला समजणारच नाही. हिंसक भावना अनेकदा माझ्या विषयी देखील असते. ती देखील ते मला उत्साहाने सांगतात. ते ऐकणे मला जडच जाते. माझे घर जाळून टाकले आहे, बॉब टाकून उध्वस्त केले आहे, सर्व त-हेच्या बंदूकांनी माझ्यावर गोळ्यांचा वर्षाव केलेला आहे, किंवा मला गोरीलांच्या ताब्यात देऊन टाकले आहे! त्यांच्या स्वप्नात मी अधिकारशाहीचे व शिस्तीचे प्रतीक असल्याने माझ्या वाट्याला या शिक्षा येत असाव्यात.

प्रत्यक्ष जीवन व आमची पुस्तके यातील अंतर भयवाह आहे. जॉन आणि जेनेट कधीच खेळतांना आपटत नाहीत, त्यांच्या गुडघ्याला खरचटत नाही. हे मला पटतच नाही. त्याची आई कधीच लाडाने त्यांना जवळ ओढून पपी घेत नाही. जॉन नेहमीच कसा आज्ञाधारक असतो? कधीच बंड करीत नाही. अमेरिकेन मुलांच्या मनात भयाचा मागमूस ही नसतो? मुसळधार पाऊस वा कडाडणा-या वीजा यांचा अनुभव अमेरिकत येत नाही? मग वाचनामालांमध्ये सर्व छान छान, गोड गोड कसे असते? पाच वर्षे वयाच्या मुलांमध्ये सतत राहिल्याने मला पडलेले हे प्रश्न आहेत. तुम्हाला ते बाळबोध वाटू शकतात. आमच्या वर्गात कमालीचा जिवंतपण भरलेला असतो. अनेक घटना घडत असतात हे अगदी ईश्वर साक्षीने मला सांगावेसे वाटते. भांडण, प्रेम, नवागतांशी होणारी ठोसाठोशी. आमची तयार पाठ्यपुस्तक म्हणजे प्रत्यक्ष जीवनावर ठेवलेली झाकण आहेत झाकण. ख-या भावनांना लपवणारी दाबणारी, झाकून टाकणारी झाकण.

या संक्रमणकालीन पुस्तकांमध्ये जीवनातले नाट्य सहजपणे समाविष्ट होणे मला आवडते. काही वेळा अश्रू, काही वेळा प्रेम, बरेचसे भय आणि संस्कृतीचा सहजस्पर्श. या मातीतून उद्‌भवलेली ही मूळ शब्दावली व त्यातून निर्माण झाले समर्पक लेखन यात हे सारे तर येणारच ना? जीवनातील नाट्य मला नकोसे वाटले. (अर्थात मला ते नकोसे वाटत नाहीच) तरीही ते त्यांच्या लेखनात आलेलेचच असते. माझ्या लेखी हे यथार्थ जीवन आहे त्रिमितीय दर्शन घडविणारे जीवन. बिथोवेन व चेकोस्कीची, यांनाही ते असेच दिसले होते, याचा अर्थ यावेळी मला ब-याच मोठ्या कलावंतांच्या भरभक्कम आधार आहे.

तरीही माझ्या शिशुवर्गात मी ‘जॉन आणि जेनेट’ च्या पुस्तकांना स्थान द्यायला आनंदाने तयार आहे. पण खरे तर आमच्या वर्गात ही ‘जॉन आणि जेनेट’ वाली पुस्तक असावी की नसावीत हा मूळ मुद्दाच नाही. मूळ मुद्दा

आहे मावरी मुलांचे हे कोवळ्या वयात एका सस्कृतीतून दुस-या संस्कृतीत ढकलेले जाणे. मावरी खेड्यातून उठून युरोपिअन गावात वसणे.

-----------------------------------------------------------------------------------------------

पाचव्या वर्षी मावरी मुलांची लिखित शब्दांशी प्रथम भेट होते. त्या शब्दांचा आपल्या जीवनाशी असलेला संबध त्यांना जाणवतो तेव्हा त्यांना आपोआपच वाचन आवडू लागले. ही दुसरी महत्वाची बाब आहे. वाचनाचे प्रेम. पुस्तकांचे प्रेम. जेनेट आणि जॉनच्या पुस्तकाशी पहिल्याच मुलाखतीत अडखळलेली मुले पाहिली की मला त्याच्या भविष्याची चिंता वाटू लागते. इथून पुढच्या काळात तो कॉमिक्स वाचत रहाणार आणि शेवटी गुन्हेगारीकडे वळणार असे दिसू लागते. पुस्तक कितीही शास्त्रीयदृष्ट्या चांगले असले तरी ते तर मावरी जीवनाविषयी संवेदनाशून्य असेल तर त्यांचा मावरीमुलांना त्यांच्या संक्रमण काळात काहीच उपयोग होणे शक्य नाही. अशी पुस्तके ज्यात त्यांच्या जीवनातील प्रसंग नाहीत. त्याचे विचारविश्व नाही.त्यात त्यांना काय रस वाटेल? पुस्तकातले वातावरण. त्यातले संदर्भ हे मुलांच्या परिचित जीवनातले असले तरच त्यांना वाचावेसे वाटेल, रस वाटेल. मूळ शब्दावली तयार करतांना जो नियम लागू होतो तोच इथेही लागू आहे. याच गरजा लक्षात ठेवून संक्रमण कालीन पुस्तकमाला तयार करण्यात आली.

या पुस्तकांचा हेतू केवळ इंग्रजी भाषा शिक्षण हा नाही. त्यांचा हेतू आहे दोन भिन्न संस्कृतीत दोन हजार वर्षाची दरी सांधणे हा. या साठीच मी आपल्या मावरी बोलीतलेच पुस्तकच वाचनासाठी वापरणे पसंत करते.

एः ("eh?") हा शब्द मावरींच्या संभाषणात वरचेवर येतो. तो मावरी भाषेतील नेई पासून बनलेला आहे. इंग्रजीत ज्या प्रमाणे "नाही का" (isn't it), "आपण नाही का? " (Don't we?) "ते नाही का? " (Haven't they?) " तुला नाही वाटत? " (Don't you think?) या शब्द समूहांचा वारंवार वापर होतो, तसेच मावरीत नेई येते. मावरीमुल कधीकधी हा शब्द सुरुवातीलाही वापरतात "एः श्रीमती क्ष? " " आपण नदीवर जाणार आहोत का एः?" मावरीच्या संक्रमणकालीन वाचनमालेत याचाही समावेश होणे गरजेचे होते. मावरी मुलांना ते वाचतांना ऐकल की त्याचा लिखाणात समावेश करण्याचे साहस दाखविल्याचे फळ मिळाल्याचा आनंद मला होतो. एखादा पुरस्कार मिळण्या इतका हा आनंद मोठा असतो. "आपण खेळू या ए? " "मी आणि तू ए?" "बाबा तुम्ही माझ्या सोबत रहाल ना ए!" परक्या भाषेतल्या आघातांनी दुखायला लागलेला कानांना हे औषधच वाटते. सर्वत्र गुणगुणणे सुरु होण्याची भिती असली तरी त्यांना वाचनासाठी उद्युक्त करुन तर पाहा! " चला, खेळू या. " "ते घरीच आहेत" "आई घरात आहे. "

पूरक वाचनातला ब्लॅक माणि डक यातला संवाद मी आता वाचते आहे.

मला हा तलाव आवडत नाही मला इथे रहायचे नाही (I do not like like this pond. I do not want to live here)

लेखकाने डोंट (**don't**) हा शब्द कधी पाहिलेलाच नाही का? कोणत्या नंदनवनात वा नरकात अशा प्रकारे भाषा बोलली जाते? शब्दांची लय का लक्षात घेतली जात नाही ? हे लेखक कविता वाचन करीतच नाहीत का? पाच वर्षाच्या मुलांसाठी वाचनातील लय घालवून ते अधिक कठीण का केले जाते आहे? मला कळत नाही मला कळत नाही. मला कळत नाही. (I do not know. I do not. I do not)

मनातला विचार प्रकट करण्यात मी उशीर करीत नाही. मी "ही इज नाट नॉटी" असे म्हणत नाही "ही इजंट नॉटी "असे म्हणते. व्हेअरिज इहाका? ही'ल गेट हीडींग, कुरी'ज ॲट होम, पुसी'ज फ्रायट्नड.. (Where's Ihaka?**He'll get a hiding,Kur's at home. Pussy's frightened)** मोठ्याच्या कांदब-यामध्ये आम्ही अस्सल संवादाचे स्वरुप पहातो. परंतु पाच वर्षाच्या मुलांसाठी मात्र काही अनाकलयीन कारणासाठी आम्ही ही वळसेदार भाषा वापरतो आणि लिहितो. आणि खरे तर कुणीही मावरी लेट अस (let us) ही शब्दरचना वापरतच नाही. ते म्हणतात "वी प्ले,एः? "

संवादाचे नैसर्गिक रुप व लय कायम ठेवली तरच ते सहजगत्या समजतात. कारण लय ही नैसर्गिक संवादाची उपजत शैली आहे. यामुळेच मला वाटते पुस्तक वाचन हाही संवादा सारखाच मुलांच्या जीवनातील एक अविभाज्य भाग बनावा.

शब्दांची पुनरावृत्ती, वाक्यांची लांबी, आणि पानाची लांबी याबाबत मी अमेरिकन लेखकाची खुली प्रशंसक आहे.त्याचेच आदरपूर्वक व मन:पूर्वक अनुकरण मी मावरीसाठींच्या पुस्तकात करते. त्यांच्या पुस्तकाची मांडणी देखिल इतर अमेरिकन गोष्टींप्रमाणेच उत्तम असते. यातील आशयही मावरींना व मला भावतो.

पुस्तकात असलेली विवरणचित्रांची शैली हळूहळू सुधारत गेली आहे. त्यामागे विचारपूर्वक केलेली कृती कमीच आढळेल. कदाचित उत्स्फूर्ततेचा भाग असेल, हुबेहुबपणा, सुबकता हे मला व माझ्या मावरी साथीदारांना सारखेच त्रासदायक व नकोसे वाटते. तशी प्रतिनिधीक चित्र मलाही जमू शकतात पण मला प्रतिकात्मक रुपरेखात्मक चित्रण करणेच जास्ती आवडते. या त-हेने भावनांचे प्रकटीकरण अधिक जोरकसपणे होऊ शकते. प्रौढांच्या तरल कवितांसाठीही मी याच शैलीतील चित्र काढलेली आहेत. मावरी मुल एखी फटकळ असली तरी त्यांनीही माझ्या या वेडाचारावर टिप्पणी केलेली नाही. कदाचित ही प्रतिकात्मक चित्रणशैली ही त्यांच्याही अभिव्यक्तीची भाषा असेल व त्यामुळे त्यांना ती जास्त समजू शकत असेले. मुलांनी स्वतः चित्र काढलेली काही पुस्तकही माझ्याकडे आहेत. जराही अतिशयोक्ती न करता केवळ काटेकोरपणे त्याचे चित्रांचे एका शब्दात वर्णन करायचे तर 'भुरळ घालणारी' एवढेच म्हणता येईल. अर्थात चित्रकार आपली सहज शैली सोडून करणार तरी

काय म्हणा! शिवाय त्याचे यथायोग्य मूल्यमापन शेवटी आमची मावरीमुलच तर करणार. मला वाटत भाषिक व्यवहारात मी त्यांच्या जवळ आल्यावर चित्रशैलीतही त्यांच्याच पातळीवर उतरणे सुसंगतच म्हणावे लागेल. या चित्रशैलींवर टिकाच करायची म्हटली तर मुलांच्या शैलीला आम्ही मान्यता व सन्मान दिला आहे, एवढेच म्हणता येईल. जे प्रौढांना हास्यस्पद वाटू शकेल. आणि ज्यांना तारीफच करायची आहे ते असे म्हणू शकतील की हेच एक माध्यम आहे ज्यात मी माझे म्हणजे मांडू शकते.

गतीमानतेने या शैलीतील रेषांचा वळणदारपणा अदृष्य झाला आहे. गोष्ट सांगत असतांनाच फळ्यावर चित्र रेखाटतांना रेषांच्याकडे लक्ष देणे शक्यच नसते. कधी कधी पुस्तकातील चित्रही घाईत काढली जातात. अर्थात आजवर माझ्या छोट्या परिक्षकांनी माझ्यावर काहीही टीका केलेली नाही.

मला रंगसंगतीचे ज्ञान यथातथाच आहे. पण डझनावारी पुस्तकांत चित्र काढल्यावर कमी वेळात चित्र काढण्यासाठी जसा वळणदारपणा अंतर्धान पावला तसेच रंगांचे एक साधे सूत्र गवसले. मी जर झाड हिरवे आणि आकाश निळे रंगवले तर माझ्या इटुकल्या मित्रांशी तो द्रोह केल्यासारखचे होईल. बालआनंदनवनातील मावरी मुलांच्या सहवासात मी नेहमीच काळ्या छपरांची घर, नारंगी घरे, हिरवे कान, पिवळे चेहरे, जांभळे ट्रक्स, निळसर पाऊस पहिला आहे. त्यामुळे माझ्या रंगासंगतीला जर कुणी रंगाची दंगल म्हणून संबोधले तर ते यथार्थच ठरेल. ती मुल जशी चित्र चितारतात तशी मीही चितारते, ती जशी लिहितात तसेच मीही लिहिते.

मावरीभाषेतील संक्रमण कालीन पुस्तकातील चिरपरिचित वातावरणा मुळे मुले वाचनाचे तंत्र जाणू शकतात आणि वाचनाला एक अगदी व्यक्तीगत महत्व असते हेही समजू शकतात. सुरुवातीपासूनच त्यांच्यात वाचना विषयीचा आत्मविश्वास वाढू लागतो. त्यातून तो इतर कुठलेही पुस्तक वाचण्यासाठी घेऊ शकतो. मग त्या पुस्तकात नैसर्गिक संवादशैली असो की नसो, ते त्रिमितीय असो की नसो, त्यात गावाच्या वातावरणाचे प्रतिबिंब असो व नसो, किंवा त्यात निळसर पाऊस असो की नसो! तो आता वाचनाच्या थोड्याफार साधनांनी व पूर्ण आत्मविश्वासाने सज्ज झालेला असतो, या परिस्थितीत जेनेट व जॉनची पुस्तके वाचतांना त्याला आनंद मिळू शकतो.

यातूनच मला आणखी एक विचार सुचतो. संक्रमणकालीन वाचनमाले मुळे वाचन प्रकियेचे सुलभीकरण झाले तर मावरीमुलांना शिक्षण प्रक्रियेत घालवावा लागणारा काळही कमी करता येईल. त्यासाठी अधिक लक्षपूर्वक काम करावे लागेल. माझ्या वर्गातील नियमित उपस्थित रहाणारी मुलें हा अभ्यासक्रम दोन वर्षात पूर्ण करतातही. पण मीच या चमत्कारसदृश्य निष्कर्षाला घाबरते. इतरही बालवाडीतील मावरीमुलांनी दोन वर्षात यश संपादन केलेले आहे संक्रमण कालीन लेखनाने वरच्या वर्गात येणा-या एक समस्येला चांगल्या त-हेने अटकाव करता येतो. चौदा पंधरा वर्षाची मुल माध्यमिक स्तरावर जाण्यासाठी वयाच्या मानाने मोठी तर कामावर जाण्यासाठी वयाने कमी ठरविली जातात. त्याच्यात प्रशिक्षणाच्या अभावामुळे कौशल्य नसते. युरापिअन शिक्षणा विषयी त्यांच्या

मनात प्रक्षोभ व असंतोष असतो. त्यामुळे गुन्हेगारीकडे वळण्याचा धोका वाढलेला असतो. संक्रमणकालीन वाचनाने मुलांच्या शिक्षणासाठी लागणारा कालावधी एका वर्षाने जरी घटला तरी तो मोठाच फायदा म्हणावा लागेल.

वाचनाच्या या प्रारंभिक प्रयासांची महत्ता काय आहे? उत्तरायुष्यात कॉमक्स पलिकडे काहीच न वाचणा-या मावरीच्या संख्येत घट होईल? शक्यता कमी आहे. मला वाटते ते एकूण वांशिक विकासावरही अवलंबून आहे.

आमची मावरीभाषेतील संक्रमणकालीन पुस्तके ही अमेरिकन पुस्तकांऐवजी वापरण्यासाठी बनवलेली नाहीत ती त्या पुस्तकांपर्यंत पोचण्यासाठी तयार केलेली आहेत. जेनेट आणि जॉन वाली पुस्तके अधिक यथार्थपणे वापरण्यासाठी ते माओरींची तयारी करुन घेतात. दोन वंशातील दरी ओलांडण्यासाठी त्याची रचना केली गेली आहे. पुढच्या आयुष्यात त्यांची मावरी ही ओळख व त्यांचे सामाजिक स्थैर्य कायम रहावे यासाठीही हा प्रयत्न आहे. आजकाल शिक्षणक्षेत्रात सुरु असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमिवर आमची पुस्तके खूपच वेगळी दिसतात. पण मुळात मावरीच आमच्या पेक्षा वेगळे आहेत. आम्ही बहुसंख्याक गोरे लोक बहुधा ही गोष्टच विसरतो की या देशात दोन स्वतंत्र कसोट्या वा मानदंड अस्तित्वात आहेत एक युरोपिअन मानदंड व दुसरा मावरीमानदंड.

मी माझ्या पुस्तकांचे यशापयश माझ्या छोट्या मावरीमित्रांच्या मानदंडावर मोजते.

---

## - निसर्ग- आमचा सोनेरी टापू

अनेक शतकांपूर्वी प्लेटो आणि पायथागोरस यांना अकांमध्ये विश्वाच्या स्वरुपाचे व सौंदर्याचे रहस्य सापडले होते.

शाळांमध्ये व्यावहारीक कारणांसाठी विश्वाचे स्वरुप आणि अंक या दोन गोष्टी वेगवेगळ्या समजल्या जात असल्या तरी वास्तवात त्यामध्ये एक पायाभूत आंतरीक एकत्मता असते. विश्वात प्रकटणा-या सर्व आकाराच्या मागे आधारभूत अंकच असतात.

कुठल्याही विषयाचा मुळाशी जाऊन शोध घेतला तर या समग्रतेचा,एकात्मतेचाच अनुभव येतो. निसर्गाचा अभ्यास आणि अंकज्ञान हे सर्व अभ्यासक्रमाचे अपरिहार्य अंग असले तरी ते भिन्न भिन्न मानून शिकवले जातात. एका समग्रतेचा अभ्यास असा तुकड्या तुकड्याने करणे हे मला जीवनाचे तुकडे केल्यासारखे वाटते, असे श्री.बीबी यांनी म्हटले होते. टॉल्स्टॉयने देखील हे असेच केले असेल का? व्यक्तीशः मला हे दोन्ही विषय एकाच शीर्षखाली ठेवावे असे वाटते. त्याना एकच शीर्षक द्यावे ज्यातून या दोन्हीपैलूंचे अर्थ व्यक्त होतील. तशा तर जीवनात अनेक अशा जागा असतील ज्यात या दोन्ही पैलूची सरमिसळ झाली असेल त्यातीलच एक म्हणजे वनस्पती जीवन. या निसर्गालाच मी आमच्या शाळेचा सोनेरी टापू म्हणते.

सोनेरी व्थ्विामध्ये आकार व अंकाचे प्रमाणबद्ध दर्शन होते. छोट्या छोट्या हिश्शांचा मिळून बनेलला मोठा भाग व त्यातून निर्माण झालेला एक संपूर्ण व्यवस्था. त्यांचा प्रमाणबध्द परस्पर संबंध हे वनस्पतिशास्त्राचे नियम बालवाडीत समजावणे अशक्य आहे. पण त्याचा प्रत्यय मात्र त्यांना येऊ शकतो. त्याची चित्र रोजच काढली जाऊ शकतात. फांदीच्या टोकाला पानांमधील अंतर कमी होत जाते. नेचाच्या (फर्न) झाडाकडे पहा. नेचा हे तर अंक ज्ञाना मिळवण्याचे सुंदर साधन आहे. आम्ही जेव्हा लांबवर सहलीला जातो तेव्हा कधी कधी मुलांच्या हाती नेचाची फांदी देऊन पाने मोजायला सांगतो. मी तर नेचाची फांदी हे एक उपयुक्त शैक्षणिक खेळणे आहे असेच मानते. याला एक पैचाही खर्च नाही. नुसती रस्त्याच्या कडेच्या झाडाची एखादी फांदी तोडून घ्या. की सर्व वेळ नैसर्गिक मूलभूत आकारांचा अभ्यास सुरु!

पुन्हा एकदा वर्गात परतू या. वर्गाच्या बाहेर जाणे ( 'बाहेर' हा शब्द सहज शब्दावलीतील सर्वात तीव्र भावना जागवणारा शब्द आहे.) निसर्गास न्याहाळणे, हाताळणे आणि वर्गात परत येऊन त्याची चित्र काढणे, वर्णन लिहिणे अशा-त-हेने या सोनेरी टापूतूनज्ञान मिळू शकते*अंक, निसर्ग आणि सौदर्य हे सारे एकाच नियमाने बांधलेले आहेत, जवळ जवळ एकरुप आहेत हे उलगडते.*

बालवाडीच्या वर्गात उपलब्ध असलेल्या अंकज्ञान शिकविण्याच्या साधन सामग्री विषयी उगाच शंकीत होण्याचे काहीच कारण नाही. समविषम संख्येवर आधारलेली अनेक उपकरणे, चौरस आकार आहेतच. पण बाहेर निसर्गातही याच्याशी ताडून पहाता येतील असे असंख्य आकार दिसतात एवढेच मला म्हणायचे आहे. ज्यामुळे मुलांची सहज उजळणी होऊ शकते. पानांचे समकोनी त्रिकोणाचे आकार, फांदीवर बरोबर एकमेकांसमोर उगलेल्या पानांच्या जोड्या ही समसंख्या शिकवण्याची उत्तम साधने होऊ शकत नाहीत का?

बालवाडीतील काही खेळण्यात क्रमवारी असते अगदी तशीच नव्हे पण दोन, तीन, पाच, आठ, तेरा अशात-हेने टोकाला निमुळत्या होत गेलेल्या फांदीवर दिसणारी गाठींची रचना आम्हाला 'बाहेर' सापडेलच . हा रचनाक्रम फळ्यावर लिहिला तर नंतर मणी ओवतांना त्यांचा वापर करता येईल, आधी समसंख्या दोनचे सर, मग विषम संख्या तीनचे सर अशा त-हेने मण्यांचा गट क्रमाक्रमाने वाढत गेला (दोन, तीन, चार असा) की मण्यांच्या माळेची लांबीही वाढत जाते हे पहाणे मुलांना खूपच चेतविते, उत्साहीत करते. यापेक्षाही पांनाची चित्र काढणे मुलांना जास्त आवडते. नेचाच्या फांदीवर एका डहाळीला दहा पाने आहेत दुसरीला नऊ अशारितीने क्रमाने कमी कमी होत शेवटी एक रहाते. मग या मोजदादीत मुल सर्वात जास्त रमतात.

छोट्यांच्या वर्गात तुम्ही त्याचा हात कागदावर ठेवून त्याभोवती पेन्सील फिरवून त्याचे चित्र काढू शकता.चित्रातील हाताच्या बोटांना एक ते ५ अंक देऊन मोजायला शिकवू शकता, किंवा पावलांचे चित्र काढू शकता. किंवा फुले आणि त्यांच्या पाकळ्या मोजता येतील. झाडावरुन न तोडता फुल मोजता येतील. मोठ्या

वर्गासाठी ते बरेजेची उत्तम उदाहरण होऊ शकतात. हे सर्व एका फेरीत होऊ शकते व त्यात काहीही नष्ट होत नाही. शिवाय अंकज्ञाना सोबत सौंदर्य व सुंगधाचीही प्राप्ती होते.

तीन पानी वनस्पती, जसे मेथी, बेल, ही तीनचा पाढा शिकवण्याची सुंदर साधने आहेत. ही तुम्हाला निसर्गात भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे व ती गोळा करुन तुम्ही आणू शकता. वरच्या वर्गासाठी त्याने तीनच्या पटीत होणारे अंकज्ञान मिळते. तर छोटा गट तीन पर्यंतच्या संख्या पाहू शकतो शिकू शकतो. पण उडत्या वा कधी उडून जातील याचा नेम नाही अशा चिमण्या मोजणे हा खेळ तर फारच गंमतीचा असतो. यात एकाग्रता लागते, शांतता लागते आणि बारकाईने निरिक्षणही करावे लागते. या शिवाय चित्रे काढण्याचा रंगविण्याचा मातीचे आकार बनविण्याचा आनंद घेणे तर सुरुच असते.

सर्व वेळ अगदी आदर्श पध्दतीने कामकाज चालू शकते असे मात्र नाही, पावसाळ्यात वा थंडीत आम्ही वर्गात खडू, खेळणी याकडे वळतो, पण जर हवा छान असली तर लागलीच आम्ही नदी किनारी फिरायला जातो, खेळतो. मुली जंगलकन्या सारख्या नाच करतात. छोट्या मुलांना पानांनी झाकून टाकतात. जेव्हा झाडा पानांचे रंग बदलतांना मुले पहातात तेव्हा आम्हाला शरदाच्या आगमनाची चाहूल लागते. ऋतु कळतो आणि शब्दही.

आम्ही समोर दिसणारी मुले मोजतो व त्यावरुन किती मुले समोर दिसत नाहीत ते शोधून काढतो. वर्गात दांडगाई केल्याने घरी पाठविलेली मुले ही वजाबाकीची संख्या होऊ शकते. घरी जातांना इतरत्र भटकणारी मुल परत मिळाली की बेरजेचे उदाहरण सुरु होते. गेल्यावेळी आम्ही बाहेर गेलो तेव्हा प्रत्येकाने हातात एक लहान डहाळी घेतली व त्यावरील पाने मोजली होती. सहा ते सतरा एवढी पाने आढळली. कडेला लावलेल्या ताडाच्या झाडांना हात लावून १०० झाडे माजायला मी त्यांना सांगितले. नदी किनारी बसल्यावर आम्ही रेतीत या संख्या काडीने लिहिल्या.शिकवणे कृती प्रधान असले तर ते सुलभ बनते, खेळ, वजनकरणे, साप-शिड्या (doninoes) पट, हिवाळ्यात स्कीटल्स (लाकडी चेंडूने बाटल्या पाडायचा खेळ) हेही त्यांना तितकेच प्रिय असते.

सात, आ**ठ** वर्षाची मुलें बेरजांची गणितही करतात. शंभर पर्यंत अंक लिहितात. आमच्या शाळेत रुपये आणि पैच्या गणितांनाही स्थान आहेच, पण ते मी ज्याला मुलांचे 'प्लास्टीक युग' म्हणते त्या पलिकडे सुरु होते. भावीकाळातील मनाची कायमस्वरुपी ठेवण ठरविणा-या या वर्तमानात सृष्टीतील विविध रुपे व आकार यांचा आधार त्याला मिळाला तर किती छान ! त्यानंतर औपचारीक व मान्यता प्राप्त पद्धतींना बराच अवसर व अवकाश रहातो. म्हणूनच आम्ही नदीकिनारी धमाल आनंदाच्या सहली काढतो. या सहलीत भरपूर किलकिलाट होतो. या सहलींमध्ये काय घडत नाही ते विचारा! चित्र काढणे, बोलणे या पलिकडचे अनुभव असतात ते. मग हा सोनेरी टापू लेखन, वाचन चित्रकला याचे अविभाज्य अंग बनतो. पंख फडफडवणारी तीन बदके आम्हाला

कार्डावरील तीन बदकांच्या चित्रापेक्षा (ज्याच्या शेजारी ३ हा आकडा निर्जीवपणे उभा असतो) जास्ती चांगली वाटतात.

अंड्यांच्या टरफलात अंकुरलेल्या बिया, डब्यात उगवलेले केशरी फुलांचे झाड किंवा काचेच्या बरणीत ठेवलेले कंद हे पहाणे आम्हाला आवडत नाही.

आम्हाला अंड्यांच्या टरफलात अंडीच बरी वाटतात, कोरांटी कुंपणावरच फुललेली छान वाटते! आम्हाला जर बिया अुंकरलेल्या पहायच्या असतील तर सृष्टीत लक्षावधी अंकुर फुटलेले दिसतील. मला व आमच्या मुलांना भिंतीवर लावलेल्या आलेखांचा तिटकारा आहे. मला त्यांच्या सतत बदलणा-या आवडीच पसंत आहेत. बाहेर भटकून परतल्यावर फिरतांना पाहिलेली पॉप्लसच्या सरळसोट झाडांची चित्र काढा, ती मोजा त्यांना क्रमांक द्या. मग द्या तो विषय सोडून आणिक काही तरी वगेळ्याच दिशेने नवे काहीतरी करा, मला त्या त्या क्षणाची उब त्यात्या क्षणी घेणेच आवडते.

आम्ही शिक्षक शाळेत आमची उर्जा फारशी खर्चच करीत नाही. आम्ही आमची जुनीच सामग्री परत परत वापरतो. हे शिळया कढीला उत आणण्यासारखे आहे. कल्पना या तरल असतात. त्या कधीही तशाच राहू शकत नाहीत. अगदी महान विचारवंतांच्या बाबतीतही हेच लक्षात ठेवले पाहिजे. कमीत कमी त्याकडे पहाणारी आमची मनोवस्था तरी बदलायला हवी. प्ररेणा असेलं तर कल्पनांची टंचाई नसते. जुन्या कल्पना रद्दी सारख्याच टाकून द्या. यामुळे सारे अधिक स्वच्छ आणि सोपे होईल.

**आमच्या प्रदेशातील पक्षी :-** चिमणी, कावळा, मैना, दयाळ, कबूतर (mynah, maspie, thrush, fantail) बदक, बगळा.

**आमच्या शाळेत जबरदस्तीने आणलेल किटक :-** नाकतोडा, फुलपाखरे, (Mantis, caterpillars, beetles cricket) उवा, कोळी, माशा.

एकदा राजा-फुलपाखराची सुरवंट आम्हाला झाडावर आढळली, सुरवंटाचे फुलपाखरात कसे रुपांतर होते ते पहाण्याचा आम्ही प्रयत्न केला. पण आमच्या वर्गातील काही अतिउत्साही मावरी मुलांनी सुरवंटाला मदत करायचे ठरवल्यामुळे सुरवंटाला आपले जिवीत कार्य पूर्ण करता आले नाही ! वरच्या वर्गात मुलांनी मात्र त्यांना व्यवस्थित हाताळल्याने त्यांना हे स्थित्यंतर पहाता आले.

गांधीलमाशीने आमच्या वर्गात प्रवेश केल्यापासून किटकजगताशी मुलांचे असलेले संबंध थोडे बिघडले आहेत. अरापत हा टायफॉइडचे इंजेक्शन घेण्यासाठी मैदान ओलांडून येत असता गांधीलमाशीनेच त्याला इंजेक्शन दिले! अरापत धावतच नर्सकडे गेला पण इंजेक्शनसाठी नव्हे ! त्या दिवशी तर त्याला इंजेक्शन देणे अशक्यच होते. जो शिस्तीत वागत नाही म्हणून त्याला वर्गाबाहेर घालवले आणि थोड्यात वेळात किंकाळ्या ऐकू येऊ लागल्या, गांधीलमाशांनी त्याला शिस्तीचे पुढचे पाठ शिकवले होते! आम्हाला परत त्याला वर्गात बोलवावे लागले

त्यानंतर त्याने कधीही बेशिस्त वर्तन केलेले नाही. यातून गांधीलमाशांचे कार्य आणि वर्तन याची घनघोर चर्चा झाली, चित्रे रंगवली गेली.

पक्ष्यांनी आम्हाला भावदर्शी नृत्य शिकविले. आमचे एक नृत्य दयाळ नृत्य (Magipe Robin Dance)म्हणून ओळखले जाते तर दुसरे चंडोल (Lark) म्हणून. खरेतर चंडोल आम्ही प्रत्यक्षात पाहिलेलाही नाही फक्त त्या विषयी ऐकले तेवढे आहे! चंडोल खरेच एवढा उंच उडणारा व गाणारा पक्षी असेल की नाही याचीच मला शंका आहे. पानळीतूनही आम्हाला नृत्याची लय मिळते. माशांच्या शेपटाची हालाचाल एवढच काय बेडूक सुदध्दा आमचे नृत्य शिक्षक होतात! एका पत्र्याच्या डब्यातील चिखलयुक्त गवत-पाण्यात काही बेडूक निरिक्षणासाठी ठेवले होते पण आमच्या मुलांच्या उत्साही आक्रमणामुळे त्यांचे आयुष्य लवकर संपुष्टात आले. इथले बेडूकही लांबचलांब उड्या मारतात. आणि पाण्याच्या डबक्यापेक्षा कोळशाच्या ढिगा-यावर बसणे पसंत करतात. कधी चिखलात बुडी मारुन बसतात किंवा कधी पुस्तकांच्या मागे दडी मारुन बसतात. सॅमी गोगलगाय हा एकाच प्रवासी असा आहे की जो आपला बचाव करणे जाणतो. आणि छपराच्या वाशांवरुन फिरतो. काही कोषही इथे आहेत. एक मांजरही अधून मधून चक्कर मारते पण तिला आमचा सहवास आवडत नसवा. लालसर कोंबडा तर पुन्हा आमच्या आसपास फटकेल असे वाटतच नाही.

**शाळेतील अनाहूत पाहुणे :-** सॅमी गोगलगाय, तांबडा कोंबडा, मांजर, मॅग्यूचा कुत्रा, माकड.काही सोनेरी मासेही आम्ही एकदा निरिक्षणांसाठी आणले होते. त्यांना मोठ्या मुलांच्या वर्गात ठेवले होते.लहानांची त्याच्या भोवती गर्दी असे! पण नंतर माशांचा टॅक गळू लागला व त्यांना धुण्याच्या टबमध्ये ठेवावे लागले. एक दिवशी टबमध्ये साबणाची वडी पडली आणि -- आमेऽन!

गेल्या काही वर्षात मांझ्याकडे खूप चित्रांचा खजिना जमला आहे. विविध विषयांवरील चित्रे. काही प्राण्यांची, काही पक्ष्यांची, काही शिशुगीते, काही निसर्गचित्र, काहींना मी चौकटी केल्या आहेत. ही सर्व वेगवगळ्या पाकीटात ठेवलेली आहेत. ही पावसाळ्यात वापरायची बेगमी आहे. या चित्रांनी एक नवे क्षितीज दृष्टीपथात येते. एका पाकीटात अस्वलांची ३० चित्रे आहेत. तीन अस्वलांची गोष्ट ऐकल्यावर पहाण्यासाठी ती सर्वांना हवी असतात. शरदाची चित्रे, घोंड्यांची चित्रे, पक्ष्यांची चित्रे, मांजरांची चित्रे पण हे सर्व तेव्हाच वापरले जाते जेव्हा आमच्या भोवती नैसर्गिक जिवंत साधनसामुग्रीचा अभाव असतो. जेव्हा आम्हाला जिवंत नाचणारे, पळणारे, गाणारे आणि चावणारे प्राणी मिळत नाहीत तेव्हाच.

बाहेर निसर्गाच्या सोनेरी टापूत फिरण्याचा तास मी दुपारी १ ते २ दरम्यान ठेवते. हा वर्गाचा आविष्काराचा/प्रकटनाचा (output period) तास असतो. हा सर्व वेळ आम्ही बाहेरच घालवतो किंवा कधी परत येऊन थोडावेळ जे पाहिले त्या विषयी लिहितो. हे सर्व मुलांच्या लहरीवर वा निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असते. चित्र मात्र ११ ते १२ या साधनेच्या तासात पाहिली जातात.

औपचारीक अंकज्ञानाचे काम सकाळी सृजनाच्या तासात केले जाते.

प्रत्येकच शिक्षकाजवळ प्राण्या व पक्ष्यांच्या वेगवेगळ्या ऋतुंच्या गाण्यांचा ऐवज असतोच.

अनुभव घेणे आणि ते नोंदविणे ही सोनेरी टापूची वैशीष्ट्ये आहेत. यात वयानुसार केलेले विभाजन असत नाही.ना वेळेचे बंधन असते, ना कामाचे, अंक आणि निसर्ग निरिक्षण यात फारकत करुन तयार केलेली पुस्तके वापरल्याने आम्ही हे व्दैत मनावर ठसवतो. या पुस्तकांचा पाया हे आमच्या मनातील व्दैत असते. त्यांचे अव्दैत जाणण्यासाठी त्यांच्या मुळाशी जायला हवे. जर आम्ही सोनेरी विश्वात वर्गाला योग्य त-हेने घेऊन गेलो तर अंकज्ञान आणि निसर्ग अभ्यास याची वेगळी काळजी करण्याची गरज उरणार नाही.

## ***TONE : अंतस्वर / अंतर्नाद / आत्मस्वर / आत्मधून***

The still centre ***अविचल केंद्र*** : **टी.एस.इलियट**

या संपूर्ण विश्वरचनेचा एक अंत:स्वर आहे. आणि हा सूर आत्मसात करता येतो.

हा सूर म्हणजे या सर्व समूहाच्या चेह-यावरील हे भावदर्शनच असते असेही म्हणता येईल.
याचा संबंध केवळ शिशुवर्गाशीच नाही. हा तर सर्वच ठिकाणी लागू पडणारा नियम आहे. मग तो शिशुवर्ग असो वा संपूर्ण शिक्षण विभाग वा संपूर्ण राष्ट्र. या सर्वांच्या संचलनात एक व्यवस्था अनुस्यूत असते.

पण व्यवस्था दोन प्रकारच्या असतात. एक असते जाणवीपूर्वक केलेली व्यवस्था जी अधिमान्यता पावलेली असते ती. दुसरी अबोध पातळीवर वावरणारी व्यवस्था जी वरवर पहाता अनिर्बंध अस्ताव्यस्त वाटते ती. आम्ही कोणती व्यवस्था निवडू इच्छितो या प्रश्नाच्या उत्तराशी दोन वेगवेगळी विश्वे जोडलेली आहेत.

आम्ही सूराच्या मुळाशी पोहोचतो तेव्हा असे दिसते की तो एकूण आचार संस्कृतीशी निगडीत असतो. आपला सूर सापडलेला माणूस तीव्र भावनिक उद्रेकांना दाद देत नाही. आचार संस्कृतीच्या पालिकडे तो एका आत्मिक व्यवस्थेचा भाग असतो. झेक वास्तु रचनाकार हॉइज म्हणतो त्या प्रमाणे सर्व इमारतींचा अंतिम आकार “ज्यात विश्रांतीचे वातावरण आहे असा आकार” हाच असतो.

कुठल्याही व्यवस्थेचा स्वीकार शिक्षकाने केला तरी त्याला आढळेल की कुठलीही व्यवस्था तीन घटकांनी मिळून बनते. १) शिक्षकाचे व्यक्तीमत्व २) मुलांचे व्यक्तीत्व ३) शिक्षणाची पध्दत.

मी एका अशा शिक्षिकेला ओळखते जी आपल्या आत्मस्वरासह सर्वत्र वावरते. एखाद्या मोठ्या शाळेच्या शिशुवर्गात, वा एखाद्या वाद्यवृंदाबरोबर, नगरपालिकेत वा रेडक्रॉसचे दुकानातील प्रदर्शनात. तुम्ही तिला एखाद्या बैठकीच्या खोलीत भेटा, वा शिशुवर्गात भेटा. रस्त्यात वा रंगमच्यांच्या पाठीमागे. सर्वत्र तिच्या या आत्मस्वराचा प्रत्यय तुम्हाला येईलच. एक असे मुख्यध्यापक आहेत की ज्यांना कुठल्याही वर्गात शांतता निर्माण व्हावी यासाठी काहीही प्रयत्न करावा लागत नाही. त्यांच्या सहवासात खोलवरच्या शांतीचा अनुभव सर्व वर्गांना आपोआपच येतो.

त्यासाठी त्यांना काहीही उपक्रम करावा लागत नाही. आणि सहा वर्षांची दोन मुलांमध्येही आत्मस्वराचा हा स्पर्श जाणवतो. खरे तर ते या आत्मस्वरा विषयी काहीही जाणत नाहीत. आपला सूर सापडलेले शिक्षक बाहेरच्या आवेगांना व अस्वस्थेला जराही घाबरत नाहीत, त्यांच्या अस्तित्वात अंतर्बाह्य या आत्मस्वराचाच प्रत्यय येतो.

वर्गाचा सूर हा काही केवळ शिक्षकाच्या व्यक्तीमत्वाशी निगडीत नसतो ही आनंदाची गोष्ट आहे. मुलांचा सूर असतो. खरे तर त्या एकूण  प्रदेशाचाही एक सूर असतो. जेव्हा आम्ही पूर्व किना-यावर होतो तेव्हा आमचे दोन शेजारी होते. एका बाजूला सर अपिरान गांता तर दुस-या बाजूला रेवेती कोहरे. त्यावेळी वर्गात कितीही कोलाहल झाला तरी वर्गाचा सूर बिघडत नसे . त्याला बाधा येत नसे. अगदी काहीही घटना घडो, आणि काही ना काही सतत घडतच असे! पण त्याचा शांतवेर जराही ओरखडा उठत नसे. सर्व प्रदेशालाच एक सूर होता. परिसरातील सर्व लोक व त्यांनी निवडलेले नेते यांच्यात एक प्रसन्नतेचा प्रवाह असे. हा शांती व सौहार्दाचा प्रवाह तेथून सुरु होऊन सर्व जिल्ह्यात पसरला असावा. जसा शाळेत हेडमास्तरांचा प्रभाव शाळेत पसरला होता.

पण इथे, मावरींना कुणीही नेता नव्हता, सावळ्या-गो-यांमध्ये तारेवरची कसरत करीत मावरींना वाट काढावी लागत होती. किना-यांवरील आदिवासींमधील आत्मविश्वास वा सुसंबध्दता त्याच्यात नव्हती. त्यामुळे येथे ना तशी व्यवस्था होती ना शांती. या कमतरतेवर मात करण्याची साधने जर शिक्षक स्वत: निर्माण करु शकत नसेल तर त्याला अव्यवस्था आणि बंडखोरी याला तोंड द्यावेच लागेल.

असेच होईल असे नाही कदाचित त्यांचा सूर सापडूही शकतो. आणि शिक्षक व मुले दोहोतही कमतरता असली तरीही तिसरा पर्याय उरतो. व्यवस्थेचा पर्याय. वरवर दिसणा-या रुपाला विसरुन आपण अबोध मनाच्या पातळीवरच मशागत करायची, नव्या व्यवस्थेचे बीजारोपण करायचे. हे तुलेनेने सोपे आहे. रचनात्मक कार्याव्दारे हे करता येऊ शकते. मग वरवर पहाता शाळेत अव्यवस्था दिसली तरी आंतरीक पातळीवर तसे भासणार नाही, मुलांमधील उर्जेला रचनात्मक वळण मिळाले की मग वर्ग आपोआपच शांत होऊ लागतो. मुलें सकाळी रचनात्मक उपक्रमात गुंतलेली असतात तेव्हा मला सर्व गोंगाटातही शांततेचा अभुव येतो. आमच्या वर्गातील मुले ज्या खेड्यातून आली आहेत तेथे बेलगाम बडबड, भांडण व बेबंद जीवन याचे राज्य आहे. पण तरीही मला आशा वाटते. तुम्ही प्रत्येक विषय रचनात्मक उपक्रमाव्दारे शिकवू शकलात तर ही उर्जा विशिष्ट त-हेने प्रवाहीत होईल व दिवसभर खर्च होत राहील. होणारा गोंगाट हादरवणारा असेल पण काहीना काही किंमत तर द्यावीच लागणार आहे. त्याच्यातील अनुचित सवयी घालवून चांगल्या सवयी लावण्याचा प्रयत्न मी करते. मी मनातल्या मनात तासाची तालीम करुन पहाते. परस्परांमध्ये विश्वास व आदर निर्माण व्हावा अस प्रयत्न करते त्यांच्या कार्यशैलीत सुधारणा व्हावी यासाठी अथक प्रयत्न करीत रहाते. वर्गाच्या सूरांची सतत तपासणी करीत रहाते. ज्या शिक्षकाकडे स्वत:चा सूर असेल त्याला इतका त्रास होणारही नाही. मावरी समूहातील अशांतता, आमच्या

खेड्यातील आंतरीक ओढीचा अभाव व विस्कळीतपणा आणि खुद्द माझ्या उरातील धग इतके सर्व विरोधी घटक असूनही मला आमच्या वर्गात खोलवर काहीशा अस्थिर शांततेचा प्रत्यय येतो.

जाणीवेच्या पातळीवरील आणि नेणीवेच्या पातळीवरील व्यवस्थापैकी फक्त एकच बरोबर आहे. खरी आहे. ती आहे अबोध पातळी वरील सुप्त व्यवस्था.

मुलांचे, शिक्षकांचे स्वभाव कसेही असोत ही अबोध व्यवस्था सर्वांना सहज प्राप्त असते. आम्ही स्वभावाचे पालिकडे व व्यक्तीमत्वाचे प्रभावा पलिकडे हा सूर शोधण्याचा प्रयत्न केला तर आम्हाला अगदी मुळाशी हीच अबोध पातळीवरील व्यवस्था सापडेल. खोलवरची व्यवस्था. एक अविचल केंद्र.

---

-**कार्यपुस्तिका**

शिक्षक कार्यपुस्तिके बाबत फार आग्रही असतात. वर्गात धडा शिकवतांना ऐनवेळी परिणमकारक एकसंध मांडणी करता येत नाही. तासाचे वेळी मला सर्व काही हाताशीच लागते. म्हणूनच त्या सर्वांची आधीच आखणी, विचार करुन टाचण ठवेलेले बरे पडते.

उपलब्ध असलेल्या साहित्याचे संक्षिप्त रुप तयार करता येईलच पण त्याहिपेक्षा संकल्पनाच प्रार्थनेच्या पातळी पर्यंत संक्षिप्त करता येईल. येशूने पर्वतावर केलेल्या आख्यानापासून लातुंगने चहा देतांना केलेल्या उपदेशा पर्यंत तर थेट आमच्या सारख्या शिक्षकांपर्यंत सर्वांचा उद्देश एकच आहे- शिकवणे. आजच्या काळात या थोर लोकांची नावे घ्यावीत की नाही असे कुणाला वाटेल पण मला तसे करतांना मुळीच कमीपणा वाटत नाही. शिकविणे, शांतपणे विचार करणे या प्रक्रिये पासून शिक्षक कधीही ढळलेला नाही.

कार्यपुस्तिका तयार केल्याने आपण जो विषय शिकवणार आहेत त्याबाबत शिक्षकांची विचारप्रक्रिया सोपी होते. त्या टिपणांची पध्दत व व्यवस्था यांचे प्रतिबिंब मुलांच्या मनावर उमटते. कार्यपुस्तिकामुळे शिक्षिकांच्या मनातही एक आधार, शांतता प्राप्त होते. त्याच्या मनातील संकल्पना व त्या प्रत्यक्षात आणण्याचे काम यातील या पाय-या असतात. कार्यपुस्तिकेची तपासणी करुन मूल्यमापन केले तर ते आपोआपच शिक्षकाचे मूल्यमापन ठरु शकते. कार्यपुस्तिका कशी व कुठे वापरावी हा मतभेदाचा मुद्दा नाही. मुद्दा आहे साचेबध्दपणाचा. अन्य पर्याय बंद करुन एकाच मार्गाने चालण्याचा.

काही शिक्षक वेगळ्या त-हेने कार्यपुस्तिकेकडे पहातात. तेही संकल्पना व अंमलबजावणी या दरम्यानच त्याचा वापर करतात. परंतु ते त्यास केवळ पायरी समजत नाहीत, त्याला मध्यस्थ म्हणून वापरतात. शिकवण्याची उर्जा आणि झळाळी या दरम्यान येणारा अडथळा. लिओनार्डो डी व्हिंची सरळ संमरवरावरच शिल्प घडवित असे. रविंद्रनाथ ठाकूर त्यांच्या कविता सरळ थेट प्रकट होत. येशूने भाषणाची पूर्व तयारी टिपणे काढून केल्याचे मी तरी एकेलेले नाही. सर्वच क्षेत्रातील शिक्षक मध्यस्था शिवाय काम करतांना दिसतात.

शिक्षक हा ब-याच अंशी कलावंतही असतो (प्लेटोच्या मते तर त्यात काही अंतर नसतेच) त्यांच्या अंतःचक्षूला एक नैसर्गिक शक्ती असते. ज्यामुळे तो हाती घेतलेल्या कामाचा अचूक वेध घेऊ शकतो. जे तो आता पाहू शकत नाही तेही वेळ येईल तेव्हा किंवा सरते शेवटी त्याला दिसेल असा आत्मविश्वास त्याला असतो. शिकवण्याचा क्षेत्रात काही ठिकाणी तशीच सुटलेली त्याला चालतील पण ती ताब्यात घेण्यासाठी मध्यस्थाला भाड्याने नेमणे चालणार नाही. कुठल्याही प्रश्नाला सरळ भिडण्याची थरारकता त्याला हवी असते. त्याला शिकवतांना ती संकल्पना लिहिलेले पान दिसण्यापेक्षा ती संकल्पानाच साक्षात दिसली पाहिजे असे त्याला वाटते. मनात आलेल्या संकल्पनेची छाया पानावर उतरवून त्या विषयी बोलण्यापेक्षा त्या संकल्पने विषयीच मुलांशी संवाद साधणे त्याला जास्त बरे वाटते. त्याच्या मनात स्पष्ट दिसणा-या रस्त्यानेच सरळ वाटचाल करणे त्याला पसंत असते.

टिपणे काढल्याने शिक्षकाना त्याचे विचार सुसंगात व स्पष्टपणे मांडता येतात हे काही खरे नाही. काहींना तर ते मुसक्या बांधल्या सारखेच वाटते. अशी बंधन जी टाळायला हवीत, लहानपणीसुध्दा मी मनात आले की सरळ मातीत हात घालून मूर्ति घडवायलाच घेत असे. यामुळे मला जे करायचे होते ते पूर्ण केल्याचे समाधान मला मिळत असे. प्रयोग करुन उरलेली अर्धीमुर्धी कल्पना व उर्जा वापरण्याची वेळ माझ्यावर येत नसे. माझा अनुभव असा आहे की त्याची पूर्वतयारी म्हणून त्याची रेखाटने वा कच्चे काम करीत बसले तर अनेक संकल्पना त्याच्यातच राहून जातात. त्या प्रत्यक्ष मूर्तिपर्यंत अंतिम कृती पर्यंत पोचतच नाहीत. पुढे शिक्षक म्हणून काम करतांना प्रत्यक्ष शिकविण्यापूर्वी कार्यपुस्तिका लिहावी लागत असे तेव्हा ते मला मध्यस्थाला दलाली देण्यासारखे वाटत असे.

आमच्या शाळेत तर सर्व उपक्रम म्हणजे सर्जकतेची अभिव्यक्ती असते. कुठल्याही विषयाला तेथे बंधन नसते. उलट मुक्त वावच असतो. तेथे तर कार्यपुस्तिकेचा प्रश्न उद्‌भवतच नाही. जिथे सर्जकता असते तेथे जीवन असते आणि जीवनाचा काही आरखडा कागदावर आधी काढता येत नाही. मुलांकडून नेमके काय विचारले जाईल, कसली अपेक्षा केली जाईल हे आधी कसे सांगता येईल? प्रत्येक दिवशी कसले वाचन अथवा लेखन करावे लागेल हे आधी सागता येणे शक्यच नाही, कारण आपल्याला कुठला शब्द लिहायचा वा वाचायला आहे हे तर मुलं त्या दिवशी सकाळीच सांगतात. त्यांची पुस्तक ते स्वतः तयार करतात. त्या दिवशी काय होणार आहे याची पूर्व निश्चिती करण्याची शिक्षकांची इच्छा असते का? शाळेत सहजभावाने विस्तारत जाण्याची सवय लावली जाते. मुलांचे स्वाभाविक कल, लहर, बदल यांना सामावून घेण्याची तयारी शिक्षकाला ठेवावी लागते. विषयाची कुंडली कार्यपुस्तिकेव्दारा आधीच लिहून ठेवण्यापेक्षा हे महत्वाचे आहे.

कॉल्डवेल कुकने म्हणून ठेवल्याप्रमाणे "प्राध्यापक नाही तर कलावंतच खरा शालेय शिक्षक होऊ शकतो. "

## नृत्य

नृत्याची वेळ मी नेहमी सकाळची ठेवते. सृजनाचे ते एक चांगले माध्यम आहे. प्लेटोने तर म्हटले आहे नृत्य ही एक अशी अभिव्यक्ती आहे ज्यात आध्यत्मिक, बौध्दीक व शारीरीक पातळीवरील सर्व क्षमतांचा पूर्ण वापर व समायोजन करणे आवश्यक ठरते. मलाही तसेच वाटते. त्यासाठी मी मुद्दाम त्यांना नृत्य शिकविते असे नाही. वसंतातल्या एका सकाळी मी माझ्याच नादात शूबर्ट वाजवित होते. त्यावेळी अचानक एक मुल उठले व त्याने नृत्य करायला सुरुवात केली. मग दुसरा उठला आणि पहाता पहाता सारेच नाचू लागले. ते अजूनही सुरुच आहे!

नृत्यातील सर्व भावभावना व त्यांची अभिव्यक्ती ही मुलांचीच असते. मी त्यात काही वेगळे पदन्यास सुचविण्यापुरती सहभागी होते. पण हे त्याना मदत करण्यापुरतेच असते. नव्या चाली व नवीन पदन्यास याचा ते सहजासहजी स्वीकार करतात असा मात्र माझा अनुभवन नाही. म्हणजे माझी मदत ही तशी जबरदस्तीच ठरते!

मी शास्त्रीय संगीता शिवाय अन्य कुठलेही संगीत वापरत नाही. केवळ माझ्या आवडीसाठी नाही तर याच संगीतांनी त्यांना प्रथम पदन्यास करायला उद्युक्त केले होते म्हणून. आतापर्यंत मी शूबर्ट, बिथोवेत चेकोवस्की, चॉपीन, ब्रहमस, आणि ग्रेग यांच्या संगीत रचनाचा वापर केला आहे. शक्य आहे की मी अजून माझी वाट शोधते आहे, कारण नृत्य हे माझे स्वप्न असले तरी त्याविषयी माझी जाणकारी मर्यादीत आहे.

लेखन, वाचन, चित्रकला या इतकेच सहजगत्या मुलांना नृत्य यायला हवे असे मला वाटते. अद्याप मी ते साध्य करु शकलेले नाही. नृत्य आम्ही अभिव्यक्तीच्या तासाला घेत असलो तरी एरवीही कधीही कुठलाही ताण घालवण्यासाठी आम्ही अधेमधे नृत्य करतो.

---

## -*न फुललेले जीवन / जीवन जे फुललेच नाही.*

सर्व विषयांना सर्जक वळण मिळणे हे शिक्षकाला वरदानासारखेच वाटते. त्यामुळे शिकविणे ही केवळ शिक्षकांची आंस उरत नाही तर शिकणे ही विद्यार्थ्यांचीही आंस बनते. शिक्षक आता विद्यार्थ्यांच्या प्रवाह विरुध्द नसतो तर त्यांच्या बरोबर असतो. हा प्रवाह आहे मुलांच्या सर्जक शक्तीचा जामेदार प्रवाह. डॉ.युग यांनी म्हटल्या प्रमाणे मानसिक शक्ती ही पृथ्वीच्या पाठीवरील सर्व शक्तीस्त्रोतांपेक्षा जास्त असते. समूह जीवनात दिसणा-या अनेक विकृतींचे मूळ सर्जक शक्तीच्या दमनात आढळते. असे डॉ.बरो म्हणतात. तर एरीक फ्रॉम म्हणतात "संहारकाता हा अव्यक्त जीवनाचा उद्रेक आहे. "

याचा अर्थ सर्जक शक्तीव्दारे मुलांकडून काम करुन घेणे हे व्यावहारीक कारणां पलिकडेही महत्वाचे आहे. ही केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरती बाब नाही. ती आंतरराष्ट्रीय शांततेच्या दृष्टीने महत्वाची बाब आहे. युध्द संपल्यावर राजकीय नेत्यांनी एकमेकांशी बोलण्याच्या फे-या करीत बसण्यापेक्षा शाळांमध्ये लक्ष केंद्रीत करावे. कारण उद्या युध्द होणार की शांतता नांदणार याचा निर्णय तिथे होणार आहे. तेथे मनाच्या सर्जक शक्तींची घडण होणार आहे या विश्वासाने मी सहज शिक्षणाकडे पहाते. हा शांतीचा प्रस्थापनेसाठीचा एक लहानसा प्रयत्न आहे.

मुलाच्या मन:शक्तींचा विकास ही एक सुंदर गोष्ट असते. या सौंदर्यातच संतुलन, शांतता व स्वरमेळ हेही साधलेले असते, स्थिरमती हाच याला योग्य शब्द आहे. सर्व आयुष्यातीलच काय त्या बाहेरील उटारेटा हाही स्थिरचित्ता कडील वाटचाल असते. अगदी लहान मुलाची साधीशी हालचाल सुध्दा तेच दर्शविते.

शिशुवर्गातील उपक्रमांना मी युध्द आणि शांतीच्या प्रयत्नांपासून वेगळे करु शकत नाही.सृजनाची वाट ओसाड झाली की विध्वंसाची वाट गजबजू लागते. हे मी माझ्या डोळ्यासमोर घडतांना पाहिल आहे. विशेषत: शेकडो भांडकुदळ मावरीमुले माझ्या हाताखालून पुढे जातात त्यांच्या डोंक्यात हिसक, 'तोडा, लढा आणि जिंका' एवढेच समीकरण बसलेले असते. जीवनातील सर्जक प्रेरणा जागृतच झाली नाहीतर पूर्व पंरपरे प्रमाणे लढणे हाच आदर्श घेऊन ती मोठी होतात. सर्जक प्रेरणांना हात घालून हे सर्व टाळता येऊ शकते. जितका मुलगा हिंसक तितकी त्याच्यातील सर्जनशीलता मोठी असा माझा होरा असतो. इतरांना लाथेने उडवतांना, डोक्यावर काहीतरी दगड वा लाकूड मारतांना मी त्याला पहाते व त्याच्या हाती चिकण मातीचा गोळा देते किंवा खडू देते. तो त्या चिकणमातीचे बॉब बनवू शकेल, किंवा चित्र काढतांना तो माझ्या घराला आग लावल्याचे चित्र काढेल वरवर पहाता हे हिंसक कृतीचे दर्शक वाटेल. पण यातूनच सर्जक शक्तींना अधिकाधिक वाव मिळू लागतो. आणि मलाही फळ्यावर चितारलेल्या हत्यारांची भिती वाटत नाही. त्यांच्या मनात दडून राहिलेल्या हिंसक प्रेरणेची मात्र वाटते.

हे सर्व माझ्या मनात असल्यानेच मी शिक्षणाची कृती अधिकाधिक सर्जक कशी होईल हेच पहाते. त्यातल्या त्यात सर्जक सहज लेखन वाचनावर भर देते. सर्व विषयांची सर्जक अभिव्यक्ती म्हणजेच जीवनाभिमुख शिक्षण होय. ही शिक्षकांसाठीही सर्वात सुटसुटीत पद्धत आहे. मुलाच्या हाती ब्रश द्या, आणि त्याला हवे ते रंगवू द्या किंवा पेन्सील द्या आणि हवे ते लिहू द्या. स्वत:ची गोष्ट शेजा-याला वाचायला देऊ द्या. सहजता हे सौख्य आहे. आणि सुरक्षितता आहे. लहान वयातच उसन्या शब्दांची मृत शब्दावली व त्याव्दारे मृत वाचन हे विद्यार्थ्याच्या डोक्यावर लादण्याचे काहीच कारण नाही. हे फुलत्या झाडाला चौकटीत ठोकून अनैसर्गिक आकार देण्यासारखे आहे. मुलांच्या नैसर्गिक वाढीवर कृत्रीम बंधन लादली की त्यातून विकृती आणि विध्वंसक प्रवृती जन्म पावतात, यालाच एरीक फ्राम न फुललेले जीवन म्हणतो. यामुळे डेरेदार विस्तारलेल्या झाडाऐवजी आम्हाला खुरटी झुडूपच हाती लागतात. आधुनिक घरातील मुलांवर या प्रौढांनी पूर्वनिश्चित अपेक्षांच्या चौकटीचे ओझे शाळेत येण्यापूर्वीच लादलेले असते. सहज शिक्षणाचे पुरेसे पाठ गिरवल्यानंतरच त्याला या निर्जीव शब्दांच्या

संगतीत नुकसान न होता रहाता येते.इंग्रजी भाषेला बाह्य जगात असलेला प्रतिष्ठेमुळे त्याला ती शिकण्यास उत्तेजन मिळते. कालांतराने या निर्जीव शब्दावलीही त्याला आवडू लागतात.

पण हे सर्व सहज वाचन लेखनाचा पाया पक्का असला तरच शक्य आहे. ज्ञाताकडून अज्ञाताकडे जाणे यात नवीन काहीच नाही. हीच सर्वमान्य रीत आहे. जर शिक्षण उत्स्फूर्ततेने आतून येण्याऐवजी बाहेरुन लादले गेले तर जीवनाच्या एकसंघ रचनेवरच ते आघात करते, आणि एकसंघ व्यक्तीमत्वावरच पुढची सर्व उभारणी होत असते. या पायाकडेच आम्ही दुर्लक्ष करतो. मावरी खेड्यांना युरोपशी जोडणारा पूल म्हणून मी शिक्षणाचे वर्णन करते, पण सर्व वंशातील सर्व मुलांसाठी आणखी एक पुल उपलब्ध असतो. आतल्या जगाला बाहेरच्या जगाशी जोडणारा पूल. हा पूल म्हणजेच सहज शिक्षण होय. एकसंघ व्यक्तीमत्वाची अनिवार्य अट आहे हे सहज शिक्षण . सहज शिक्षणाऐवजी आम्ही जर शिक्षण व्यवस्थेने तयार केलेल्या साचेबद्ध चौकटीत मुलांना कोंबण्याचा प्रयत्न केला तर त्या सर्वांची मतेही एकसाची होतात. आणि ज्यावर बहुधा अमेरिकन वर्ग वर्चस्वाची छाप असते. आधीच रेडिओ, दूरचित्रवाणी या द्वारे शाळेबाहेर आमच्यावर एकसाची जीवनच लादले जात असते. शाळेतही आम्ही सर्वांसाठी सारख्याच पद्धतीची पुस्तके वापरु लागलो तर ते आम्हाला परवडणार नाही. आमच्या स्वतःची काही एक प्रतिमा स्थापित झाल्याशिवाय आम्ही सरसकट एका प्रकारची पद्धती स्विकारणे घातक ठरेल. न्युझीलंडमधील विविध भागातील मुले इथे एकत्र येतात तेव्हा एकसाची प्रतिमा कशा विकसित होत असतात. प्रभाव टाकत असतात. ते मला सहज समजत असते. माझ्याकडे सत्तरहून अधिक प्रकारचे विविध पोषाख आहेत. पण मुलांना मात्र काही विशिष्टच पोषाख हवे असतात. जर तुम्ही डझनावारी काऊबॉय व काऊगर्लचे पोषाख बनवले, शेकडो सुपरमॅन व हजारो रॉकेटमॅनचे पोषाख बनवले व ते भाड्याने द्यायचा व्यवसाय काढला व त्याला एक रुपया एवढेच जरी भाडे ठेवले तरी काही दिवसातच तुमची गुंतवणूक वसूल होईल एवढेच नाही तर म्हातारपणी मस्त मजेत बसून जीवन घालवता येईल एवढी भरभराट होईल! माझ्याकडे छोट्यांसाठी जगातील उत्तम कथा साहित्य आहे. बो-पीप `बीन, चिनी मँडेरीन, पीटर पॅन आणि चेटकीण आदी.पण हे सर्व केवळ धूळ खात पडले आहे.शेवटी मला ते खोक्यात भरुन ठेवून द्यावे लागले. मुलांमधील विविधता नाविन्य संपून निर्माण झालेला एकसाची एकजिनसीपणा एखाद्या वाळवंटा सारखा भंयकर वैतागवाणा आहे. वैविध्याचा हा अंत मृत्यू इतकाच भीषण आहे. शांततेचे गोडवे गाणारी पुस्तके लिहून ती बालवाडीच्या वर्गामध्ये ठेवण्याने शांती स्थापित होत नाही. त्यांनी तर पृष्ठभागावर साधा ओरखडाही उमटत नाही. कुणाही मुलाने आजवर जेनेट वा जॉनचा पोषाख मागितलेला नाही. विध्वंसावर एकच उत्तर आहे. रचना, नवनिर्माण,सृजन. हे शाश्वत सत्य आहे. आणि मी जेव्हा असे म्हणते तेव्हा जगातील महान विभूतीही माझ्या सोबत पाठीशी असतात.

न्यूझीलंडमधील सर्वच समूहांचे आंतरीक शक्ती स्त्रोत क्षीण झालेले आहेत असा माझा अनुभव आहे. जीवनाच्या ख-या गरजा, उर्मी, चेतनांसाठी ते क्वचितच आपल्या आंतरीक स्त्रोतांचा वापर करतात. भौतिक

वस्तूंपासून कल्पना विलासापर्यंत सर्वच त्यांना तयार मिळते. दुकानात यांत्रिक करामती खेळणी तयार मिळतात. थरारक अनुभव चित्रपटात तयार मिळतात. जीवन सुद्धा बाहेर विकत मिळते. रेडीओ व चित्रपटातून मिळणारे बाजारातील तयार डबाबंद अन्नासारखे तयार जीवन.

अगदी क्वचित बाहेरच्या जगात एखादी गोष्ट तयार मिळत नाहीच असा दिवस उंबराच्या फुलाप्रमाणे उगवलाच तर त्याला समजते की आत काही शिल्लकच राहिलेल नाही. सर्व शुष्क झालेले आहे. लहानपणापासून त्यांच्या हाती चमकदार खेळणी दिलेली आहेत. खेळवाडीत, बालवाडीत आकर्षक चित्र आणि गंमतीदार साहित्य मिळालेले आहे. मग स्वत:चे काही तयार कराच कशाला? स्वत:काही तयार करण्याची त्याची क्षमताच पूर्णपणे नष्ट झाली आहे. रचनात्मकतेला वाव दिला असता तर मनाच्या या अफाट शक्तीला किती दिशांनी वाव मिळाला असता. परंतु आता या सृजनाच्या तिजो-या रिकाम्या झाल्या आहेत. आणि त्याचे रिकामपण जाणवू नये म्हणून मग सतत सुरु असणारा रेडीओ व चित्रपट ती जागा भरुन काढीत असतात.त्यांच्या संभाषणात घासून गुळगुळीत झालेले वाक्प्रचार येतात, कसलाच जिवंतपणा नसलेली अनाकर्षक भाषा ते वापरतात.

याचे कारण मला तरी समजू शकत नाही. आधुनिक शिक्षणचा उद्देश खरे तर या उलट आहे. मुलांना त्यांच्या स्वत:च्या कलानुसार वाढू द्या. त्यातून सृजनाशील आणि रसरशीत व्यक्तीमत्व फुलू द्या.मग असे विपरीत घडण्याचे कारण काय?आम्ही लादलेली] सर्वत्र एकच प्रमाण मानलेली पुस्तके हे तर नाही ? त्यांना घट्ट चौकटीत बांधल्याचा हा परिणाम म्हणावा ? की शिक्षकांच्या कार्यक्शमतेचा परिणाम आहे ? रेडीओ व चित्रपटांची सहज उपलब्धता असण्याच्या चैंनीमुळे हे घडते ? की कमी दर्जाची वाचन सामुग्री दिल्याने होते आहे ? हा नेमका कसला परिणाम आहे. हे सांगता येत नाही. पण शंभरातले नव्याण्णव जण एकसाची पुतळे दिसतात हे मात्र खरे.

“आजकाल विद्यापीठात कशा प्रकारचे विद्यार्थी येतात, ” असे मी एका प्राध्यापक मित्राला विचारले “सर्व जण एकसारखेच असतात. ” तो उतरला. “पण असे कसे होईल? ” मी अविश्वासाने म्हटले. प्राथमिक शाळेची ध्येय, उद्दीष्टेच मुळी वैविध्याची जोपासणी हे आहे.

“एखाद्या कारखान्यातील नमुन्यांसारखे ते माझ्याकडे येतात” तो म्हणाला. “कुणीही स्वतंत्रबुद्धीने विचार करु शकत नाही. मी जे तुम्हांला शिकवतो तेच तुम्ही मला परत करु नका असे मी वारंवार बजावतो. मुद्दाम चुकीची, प्रक्षोभक विधान करुन त्यांना चेतविण्याचा प्रयत्न करतो. पण त्याचा काहीही उपयोग होत नाही. ते जराही मतभेद व्यक्त करीत नाहीत. ”

“निदान तीन टक्के तरी विद्यार्थी स्वंयप्रज्ञ असतील अस तरी म्हणू शकशील का ? ”

“छे। हजारात एखादा. जेमतेम हजारात एखादा” तो पुटपुटला.

पाच वर्षाच्या मुलाचे मन प्रवाही असते. ही मोठीच हुरुप देणारी गोष्ट आहे. अर्थात आईबापांनी शिस्तीच्या वरवंट्याखाली चिरडून ज्यांच्या व्यक्तीमत्वाची ओळख नष्ट करुन टाकली आहे, अशी मुले बहुधा युरोपिअन घरातील असतात. मावरीघरातील पाच वर्षाची मुले मात्र रसरशीत असतात. ती कधीही साचे बंद नसतात. बालवाडीतच आपल्याला रसरशीत व प्रवाही व्यक्तीमत्व सापडू शकतात.

बालवाडीतील मुलांना त्यांचे व्यक्तीत्व असते. असे मी अभिमानाने सांगते. बालवाडी ते विद्यापीठ या प्रवासात कुठेतरी असे वळण येते की तेथे सर्वच बिघडते.पण हा काही शिक्षण योजनेचाच भाग असेल असे मला तरी वाटत नाही. बालवाडी ते विद्यापीठ हा प्रवास एखाद्या कादंबरीचा विषय होऊ शकेल. पण तुमच्या शेवटाची तपासणी करुनच सुरुवात योग्य होती की नाही. हे ठरविता येईल.जर बालवाडी शिक्षकांनी विद्यापाठीला आणि विद्यापाठ शिक्षकांनी बालवाडीला भेट दिली तर काय होईल ? गेल्या वर्षी दोन प्राध्यापकांनी माझ्या बालवाडीला भेट दिली. ते स्वत: तर या भेटीने खूपच उल्हासित झालेच पण त्यांना आम्हाला स्नेहपूर्वक मदतही केली.

अर्थात जे मी मनापासून मानते ते सर्वच काही मी प्रत्यक्षात करु शकले. असेही नाही. सातव्या वर्षोपर्यंत मुलांना केवळ सृजनाच्या आनंदात रमणे एवढेच करावे असे मी मानीत असले तरी मीही त्यांना काही ना काही शिकविण्याचा प्रयत्न थोडा फार तरी करीतच रहाते.

हे सर्व लक्षात घेता बालवाडीचा उद्देश केवळ सहजभावाने सृजनाचा विकास होणे एवढाच असला पाहिजे.

- सृजनाची आंतरीक शक्ती जोपासणे
- अंतर्दृष्टीचा वापर करणे
- ख-या व्यक्तीत्वाचे रक्षण करणे

मला अनिश्चितता आणि बदल आवडतो. मला नाट्य आणि आनंद हवासा वाटतो.मला जगात शांतता असावी असे वाटते.मला चितवेधक व्यक्ती आवडतात. थोडक्यात म्हणजे मला जीवनाचा सहज, अनघड, आकार आवडतो.आणि हेच तुम्हाला बालवाडीत मिळेल. इथेच सृजनात्मक शक्तीचा विकास हातो व शैलीचा जन्म होतो. लेखन आणि कला दोहोंची शैली. एखादी गोष्ट कशा त-हेने केली जाते. तीच तर कला असते. शिक्षणाचा आधार जर कला असेल तर त्यातून प्रत्येकाच्या शैलीचीही चमक लागलीच दिसते.

'जॅलोपी' (Jalopy) हा नवाच शब्द परवा अचानक वर्गात उगवला . ब्रायनने लिहिले "मी शहरात गेलो,तेथून एका जॅलोपी बसने मी परतलो. " या शब्दाने आम्ही उडालोच. इतरांनी त्याला या शब्दाचा नेमका अर्थ विचारला. त्याने बसचे जे वर्णन केले त्यावरुन आम्हाला समजले की जॅलोपी बस म्हणजे डुगडुगत जाणारी जुनाट बस! हा शब्द चटकन उचलला गेला. प्रचलीत झाला. त्याचा स्पेलींगच्या यादीत समावेश झाला. अलीकडे जॅलोपी शब्दाचे स्पेलींग तुम्ही लिहायला दिलेच नाही. अशी ब्रायन तक्रार करतो. त्याला या शब्दाचे स्पेलींग

करणे फारच आवडते. मुलांच्या अंतःत्स्फूर्तीकडेच मला लक्ष वेधायचे आहे. यामुळे शिक्षकांनाही किती शिकवणे किती सुखकारक होते.

कुठल्याही बालवाडीत आणि शांतता यांचा सीसॉचा खेळ सुरु असतो. संधीची वाट पहात दबा धरुन बसलेले दोन गुण , युद्ध आणि शांतता.

मुलांच्या खेळण्यांची दुकाने शस्त्रास्त्रांनी खच्चून भरलेली असतात. मुलांच्या हाती रणगाडे, युद्धविमाने व बंदुका असतात. फळ्यावर, मातीच्या खेळात, चित्र चौकटीत, सर्वत्र युद्धाचे प्रतिबिंब आढळते. पण मला याची भिती वाटत नाही. भिती वाटते ती सृजनात्मकतेची पीछेहाट होते आहे याची. या खेळघरात, बालवाडीत जिथे जीवन फुलले आहे. मन घडता आहेत तेथे तरी युद्धाला विरोध केला जावा. युद्धाचा अंत नाही पण निदान त्याला आव्हान तरी दिले जावे. येथे घडणारी प्रत्येक गोष्ट एक तर रचनात्मक तरी असते किंवा विध्वंसक तरी असते. प्रत्येक चित्र, नृत्य, आकार, वाक्य या नाहीतर त्या दिशेला वळते. एरीक फ्रॉम म्हणतो "जीवनाला एक स्वतःची आंतरीक गती असते.ते अभिव्यक्तीसाठी धडपडते. त्याला धुमारे फुटतात.ते वाट काढले मुलाच्या स्वाभाविक वाढीला आपण जितका अटकाव करु तितकी ती विध्वंसक होतात. विध्वंसकता ही जीवनाची अखर्चित उर्जा आहे. "

कलावंताला त्याच्या ब्रशवर वा रस्त्यावरील कामगाराला त्याच्या फावड्यावर जेवढा विश्वास असतो. जेवढाच माझाही या म्हणण्यावर आहे. कारण प्रत्येक कामास आणि त्यातल्या त्यात शिक्षकांच्या कामास एक स्वतःचा आकार व प्रारुप असायलाच हवे असे माझे ठाम मत आहे. जीवनाच्या या काळात जेव्हा व्यक्तीच्या सर्जनशीलतेवर जास्तीजास्त प्रभाव टाकता येतो तेव्हाच रचनात्मकतेवर भर देणे. हे युद्ध रोखण्याचे माझे प्रारुप आहे. माझ्यासाठी या चंचल शक्तीशाली भाववृत्तींना रचनात्मक वाट देणे तितकेच सत्य आहे जेवढे फिजीक्स.

रोजचा ताल -

**९ - १०.४५ उच्छवास**

| | |
|---|---|
| संभाषण - संवाद | रडणे |
| रंगकाम | भांडण करणे |
| सहज लेखन | ठोकळ्यांशी खेळणे |
| माती काम | सहज नृत्य |
| रेतीकाम | मूल शब्दावली |
| पाणी | जीवननिष्ठ शब्द संग्रह |
| रंग | बाहूल्या |

| | |
|---|---|
| बाहूल्यांच्या अंघोळी | बोटी |
| गाण | खडू |
| दीवास्वप्न | प्रेम |

**११ - १२ <u>श्वास</u>**

मूल शब्दावली - लहान मुलांसाठी १५ मिनिट

सहज शब्दावली ( जीवननिष्ठ शब्दावली ) सहज वाचन, जैवीक वाचन, जैवीक चर्चा कथा, चित्र, लहान मुलांसाठी चित्रकथा.

**१ ते २ <u>उच्छवास</u>**

सोनेरी विश्वातील काळ

छोट्यांसाठी प्लास्टीक माघ्यम.

**२ ते ११.३० <u>श्वास</u>**

प्रमाण शब्दावली
प्रमाण वाचन
मावरी पुस्तकातील शब्दावली
पूरक वाचन
कथा, गाणी, कविता

छोट्यांसाठी अक्षरे

## ***<u>मावरी शाळेतील जीवन</u>***

एका रोजनिशीच्या आधारे

“मावरी मुलांशी तुमचे कसे काय जुळते आहे ? ” शाळेत आलेल्या नवीन अतिथी शिक्षकास मी विचारले.

“उफ ! उर्जा, अखंड उर्जा ही खरी समस्या आहे. ते सदैव काहीतरी करायला धडपडत असतात. पण एकदा तुम्ही त्यांच्या मानेवर तुमचा पाय दिला की मग ते ठिक होतात. ”

समजतय मला, समजतय मला, ... मला समजतय, अगदी खर आहे. मला समजतय. पण याविषयी मी बोलत नाही. आमच्या नव्या पिढीत उर्जेचा जोम किती आहे याचे वर्णन इतरांना सांगण्याचा मी प्रयत्नच करीत नाही. मी जेव्हा ‘उसळती उर्जा’ म्हणून त्याचे वर्णन करते तेव्हा ते खरे तर त्याचे खूपच अपुरे वर्णन असते. ते खरे म्हणजे एखाद्या ज्वालामुखीचे सतत होणारे स्फोटच असतात! माझ्या शाळेत अशा ज्वालामुखीवर उभ राहून

पारंपारीक शांत पद्धतीने शिकवणे म्हणने वेडेपणा, हत्या वा आध्यात्मिक मृत्यू या सारखेच आहे. पण त्यावर उभे न रहाता शिकवणे हे तर अशक्यच आहे !

मी नेमके तेच करते. मी मागे सरकते. एखाद्या अध्यक्षाप्रमाणे. आणि त्यांना स्वतःला शिकू देते. एकच गोष्ट शिकवण्यासाठी मी पुढे सरकते ती म्हणजे शैली. तुमचा विश्वास बसो की ना बसो पण खरेच मी फक्त शैलीच शिकवते. बाकी सर्व आपोआप होते.

तुम्ही हा मार्ग धैर्याने स्वीकारु शकता किंवा अगतिकतेने. काहीही केले तरी शेवटी तो शांत, सुंदर फुललेल्या शेताकडेच घेऊन जातो. मला याची जाणीव आहे. की येथे गोंगाट असतो. अगदी पुरेपुर गोगाट. आणि माझी शिक्षकीय पारंपारीक मानसिकता 'शांतता शिक्षण चालू आहे' अशीच आहे! पण केवळ याच फुलणा-या शेतावर माझा विश्वास आहे. हे मी जाणू शकते . मी एक साधी सरळ शिक्षिका आहे. या मार्गाने चालण्याचा दंड मी पुरेपूर भोगला आहे. शिक्षकी पेशातून एकटे पडणे. चिरंतन अपराध भावाने ग्रासले जाणे, पण हे काहीही असले तरी मी या याच शेतावर डेरा टाकून आहे.

खूप काळ बसून, पाहून आणि चिंतन करुन ( व्यावसायिक दृष्ट्या गैर लागू मेहनत ! ) मी शिकवण्याचे दोन मुख्य शत्रू शोधले.

पहिला आहे मुलांचे एकमेंकांविषयीचे औत्सुक्य. पारंपारीक शिक्षण पद्धतीत हा मुद्दा मुख्य सैतानाचे काम करतो.जर त्यांनी एकमेंकांशी बोलणे थांबवले, खेळणे थांबवले आणि एकमेंकांशी लाडात, प्रेमात येणे थांबवले तर किती बहार होईल ! शिक्षकांच्या मर्जीविरुद्ध, वर्गात विनापरवानगीने संभाषण सुरुच असते.माझ्या बचावार्थ मला याच दुर्गुणाचा वापर करणे भाग होते. एवीतेवी मी हे संभाषण नियंत्रित करुच शकत नव्हते. तेव्हा मी त्याला उलट उत्तेजन द्यायचे ठरविले व त्यावरच आधारीत अशी माझी पद्धत विकसित केली. ते जोडी जोडीने वाचतात. एक वाक्य हा, एक वाक्य तो. त्यामुळे दोघांनाही कंटाळा येत नाही. प्रत्येक जण दुस-याची चूक तपासून सांगतो. जर फार हळू वाचत असेल तर वेग वाढवायला सांगतो. कारण त्यावरच त्याची वाचनाची पाळी येणे अवलंबून असते. कोप-याकोप-यात मांडी घालून ते जोडी जोडीने बसतात. आणि आपल्याला येते ते दुस-याला शिकवतात. किंवा त्यांच्या टेबलाशी बसतात. एकमेंकांशी वाद घालतात ! चुका दुरुस्त करतात. खिदळतात आणि शिव्याही घालतात. हे सर्व करतांना ते सतत बरोबर असल्याने त्यांचे गहिरे नाते तयार होते. शिक्षण हा या नात्याचा भाग बनतो. हा भावबंध हा सृजनशीलतेचा केवढा मोठा शक्ती स्त्रोत आहे. याचा आपल्याला विसरच पडलाय ! या नव्या पिढीचा दुसरा त्रास म्हणजे त्यांना सर्व गोष्टी स्वतः करायची इच्छा असते हा ! जर गो-या मुलांप्रमाणे ते हाताची घडी तोंडावर बोट ठेवून स्वस्थ बसले तर किती बरे होईल. गोरी मुल कशी शिक्षकांने सांगितल्यावरच कुठलीही गोष्ट करतात. व शिक्षकांने सांगितल्याप्रमाणेच करतात. मावरी मुले मात्र बॉंबर विमाने बनवून ( आणि

ती ते कशापासूनही बनवतात. ) खोलीभर विमानाचा आवाज काढून दौडत असतात. आवाज, गोंगाट, गलबला. अगदी खरे आहे. पण तुम्हाला जर गोंगाट आवडत नसेल तर तुम्ही शिक्षक होऊच नका. कारण मुले म्हणजे गोंगाट करणारे प्राणी आहेत. नव्या पिढीचे तर विशेषच. मला माहित असलेल्यांपैकी सर्वात गोंगाट करणारे. पण हा नैसर्गिक आवाज असतो आणि म्हणून सुसह्य तरी असतो. पण कधीकधी एखादी रागाने फोडलेली किंकाळी, दुस-यावर आरोप करतांना केलेला आरडा ओरडा, उंच पट्टीतल्या सुरातले रडणे, काहीतरी खाली पडल्याचा आवाज, अर्थात आनंदाच्या भरात टिपेला चढलेला स्वरही अधून मधून ऐकू येतो, कुणीतरी गाणी म्हणतांना ऐकू येते आणि सर्वात महत्वाचे म्हणजे सगळीकडे वारंवार हास्याला उकळ्या फुटत असतात ! हे सर्व म्हणजे उर्जेच्या वाटा असतात. आणि म्हणून ती मदतच असते. एका सुरक्षित सीमेपर्यंत जे काही येईल त्याचे मी स्वागतच करते... आणि त्याचा उपयोग करुन घेते.

मी सर्व गोष्टींचा उपयोग करुन घेते. प्रत्येक सकाळी ते स्वतःची पुस्तके लिहितात. वाचण्याची वेळ येते तेव्हा तीच वाचतात. आणि वाचनाची वेळ ... असो. हे पुन्हा पद्धती विषयीचे बोलणे सुरु झाले आणि आपली चर्चा जिथपासून सुरु झाली त्यापासून आपण कोसभर बाजूला सरकलो. मूळ विषय होता मानेवर पाय देणे हा.. . एकदा झाकण काढले की झंझावातच सुटतो. त्याला मुक्तपणे विहारही करु द्यायचे आणि तरीही काही शिस्तीचे पालन करायला शिकवायचे ही अवघड कसरत अजून मीही शिकतेच आहे. त्याला काही एक वळण द्यावेच लागते. पण कसे ते सांगणे कठीण आहे. त्याला त्याचे पंख आणि त्याचा अवकाश तर असायलाच हवा. वादळात झेप घेण्याचे धैर्य त्याच्यापाशी हवे. पण रात्री त्याने घरट्यात वेळेवर परतायलही हवे. आणि घरटे शाबूत हवे. आत्म्याला पूर्ण स्वातंत्र्य भोगायचे असेल तर मनाने शिस्त पाळायलाच हवी. या खोलीत तरी. या खोलीत बाह्य शिस्ती बरोबरच आंतरीक शिस्तही हवी. मी जेव्हा बोलेन तेव्हा त्यांनी ऐकलेच पाहिजे आणि पाळलेही पाहिजे. मी एवढेच म्हणेन की मी फारच क्वचित बोलेन. आणि मी काय बोलायचे ते मी फार काळजीवूर्वक ठरविते. बाह्य शिस्त आणि आत्मिक स्वातंत्र्य या दोद्योंच्या दरम्यान फारच कमी अंतर असते. त्यामुळे ही तारेवरची कसरतच असते. मी त्यावरुन यशस्वीपणे जाऊ शकते असे म्हणणे अवघड आहे.

ज्वालामुखीची ही उर्जा जुन्या व नव्या पिढीच्या प्रज्वलनाने निर्माण होते. युवा पिढीच्या शक्तीचा स्फोट होतो. पण त्याला दिशा असते. या स्फोटांना दिशा देणे हे दमछाक करणारे काम असते. विध्वंसक वाटेकडून रचनात्मक वाटेकडे वळवणे यात धोकाही संभवतो. कारण मावरी हे 'हाणामारा, तोडाफोडा पण पहिले या' या प्रेरणेने ओतप्रोत भरलेले असतात. अर्थात झंझावाताला वळण देणे हे अवघड असले तरी झंझावात अडवून धरण्यापेक्षा ते कमी धोक्याचे असते. कधी कधी आदिवासींच्या आदिम प्रेरणांना उधाण येते. व ते आमच्या शाळेतही संचारते तेव्हा तर भावनिक भरतीच्या लाटा आमच्या डोळ्याच्या पातळीपर्यंत उसळतात. आम्ही त्यात

बुडून जायची पाळी येते. असे बुडतांना आम्ही या मुलांच्या मानेवर पाय देण्याचा विचार करु लागतो. पण मला माहित आहे. की या पुरा पाठोपाठ खूप सुपीक माती येणार आहे. त्यात सृजनाचे बीज रूजणार आहे. त्यामुळे आम्ही श्वास रोखून धरतो. हे सर्व जिवंत असते त्यांच्यासाठीही व माझ्यासाठीही. त्यामुळे आंतरिक शिस्तीवर विसंबून आम्ही वाट पहातो. या सर्व तुफानानंतर सृजनानंदाची जी पुस्तके तयार होतात त्यासाठी तर मी काहीही किंमत द्यायला तयार आहे.

तरीही मला हे सांगायलाच हवे की मी शिस्तीची भोक्ती आहे. फक्त एवढच आहे की मला झाकण काढावस वाटत. त्यात काय दडलं आहे. ते पहाण्याची मला अनावर उत्सुकता असते. मला शक्यतांच्या पलिकडील गोष्टी आवडतात. आनंदी आणि जोमदार माणसं आवडतात. अगदी छोट्या छोट्या गमतीदार घटना आवडतात. तुफानी घटना आवडतात. गोड घटना आवडतात आणि ज्यातून जीवन व्यक्त होत ते सर्व काही मला आवडते. मला कुठल्याही आडपडद्याचा राग येतो. जीवनाचा खरा आकार मला आवडतो. शाळेतही सहज सुंदर आकाराचेच मला प्रेम आहे.

“हे सर्व योग्य असते. एकदा का तुम्ही त्यांच्या मानेवर पाय दिला की बस. ”

मी हे जाणते, समजते. पण संवाद आणि सृजन हे जास्त चांगले उपाय आहेत. नरडीवर पाय देण्यापेक्षा ! पण अद्याप मी या उर्जेचे यथायोग्य वर्णन करु शकलेले नाही. झाकण निघाल्यावर ती उर्जा पहावी लागते. समजून द्यावी लागते. त्याविषयी मी फारस बोलतही नाही. एका छोट्या बालवाडीतील छोटीशी घटना आहे ती. बालवाडी तीही छोट्या देशातील एका अल्पसंख्य जमातीतल्या मुलांची. एका नगण्य ग्रहावरील, जो एका तुलनेने लहान असलेल्या आकाश गंगेचा भाग आहे. अगदीच छुटपुट घटना आहे. माझ्यासाठी एवढे पुरेसे आहे. “लहान घटना मला हलवून टाकतात. प्रचंड भूकंपांचा माझ्यावर काहीही परिणाम होत नाही. ”

माझ्या वर्गातील नवीन गोरा मुलगा मार्क आज सकाळी माझ्याकडे आला व म्हणाला, “माझा एप्रन चोरीला गेला आहे. ” तो थोडा उत्तेजित झाला होता आणि हताशही.

“अस म्हणू नकोस”, मी बालवाडीत कष्टपूर्वक शिकलेला संयम विसरुन उदगारले “इथे कुणी चो-या करीत नाही” .

तो अगदी ठाम दिसत होता. मध्यम वर्गीय कुटुंबात आपल्या अज्ञानाविषयी असतो तसा ठाम विश्वास. “माझ्या टेबला वरती तर नाहीय. मी तिथेच ठेवला होता. ”

माझ्या आसपास फिरणा-या सावळ्या रंगाच्या नवनव्या आकृती व लहान मुलांच्या चित्कारावर मात करीत मी तापलेल्या स्वरात म्हटले, “मी तुला शुक्रवारी एप्रन धुण्यासाठी घेऊन जायला सांगितले होते.तो घरी असेल. ”

“ घरी नाहीय तो. ”

“मग तुझ्या बॅगमध्ये असेल. ”

“नाहीय” पण मावरी मुलांच्या आरडाओरड्यामुळे वर्गात चर्चा पुढे चालणे शक्य नव्हते. आसपासच्या सततच्या गडबड गोंधळामुळे तोही कंटाळला. त्या आवाजांनी मार्कला माझ्या अंतर्दृष्टीपासून व बाह्यदृष्टीपासून दूर ढकलले.

“शेवटी घरीच मिळाला ना एप्रन”, मी जेवणाच्या टेबलापाशी चर्चा करतांना संयम बाजूला ठेवून उदगारले. “त्याने घरी शोधले सुद्धा नाही ! ही गोरी मुलं अशीच मावरींच्या समूहात गो-या माणसांची कुठलीही गोष्ट सापडत बसली की त्याचा एकच अर्थ निघतो. मावरीनी चोरली. हा मुलगा शाळेत यंऊन एक आठवडाही झ ाला नाही. त्याने ही मावरी मुल चोर आहेत. असे कसे ठरवले ? ”

“खर आहे. ” टोमॅटो चिरत के म्हणाले.

“जर घरच अशी असतील तर आम्ही इथे जे काही करु शकतो त्यावर  किती मर्यादा आहेत ते त्याचा अंदाज तुला आता आला असेल ना ? ”

“मिसेस हॅंडरसन, कुणीतरी माझे डस्टर चोरले ! ” आणखी एक गौरवणीय मुलगा. माझ्याजवळ मातव्हेरो वाचत बसला होता,  त्यातून नजर वर करीत मी पाहिले, माझी मान संतापाने लाल होऊ लागली आहे असे मला जाणवले.

“ते त्याच्याच टेबलामध्ये आहे, ” माटाव्हेरो काळजीने हळूच पुटपूटला.

“त्याने शोधलेही नाही. ” मी के ना सांगितले. जवळच मोठ्या मुली बालवाडीची फरशी पुसत होत्या. “हा मुलगा दोन महिन्यापासून इथे आहे. एवढ्यात मावरीमुल चोर आहेत की नाहीत हे त्यालाही समजायला हवे होते. ”

“शाळेचा त्या घरावर काही परिणाम झालेला नाही असे दिसते, ” के उत्तरले.

“त्यानी पाहिले पण नाही हो. ”

“हूं आणि यामुळे तू वैतागली आहेस ! ”

मावरी मुलांच्या वाचनासाठी काढलेल्या पुस्तकाच्या तिस-या आवृतीच्या तयारीत मी शाळेनंतर  दंग होते. तेवढ्यात के आत आले आणि म्हणाले, “मिसेर रॅमके आणि एकजणीला मी चहाला बोलावले आहे. ”

मी ब्रश खाली ठेवला.मिस रॅमके ही हुषार व तल्लख मावरी स्त्री होती. आणखीही अनेकजण तसे होते म्हणा, पण हीची गोष्ट थोडी वेगळी होती. ती समाजकल्याण अधिकारी होती. तिच्यात आणखीही काही होते. बहुधा गौरजनांचे रक्त वा मावरीं मधील अधिकारी वर्गाचे रक्त. ज्यामुळे ती युरोपियन समुदायात यशस्वी ठरली होती. अर्थात यशस्वी म्हणजे गो-यांच्या नजरेतून यशस्वी. तुम्ही स्वत: यश कशाला म्हणता यावरच सारे अवलंबून असते. असे मी खाजगीत म्हणत असे.

त्या एक किवीच्या कातडीचे पावसाळी कोट हाताळून पहात होत्या. माझा एक बेघर मावरी मित्र ते सोडून गेला होता. माझ्या पडद्यावरील मावरी भरतकामानेही त्यांना आकर्षून घेतले होते. प्रवेश करताच मला हे जाणवले व खूश होऊन मी म्हणाले, “खरेच ! माओंरीच माओंरीची कला जाणू शकतात. ”

थोड्याच वेळेत संभाषण भरतीच्या लाटेवरील एखाद्या छोट्या होडीसारखे भलतीकडे भरकटू लागले. सहाशे वर्षापूर्वी सागर पार करुन या ‘मोठ्या पांढ-या ढगांच्या जमीनीवर’ पाहिल्यांदा पोलेनिशियन बीज रुजवणा-या मोठ्या जहाजा प्रमाणे हेलकावे खात चाललेले संभाषण.

..

“मी काही गो-यांच्या विरोधी नाही ? ” मी म्हणाले. “मला माझ्या वंशाविषयी प्रेम आहे. एवढेच आहे की मावरींना अधिक समजू लागल्यापासून अनेक अन्याय माझ्या नजरेस येऊ लागले आहेत. आणि त्या अन्यायचाच दंश बोलण्यात व्यक्त होतो. ” मी योग्य शब्द निवडीत म्हणाले.

“आ ! ” त्या मावरी स्त्रिया उदगारल्या.शब्द काळजीपूर्वक ऐकत, प्रतिसाद देण्याची मावरीची सवय आहे. त्यांच्या प्रतिसादाने प्रभावित होऊन मी पुढे म्हणाले “माझ्या वर्गातील गो-या मुलांच्या वर्तनातून त्यांच्या घरातील पूर्वग्रह स्पष्टपणे उलगडतात. मावरी मुलांविषयी ठामपणे पूर्व निर्णय होऊन जातो. खरेतर या खेड्यात मोठे अद्‌भूत मिश्रण पहायला मिळते. मी ज्यांना आजवर शिकवले त्या सर्वांमधील- मग ते गोरे असो सावळे- ही सर्वात हुषार मुले आहेत. हे आम्हीच म्हणतो आहोत असे नाही. शारीरिक शिक्षणाचे शिक्षक, कलाशिक्षक, शाळा तपासनिस सर्वाचे हेच मत आहे. ”

“खरे आहे, या विभागात मावरी व गोरे लोक यांच्या खोल दरी आहे खरी. ” मिसेस रामेके म्हणाल्या.

त्यांच्या बरोबरची बुजरी स्त्री म्हणाली, “यामुळे आम्हाला फारच शरमल्यासारखे वाटते. आणि हळवेपणा येतो. थोड्याश्याही मदतीबद्दल आम्हाला किती कृतज्ञता वाटते हे युरोपियनांना समजते तर किती बरे झाले असते. पण त्यांचा आमच्या विषयीचा प्रतिकूल ग्रह असल्याने आम्ही आमची कृतज्ञताही त्यांच्यापर्यंत पोचवू शकत नाही. ”

मिसेस रामेके म्हणाल्या, “मला मात्र माझ्या कामात असे लक्षात आले आहे की फक्त एक वर्ग आमच्या विषयी वांशिक अढी बाळगून आहे. तो म्हणजे... म्हणजे काय बरे म्हणतो आपण त्याला ? हां मध्यमवर्ग. खालच्या वर्गातील लोकांना सहानुभूती असते. शिक्षणातील लोक आणि... उच्च वर्ग हेही समजून घ्यायला तयार असतात. निदान ते तसा प्रयत्न करतात. ” रामेके शुद्ध इंग्रजी भाषेत, थेट अचूक इंग्रजी उच्चार करीत बोलत होत्या. पण त्या जोडीला त्या मावरी पद्धतीने हातवारेही करीत होत्या ज्यावरुन त्या मावरी आहेत हे स्पष्ट होत होते.

नव्या पिढीसाठी हे दिवस किती वाईट आहेत, मावरी असल्याविषयी त्यांना वाटणारी लज्जा आणि त्यांच्या टोळ्यांचा प्रतापी इतिहास याची माझ्या मनात सरमिसळ होत होती. रंगतिर टोळीतील लोकांच्या गर्वोन्नत प्रतिमा दिसत होत्या. मला त्यांची सजवलेली उंच आणि निमुळती लढाऊ जहाज लाटांच्या माथ्यावर स्वार झालेली दिसतात, गावांचे मुक्त सौदर्य, वाहते पाणी आणि जंगल याच्या आधारे विसावलेले दिसते आहे. युद्धातील पिसाट उद्‌घोष आणि भाषणे ज्याचा स्वर एखाद्या नदीच्या खळखळाटासारखा ऐकू येतो. पण माझ्या गो-या मुलांच्या पालकांना यातले काय ठाऊक आहे. त्यांच्या पूर्वग्रहाच्या भाल्यांपासून मी माझ्या गोड माताव्हेरो सारख्या लहान मुलाचा बचाव तरी कसा करु ?

सर माओई पोमरे आपल्या पूर्वजांना भेटायला जाण्यापूर्वी ( मृत्यूपूर्वी ) म्हणाले होते. “शिक्षण हे मावरीच्या जीवन नौकेचे नवीन वल्हे आहे. ”

“किन ओई बाहेर जाऊ ? ” माताव्हेरेने विचारले. हे भयानक उच्चार ऐकण्याची मला हळूहळू सवय होते आहे. या गो-या लोकांच्या विभागात रहाणा-या मावरींनी गो-या लोकांकडून हे अशुद्ध उच्चारण उचलले आहे. सुरुवातीतीला वाईओ मधून मी आले तेव्हा मला याचे फार वाईट वाटे. तेथील मावरींचे उच्चारण शुद्ध आहे. इथले उच्चार करकरणा-या दरवाजा सारखे मला त्रासदायक वाटतत. मी त्याच्याकडे पाहिले. तो अगदी छोटा आहे. मी गुडघ्यावर बसून त्याच्याएवढी झाले. अजून बाहेर जायची वेळ झालेली नव्हती.

“किन ओई” तो पुन्हा चिरकला.

त्याला बाहेर जावेसे वाटत असेल तर त्यात माझाच दोष असणार. काहीतरी गडबड दिसते आहे. पण तरीही विद्यार्थ्याच्या मनाप्रमाणे वागण्याची परंपरा थोडीच आहे? मला तर परंपरे शिवाय रहाणे खूपच अपघड वाटते. म्हणून मी परंपरेचे पालन करीत त्याला विचारले, “तुझा अभ्यास झाला ? ”

तो पटकन भिरभिरत गेला व वही घेऊन आला. सर्व अक्षरे एकात एक गुंफलेली, एका कोनात कललेली, गिचमिड अक्षरांची माळ !

“किन ओई, जाऊ. ”

“अलबत. ”

“सर्व जण झोपायला जा. ”

“तुम्ही ‘ब्लू जग’ ची गोष्ट वाचणार नाही का मिसेस हँडसन? ”

“झोपण्याची काय गरज आहे ? ”

“माताव्हेरा, चल बर झोपायला. मिसेस हँडसनची बजावलय आम्ही झोपायलाच पाहिजे. ”

“‘ब्लू जग’ वाचा ना, मिसेस हँडसन”

“मिसेस हँडरसन रंगी झोपत नाहीए.”

“आडवच व्हाव लागेल ? ट्वीनी हो बर आडवा ! ”

“तुम्ही ‘ब्लू जग’ वाचणार आहात की नाही? ”

“ट्वीनीचे डोळे उघडे आहेत ! ती किलकिल्या डोळ्यांनी पहाते आहे. ”

“या दुस-या ट्वीनीचे डोळेही उघडेच आहे ! ”

“मुळीच नाही ”.

“आहेतच! ”

“नाहीच्चे! ”

“आहेच्चे! ”

“मिसेस हँडरसन ब्लू जगाचे काय झाले ? ”

“झोपा पाहू सर्व ! ”

शांतता!

मार्क :- मिसेस हँडरसन मला या गोष्टीतल्या कुठल्याच गोष्टी काढता आल्या नाहीत.

मी :- तुला दोर तरी नक्कीच काढता आला असता.

मार्क :- नुसती सरळ रेषा ?

मी :- हो मग उंदीर काढ. नुसता एक गोल आणि त्याला जोडून एक रेषा शेपूट म्हणून.

मार्क :- डोक म्हणून नुसता एक गोल. दुसरा गोल पोट म्हणून आणि शेपूट म्हणून छोटी रेषा ?

मी :- आणि काही पाय, टेम,नाक स्वच्छ करुन ये.

टवीन :- मिसेस हॅडसन ही टवीनी वाईट आहे. ती माझ्या जवळ येऊन चित्र काढते आहे.

मार्क :- आणि थोडे पाय ?

मी :- आणि डोळ्यांसाठी हा छोटा बिंदू.

मी ते चित्र भिंतीवर लावले तेव्हा रांगी त्याकडे पहाण्यात रंगून गेंला.मग मला तोंडाने काढलेला गोळीबाराचा असह्य आवाज ऐकू आला. वर्गात सुरु असलेल्या उत्स्फूर्त गाण्याला त्या आवाजाने भेदून टाकले. अरे देवा ! त्या नव्या कार्ट्याने परत बंदूक खेळायला सुरुवात केली वाटत ! मी जोरात तिकडे गेले आणि त्याच्या पोटरीवर एक चापट मारुन दरडावले. “खबरदार! पुन्हा असा आवाज काढू नकोस” . शूबर्टच्या मधूर सुरावटी वाजवणा-या माझ्या बोटांना कधी कधी हे कामही करावे लागते.

मग मार्कने परत एक उंदीर केला.

“रांगीला देऊन टाक तो उंदीर ”. यामुळे मार्कच्या मनात मावरी मुलांविषयी जरा प्रेम तरी निर्माण होईल.

मग पुन्हा एक उंदीर

“हा तू ... माताव्हेरोला दे” .

निकीने एक चित्र दाखवायला आणले.

“कुणी काढले हे चित्र ? ” मी विचारले.

“माझ्या मैत्रीणीने. ”

“कोण आहे तूझी मैत्रीण? ”

“नामोई”

“ती प्रेमळ मुलगी आहे. ”

“मी हे चित्र कापण्यासाठी कागद घेऊ का ? ”

“नाही तू स्वत: उंदीर काढ. मग कात्री घे व काप. ”

“मला नाही येत. ”

“मार्कला येत. ” मी त्याला मार्ककडे पाठवल.

मार्कने आणखी एक उंदीर काढला. “मी हा तामेला देते, मिसेस हँडसन. ”

माताव्हेरोने कसलेच चित्र काढले नाही. तो पॅचीला ‘’ब्लू जग’ वाचून दाखवत होता. एक सावळ्या रंगाचा मुलगा गो-या मुलाला शिकवित होता. आंतरवंशिय सामजस्य ! दोन वंशांमधील एकमेकांना जाणून घेण्याची

प्रक्रिया म्हणू या! माताव्हेरो या संबंधात इतका गुंतलाय की तो एकटा काहीही करु शकत नाही. ( त्याचे आजोबा देखील मला यासाठीच आवडतात. ) तसाच पॅची आहे.

विकी - मी डुक्कर बनवले, मिसेस हॅंडसन.

मी - त्याचे पाय कुठेत ?

तिने तो कागद पलटला व म्हणाली, “मागे इथे आहेत काही पाय. मला कात्री मिळेल ? ”

मी - हो, घे तू कात्री.

मार्कने आणखी एक उंदीर काढला.

पॅची - मिसेस हॅंडसन, घरी जायची वेळ झाली ?

माताव्हेरो - मिसेस हॅंडरसन मीच घंटा वाजवली ! मी तीनदा घंटा वाजविली.

सर्वजण- मिसेस हॅंडरसन इथे आहे मांजर.

“मिसेस हॅंडरसन मी पुस्तक घेऊ शकतो. ”

“मिसेस हॅंडरसन मी पियानो वाजवू का ? ”

“मिसेस हॅंडरसन पॅचीने माझा कागद घेतला. ”

“मी तो खेळल्यानंतर लागेल म्हणून ठेवला होता. ”

तेव्हा हिरानी पियानोवर “पोकर करे आन” वाजवू लागल्या, त्यात पुढील सर्व गोंगाट बुडुन गेला.

जीवनाच्या सहज शैलीतील रांगडी खेडवळ वागणूक. अतर्क्य व अनिश्चित असे वर्तन. प्रौढांच्याही वागण्या मागिल प्रेरणांची हीच सूत्रे आहेत. तेही हे मान्य करतील.

माताव्हेरो- किन्न ओई पुन्हा गॉर्डन जवळ बसली. गॉर्डन हा गोरा मुलगा आनंदला “तुला नेहमीच माझ्या जवळ बसायला आवडत ना ?. ” तो म्हणाला.

मी- ( मनातल्या मनात ) एक छोटीशी सुरुवात. पण गोरी आणि सावळी मुले खरोखर एकमेंकांत मिसळतील असे मला वाटले नव्हते. त्या दोघांमध्ये सामंजस्य निर्माण व्हावे एवढाच प्रयत्न मी करते. शारीरीक मानसिक व आध्यात्मिक क्षेत्रात ते एकत्र येऊच नाहीत असे नाही. हे तर मी स्वतःच केले आहे. परंतु जेथे हितसंबंधाचा प्रश्न येतो तेथे मात्र त्यांच्यात फूट पडते. प्रत्येक वंशाचे हितसंबंध त्यांच्या शतकानुशतकाच्या पूर्वेतिहासातून तयार झालेले आहेत. सर्वसाधारणपणे माओरींना सामूहीक संमेलन आवडते. ज्यात खाणेपिणे व अध्यात्म यावर भर असतो. आम्ही बुद्धीवादी युरोपिअन मात्र सर्व काही कायमचे विभाजित करुन टाकतो आणि

एकाकीपणा पत्करतो. अर्थात हे सर्वसाधारण चित्र आहे. पण माझा स्वतःचा मात्र जास्त संवाद सावळ्या माणसांशीच झाला व होतो.

गोरा हॅरी आज घरीच आहे. कारण सावळ्या ज्यूनियरने त्याला ठोकून काढले आहे. पण फक्त एवढ्याच कारणाने तो घरी राहिला असेल यावर माझा विश्वास बसत नाही. बहुधा शाळेत सगळ्यांशी मिळून मिसळून रहावे लागते याची प्रतिक्रिया म्हणून तो घरी राहिला असावा. वर गेलेला झोका एकदा मागे जाणे अपरिहार्यच असते. मी आधीच त्याच्या आईला सावध केले होते. अशी लक्षणे दिसली तर हॅरीला घरीच आराम करु द्या. असे सांगितले होते. अर्थात माझ्या सूचनेशी मिस्टर हॅंडरसन सहमत झाले नसते, असेही मी सांगितले. पण तरीही हॅरीचे हे परत जाणे मी अडवू शकले असते. जर मी पूर्ण मनाने तेथे हजर असते तर ... पण मी सुट्टी संपवून नुकतीच परतले होते. अजून शाळेच्या वातावरणत पूर्णतः शिरले नव्हते. नाहीतर मी त्याला धीर दिला असता. दिलासा दिला असता. असे मी पूर्वीही केले आहे. पण यावेळी मी चुकले आणि आता हॅरी घरी गेला आहे. मला अगदी शरमल्यासारखे  झाले आहे. मी ज्यूनियरला बडवायला पाहिजे होते. हाच तर एक उपाय मानला आहे. या मूर्ख मोठ्या मुलांना फोडून काढले की मारामारीची वेदना काय असते ते त्यांना समजते. पण मी हे केले नाही आणि आता हॅरी घरी गेला आहे. त्याची शिक्षिका म्हणून मला मेल्याहूनमेल्यासारखे झाले आहे. विचाराने मी अगदी ठाम असले तरी त्या दुःखद जाणीवेतून वर यायला वेळच लागतो आहे. कधीकधी डोळ्यापुढे येणारी अंधारी क्षम्य मानायला हवी.

सावळी वाईवानी कुठलीही गोष्ट स्वस्थ बसून ऐकूच शकत नाही. तिला मध्येच उठून माझ्याशी काहीतरी बोलावेच लागते. बोलणे,संवाद साधणे ही सुद्धा एक कलाच आहे.पण आमच्या आयुष्यात आम्ही याची नामोनिशाणीही राहू देत नाही. संवादाची उर्मीच खोलवर गाडून टाकतो. तेव्हाच आम्ही सभ्य माणूस गणले जातो. या शिष्ट पांढरपेशेपणाचा मला अगदी तिरस्कार वाटतो. असे जॉय म्हणत असे. वाईवानीचे कुठलेही काम चटकन पूर्ण होत नाही याचे कारण तिचे सारे लक्ष व्यक्तीगत संबंधातच लागलेले असते. पण मी तिच्या या दृष्टीकोनाचा आदर करते. एवढेच नव्हे तर त्यास प्रोत्साहन देते. कारण मला माहित आहे यामुळे कुठल्याही गोष्टीला अर्थ प्राप्त होतो. किती प्रेमळ आणि उत्सुक मुलगी आहे ती. माताव्हेरो प्रमाणेच तिलाही कुणाही व्यक्तीबाबत घडत असलेल्या कुठल्याही घटनेच्या जास्तीतजास्त जवळ जायचे असते. व्हेरपोरेताची जुळी मुल दगावली तेव्हा ती त्याच्या शवपेटीच्या निकट उभी होती. आणि देहभान हरपून काळजीपूर्वक त्या मृत जुळ्यांचे चेहरे न्याहाळत होती. देहभान हरपणे ही जीवनाची वरची पायरी आहे. वाईवानी आणि माताव्हेरो हे खरे सार्थ आयुष्य जगतात. आम्ही युरोपिअन ज्याला काम म्हणतो ते नाही पण ज्या असोशीने ते जगतात ते दाद देण्या सारखे असते.

दुपारी लिहिण्याला सुरुवात झाली. शब्द जुळवून लिहिणे. ही पहिली भिंत आहे. ती दोन भिन्न जिवंत माणसांना विभागते. स्पर्श व वाणी याद्वारे भावना व विचार व्यक्त करण्याऐवजी ते लिखित शब्दात बांधले जातात. मला हे आवडतेही आणि नाहीही. स्पर्श आणि भाषेतून भावना व्यक्त करणारे कधीही एकटे असत नाहीत. पण लेखक मात्र एकाकी पडतात. ही एकटे पडण्याची सुरुवात असते. माझी मुले स्वत:हून स्वतंत्रपणे वाक्य रचना करीत आहेत. म्हणून मी आनंदी व्हावे की.. ? एक ट्वीनी फळ्यावर लिहिते आहे. “मासा उडी मारतो आहे. मासे पोहत आहेत. समुद्रात छोटासा मासा असतो. माशाला पाय नसतात. ” अरे देवा ! या संस्कृतीच्या आक्रमणाला मी थोपवू शकत नाही. देवळा जवळ जमलेल्या बोलण्यासाठी उत्सुक असलेल्या अंगावर चित्रविचित्र गोंदण असलेल्या मावरीपूर्वजांचे चित्र माझ्या मनात आले. सरळ जोमदार संपर्क.

डोळे मिटून मुले शांतपणे विश्रांती घेत असतात. तेव्हा मी गाण सुरु करते. मला झोपवतांना वडीलांनी गायलेली गाणी . शिकवण्याच्या नादात माझ्या मुलामुलींना जी ऐकवण्यासाठी मला फुरसतच नाही झाली ती गाणी. ही गाणी वारंवार ऐकायला त्यांना आवडतात,. आणि मलाही. त्यामुळे नकळत अनेक बाधांपासून माझी मुक्तता होते.

कुठे गेला, माझा कुत्रा कुठे गेला.
कुठे असेल, तो कुठे असू शकेल ?
त्याचे केस कापलेले आणि शेपूट मोठी
कुठे असेल, तो कुठे असू शकतो ?
नदी पात्रात वाफेच्या बोटीने फे-या मारणे ...

मी हे गाणे पूर्ण करीत नाही, कारण हे खास माझ्या कुटुंबाचे गाणे आहे. शेकडो वर्षापासूनचे पारंपारीक कोटुंबिक गीत. पण या सावळया मुलांना निजवतांना मात्र ते आपोआप माझ्या ओठी येते.

- माझ्या बालवाडीच्या साधनांपैकी बहुतेक महत्वाची साधने मी शुक्रवारी जाळून टाकली. जितकी साधने जास्त असतील तितकी स्वत:ची सामग्री घडविण्याची, वापरण्याची मुलांची व शिक्षकांची शक्ती कमी होत जाते. इतर शाळातून आमच्या शाळेत येणारी मुले चीड यावी इतकी साधनावलंबी बनलेली असतात. आई प्रमाणे आपले सर्व काम शिक्षिकांनी करावे अशीच त्याची अपेक्षा असते. मला चकचकीत सुबक चौकोनी ठोकळ्यांचे आकर्षण नाही. त्याला चमक आणि रंग हे मुलांनी आपल्या कल्पनेनी भरले पाहिजेत. कदाचित तो गुळगुळीत, चकचकीतपणाची कल्पना करणारही नाही. त्यावेळी बाहेरुन दिलेला गुळगुळीतणा, चकचकीतपणा हा त्याच्यावर लादल्यासारखा होईल हे उघडच आहे. असे होणे भयानक आहे, हे मी अगदी ओरडून सांगेन. जे काही तो स्वत:च्या कल्पनाशक्तीने तयार करेल ते त्याच्या स्वत:च्या गरजेनुसार केलेले असेल. तो त्याच्या व्यक्तीमत्वाचा

सहज आविष्कार असेल. चौकोनी ठोकळे हे मी फक्त उदाहरणा दाखल घेतलेले आहेत. पण खरे तर सर्वच साधनांविषयी मला हेच म्हणायचे आहे. मिसेस एस यांना एक काम सोपविण्यात आले होते. वाचन पुस्तकांच्या पूरक अशी वाचनाची कार्डस तयार करण्याचे. प्रत्येक शब्दाला साजेसे चित्र काढायचे. कार्डांचा अगदी डोंगरच तयार करायचा.प्रत्येक शब्दाचे चित्र. यावर विश्वास ठेवा की ठेऊ नका पण अगदी 'उठ' 'त्याला' 'माझे' अशी बहूतेक सर्व नामांची चित्र ! आधुनिक शिक्षक हे करीत असतील आणि आधुनिक शिक्षणतील तपानिस हे करण्यास प्रोत्साहित करीत असतील यावर माझा विश्वास बसत नाही. मुल नामाला साजेशा चित्राची कल्पना करु शकत नाही का ? आम्ही उभायान्वयी अव्ययांची, संबंध सूचक अव्ययांचीही चित्र काढणार की काय ? आणि हे सर्व तयार केलेच तर त्याला सांभाळून ठेवण्यातच किती वेळ जाईल. साधने व्यवस्थित व सुरक्षित ठेवणे. किती अवघड व वेळ खाणारे काय असते. याची कल्पना बालवाडी शिक्षकालाच करता येऊ शकेल. हाच वेळ खरे तर मुलांशी बोलण्यात घालविता आला असता. मी माझ्याकडील अशा प्रकारच्या सामग्रीला स्वहस्तेच काडी लावली. डझनावारी कार्डस, हातांनी चित्रित केलेली कार्डस. खोकेच्या खोके भरलेली होती. सर्व पेटवून दिली. आता फक्त खालील वस्तू तेवढ्या शिल्लक आहेत.

खडू, पुस्तक, फळा, चार्ट,कागद, रंग, पेन्सील, माती, गिटार आणि पियानो. मुलाला काही वाचायची उर्मी आली की स्वतःच एखादे पुस्तक घेईल आणि वाचायचा प्रयत्न करु लागेल. मुलांना या प्रयत्नापासून दूर ठेवणे म्हणजे त्यांना स्वतःची साधने तयार करण्याच्या शक्तीचा विकास करण्यापासून रोखण आहे. (ही साधन जाळली तेव्हा अर्थातच मला दुःख झालेच ! )

मात्र या अग्निपरिक्षेनंतर शिकवणे अधिक सोपे व स्वच्छ झाले असा अनुभव आला. मुलांशी बोलायला आता अधिक वेळ मिळू लागला. संवाद आणि संप्रेषण. ( हे साहित्य जाळतांना चिमणीत भपकन झालेला आवाज तुम्ही ऐकायला हवा होता ! )

या आठवड्यात आमचे मूल्यमापन झाले. टॉम, के या माझ्या पुरुष सहका-यांना चांगली श्रेणी मिळाली. नेहमी प्रमाणे मला मात्र सर्वात खालची श्रेणी मिळाली. मी अगदीच वाईट शिक्षिका आहे. माझ्या अंगी यापेशासाठी लागणारे कुठलेच गुण नाहीत. हे अगदी खरे आहे. पण माझी बहिण डेफने म्हणाली, तू या स्तरावर आल्यावरही जर या शिक्षण खात्याने तुला चांगला दर्जा दिला असता तर ती फारच लाजिरवाणी गोष्ट झाली असती ! . न्यूझीलंडमधील शिक्षण प्रणालीने मला झिडकारणे हा एक प्रकारचा सन्मानच असू शकतो असे मलाही वाटते. याचा अर्थ मी शिक्षिका म्हणून गुणवान आहे. कारण माझ्यावाटेवर मी एकटीच आहे.एडमड वर्कप्रमाणे आम्ही अगदी 'डांबरट' आहोत. टिकाकार जेव्हा तुम्हाला कुठल्याही विाशिष्ट चौकटीत कोंबू शकत नाहीत. तेव्हा ही विशेष उपाधी तुम्हाला मिळते. ही देखील एक शक्यता आहे. माझ्या बाबतीत या दोन्ही शक्यता योग्य ठरतील.

शनिवार सकाळी मी राजीनामा देण्याच्या निर्णय घेतला. या वर्षाच्या शेवटी राजीनामा द्यावा असे मी ठरविले. खूप गोष्टींची मी इथेच सुरुवात केली. जे काही माझ्याजवळ होते. ते सर्व मी इथे अर्पण केले. पण आता हे सर्व काही सोडून जायचे आहे. खूप झाले. आता केवळ पत्नी म्हणून भूमिका करायची. शक्य झाले तर याच्या आधीही पळून जाईन. रजा बाकी असेल तर आधी ती घेऊन टाकू.

व्हेरिपारीताच्या जुळया मुलांच्या समाधीवर आता थोडे गवत उगवले आहे. तिचे दु:ख ही आता थोडे हलके झाले असावे. प्रसूतीनंतर आपली जुळी मुले गमावल्यावर जेव्हा ती कामावर आली तेव्हा मला तिच्याकडे पहावत नव्हते. हातातला झाडू विसरुन ती तासंतास शून्य मनस्कपणे उभी राही. ''व्हेरिपारीता आपल्या मुलांच्या समाधीजवळ अश्रू ढाळत उभी असल्याचे पाहिले'' असे रोज कुणी ना कुणी येऊन सांगत असे. आपण तिच्यासाठी काहीतरी करायलाच हवे असे मला वाटत असे. फक्त सोळाव्या वर्षी असा जिव्हारीचा घाव झेलणे किती अवघड वाटत असेल. शुक्रवारी आपल्याबरोबर तिला शहरात घेऊन जायचे मी ठरविले. पण नंतर मी ते विसरले. शहरात गेले आणि पहाते तर व्हेरिपारीता झकास नट्टापट्टा करुन आपल्या मैत्रीणीबरोबर रस्त्यात दिसली. तिच्याकडे पाहून हीच ती पुत्र वियोगाने व्याकूळलेली व्हेरिपारीता आहे, असे मुळीच वाटत नव्हते. व्हेरिपारीताचे आजारपण आणि दु:ख यांनी तीच्या रुपाला नवा घाट दिला आहे. पूर्वी अगदी खास मावरी ठशाचा चेहरा होता. पण आता कांती उजळली आहे. बांधा सडपातळ झाला आहे. गेल्या महिन्यात झालेल्या सौंदर्य स्पर्धेत ती दुसरी आली होती. त्यादिवशी जेव्हा ती ट्रक मधून उतरली तेव्हा किती सुरेख दिसत होती ती !

“मला तू फार आवडतेस” मोही मला म्हणाला. “तू सिगारेट ओढतेंना म्हणून मला आवडतेस. ”

मोही हा एक गो-या रंगाचा मावरी मुलगा आहे. त्याचे वडील जत्रेत फेरीवाल्याचा धंदा करतात.

“हो, मी सिगारेट ओढते. ”

“तुला सैतानाच्या घरी नरकात जाव लागेल. ”

“मलाही तसच वाटतय खर. ”

“मी पण सिगारेट पितो. ”

“अरेच्या ! मगतर तुलाही नरकात याव लागेल ना? ” माझ्या प्रश्नांवर मोहीने होकारार्थी मान डोलावली. “ठिक आहे, आता आपण दोघही आपापला बाडबिस्तरा बांधून सैतानाकडे जायची तयारी करु ” त्याला सोडून जाणे अशक्यच आहे.

गेल्या आठवड्यात एक चमत्कार झाला. हाईने आणि रिटी टमाटीचा कुणीतरी जादूने कायापालट केला. कुणीतरी दोन्ही मुलांना चांगल रगडून रगडून न्हायला घातलय.केस विंचरुन दिलेत.कपडे देखील स्वच्छ धुऊन

इस्त्री केलेले होते. मी तर अचंबितच झाले. केवळ आत्मरक्षणाच्या भावनेने शाळेत इतके दिवस मी त्यांना अंघोळ घालत होते. केस विंचरत होते.

“कुणी अंघोळ घातली तुम्हाला? ” मी विचारले.

“आईने” ते उत्तरले.

“आई परतली तुमची ? ”

“होऽऽ आली. कपडे धुतले. ” ”

“तिनेच तुमचे केस विंचरले? ”

“हो, केस विंचरले. परत आलीय ती ”.

“वा ! किती झकास झाली नं. ”

मी त्या दोघांविषयी आतापर्यंत काहीच लिहिलेले नव्हते. कारण आधी रोझ विषयी लिहावे असे मला वाटत होते. आई घरात नसल्याने तिलाच या दोघांना सांभाळावं लागत होत. पण रोझविषयी मी अद्याप काही लिहिलच नाही. रोझ जीने सौदर्य स्पर्धेत मुलींच्या परेडचे नेतृत्व केले होते.

मी राजीनामा देणार नाही. माझ मन पालटल आहे. म्हणजे मी ज्याला आपले मन समजतं ते बदलल आहे.

हॅरी आज परत प्रकट झाला. अश्रू दाटलेल्या अवस्थेत मी येईपर्यंत मुलांनी त्याला रोखून धरल होत. खर तर दुस-या घंटेपर्यंत तर मी पोचतेच. मी त्याला उचलून कडेवर घेतल आणि टेबलाजवळ बसलें. मी दुस-या मुलांना काम देत असतांना तो न्याहाळत बसला. तिकिटांशी खेळत बसला. मग मी त्याला ‘निळे जग’ ही गोष्ट वाचून दाखवली तेव्हा तो म्हणाला, दुपारनंतर तो शाळेत येणार नाहीए. घरीच झोपणार आहे. कारण छोट्यांनी त्याला रात्रभर नीट झोपूच दिलं नव्हतं. पण दुपारी तो परत आला. तेव्हा तो जरा खुशीत दिसत होता. त्याच्या घरी नेहमीच तणावपूर्ण वातावरण असावं. चार छोट्या मुलांमधला तो सर्वांत मोठा. हे मोठेपण ही त्याच्यासाठी मोठीच कठीण गोष्ट झाली होती. आईकडून आपले लाड करुन घेण्याचा हक्क त्याला घेताच येत नव्हता. मी त्याला आई सारखं प्रेम देण्याचा प्रयत्न केला. शेवटी मलाही माझ्या मनातील अपराध गंड विसरायचा प्रयत्न करायचाच होता.

मी मोठ्या मुलींना बास्केटबॉलच्या तीन टिममध्ये विभागले आहे. अ, ब, क आपल्या कोटावर शाळेची निशाणीचे भरतकाम त्या स्वत: करीत आहेत. आपल्यासाठी पिवळ्या रंगाचे स्वेटरही त्या विणताहेत. बहूतेक जणी पियानो वादन शिकता आहेत. सराव करीत आहेत. त्यांना असे कार्यमग्न पाहून मला खूपच आनंद वाटतो. गोल

करणा-या मुली रोज आपल्यासाठी काही विशिष्ट गोलसंख्येचे लक्ष्य ठरवून तेवढे गोल करण्याचा प्रयत्न करतात. रोज वीस गोल. पहिल्यांदा मला याविषयी संशय होता. मला वाटायचे की मी जरा जादाच अपेक्षा करते आहे. पण थोड्याच दिवसात मी ऐकले की बी टिममधील काही मुली तर १०० गोल करतात. मी माझ्या शाळेतील पुरुष सहका-यांना विचारले की या संख्या कितपत विश्वसनीय आहेत. आमीराने सांगितले होते की, तिने गेल्या आठवड्यात ७२० गोल केले होते. मी टॉमला म्हणाले, मी काही २४ तास तिच्यावर पहारा करु शकत नाही. त्यामुळे ती सांगते. त्यावर मला चिश्वास ठेवणेच भाग आहे. सराव किती होतो आहे. कुणास ठावूक. पण ही गोल संख्या मात्र मन मोहून टाकणारी आहे !

माझ्या शाळेत रोज कुणी ना कुणी मुलगा पियानोवर रियाझ करतांना आढळतोच. कुणी मुलगी मशीनवर शिलाई काम करते. तर कुणी विणकाम करतांना दिसते. तीन चार डझन छोटी मुल एकत्र काम करताहेत. बोलत आहेत. हसत आहेत, आणि गाताहेत. मला त्यांचे गाणे खूप आवडते. कुणीतरी एखादा सुरु करतो, दोन चार जण त्याला साथ देतात.आणि मग सारा वर्गच गाऊ लागतो.

पण ज्या गोष्टी मला आवडतात. नेमक्या त्याच माझ्या विरुद्ध जातात. मी स्वतःच पियानोवर बसून त्यांची गाणी वाजवते.ते ऐकून काहीजण धावत माझ्याजवळ येतात आणि गायला लागतात. किंवा कधी बसल्या जागेवरुनच सूर मिसळतात. पण जेव्हा ते 'गुडनाईट इरिनी' हे गाण ऐकतात. तेव्हा मात्र ते सर्वजण धावत येतात. एक घोळकाच जमतो आणि सर्वस्व ओतून गाऊ लागतो. वाईवानी माझ्या सगळ्यात जवळ उभी राहून मला वाजवतांना पहात रहाते. आणि ते लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करते. मग थोड्या वेळाने ते आपापल्या कामाकडे परत जातात. ही मला खूपच भावणारी घटना असते. समूहाचे उत्स्फूर्त संमीलन. अगदी आदर्शवत सहज घडण. असो, पण मी कुठे होते ? हां, मी हे कबूल करते की मी अगदी वाईट शिक्षण देते. एकदम कबूल.

गणवेश शिवणा-या दुकानदाराने आमचे गणवेश शिवण्यास नकार दिल्याचे समजले. मी काही त्यांना दोष देणार नाही. कालच तर मी नेपिअरला गेले असता या दुकानात जाऊन आले. के देखील शाळेसाठी प्रोजेक्टर बघण्यासाठी तेथे आले होते. अचानक मला तेथे टांगलेले ब्लेझर व जाकीट दिसले. विक्रेत्या महिलेशी मी त्याबाबत बोलले. तिचा एकूण अवतार जरा भितीदायकच होता. पुढच्यावेळी आपण असेच कपडे आणून देऊ असे तिने सांगितले. मला एकदम आठवले की श्रीमती हाकीवाई यांनी माझ्याकडे गणवेशाच्या जाकीटाचे पैसे आधीच दिलेले आहेत. म्हणून मी त्यांना या कपड्यातून तीन जोड श्रीमती हाकीवाई यांच्यासाठी वेगळे ठेवायला सांगितले.

हाकीवाई हे नाव ऐकताच विक्रेती म्हणाली, "कृपया स्पेलिंग सागाल का ? "

मी तिला स्पेलिंग सांगितले. ते ऐकताच हातातली पेन्सील खाली ठेवत तीव्र नाराजी दर्शवत ती म्हणाली,

"म्हणजे ! ही तर कुणी मावरीस्त्री दिसते. "

“होय” मी उत्तरले.

“त्यांचा काही भरोसा नसतो बाई. ते माल मागवतात आणि नंतर घ्यायलाच येत नाहीत. ”

“पूर्वी अस झालही असेल. पण यावेळी तस होणार नाही एवढ नक्की. ” मी सावरत म्हणाले.

“तुम्ही त्या माओंरीवाल्या शिक्षिकां तर नाही ? ”

“होय, मीच ती. ” मी शरमेने मान खाली घालत म्हणाले

तिने मला आपादमस्तक न्याहाळले. मला वाटलं आता ती मला मागे वळायला सांगेल, पाठीमागून पहाण्यासाठी ! मी जरा चिंतीत झाले. माझ्या एका छोट्याशा स्वप्नाची मला काय काय किंमत द्यावी लागणार आहे. कुणास ठाऊक. आणि स्वप्न तरी काय तर आपल्या मावरीमुलांना पिवळ्या करड्या रंगाच्या गणवेषात पहाण्याचे ! बस्स एवढेच . मी इतकी वैतागले की मन रमविण्यासाठी इतर महागड्या विभागात गेले.

वरीष्ठ निरिक्षकांनी मुख्याध्यापकांची बैठक घेतली. त्यात के यांनी शाळेची चर्चा केली. त्याने प्रभावित होऊन वरीष्ठ निरिक्षकांनी एका सहाय्यिकेची मला मदतनीस म्हणून नेमणूक केली. “जे काही श्रीमती हँडरसन करतात, त्यात तिने मदत करावी. ” अस ते म्हणाले ! नियुक्तीचे सर्व नियम धाब्यावर बसवून केलेल्या नेमणूकीने शाळेतील इतर सहका-यांना काय वाटेल याचा विचार करायला हवा. पण कदाचित कल्पकतेच अस स्वागत होतही असेल कधी कधी! शिक्षक दालनात नवीन स्नानगृह व लाँड्रीची जागा कशी बांधता येईल याची मापे घेण्यासाठी काल शाळेत एक वास्तूरचनाकार आले होते. हे ऐकूनही काही ना काही वादळ उठेलच. पण आता जे व्हायचं ते तर होऊनच गेलय. माझ एक स्वप्न होत की या शाळेचा दर्जा आपण असा उंचावू की गोरी मुले या शाळेत परत येतील. ही इतकी जवळची शाळा सोडून गो-या मुलांना प्रवासाची दगदग करुन लांबच्या शाळेत का जाव लागू नये अस मला तर नेहमीच वाटत. हे किती लाजरवाण आहे.

आमच्या शाळेचे गणवेष बनविण्यास बी दुकानाने नकार दिल्यापासून माझ्या मनात ठसठसत होते. काहीही झालेतरी काम करत, वाट चालत रहावे. हाच माझा स्वभाव असला तरी वाटेत येणा-या या त-हेच्या अडथळ्यांनी मनावर ओरखडा उमटतोच. काय करावे ते कळत नव्हते आणि अचानक शाळेतली मुल माझ्या स्वप्नातल्या पोषाखात दिसू लागली. कोठून हे आले देवाला माहित.

“अरे ! कुठून खरेदी केली ? ”

“माझ्या मामेभावाने शिवून दिलाय. ”

“मेरीऑन, हा तुझा गणवेष कुठून आणलास तु ? ”

“आणला नाही, माझ्या दादाने काल रात्रभर बसून शिवून दिलाय. ”

“डेला ! अरे तू तर खेळाचा करड्या रंगाचा नवा गणवेष घातलायस ! ”

“मग ! माझ्या आईने नेपिअरहून आणला आहे तो ! ”

दुस-या दिवशी सकाळी दरवाजा वाजला, लिली एक मोठा लिफाफा घेऊन आली होती. “हे आमचे जाकीट आणि ब्लेझर आहेत. हँडरसनताई. ”

“माझ्या आजीने नेपिअरहून आणले आहेत, माझ्यासाठी आणि आमेरिआ, रेरेमोना यांच्यासाठी यांची उंची ठिक आहे ना. ते आजीने विचारायला सांगितल. ” आणि दिवसभर मग असच काही ना काही होत गेलं.

विश्वास ठेवा की नका ठेवू. अशा त-हेचे हे किस्से. मी ओसरीत बसून माझ्या पुरुष सहका-यांना हे सांगत होते. कारण आता स्टाफरुम राहिलीच नव्हती.

“श्रीमती हँडरसन, आज दुपारी इरिनी येणार नाही. ”

“का बरं,लोटस ? ”

“ती हॉस्पीटलमध्ये आहे. ”

“काय झालं माझ्या इरिनीला ? ”

“तो लॉरेंस आहे ना, तो सायकलवर बसवून तिला घरी नेत होता. अचानक एक घोडागाडी समोरुन आली. टक्कर टाळता टाळता ते दोघंही आपटले. इरिनी खाली आणि वर लॉरेंस. इरिनीच्या चेहत्यावर दोन ठिकाणी जखमा झाल्या आहेत. ”

“केव्हा झाले हे सारे? ”

“काल रात्री, जेवणाचे वेळी इरिनीच्या आईने टॅक्सीत घालून हॉस्पीटलमध्ये नेलयं. ”

“आपल्याला रविवारी हॉस्पीटलमध्ये जावे लागेल. ” मी के ना म्हणाले. “पुष्कळच परिचित तेथे इलाज घेत आहेत. ”

“दा वर शुक्रवारी शस्त्रक्रिया झाली. ”

“अरे देवा ! ”

“डस्कीला पंधरादिवसापूर्वी ह्रदयविकाराचा जोरदार झटका आला. तो तिथेच विश्रांती घेतो आहे. ”

“अरे देवा ! हे तर मला माहितच नाही ! ”

“आपल्याला खरेच रविवारी जायला हवे ! ”

तेथे नेहमीच बरेच ओळखीचे लोक असतात. त्यांना काय भेट घेऊन जावे ही नेहमीची मोठी समस्या असते. गेल्यावेळी मी सर्वांना तिकिटे लावलेले लिफाफे घेऊन गेले होते.

गेल्या रात्री हेमिंग्वेमध्ये सिनेमाला गेले असता मी व्हेरीपारीताला पाहिले. ड्रेस सर्कलमध्ये एका तरुण मावरी मुलाबरोबर, आता वाजंत्री केव्हा वाजणार एवढाच प्रश्न उरलेला आहे असे दिसते !

के खेडयामध्ये प्रोजेक्टर चालवून पहात होते. यामुळे आता अनेकदा संध्याकाळी सिनेमा बघायला मिळणार. सगळेच जण जमतात. प्रोजेक्टर मिळणे ही धमालच गोष्ट ठरणार.

काल दुपारी अडीच वाजता,माझ्या बालवाडीतील मुले जेव्हा वाचण्यात रमली होती. तेव्हा आमची बास्केटबॉलची टीम मैदानावर माझी वाट पहात होती. खिसे शिवण्यात आणि विणण्यात काही मुली दंग होत्या. होरी पियानोवर रियाज करीत होता. लोटस तिचा गणवेष शिवत होती. मेरे तिच्या नवीन अंगरख्याच्या चुण्यांना नवीन इस्त्रीने इस्त्री करीत होती. वरीष्ठ निरिक्षकांनी मान्य केलेली सहाय्यिका पुढील आठवड्यात येथे असेल हा विचार माझ्या मनात आला. मी स्वत:शीच हसले.

पुकीच घर रस्त्याच्या पलिकडे होत. घर कसलं ती एकच खोली होती. आईवडील आणि आठ मुलं. आठही मुलं एकाच बिछान्यात झोपत. ते शाळेत बहूतेक चेहरा न धूता केस न विंचरताच येत. त्यांची आई निराश झाली असावी. वडील प्रत्येक शनिवारी दारुच्या गुत्त्यात जाऊन आठवडाभराची कमाई उडवून घरी परततात. घरी आल्यावर बायकोला मारहाण करणे, भांडण करणे हा त्यांचा कार्यक्रम सुरु होतो. नेमके त्याचवेळी मी व माझा नवरा आनंदाने शहरात जायला निघत असू. आठही मुलं घाबरुन घराबाहेर पडत व सुरक्षित अंतरावरुन आईवडीलांचा तमाशा बघत. घरातून उडत येणारे झाडू, ब्रश हे अगदी भितीदायक असत. सर्वात वाईट भाग म्हणजे या आठ मुलांचा आक्रंदन. पण मला त्या स्त्रीविषयी करुणा वाटत असे. एकदा आजीशी चर्चा करतांना मी म्हणाले, “मी नेहमीच त्या स्त्रीच्या बाजूने राहीन, चूक असो की बरोबर मी तिचीच बाजू घेईन. ”

“तो दुस-या एका बाई बरोबर जातो. मोनाला ते आवडत नाही. ”

“हे तर मलाही नाही आवडणार. ”

“मलाही नाही. ”

प्रत्येक शनिवारी रात्री मी नव-याला म्हणे, एक ना एक दिवस इथे खून पडणार आहे.

त्या गुरुवारी पाऊस पडत होता. बालवाडीत बसण्याचा एक फायदा असतो. शाळेत काहीही विस्मयजनक घडत असले तर त्याचा शोध मला लागतोच. मला दोन विलक्षण प्रज्ञावंताचा शोध लागला आहे. रेरेमोआना आणि टेम टुही दोघेही अगदी अस्सल मावरी रक्ताचे. गो-या रक्ताचा एक थेंब त्यात नाही.

मी माझ्या वरीष्ठ निरिक्षकांशी त्यांच्या विषयी बोलतांना म्हणाले, तुम्ही एकदा रेरेमोआना आणि टेमटुही यांना भेटायला हवे. पुढील सात वर्षात नागरिमू शिष्यवृत्तीसाठी हे माझे दोन उमेदवार आहेत. कदाचित त्यावेळी मी येथे नसेनही.

पॉली पियानोवर सराव करीत होती. तिच्या संगीतात एक खिन्नतेची छटा असते, सच्चेपणा असतो. तिच्या शरीरात हाडामांसा पेक्षाही संगीतच अधिक सामावलेले आहे. प्रसिद्ध आकाशवाणी गायक काहू हे तिचे काका. पॉली माझी विशेष लाडकी आहे. ती मेरेची बहीण आहे. तिला आई नाही. मेरेनी मला सांगितल की तिची आई वारली. आसपासच्या दुकानदारांनी सांगितल पॉलीची आई शेवटच्या बाळतपणात वारली. मला माझ्या पॉलीचा व मेरेचा खूप अभिमान आहे. त्या दिसायलाही आकर्षक आहेत. त्यांच्या व्यक्तीमत्वात काहीतरी चमक आहे. समोरच्याला खेचून घेणारी व्यक्तीमत्व किंवा काही तरी आणखी वेगळेच ?

काल मेरे आणि गो-या जूनने चेह-यावर लाल खडू चोळून घेतला. तो एक ओलाचिंब बुधवार होता. काही वरील भेटायला आले होते. माझ्या समवेतच्या मोठया मुली विणकाम, शिवणकाम करीत होत्या. शेवटचया दिवशी नृत्याच्या जोडीला वाद्यवृंदाचा कार्यक्र्म होणार होता. त्याची तालीम सुरु होती. माझी शिशुशाळा तर समवेत होतीच. जेव्हा अचानक आपल्या रंगवलेल्या चेह-यांनी, मोठ्याने खिदळत हे दोघे जेव्हा वर्गाबाहेर धावत आले, तेव्हा जाणीवपूर्वक ठेवलेल्या माझ्या संयमावर एक थप्पडच बसली. त्यांना उद्देशून मी म्हणाले, आधी तुमचे चेहरे धूऊन या. मगच तुमच्याशी बोलेन.

मेरेनी माझ म्हणण ऐकल न ऐकल्यासारख केल. माझ्या म्हणण्यातला कडवटपणा तिला माहित होता. पण गो-या जूनला माझ्या बोलण्याचा सराव नव्हता. ती एकदम मोठ्याने रडायला लागली. मी जरा चपापलेच. “रडू नकोस, पोरी मी पुन्हा नाही रागवणार. ” म्हणून समजावू लागले, पण ती अगदीच सैरभैर झालेली होती. मला घट्ट बिलगून ती पुन्हा पुन्हा म्हणत राहिली. “मला रागावू नकोस. ” एकच गोष्ट या परिस्थितीत करता येण्यासारखी होती. मी तिला उचलून घेतली आणि तिचे अश्रू पुसले.तिला दिलासा मिळाला. ती रडायची थांबली, पण काही मोठ्या मुली हसल्या. हसू नका. मी त्यांना दटावले, जरा प्रेमाने पहा.

मला जून कडे खास लक्ष देणेच भाग होते. तिला वर्गात कुणीच समवयस्क गो-या मैत्रीणी नव्हत्या. त्यामुळे मीच तिची मैत्रीण बनले होते. आम्ही पेन्सीली वाटून घ्यायचो, फळ्यावर जागा वाटायचो. एकमेंकींना रबर द्यायचो. दर दिवशी तिच्या दहा हजार प्रश्नांचे व निरिक्षणांचे मला समाधान करावेच लागे.

उपसंहार - पहाटे चारपर्यंत मी जूनच्या प्रसंगावर विचार करीत जागी होते.

संवाद व संपर्कात निपुण असलेली आमची वाईविनी ही यावर्षीची सर्वश्रेष्ठ पियानो कलाकार होती. तिची बोटे तिच्यासारखीच सहज वळणारी, लवचिक होती. तिने मला तिच्या कौशल्यानी थक्कच केलं. ती फक्त सहा वर्षाची आहे.पण या तीन प्रतिभावंत मावरी मुलीचे भवितव्य काय आहे ? रेरेमोना टेम आणि वाईविनी? काय आहे त्यांचे भविष्य ? पाखेहा (गोरे लोक) सारख्या यशासाठी सतत संघर्ष करणें ? मग त्याच्याकडे हे काही नसते तर जास्त बरे झाले असते. त्यांची बौध्दीक क्षमता वाढत राहो. त्याचबरोबर त्यांची संवेदन संवाहनाची क्षमताही वाढो. इथे पाय-यावर बसून गप्पा मारणे, बोलणे, स्नेहाने बांधणे, झगडणे ...

मिसेस कटरने म्हणजे गो-या मार्कच्या आईने मला फुल पाठविली ! एक गुण जमा.

**<u>या आठवड्यातील सनसनाटी</u>**

*माझा मावरी पियानो वादकांचा गट वाद्यवृंदात भाग घेणार आहे. ही खरे तर या वर्षीची सनसनाटी घटना म्हणायला हवी. आता मला पियानोजवळ बसायची गरज नाही. मी बाहेरुन सुत्रसंचलन करु शकते. किती मजा!*

सर्व पियानो वादकांशी मी एक दिवस बोलले. त्यांच्या हजारो प्रश्नांना उत्तरे दिली. मुख्यत: त्या जे काही शिकल्या होत्या ते त्या स्वत:च शिकल्या होत्या. मला वाटते त्यांच्या माझा संवाद ही त्यांच्या शिक्षणातील महत्वाची कडी असू शकेल. माझ्याकडे खूप लिखित उत्तम रचनाही आहेत.

पण खरे सांगायचे तर मला आता या गोंगाटाचा त्रास होतो. वय झालय. आणि त्यात आमच्या शिस्तीचे हे विाशिष्ट स्वरुप ! म्हणजे तशी शिस्त आहेच. पण इथे नियंत्रण, शिस्त आंतरीक आहे. पूर्णपणे सहजभावाने आलेली. आंतरीक शिस्त ही बाहेरुन लादलेल्या कुठल्याही नियमांच्या विरोधी आहे.

पण जीवन किती छोटे आहे. नाही ? एक छोटीशी अर्थपूर्ण बालवाडी चालवू शकेल एवढे धैर्यतरी माझ्यात शेवट पर्यंत कायम असेल अशी आशा आहे. बालवाडी हा असा एक वाफारा आहे की जिथे अबोध मनातून असंख्य मुक्त आकार सरसरुन वर उठतील. नव्वादाव्या वर्षात जेव्हा मी माझ्या आरामखुर्चीत बसून मागच्या आयुष्यावर नजर टाकेन तेव्हा यावेळेचा मी योग्य उपयोग केला नाही. असे दिसले तर मी स्वत:ला क्षमा करु शकणार नाही. मग त्यावेळी माझे म्हातारपण किती पश्चातापात आणि हळहळण्यात जाईल याची कल्पनाच न केलेली बरी. सारखे, अरेरे ! त्यावेळी मी हे साहस का नाही केल? असे` वाटत राहील..

मी आज काहूच्या वाढदिवसाला हजर राहू शकणार नाही. जूनच्या घटनेनी जागवल्याने मी अगदीच थकून गेली आहे.

एक चिंबचिंब गुरुवार. रिमझिम रिमझिम.

माझे सात वर्षाचे जुळे काहूच्या वयात येण्याच्या निमित्ताने हेस्टिंग्ज येथील सभागृहात होणा-या मेजवानीत गाणार आहेत. या आधी त्यांचे गाणे आकाशवाणीवरही झाले होते. वृत्तपत्रात त्यांना बरीच प्रसिद्धी मिळाली आहे. आज जेव्हा मी त्यांना त्यांचे गीत मला आधी ऐकवण्याची विनंती केली तेव्हा त्यांनी युकूलेल ( एक

तंतूवाद्य ) उचलले आणि उत्स्फूर्तपणे गायला सुरुवात केली. या आदिवासी समूहातील अनेक गुणांशी खरेतर मी चांगली परिचित आहे. पण तरीही मी त्या मुलांच्या गाणे ऐकून चकीतच झाले.

या खेड्याच्या धमन्यांमध्येच संगीत आहे. उत्स्फूर्तता हे त्यांच्या संगीताचे वैशिष्ट्य आहे. कुठलीही रचना ते करीत नाहीत. अर्थात त्यांच्यात पूर्व निश्चित असे काही नसतेच म्हणा. सभागृह सुद्धा ऐनवेळी वाईरोवा पासून उधार घेतले आहे! अगदी निकटच्या संवाद-संपर्कात त्यांना जास्त रस असतो. एकत्र बोलणे, गाणे, नाचणे, धुंद होणे, प्रेम करणे या सर्वात त्यांनी जी उंची गाठलेली आहे ती लक्षणिय आहे.

विशेष सूचना : स्थलांतराच्या काळापासून ते अत्यंत भांडखोर म्हणून ते प्रसिद्ध आहेत!

## *सुट्टी नंतर - एक टिप्पणी*

सुट्टीपूर्वी शुक्रवारी दोन पोलीस शाळेत आले. गावात एका आईस्क्रिमच्या दुकानातून वेगवेगळ्यावेळी वीस पौंडाची चोरी झाली होती. त्या संदर्भात आमच्या शाळेतील तीन उनाड मुलांशी त्यांना बोलायचे होते. एका संशयिताच्या भावाशी बोलतांना पोलीसांनी त्याला विचारले.

“काय एवढ्यात काही चॉकलेट वगैरे खाल्लस की नाहीस ? च्युईगम तरी ? ”

“काय ! तुला काहीच नाही मिळालं ? ”

“मला अगदी थोड मिळाल. त्यांनीच सर्व संपवलं. ” अशीच थोडी प्रश्नोंत्तर झाली आणि दहा बारा वाक्यात तपासाच काम संपल.

ही सुरुवातीची प्रक्रिया ओसरीत सुरु असतांनाच आरोग्य तपासनिस शाळेत आले. आम्ही लाँड्री व शॉवरची व्यवस्था करुन मिळावी यासाठी अर्ज केला होता. त्याची खरच जरूरी आहे की नाही याबाबत त्यांना प्रत्यक्ष पहाणी करायची होती. फाटकातून आत शिरताच ते एका मांजराच्या प्रेताशी अडखळले. ते नुकतेच मेलेले मांजर कुणीतरी शेपटीला धरुन ओढून आणले होते.

पोलीस आणि कोर्टाच्या आमच्या विरोधी मोहिमेने माझी खूपच करमणूक झाली. शाळेला पुन्हा लोकमानसात, समाजात स्थान मिळावे, म्हणून वृत्तपत्रात वारंवार आमच्या प्रयत्नांविषयी मी जीव तोडून लिहित होते. परंतु त्या लेखा खालीच पोलीसाचे आमच्या विरोधी निवेदन छापलेले असे. घरफोडी बाबत,चोरीबाबत किंवा पाईच्या वडीलांचे कोर्टातील निवेदन असे काही ना काही. पाईच्या वडीलानीं म्हटले होते की, “कितीही बेदम मारहाण केली तरी पाई शाळेत जातच नसे. ” मी हे आरोप वाचून जोराने हसत असे. किती जण हे विनोद किंवा त्यातील कारुण्य समजू शकत असतील कुणास ठाऊक?

मे महिन्याच्या सुट्टी नंतर शाळेत आल्यावर मला जोरदार धक्काच बसला. बहुतेकांच्या अंगावर खाकी रंगाचे हिवाळी गणवेष होते ! काहींना तर त्यांचे खिसे सुद्धा होते. अर्थात रोजच्या जीवनात काहीही चमत्कार

संभवनिय असतात. असे मी मानतेच. आता हे जरा नियमित दिसायला लागलेत इतकेच. आमचे पूर्वीचे दुकानदार जर हे पाहू शकले असते. तर किती बरे झाले असते. न्यूझीलँडच्या सर्व भागातून पाठविलेले पोषाख आहेत. नेपिअरपासून विलींग्टनपर्यत. न जाणे आणखी कुठूनकुठून!

नियुक्ती नियमांमध्ये थोडे वळण घेत केलेली एका सहाय्यिकेची नियुक्ती माझ्या समोर अवतीर्ण झाली आहे. एका अर्थी हा पक्षपातीपणा आहे. तर दुस-या अर्थाने ती व्यवहार्य कल्पकताही आहे. अर्थात कल्पकता ही नियमांचे बंध झुगारणारच व त्याची किंमत अन्य मार्गाने चुकवावी लागणारच!

किती सुंदर दिवस ! सौख्यकारक, संपन्न खरचं . देवा बरोबरच ट्रेमेन यांचेही आभार मानायला हवेत.

फर्नहिल शाळा

२२ मे

विषय :- फर्नहिल शाळेचे गणवेष

प्रिय श्री बी

एक महिन्यापूर्वी तुम्ही आमच्या शाळेचे हिवाळी गणवेष तयार करु शकणार नाहीत असे सांगितले होते.तेव्हा मी अगदीच हवालदील झाले होते. तथापि त्यानंतर नेपिअर पासून विलिंग्टनपर्यत सर्व ठिकाणहून कुणी ना कुणी शाळेला हे गणवेष पाठविले आणि मी पुन्हा सावरले. मावरींना कपड्याचे विशेषत: गणवेषाचे किती वेड असते हे तुम्हालाही ठाऊक असेल कारण माझ्या इतकेच तुम्हीही त्यांना ओळखता. गणवेषाचा शाळेच्या कार्यावर किती अनुकूल परिणाम होतो.याचीही तुम्हाला कल्पना असेलच.आमच्या शाळेतील काही मुलांचे उच्छृंखल वर्तन सर्वांना ज्ञात आहे.(याचा मला फार बाऊ वाटत नसला तरी) हे लक्षात घेता गणवेष घालणे अतिशय सुटसुटीतपणाचे ठरते. आमच्या शाळेतील मुलींची या गणवेषामुळे चांगली सोय झाली एवढे नक्की.

तुम्ही आमच्या शाळेच्या मुलांसाठी पूर्वी चर्चिल्याप्रमाणे गणवेष पुरवू शकाल ना ? मला नमुन्यासाठी शर्ट पँट व ब्लेझर पाठवू शकाल काय ?

मुलांच्या व मुलींच्या पोषाखात सारखेपणा रहावा यासाठी एकाच प्रकारचे करड्या रंगाचे कापड मिळण्यावर आपण लक्ष ठेवलेत तर बरे होईल.

पूर्वी तुम्ही दिलेल्या सेवेबद्दल व सहकार्याबद्दल आभार. हिवाळी पोषाख पुरविण्याबाबत तुम्हाला जाणवलेली अडचण मी समजू शकते.

तुमची विश्वासू

श्रीमती एस हँडरसन

वरीष्ठ निरिक्षक ट्रेमेनना शाळेत पाहून मला आश्चर्यच वाटले. मला आनंदही झाला. समजूतदारपणाचा दुर्मिळ गुण अंगी असलेला हा माणूस आहे. तल्लखही आहेत. शाळेचे डॉक्टर व नर्स आलेत का हे पहाण्यासाठी मी ओसरीवर आले तर ट्रेमेन दिसले. मी हर्षोत्फुल्लतेने त्यांचे स्वागत केले. “तुम्हाला पाहून खूपच आनंद वाटला.” मी उत्साहाने म्हणाले.

“मलाही येथे यायला खूप आवडते. ”

मग मी बालवाडीत पळाले.

पण थोड्याच वेळात मुल एखाद्या पाण्याच्या लोंढ्यासारखे शाळेत घुसले, तेव्हा तेही त्यात सापडले.माताव्हरोने त्याचे काळे मांजराचे पिल्लू बरोबर आणले होते. ते त्याने माझ्या खांद्यावर ठेवले. टमेन चांगलेच उंच होते. त्या गर्दीत मी खांद्यावरील गुरगुरणा-या मांजराला सांभाळत त्यांना शोधत होते. आणि ते मांजर माझ्या डोळ्यासमोर त्यांची शेपटी फिरवित होते! मुले आमच्या भोवती कुतूहलाने बघत होते. मांजराला पाहून ते प्रसन्नपणे हसत होते. मोठे मोठे डोळे करुन बघत होते.

“तुम्हाला हवा होता तसा टाईपरायटर मला मिळाला आहे. मिसेस हॅंडरसन. आता मी माझा टायपिस्ट पाठवून देईन. तुम्ही तुमचे पुस्तकाचे काम पुरे करा. ”

“कुठे मिळाला तुम्हाला टाईपरायटर, ” मी एकदम चित्कारलेच.

चित्कारण्या सारखे काय झाले होते? माझ्या मावरी प्राथमिक वाचनमालेच्या साठ पुस्तकांच्या हस्तलेखनात मी खर्च केलेला वेळ व कष्ट याची कुणाला कल्पना येणच शक्य नाही. अकरा वाजेपर्यंत ट्रेमेन माझी पुस्तक माझ्या सोबत पहात बसले होते. आता हे काम पुढे होऊ शकणार होते. ते म्हणाले “हे खेडे आणि शाळा यात काहीतरी अनुबंध असायलाच हवा असे मला वाटत होते. मला वाटते ही गोष्ट तुमच्या पुस्तकामुळे चांगल्या त-हेने पुरी होऊ शकेल, कारण या खेड्यातील वातावरण या पुस्तकात अचूक उतरले आहे. ”

माझी ती छोटी छोटी पुस्तक त्यांच्या हातात पाहून मी सुखावले होते. अर्थात तिसरी आवृत्ती ही बरीच चांगली होती. त्यांनी नमुना म्हणून एक पुस्तक मागितले. पण मी त्यांना एक चांगली प्रत बनवून देण्याचे वचन देत ते त्यावेळी टाळले. चांगल्या प्रतीमुळे टायपिस्टचे काम सोपे होऊ शकेल. यापूर्वीही एकदा ते आपल्या सचिवांसह आले होते. तेव्हा त्या सचिवांनीही एक प्रत मागितली होती. पण श्री हॅंडरसन ही पुस्तक शाळेबाहेर नेऊ देत नाहीत असे सांगून हुषारीने मी त्यांना टाळले होते. यावर ते निरुत्तरच झाले. आता पुन्हा ट्रेमेन तिच मागणी करीत होते. पण मी ती पुरी केली नाहीच.

मी ही तिसरी आवृत्ती पुढे वाढवू शकत नाही. ट्रेमेनना सुध्दा मी सांगितले की यापुढे मी काही करुच शकत नाहीये. मी प्रत्येकाचा एक नमुना करु शकेन. पण त्याच्या अधिक प्रती नाही करु शकणार. मी आता थकले आहे. वय झाले आहे. शक्तीपात झालायं.

पण आता अचानक सर्व बदलले. ट्रेमेन स्वत:च छपाईचे काम बघणार आहेत. माझ्या पुस्तकातील चित्रांसाठी एका तरुण माणसालाही मी हेरले आहे. अभिनंदन ट्रेमेनसाहेब ! या पुस्तकांची मृत्यूशय्ये वरुन सुटका करण्याबद्दल अभिनंदन! मागच्या असंख्य वर्षातील प्रयोग, उत्साह आणि संशोधन हे सारे त्यात सामावलेल आहे.

ट्रेमेनना पाठविलेली टिपणी

"इहाका (मावरींसाठीची प्रथम वाचनमाला)पुस्तकात मी वापरलेल्या नामांविषयी माझे म्हणणे मांडायचे आहे. आपण पूर्ण वाक्यांचा वापर करुन विचार करतो. या श्री शॉनेल यांच्या मताशी सहमत होऊ शकत नाही. हा अपुरा विचार आहे. आपण वाक्यातून विचार करतो हे ठीक आहे पण आपण बघतो मात्र सुट्या सुट्या प्रतिमांमध्ये. त्या प्रतिमा तर एकेकेच असतात. विशेषत: मावरी मुले ज्या त-हेने बोलतात, त्याला मी एक शब्दाची भाषा म्हणते. पण एक मावरी दुस-या मावरीशी बोलतो. तेव्हा त्यांच्यासाठी ते पूर्ण वाक्यच असते. कारण मावरी हे मूलत: तरल मनाचे आहेत. प्रगल्भ प्रतिमासृष्टी बरोबरच त्यांच्या मनात कमालीचा बेबंदपणा असतो. त्यांाच्या मनातील प्रतिमा चित्र ते एखाद्या शब्दात मांडतात. व बाकी अर्थ देहबोलीतून पुरवतात. हावभाव, मुद्राभिनय, आवाजातील चढउतार आणि स्पर्श. एक मावरी दुस-या मावरीशी बोलतो, तेव्हा ते सहजगत्या पूर्णपणे त्याला समजते, कारण मावरींमध्ये समूह मन अजूनही विखंडीत झालेले नाही. समूह जीवनामुळे त्यांची संवादक्षमता किंवा सहअनुभूति (Sympathy) घेण्याची क्षमता जवळजवळ अंतर्ज्ञानाच्या (telepathy) पातळीपर्यंत पोचलेली असते.'शब्देवीण संवादु दुजेवीण अनुवादु' अशी त्यांच्या संवादाची अवस्था येते. जेव्हा दोन व्यक्ती एकमेंकांच्या इतक्या निकट असतात. तेव्हा शाब्दीक संवाद एकाक्षरीच उरतो.

मावरीभाषा अलंकारीक मानली जाते. पण तशा भाषेच्या फुलो-याचा उपयोग सभा समारंभातच होत असतो. जर एखादा मावरी मुलगा जोरात धावत धावत तुमच्या जवळ येऊन म्हणाला, "माणूस ! माणूस ! " तर त्याच्या आविर्भावा वरुन, उत्तेजित आवाजावरुनच तुम्हाला हे समजते की त्याला म्हणायचे आहे की "कुणी तरी अपरिचित व्यक्ती आली आहे. मी त्याला यापूर्वी कधी पाहिलेले नाही. कोण असेल तो. त्याला काय हवे असेल ? तुम्हाला हे समजल की मला सांगाच. मला खूपच उत्सुकता आहे. आणि नवीन व्यक्ती विषयी जाणण्याची हौसच आहे ! "

एकदा मी रिसीव्हर उचलला, मला टेलिफोन एक्सचेंजशी बोलायचे होते. चुकून मला दोन मावरी मधील संभाषण ऐकू येऊ आले.

पहिला माणूस - नांगर

दुसरा - नाही

आणि आवाजाचे चढउतार, निशब्दता आणि रिसिव्हर ठेवण्याचा आवाज यातून सर्व समजले.

ही नामे जी मी प्रथम वाचनमालेतील पुस्तकात घेतली आहेत ती एकाक्षरी वाक्यच आहेत. एका बौद्धीक वातावरणातून दुस-या बौद्धीक वातावरणात जाण्यासाठी ती आवश्यक आहेत. मावरी प्रवेशिका वाचणारे कुणीही मावरी मुल ही वाक्ये विशेषण वा नामाच्या पाचपट वेगाने आत्मसात करते आणि ही वाक्य जर त्याच्या रोजच्या भावजीवनातून निवडलेली असतील तर दसपट वेगाने ! या संज्ञाशी परिचय होता होताच अक्षरांशी व त्यांच्या उपयोगाशीही तो परिचित होतो. त्यामुळे पहिलीच्या पुस्तकांचा वापर करतांना त्याचा अनेक शब्दांच्या वाक्यांशी परिचय होतो. त्यातून तो अव्यये, क्रियापदे व समूहार्थक शब्द वापरण्यात तरबेज झालेला असतो.

म्हणूनच मला ही एका शब्दांची पुस्तकेच प्रथम हवी असतात. त्यांची निवड मात्र काळजीपूर्वक करावी लागते. खेड्यातील वातावरणाशी त्याला जोडण्याचा सुसंगत राखण्याचा प्रयत्न ही निवड करतांना करावा लागतो.

हे सर्व सहजभावाने मावरींना येते ... ... आणि मलाही. ”

ट्रेमेनच्या भेटीनंतरचे चिंतन

वाईविनी आमची संवेदन सम्राज्ञी, आमच्या टेबलापाशी आमचे हावभाव न्याहाळत सर्व वेळ उभी होती. मीही तिला तिचे काम करायला जा असे सांगितले नाही. माझे तिच्या आकलनशक्तीवर प्रेम आहे. ती जरी फक्त ६ वर्षांची असली तरी तिचा कोपरावर टेकलेल्या हातावर रेललेला चंहरा, आमच्याकडे देहभान हरपून आपले मोठे करडे डोळे विस्फारून पहाणे, सारे मला स्पष्ट दिसते आहे. ती तेथे का आली होती ते मी समजू शकत होते. तिला माझ्या भावनांचा थांग लागला होता. मावरींना भावनांचे कल्लोळ सहज उमजतात. तिला आमचे संभाषण म्हणजे शाब्दीक संवाद कदाचित कळलेही नसेल. पण माझ्या चेहे-यावरील भाव ती सहज समजू शकत होती. माझा आवाज, माझे हातवारे. सकाळी नऊ ते अकरा ती तेथे उभी होती. शेवटी तिच्या हाताला कळ लागली. पण मला खात्री आहे नेमून दिलेल्या अभ्यासापेक्षा ती यावेळेत खूप काही महत्त्वाचे शिकली होती. मावरी पुस्तकां विषयी असलेल्या माझ्या सर्व भावनांशी त्याच्या विविध छटांशी ती समरस झाली होती. मला ते जाणवत होते. मावरींच्या अंतरंगाची मला जाण आहे. आणि ते मी विसरू शकत नाही.

श्री. ट्रेमेन त्या टाईपरायटर विषयी उत्साहाने सांगत होते, “मला हे माझ्या एका मित्राकडून मिळाला आहे. मी खर तर त्याच्याकडे हा विकतच मागितला होता. पण तो त्याला एका मित्राने भेट दिलेला होता. तो मित्र आता हयात नसल्याने त्याची आठवण म्हणून असलेला हा टाईपरायटर त्याला विकायचा नव्हता.

माझ्या माहितीनुसार न्यूझीलंडमध्ये अशाप्रकारचा हा एकच टाईपरायटर असावा. तुम्हाला अशाच प्रकारचा टाईपरायटर हवा होतांना ? अर्थात हा त्यानी मला फक्त कामापुरता वापरण्यासाठी दिला आहे. ”

त्या टाईपरायटरवर टाईप केलेला एक नमुना त्यांनी माझ्या पुढे केला. तो पहात मी भावनिवश होत म्हणाले “मला तर आनंदाश्रू आवरत नाहीएत ! ” मग मी स्टोअररूममध्ये धावत जाऊन माझी हस्तलिखित पुस्तक आणली. पहिला गठ्ठा, दुसरा गठ्ठा आणि मग एका मागोमाग एक ती टेबलावर पसरली ढिगचढिग इतस्तत: पसरले आणि ते पहाता पहाता ट्रेमेनही भावनावश झाले आणि त्यांनी आपल्या तळहातांमध्ये आपला चेहरा दडवला.

मातोव्हेरो हा एक भावनातिरेकांने वागणारा मुलगा माझ्या सहाय्यिकेच्या उपस्थितीने बिथरल्यासारखा वागू लागला. सुरूवातीलाच आपली उपस्थिती जाणवून देण्यासाठी तो चढ्या सुरात बोलू लागला. मी मुलींना बास्केटबॉल शिकवण्यासाठी बाहेर मैदानावर गेलेली असतांना प्रकरण हातघाईवर आले. माताव्हेरोने गो-या जुळ्या मुलांपैकी गॉर्डनला ठोकून काढले. मी परतले तेव्हा गॉर्डन हुंदके देत रडत होता.

“काय झालें रे गॉर्डन ? ”

त्याला सर्व सांगायचे असूनही तो गप्प बसला. शेवटी त्याच्या भावाने सांगितल की त्याला माताव्हेरोने मारले.

मला याचे फारस आश्चर्य वाटल नाही. पण एका गौरेतर मुलाने गो-या मुलाला मारावे यामुळे माझ्यातील सुप्त रंगव्देषी गो-या मनाला वेदना झाल्या. माझा राग वाढू लागला. माझ्यातील या अंतर्गत प्रतिक्रियेचा अंदाज मला आल्यावर मी वरकरणी शांतता पाघरत एवढच म्हटलं “माताव्हेरो शाळा संपल्यावर तू घरी जाऊ नकोस. ”

“त्यानीच पहिल्यांदा माझ्या पोटात गुद्दा मारला,” माताव्हेरोने आपल्या समर्थनार्थ सबबी पुढे करायला सुरूवात केली. पण मला माहित होत गॉर्डन कुणा मुलाला तर काय कुठल्या निर्जीव वस्तूलाही गुद्दा मारणे शक्य नाही. मी माताव्हेरोकडे दुर्लक्ष करीत गॉर्डनला समजावण्याचा प्रयत्न करू लागले. माझ्या रागावर ताबा मिळवण्यासाठी मी हा प्रश्नच थोडा वेळ बाजूला ठेवून दिला.

त्यावेळी खोलीत मोठ्या मुलीही होत्या. काही सफाई करीत होत्या. काही पियानो वाजवित होत्या. काही विणत होत्या. कॉलीनही तेथेच होती. थोड्या वेळाने सर्व मुले बाहेर गेली तेव्हा माताव्हेरोलाही मी बाहेर जायला सांगितले.

त्याचे माझ्यावर खरे तर खूप प्रेम आहे पण याक्षणी मी त्याच्यावर खूपच नाराज आहे. हेही त्याला उपजले होते. तरीही त्यानंतर काय घडले ते सरळ सांगते. त्यावेळी त्याची प्रतिक्रिया अगदी खास मावरीं ढगाची होती. तिथे काही प्रेक्षकही हजर असल्याचे पाहूनही त्याला चेव आला असावा. कारण त्यांची उपस्थिती त्याला

आवडणारी होती. त्याने मुठी आवळल्या आणि आपले छोटे छोटे पाय आपटत तो तेथून बाहेर पडला. मी क्षणभर स्तब्ध झाले.

खरे तर त्याच्या दृष्टीकोनातून त्याच्या या कृतीचा अर्थ लावण्याचा एरवी मी प्रयत्न केला असता. तशी मी स्वत:ला सवयच लावून घेतली होती. पण यावेळी मात्र त्याच्या या कृतीने माझ्या आत खदखदत असलेल्या संतापाचा स्फोटच झाला. वरपांगी शांत आवाज काढत मी ज्याला धमकावले “माताव्हेरो फाजीलपणा करू नकोस. ”

पण त्याने माझ्या शांतस्वरा मागील संताप चटकन ओळखला. शब्दांपलीकडील भावनांची स्पंदने समजणे ही तर मावरींची खासियत आहे. तो दुखावला. त्याने अधिक जोरात पाय आपटले आणि आपल्या छोट्या मुठी वळून उंचावून दाखवल्या. अर्थात प्रेक्षकांची उपस्थिती त्याला चेतवत होती.

मलाही उपस्थितांची जाणीव होती. ती वेगळ्या अर्थाने. त्यांच्या समोर त्याने गैरशिस्त वर्तन करावे हे मला लागले. माझा पारा एकदम चढला. पण मला माझ्या स्वभावाची जाण असल्याने मी स्वत: त्याला स्पर्श केला नाही. त्याऐवजी मी त्याला श्री हेंडरसनकडे जायला सांगितले. शांतपणे त्याच्याकडे जाऊन मी त्याला हाताला धरले. पण त्याला घेऊन वर्गाबाहेर दोन पावले टाकताच त्याचा बंध तुटला व पायरीवर बसकण मारत त्याने रडायला सुरूवात केली. ही सर्वात वाईट गोष्ट होती. अचानक माझा राग विसरून मी त्याला म्हटले, “रडू नकोस माताव्हेरो, तू तर चांगला मुलगा आहेस ना ? तुझा रूमाल कुठे आहे ? ”

“आत आहे” असे म्हणून तो वर्गात पळाला तो बाहेर आलाच नाही ! शेवटी मी परत आत गेले व त्याला शोधत विचारले गेला कुठे हा मुलगा ?

माताव्हेंरो एका कोप-यात रूमाल शोधण्याचा बहाणा करीत वेळ काढत होता. “तो रूमाल शोधतोय” कुणीतरी म्हणाल. तोपर्यंत मला याची कल्पनाही आला नाही की बघणारी मुल माताव्हेरोच्या बाजूने असू शकतील. मी स्वत: त्याच्या पर्यंत गेले. मला कळत होत मी चुकतेय. आता माझ्या चुकीची शिक्षा मला भोगणे भागच होते. सगळ्यांसमोरच “तू घरी जा, ” असे मी माताव्हेरो फर्मावले. “आणि उद्या येऊ नकोस दुस-यावर हात उगारणारी मुल मला शाळेत नकोच आहेत. ” रागाने मी पुढे आणखी पुस्ती जोडली.

“मी नाही आत्ता जाणार. मी एमिलीची वाट पाहीन” परिस्थिती हाताबाहेर चाललीच होती. मी पवित्रा बदलला. स्वत: मी त्याला हातही लावला नाही. मी परत म्हणाले “ तुला आता हँडरसन साहेबांकडेच पाठविते माताव्हेरो. जरा हँडरसन साहेबांना बोलाव बर” मी वाईविनीला सांगितले. कुणाला काय काम सांगितल पहा ! ती गोगलगायीच्या गतीने बोटांशी चाळा करीत करीत वर्गाबाहेर गेली. मी माताव्हेरोचा जर्सीची कॉलर पाठीमागून

पकडली व त्याला वर्गाबाहेर नेऊ लागले. पाय-या उतरून पाय वाटेने मुख्य इमारतीकडे जाऊ लागले. माताव्हेरोचा निषेधात्मक आक्रोश सुरूच होता. "मी नाही जाणार ! मी एमिलीची वाट पहात थांबेन ! "

.हिरवळीच्या पलिकडे गेल्यावर मात्र तो थांबला. मी त्याला अद्यापही पकडून ठेवले होते. के अद्याप का आले नाहीत ? मला आता या नाट्याला उबग येऊ लागला होता. तेवढ्यात पावसाची सर आली. पण मी माताव्हेरोला सोडले नाही. मग अचानक माताव्हेरोने आपला हट्ट सोडून दिला व तो घरी जायला तयार असल्याचे सांगू लागला.

मी कें ना बोलावण्यासाठी कुणी दुसरा माणूस शोधू लागले. माताव्हेरोच्या प्रेमामुळे वाईविनी ऑफिसचा रस्ताच विसरली ! मला गॉर्डन दिसला. त्याच्या शिवाय या कामासाठी अधिक उत्साही स्वयंसेवक कोण मिळाला असता ? "गॉर्डन हॅंडसन साहंबांना मी बोलावलय म्हणून सांग तर. " गॉर्डन अत्यंत आवडीने व वेगाने कामावर निघाला.

पावसाचा जोर आता वाढला होता. बालवाडीच्या अंगणात दर्शकांची गर्दी वाढली होती. त्यातच कॉलीन पण उभी होती.  गेले तीन दिवस ती माझ्याकडे आदर्श शिक्षिका म्हणून पहात होती! मुख्य इमारतींच्या पाय-यावर, सावलीत मुल उभी होती. पण मी अजूनही माताव्हेरोला पकडून ठेवले होते. शेवटी के आले. "तुम्ही या मुलाशी बोलाव अशी माझी विनंती आहे तो खूपच व्रात्य आणि उद्धटपणे वागतोय आज " मी म्हणाले. आणि माताव्हेरोला त्यांच्या हवाली केले.

हे लिहिण खूपच वेदनादायी आहे. आणि ते एकदाच लिहून संपले याचा मला किती आनंद वाटतोय. मला खरंच ते सारे लाजिरवाणे वाटतेय. मला समजतय मी कुठे चुकले होते. माझा तोल गेला आणि ... ...

---

माध्यमिक शाळेच्या ऑपेराच्या कार्यक्रमासाठी मी दोन दिवसांपासून गिसबोर्नमध्ये आहे. मी घराबाहेर असतांना मेरीयन आणि रांगी घरी गेल्या आणि त्यांनी पुढच्या अंगणापासून मागच्या परसापर्यंत सर्व काही झाडून पुसून लख्ख केले. बाथरूम, स्वैपाकघर धुतले. सर्व अगदी नव्यासारखे झाले. अगदी माझे ते नामांकित ड्रेसिंग टेबल सुद्धा त्यांनी आवरले. मुलांच्या खोल्या-ज्यातील पसा-याची व्याख्याच करता येणार नाही अशी अवस्था होती-त्याही नीट नेटक्या केल्या होत्या.

पुन्हा माताव्हेरो विषयी थोडस. डी. एच. लॉरेन्स यांनी म्हटल होत. "जर एखादे मूल तुम्हाला त्रास देत असेल तर त्याला चांगल बदडून काढा. जोरात हे हितांचे आहे आपल्या अशा प्रकारच्या वागण्याने इतरांना त्रास होतो. हे त्यांना यातून समजेल. " अर्थात डी. एच. लॉरेन्संना स्वतःला मुले नव्हती. त्यामुळेच कदाचित ते या विषयावर  अधिक सुस्पष्टपणे बोलू शकले असतील. आपण आपल्या मुलांमध्ये अगदी खोलवर गुंतलेले असतो.

एक मेंदू तज्ञ म्हणाला होता. “ही दोन वर्षाची पोर जगात आल्यावर आपला भार अन्य कुणावर टाकू लागली तर त्यांना तडाखा दिलाच पाहिजे याशिवाय अन्य गोष्टी आणखी इतर समस्याच तयार करते. शिवाय योग्यवेळी मिळालेला मार आणि त्याचे कारण याची जुळणीही तो करू शकतो. ” माझ्या स्वतःच्या मुलांबाबत मला हाच अनुभव होता. त्यांना फटकावल्या शिवाय त्यांच्याकडून काहीही करता येणे शक्य नव्हते.

तथापि ... अजूनही मला असेच वाटते की माझ्या इतकाच माताव्हेरोलाही राग येण्याचा हक्क होताच. मी सुद्धा बाह्य नियंत्रणाशिवाय मुक्तपणे जगण्याची शैलीच नेहमी पुरस्कारली होती. इथेही आणि ऐन कसोटीच्याच क्षणी मी ती नाकारली का ? अहंकार.

शी ! किती लाजिरवाणी गोष्ट आहे ही ! आश्चर्य म्हणजे या नंतरही मला झोप आली. कदाचित या प्रकरणाची मी दोनदा सविस्तर चर्चा केली म्हणूनच असेल. एकदा केंशी व नंतर टॉमशी.

मुलींमध्ये काम करतांना मला खट्टू चेहरे, बदलत्या लहरी, चढते सूर आणि वेळोवेळी वहाणारे अश्रू यातून वाट काढतांना काय काय सोसावे लागते. याची कुणाला कल्पनाच करता येणे शक्य नाही. आणि हेच मुलांबरोबर काम करतांनाही होते. मुलांच्या वर्तनाचे मूल्यमापन तुम्ही कशा पद्धतीने करता यावरच सारे अवलंबून असते. युरोपियतांच्या दृष्टीकोनातून पाहिले तर हे भयानकच वाटेल. मावरींच्या मानदंडावर तपासले तर हे सहज सामान्य वर्तन वाटेल. बास्केटबॉलच्या मैदानावर :

“श्रीमती  न मी पाऊलेट बरोबर जागांची अदलाबदल करू ? ”

“नाही”

सुरु रडणे !

कुणीतरी कुणाला तरी “हेलन, तू लबाड आहेस. ” अश्रू ! शिवाय खट्टू चेहरा घेऊन उर्वरित वेळ खेळण.
“श्रीमती हॅंडरसन मला सेंटरला खेळून कंटाळा आलाय मला गोल जवळ खेळायच. ”
“मध्येच जागा बदलता येणार नाही. त्या जागी  खेळण्याचा सराव व्हायला हवा. अजूनही तुझे पाय जागी स्थिर नसतात. ”

संताप ! माना उडवून फणकारा व्यक्त करण. त्यावेळी इतरांच्या नजरेत तिच्याविषयी दिसणारी सहानुभूती! .

उपाय

मी कें शी या सदैव फुरगंटणा-या मुलींवर काय उपाय करावा याबाबत बोलले. ते म्हणाले “त्यांना तत्काळ बाहेर काढ. तिच्या जागी बदली खेळाडू घेऊन तिच्याकडे पूर्व दुर्लक्ष कर. ”

"मिसेस हेन्सन मी रांगी बरोबर जागा बदलू ? "

"नाही"

अश्रू !संताप !!

"चल, लागलीच बाहेर हो बर. "

"नको, नको मी खेळते याच जागेवर. "

किती सोप्पा उपाय !

पण मी कधीही 'रडू नकोस' म्हणून समजावत नाही. रडण्या विषयी माझी काहीच तक्रार नसते. मला अश्रू समजतात. आवडतातही. पण वेडावाकडा चेहरा करून खेळून इतरांचाही रसभंग करणे मला खपत नाही. अश्रू वाहू द्या. ते ठिक आहे. वेळ पडली तर तुमच्यासाठी माझेही डोळे पाझरतील.

मी माझी मावरी प्रवेशिकेच्या पुस्तकाची साठ पान ट्रेमेनना पाठविली. आता लहान मुलांसाठी खास मोठ्या टाईपमध्ये ते ही पुस्तके टाईप करतील. ही पान टाईप करून माझ्याकडे परत आली. तेव्हा मी अगदी हर्षभरीत झाले.

पहिल्या प्रतीवर छापलेल्या शब्दांवर मी चित्र काढते. चित्राच्या बाह्य रेषा काढून मी माझ्या सहाय्यिकेकडे देते. प्रत्येक पानाच्या सहा प्रती काढल्या जात आहेत. कॉलीन ती उर्वरित पाच प्रतींवर गिरवते. त्यात रंग भरते. तिचे काम अत्यंत टापटीपीचे असते. आमचे काम धीम्यागतीने सुरू असतें. रोजच्या जीवनातही चमत्कार घडू शकतात असे मला नेहमीच वाटत आले. खर तर अशा चमत्कारांची मी अपेक्षा करीतच असते.

एक दिवशी अचानक शिक्षण मंडळीचे काही सदस्य भेटी दाखल आले.

"आपल्या सगळ्याचं मन:पूर्वक स्वागत, "

मी तर अनपेक्षितपणे घडणा-या सर्व घटनांचे अगदी स्वागतच करते.

"या दिशेला आल्यावर तुम्हाला भेटल्याशिवाय जाणे कसे शक्य होते ? "

"या निमित्ताने परिचय वाढेल. "

मेरिऑन पियानोवर 'बिग इनफ फॉर टू' ही धून वाजवत होती. मुले चित्र काढण्यात दंग होती. धून कानी पडताच ती जोशात गायला लागली.

अचानक मी पाहूण्यांना विचारले.

"तुम्ही हूला नृत्य पाहू इच्छिता का ? "

"अरे वा! आवडेलच की! "

मी पियानोच्या दिशेने धावले. आता मदतनीस मिळाल्यापासून सर्व दिशांना धावण्याची माझी गती वाढली आहे. मी पियानोवर बसले आणि मुलांचा उत्साह वाढविण्यासाठी दोन गाणी वाजवली. If I knew you are coming I'd have baked a cake मुले बसल्या जागेवरून गाण्यात सामिल होऊ लागली. मग मी 'हुला'नृत्याची धून वाजवायला सुरूवात केली. Just a little Hula Hula ha hey ! धून छेडताच ते सर्व तिथे खेचले गेले. काहींनी टाळ्यांचा ताल धरला, काहींनी गाण म्हणायला सुरूवात केली, तर काही त्या ठेक्यावर नाचू लागले. जेनीच्या हातांची हालचाल तुम्ही पहायला हवी होती. आणि मेकरच्या गब्दुल शरीराची लय, रेरेमोनाची भिरभिरणारे डोळे ! पण खरी नायिका तर अजून दिसतच नाही. वाईविनी. कुठे आहे ती? एखाद्या अस्सल कलावंताप्रमाणे ती तिची कमतरता जाणवून देऊन मगच प्रकट होणार अस दिसतय ! "वाईविनी, " मी आवाज दिला. आणि मग वाईविनी लयबद्ध पावल टाकत हूला नृत्यात सहभागी झाली. हळूहळू कंबर लचकवत, हातांनी ताल देत ती मुलांच्या कड्याच्या मधोमध येऊन स्थिरावली. सर्वच जण धुंद होत त्या छोट्या कड्यात बांधले गेले.

ते परतल्यावर माझ्या मनात आले खरेच मी केले ते बरोबर होते की नाही? ते शिक्षण मंडळीचे सदस्य होते त्यांना हुला नृत्य दाखविणे योग्य म्हणावे की नाही ?

पण माझा हाच तर सिद्धांत आहे आधी कृती करा मग त्यावर विचार करा !

बुधवारी ट्वायफोर्डशी आमची बास्केट बॉलचा सामना आहे. सर्व मुली आपापले ब्लेझर पूर्ण करण्यात गुंतल्या आहेत. खिशावर भरतकाम सुरू आहे. स्वेटरचे काम पूर्ण झालेही. बारा वर्षाच्या इतिहासात प्रथमच मी टीम बरोबर बाहेर चालले आहे. मला जायची इच्छा आहे. शेवटी मी या तीन टीमना शिकवले आहे ते काय उगीच? मला हा सामना बघायचाच आहे. त्यांच्या हातून होणा-या चुका पहायच्या होत्या. त्या पाहूनच पुढच्या शुक्रवारी उत्तर हॅवलॉकशी होणा-या सामन्याचे वेळी त्यांच्यात सुधारणा करणे शक्य होईल. बरीच धूर्त होत चाललेय की मी! कल्पना करा मी आता बास्केट बॉलच्या दृष्टीकोनातून विचार करायला लागलेच !

पॉली - "हॅंडरसनताई तुम्ही किती वर्षाच्या आहात? "

"का ? "

"आज माझी कोड तयार करायची पाळी आहे. तुमच्या या माहितीचा मी एका प्रश्नासाठी वापर करीन "

माताव्हेरो हा शाळा समितीच्या अध्यक्षांचा नातू आहे. त्यांची उपस्थिती माझ्या स्त्री मनाला देखील स्पर्श करून गेली. मी आजवर पाहिलेल्या सर्व पुरूषांपेक्षा ते अधिक उंच तगडे होते. माताव्हेरो हा त्यांच्यापुढे एवढूसा दिसत होता. पण एक साम्य होत दोघात. दोघेही बेधडक खोटे बोलण्यात पटाईत होते!

पण मला खोट बोलण आवडत. त्यात कल्पना शक्तीचा वापर असतो. सहज ओळखता येणारी तीच ती कंटाळवाणी रोजची परिस्थिती त्यात नसते.

माताव्हेरोशी झालेल्या चकमकीनंतर दुस-या दिवशी तो शाळेच्या प्रवेव्दारापाशी आलेला मी पाहिला. थोडावेळ घुटमळून तो परत घरी गेला.खरे तर रूसलेल्या मुलांच्या मागे न धावण्याचा माझा नियम आहे. परंतु काही झाल तरी माताव्हेरो हा शाळेच्या अध्यक्षांचा नातू आहे हे मी विसरू शकत नव्हते. शिवाय त्याच्या विषयी मलाही आस्था होती म्हणून..

त्यादिवशी संध्याकाळी मी माताव्हेरोला घराकडे जातांना पाहिले होते. आपले रबरी बूट घालून उड्या मारत तो चालला होता. मी मागून त्याला पुकारले, “माताव्हेरो उद्या शाळेत ये. तू चांगला मुलगा आहेस ना ? ”

त्याने मागे वळून पाहिले त्रयस्थपणे माझ्याकडे पाहिले. त्यावेळी मी त्याला एखादी जख्ख म्हातारी चेटकीण वाटत असणार. मी परत म्हणाले, “येरे बाबा परत,”पण माझ्या स्वरातला आत्मविश्वास डळमळला होता.

काही वेळ त्याने तिथेच थांबून विचार केला आणि मग तो घराकडे निघून गेला.

नंतर मी शाळेत पोचले. आणि थोड्याच वेळात एखाद्या वळू सारखे डुरकत अध्यक्ष तीथे आले आणि म्हणाले, “मी शहरात निघालो होतो. तर मला माताव्हेरो भेटला. तो घरी निघाला होता. तो म्हणाला त्याला कुणीतरी फारच रागावल. मिसेस हँडरसननी त्याला शाळेत परत येऊ नको म्हणून सांगितलय असही तो म्हणाला. ”

“ही फक्त एका बाल मनाने रचलेला गोष्ट आहे. ” शांतीदूत के म्हणाले. “मिसेस हँडरसन असे काहीही म्हणाल्या नाहीत. ”

“मला मात्र त्यानी अस सांगितल ! मी अगदी बसमध्ये चढतच होतो तेव्हा मला तो भेटला. ”

“पीटर अरे तो एक लहानसा मुलगा आहे. तू त्याचा शब्द न शब्द खरा मानणार आहेस का ? ”

“तो म्हणाला त्याला काल खूप बोलण खावी लागली. ”

“हो, त्याला काल बोलणी खावी लागली खरी! तो आपल्या वर्गात शिक्षकांशी खूपच उद्धटपणे वागत होता. मीच तर रागावलो त्याला. ”

थोड्या वेळाने मुलांनी सांगितल पीटर दरवाजापाशी उभे आहेत.

मी त्यांना आत बोलावले. पण ते आले नाहीत. फक्त निरोप पाठवला की ते मिसेस हँडरसनना भेटू इच्छितात. मी उठले लाकडी ठोकळ्यांची घरे बनवण्याचा मुलांकडे एक नजर टाकली. त्यांची अस्वस्थता पाहून मी हादरलेच. भरभक्कम देह पण कमजोर हृदय. त्यांनी माताव्हेरोचा डबा आणला होता ते म्हणाले “मी माताव्हेरोला भेटू इच्छितो. ” अगदी खर्जातला आवाज.

“हा काय इथेच तर आहे तो. ”

मला आश्चर्य वाटले त्यांनी सरळ माताव्हेरोलाच का नाही बोलावल. ते अजून माझ्याकडे पहात होते.

“मी बोलावते त्याला”

मी त्यांना तेथेच सोडून माताव्हेरोला बोलवायला गेले.

त्या रात्री मी त्यांचा दु:खी कष्टी पाहून मी कशीबशी झोपले. त्यांची पत्नी वारलेली होती.

त्यानंतर ब-याच दिवसांनी एका रात्री ब-याच उशीरा पीटर माझ्या दिवाणखान्यात ते बसून होते. ही तशी खास मावरींची सवय त्यांच्यात दिसत होती. शुष्क स्वरात ते म्हणाले “मी जरा उशीराच आलोय”

“ जाऊ द्या. तुम्ही सकाळी उशीरा पर्यंत झोपू शकाल”

“नाही. मी नाही झोपू शकणार.”

“नाही ? का ?”

“मला माझ्या नातवाचा नाश्ता तयार करावा लागतो.”

“माताव्हेरोचा ? का ? त्याचे आईवडील काय करतात ! ”

“त्याला माझ्याच हातचा टोस्ट आवडतो. त्याच्या आईला माझ्या सारखा जमत नाही असे त्याचे म्हणणे असते. ”

काही दिवसांनी गुरगुरणे हा शब्द नव्याने आलेल्या मुलांच्या शब्द संग्रहात समाविष्ट झाला. अर्थातच मावरी पुस्तकात. कटाळवाण्या नीरस सामान्य व्दिमितीच्या इंग्रजी पुस्तकांच्या जगात हा शब्द कुठुन येणार ? मावरींना मात्र एका नजरेत त्याचा अर्थ उमगतो.

आज काहू आमच्या निमंत्रणावरून शाळेत आला होता. शाळेतल्या मुलांना ‘वाई आता’ हे माओरी गाणे आणि ‘हाका’ नृत्य शिकवायला. पुढच्या आठवड्यात उत्तर हॅवलॉकच्या भेटीसाठी हे गाणे व नृत्य हवे होते. तो अद्ययावत कपडे घालून बरोबर २.३० ला शाळेत आला. मी त्यांच्या सरावाचे वेळी तेथेच थांबले. मी काही नेहेमी थांबत नाही. त्याच्या गाण्यात एक झिंग असते. ती मला सहन होत नाही. पण आज कॉलीन बालवाडी सांभाळत असल्याने मी मोकळी होते. त्यातून मला पुढील गोष्ट समजल्या. गाणे गातांना ते जी धीमी लय सांभाळतात त्याचे कारण त्यांना नव्या गाण्याविषयी असलेले आकर्षण एवढेच नव्हते. गाण्याची नशा हेही होते. ही नशा खूपच सुखद असते. त्याच त्या ओळींची पुनरारूक्ती, त्याची साधी लय, आणि जोडीला मावरींचा तो विशेष कंठ स्वर, मीही ते ऐकून झिंगून गेले. काहू त्याची गिटार वाजवतोय. ते सर्व दृष्य म्हणजे मावरींच्या समूह मनाचा जिवंत आविष्कार होता. ते जणू त्यांचे हृदय होते आणि गिटार ही त्यांच्या हृदयाची सरगम.

खरेतर मी मुद्दाम गाणे शिकायला आले होते. म्हणजे काहू नसेल तेव्हा मी त्यांची गाण्याची तालीम घेऊ शकेन. पण तिथे थांबल्यावर मला माझ्या कल्पनेतील वैय्यर्थ कळले. काहू जे त्यांच्या मधून निर्माण करू शकतो. तसे संगीत मी कधीच निर्माण करू शकणार नाही.

मी मावरी नाहीए.

आता मला परत तालमीला जाण्याची गरज नाही.

वाचनमाला पुस्तक एक.

फेब्रुवारीत प्रवेश घेतलेल्यांची प्रगती.

| | |
|---|---|
| हॅरी - ( बहुतेक वेळी गैरहजर ) | ३ शब्द |
| पॅची - ( हा कानाने ऐकू शकत नसल्याचे आम्हाला आता कळले आहे ) | १२ शब्द |
| क्लॉसम ( दीर्घ बाल्यावस्था ) | १० शब्द |
| विकी ( मंद बुद्धी ) | १२ शब्द |
| मार्क ( युरोपिअन चांगली देखीभाल ) | ४६ शब्द |
| टेम ( बुद्धीमान माओरी ) | ६८ शब्द |

युरोपिअन मुलांना इंग्रजी पुस्तके व मावरी मुलांना इकाहा मावरी पुस्तके वापरून शिकवायचे मी ठरविले आहे. यामुळे वर्गातील पुस्तकांची संख्या दुप्पट होते. पण त्याला इलाज नाही. गो-या मुलांना गो-यांचीच पुस्तके आवडतात. व सावळ्या मुलांना त्यांची सावळी पुस्तक आवडतात. ते तसे स्पष्ट सांगतातही. अर्थात त्याशिवायही अनेक गोष्टीतून हे स्पष्ट दिसतच असते.

मला वाटत त्याच्या हाती प्रत्यक्ष पुस्तक देण्यापूर्वी त्यांची शब्द संख्या झपाट्याने वाढली पाहिजे. पानांचा स्पर्श, ती पलटतांना होणारा आनंद, चित्रांचा उलगडणारा आनंद यातून वाचनाचे प्रोत्साहन मिळते. मी पहिले इकाहा पुस्तक त्या सावळ्या मुलांच्या हाती दिले. आतापर्यंत ते तयारच नव्हते. आता त्यांची गती वाढेल अशी माझी अपेक्षा आहे. पूर्वी पेक्षा तरी जास्त गती होईल.

गो-या मार्कच्या हाती पहिल्यापासून गोरी पुस्तके न देण्याबद्दल मला आता खेद होतोय.

बास्केटबॉलचा अ संघ बालवाडीत स्वस्थ शांतपणे बसला आहे. का ?

“माफ करा मला हेलेनला शिक्षा करणे भागच आहे. ” मी म्हणाले . हेलेन ही अत्यंत तोंडाळ व अहंकारी मुलगी आहे. माझे बोलणे ऐकताच ती एकदम मागे सरकली. तिचा चेहरा लाल झाला. “ट्वायफोर्डला तीने केलेले निषीद्ध वर्तन लक्षात घेता हे अटळ आहे. तिचा चिडकेपणा व बेशिस्त. तिच्या चिडक्या स्वभावामुळे तुम्ही खेळाच्या

उत्तरार्धात एकही गोल करू शकला नाहीत. आपण जवळ जवळ हरण्याच्या स्थितीत होतो. जेव्हा आपण अस्वस्थ होतो तेव्हा मुलीच काय आपण सगळेच रडतो.  तुम्ही खेळतांना स्वतःची जागा विसरू शकता. हेही ठिक आहे. तुम्ही पुन्हा सरावाने ते शिकू शकता. पण चिडणे, हट्टीपणा करणे, तोंड फुगवून बसणे हे चालवून घेणे अशक्य आहे ! तुला हॅवलॉक विरूद्धच्या सामन्यातून वगळण्यात येईल. तुला टिमच्या कायमचे बाहेर घालवण शक्य होते. पण एरवी तू चांगली वागत आली आहेस. मला अनेकदा खूप मदतही केलेली आहेस. तशी तू चांगली मुलगी आहेस. त्याला स्मरून मी तुला आणखी एक संधी देऊ इच्छिते. तू यानंतर होणा-या पाकी-वाकी विरूद्धच्या सामन्यात खेळू शकशील. मात्र त्याही सामन्यात मी तुझ्या वर्तनावर लक्ष ठेवीनच. ”

मी यापूर्वी खूपच अस्वस्थ होते. मला वाटले हेलन फटकळपणे माझ्यावर तोंडसुख घेईल. प्रतिस्पर्ध्याकडून जराही प्रतिकार न होण्याची मी कल्पना केलेली नव्हती.

‘बी’ टीमला मी बॉस्केट बॉल शिकवत होते. अचानक जेन हॅमंड खेळायची थांबली. तिची लय साधत नव्हती म्हणून ती वारंवार अडखळत होती. तिच्या सारख्या मुलींना आपल्याच हातून सर्वोत्तम कामगिरी व्हावी असे वाटत असते. आधी मी तिच्याकडे दुर्लक्ष केले. तिच्या त्रासिक आविर्भावाकडे कानाडोळा केला. मला वाटले काही वेळाने ती पूर्ववत होईल, व माझ्या समोरील एक कटू प्रसंग टळेल. पण लिलि ओरडली. “जेन, तू खेळतच नाहीएस ! ” मग मला शिट्टी वाजवून खेळ थांबवणे भागच पडले.

“जेन थांबव खेळ आणि बाहेर ये मला अशी त्रासिक मुद्रा चालणार नाही. ”

जेन हलली सुद्धा नाही. तिथेच उभी राहून ती जोरजोराने किंचाळू लागली. वेड्यासारखी रडू लागली. लिलीला लाखोली वहात ती म्हणाली. “तू माझ्याशी अस वागायला, बोलायला नको होत. माझ्याशी अशा स्वरात बोलतेस तू ! ही काय पद्धत आहे बोलायची ? ” ही खेड्यातील भांडणाची सही सही नकल होती ! लिली खरे तर काही बोललीच नव्हती. जेन खेळत नाहीए हे तिच वाक्य म्हणजे तिचे निरिक्षण मात्र होते. तक्रार नव्हती.

“आत जा जेन, तू खेळत नाहीएस. आणि मला अशी चिडकी मुलगी नकोय. ”

जेन हॅमंडने हलली नाही. अधिक मोठ्याने रडणे चालूच.

“आत जा. ”

जेन तरीही आक्रमक मुद्रेने उभीच !

“लोटस हॅंडरसन साहेबांना बोलाव बर. ”

हॅंडरसन जेव्हा पाय-या उतरून आमच्यात आले तेव्हा अश्रूंचा आणि आरोपांचा पूर परमोच्च बिंदूवर पोचला होता.

“हँडरसन ही मुलगी तोड फुगवून उभी आहे. ”

“लिली तू मला अस बोलायला नको होतस. ही काय माझ्याशी बोलायची पद्धत झाली? ”

“आत जा” हँडरसन म्हणाले.

जेनने पहिल्यादाच आपल्या मनाविरूद्ध जाणारी गोष्ट स्विकारली. ती आत गेली आम्ही पूर्ववत खेळू लागलो.

“विणकाम करणा-यांनी हात वर करा. ” मी हँडरसनच्या मोठ्या वर्गात जाऊन विचारल.

काही हातवर झाले. काहींना भविष्यातील संकटाची चाहूल लागली. त्यांनी हातवर केलेच नाहीत. अगदीच खर सांगायच तर हॅमंड मुलींनी.

“तूझं विणकाम कुठे आहे विनी ? ”

“ घरी राहयलं” विनी. ”

“तुझ जेन ? ”

“ घरी राहयलच, हँडरसनताई. ”

रोंडाने आमच्याकडे दुर्लक्ष करीत एक पुस्तक उचलून वाचायला सुरूवात केली.

“हँडरसनताई बोलत असतांना वाचू नकोस” के हँडरसनने तिला बजावले. त्यांनी तिला बाहेर बोलावून चांगले झापले. तिने ते शांतपणे ऐकले. मावरी तसे टणक असतात. शिवाय बोलणी खायला ते सरावलेले असतात. मोठ्यांचे रागावणे, ऐकणे हा त्यांच्या शिष्टाचाराचाच भाग असतो. मी त्यांना झाडणे चालूच ठेवले. माझी सर्दी वाढली होती. आणि त्यामुळेही मी चिडचिडी झाले होते.

“हेलन, तुझ विणकाम कुठे आहे. ”

“मी ना बाहेर मैदानावर विणत होते तेव्हा काही मुले पळत पळत येऊन माझ्यावर धडकले. त्यात माझी विणकामाची सुईच मोडली” -हेलेन.

“कुठे आहे ती सुई. ”

“धरी आहे हँडरसनताई. ”

“रॅचेल तुझे विणकाम कुठे आहे ? तू हात वर केला नव्हतास. ” हळूहळू आणखी हात वर झाले.

“कुठे आहे ? ”

“ घरी आहे ? ”

“तुझे विणकाम कुठे आहे नेहा ? ”

“शाळेत आहे हॅंडरसनताई. ”

मी शेजारी उभ्या असलेल्या हॅंडरसन साहेबांकडे वळले. पती म्हणून नव्हे तर शाळेचे मुख्याध्यापक म्हणून.

“हॅंडरसनसाहेब या मुलींना माहित आहे की दुपारी विणकामाचा तास असतो. पण त्या क्वचितच वर्गात येतात. आणि आल्यातरी विणकाम आणतच नाहीत. त्यांनी मे महिन्याच्या सुट्टीपूर्वी विणकामाला सुरूवात केलीय आणि अजून पुरचं होतय ! तुम्ही या सर्व मुलींशी बोलाव अस मला वाटतय. ”

“जरूर. जरूर बोलेन मी या सर्वांशी. ” मग सगळ्यांची नावे लिहिली गेली.

माझा पारा चढू लागलाय याची मला जाणिव झाली. मी सावधपणे लक्षणे बघू लागले. मी खोलीत नजर फिरवली. “लोकर पुरवली आहे. सुया दिल्यात, वेळ ठरलीय. मार्गदर्शनाला शिक्षक आहेत. आणि तरीही तुमच विणकाम पुरं होत नाही ? एकाही मुलीने स्वेटर पूर्ण केला नाहीय. ” मी त्यांना सर्वात अधिक बोचणारा शब्द शोधत म्हणाले. “तुम्ही सर्व जण मूर्ख आहात ? ”

माझी मनोवस्था आता पूर्णपणे नियंत्रणाबाहेर चालली होती. मी स्वतःला काहीही करून सावरू इच्छित होते.

“विणकाम शुक्रवारपर्यत पूर्ण व्हायलाच हव. नाही तर मुख्याध्यापकांसमोर उभ करण्यापलिकडील कारवाई करावी लागेल. ” पण यावेळपर्यंत माझ्या आवाजाला कंप सुटला होता. माझा स्वतःवरील ताबा सुटत चालला होता. म्हणून मग मीच तेथून निघून गेले.

शुक्रवारी हॅवलॉकशी ‘बी’ टीमचा सामना होता. त्याचा सराव घेण्यासाठी मी जाणार होते. पण झाल्या घटनांनी मी इतकी विचलित झाले होते की काहीही न करता मी सरळ घरीच गेले. घरी गेल्यावर कशात तरी मन रमवाव म्हणून कपाटातून माझ्या आवडीचा खाऊ शोधला. आणि आहारतज्ज्ञांचा सल्ला धुडकावत सर्व खाऊ संपवला ! चहा केला ! ‘मावरी’ मी स्वतःशीच पुटपुटले. त्या पुटपुटण्यात वंशभेदाचा पूर्वग्रहाचा सर्व विखार सामावलेला होता. इतरांमधील हा पूर्वग्रह जावा यासाठी मी आजवर संघर्ष करीत आले होते !

पण केकची चव अप्रतिम होती. आणि कटलेटही .शिवाय मलईयुक्त चहा वा! अमृतच जणू !

बिचारे मावरी !

दुस-या दिवशी मी केंशी बोलले. नवरा म्हणून नव्हे, मुख्याध्यापक म्हणून. अजून दोन मुलीनी विणकाम केलेले नव्हते. पण त्यांनी चतुराईने हात वरच केले नाही. जेन आणि क्रिस्टल हॅमंड !

त्यादिवशी मी शाळेत गेलेच नाही. शिशुवर्ग कॉलीन वर सोपवला. मुख्याध्यापक जेव्हा सायंकाळी घरी परतले तेव्हा म्हणाले आज शाळेत सर्वत्र विणकामच विणकाम सुरू होते !

खरच के किती विलक्षण मुख्याध्यापक आहते! हे सर्व काल्पनिक वाटू श ाकेल पण हे सत्य आहे. माझ्या डायरीतला उताराच आहे हा. हे कथन करतांना मला वेदना होत होत्या. पण तरीही हे सांगितलेच पाहिजे.

आज सकाळी मी कॅप्टन मॅरिऑनला बोलावले.

“मॅरिऑन मी तुझ्या टिममधल्या मुलींना शुक्रवार पर्यंत स्वेटर विणून ठेवायला सांगितल होत. पण ते इतक्या लौकर त्यांना जमेल असे मला वाटत नाही. डेलाला पुढच्या बुधवारपर्यंत स्वेटरसाठी वेळ मिळेल अस सांग. जेन तर विणकामात इतकी मागे आहे की तिला काम पूर्ण करायला पुढच्या आठवड्यातला शुक्रवार तरी उजाडेलच. तिलाही तेवढा वेळ दिलाय म्हणून सांग. ”

मुख्याध्यापकांपुढे उभे करण्यापलिकडील कारवाई बहुधा हीच असावी !

मी माझ्या या कृतीने प्रसन्न झाले.

पण किती विलक्षण आहेत ही मुलं. नाहीतर काय मी उगाच त्यांच्या विषयी इतका विचार करीत बसले असते? आज काहू अगदी वेळेवर आला होता. त्याने साभिनय गीतांची तालीम घेतली. हॅवलॉकच्या उद्याच्या भेटीत ही गाणी म्हणायची होती. आता या गाण्यांनी चांगला आकार घेतलाय. इतके सुंदर कंठ आणि इतके उत्कृ ष्ठ शिक्षक. मी आजवर पाहिलेच नव्हते. मोठ्या मुलांची गाणी दिवसेंदिवस प्रभावी बनत आहेत. डेलाचे ‘हॅरी लाईम थीम, ’ पॉलीच ‘अम्ब्रेला मॅन’ जॉर्ज ‘ट्वायलाईट’ गीत ऐकायला हव तुम्ही. आणि याच वेळी विणकामपण जोरात सुरू आहे. सुरेख पिवळ्या रंगाचे स्वेटर्स. बी टीमला मी लिहिलेल्या पत्राचे त्यांनी उत्तर दिले नाही पण हिवाळी गणवेश घातलेल्या मुलांची संख्या मात्र वाढताना दिसते आहे.

*ताजी बातमी. छापता छापता*

काल हॅवलॉकची टीम इथे अवतरली. त्याच त्यावेळी लॉपडेल व ट्रेमेन हे न्युझीलँडमधील माध्यमिक शाळांचे वरीष्ठ तपासनीस शाळेत आले. त्यांना माझी माओरी पुस्तके पहायची होती. त्यांच्या बरोबर मी सायंकाळ पर्यंत होते. त्याच वेळी पिवळे स्वेटर्स व नव्या रंगसंगातीचे कपडे घालून माझ्या टीम मैदानावर उतरल्या. त्याच्या लढती त्यांना माझ्या शिवायच लढाव्या लागणार होत्या.

पुढच्या आठवड्यात शिक्षक संचालकांना ट्रेमेन व लॉपडेल शाळेत घेऊन येणार आहेत. गुरूवारी मी खूपच अस्वस्थ होते. एक नमुना संच तयार करून ठेवायला ट्रमेननी सांगितले होते. त्यांना तो विलिंग्टनला न्यायचा होता. मी त्याचीच जुळणी करीत होते.

म्हणजे आता ही चौथी आवृत्ती असणार होती. ट्रेमेनना स्वतःसाठीही एक संच हवा होता. “तुम्ही तो मागण्याची गरज नाही. ट्रेमेन कित्येक दिवसापासून मी तो तुम्हाला द्यायचा विचार करीतच होते. ”

“धन्यवाद ! श्रीमती हॅंडरसन ”

केवढे उंच आहेत ते !

आमच्यातील बातचित लिहून ठेवायला मला वेळच मिळाला नाही. पुढचा संवाद मात्र त्यावेळी नोंदवलेला आहे.

“पुढच्या आठवड्यात आम्ही शिक्षण संचालकांना घेऊन येऊ. ”

“नको, नको ! त्यांना नका आणू. ”

“अरे, पण तो तर खूपच छान माणूस आहे”

“मला भिती वाटते. ”

“तू त्याला यापूर्वी भेटली आहेस ? ”

“नाही. ”

“त्यांना घाबरायच काहीच कारण नाही ते अगदी लहानसहान गोष्टींचेही महत्त्व जाणतात. व कष्टांची कदर करतात. ”

“मला इतक महत्त्पूर्ण होणच पसंत नाही. ”

माझ्या या तडकफडक उत्तरावर ट्रेमेन शांतच बसले! मला थोड्या वेळाने ते जाणवले. कारण माझ्या मावरी पुस्तक प्रकाशनाबाबत ते शिडात वारा भरलेल्या जहाजासारखे वेगात असत. आता जणू शिड उतराविल्यासारखे ते स्तब्ध होते ! त्यांच्या उत्साहावर मी पाणी ओतले होते. काय हे ! मला स्वतःलाच असे कुणाची प्रेरणा,उत्साह दाबून टाकणे घृणास्पद वाटते. आणि आता मी आक्षेप घेऊन नेमके तेच करीत होते. या उंच मोठ्या माणसाशी आपण आस्थापूर्वक बोलायला हव. मी स्वतःचे हात घट्ट बांधून म्हणाले “ट्रेमेन साहेब तुम्ही म्हणाल तस करू या ! ”

“धन्यवाद ! हॅंडरसनताई. ”

त्यादिवशी रात्री बाजारात मला त्यांच्यासारखा उंच माणूस दिसला. मला पहिल्यांदा तेच आहेत अस वाटल पण ते नव्हते.

देवाची कृपा झाली आणि संचालक महोदय आलचे नाहीत ! पण कॉलीनने आणि मी आमच्या खोल्या मस्त सजविल्या.मी तिला म्हणाले “आपल्या वर्ग खोल्या नीटनेटके करण्याचा मुहूर्त या संचालकांमुळे सापडला ! ”

मी तो अदभूत टाईपरायटर घेण्यासाठी शिक्षण मंडळाच्या कार्यालयात गेले होते. बालसुलभ टाईप वापरून इहाका पुस्तक क्रमांक एक पूर्ण करण्यासाठी तो लागणार होता. ट्रेमेनना तो द्यावाच लागणार होता. नाहीतर शिक्षण संचालकांना माझे पुस्तक देणे त्यांना शक्य होणार नव्हते. शनिवार, रविवार, सोमवार हे तीन दिवस मी पुस्तकाच्या टंकलेखनात अहोरात्र मग्न होते. माझ्या जीवनातले सर्वात सुंदर दिवस होते.

हॅवलॉकच्या सामन्यातून हेलनला मी बाहेर काढलयापासून ती शाळेत आलेलीच नाही.

“आपण पुन्हा बास्केटबॉल खेळणारच नाही अस ती म्हणते. आणि आपण शाळेतही येणार नाही. अस ती म्हणते. हँडरसनताई ” तिच्या मैत्रिणींनी मला सांगितले. मी फक्त हसले.

कॉलीन वर्गातील मोठ्या मुलांना घेऊन फिरायला गेली असता तिला वाटेत हेलन भेटली. “मी आता शाळेत परत येणार नाही. आईनी सांगितलय. ” ती म्हणाली.

कॉलीन तशी शाळेतल्या मुलींच्या बरोबरीचीच होती. तिने वर्मावर बोट ठेवत अचूक विचारले. “तुला मंगळवारी मध्यभागी खेळायचे नाहीय ? ”

“तू खेळणार आहेस मध्यभागी? ”

“हँडरसनताईंना वाटते की तू बचाव फळीत खेळावेस”

“हँडरसनताईंनी आधी मला खेळाच्या मैदानावर तर आणून दाखवाव. ”

खरच हेलन नसली की किती शांतता असते!

हॅवलॉकशी झालेल्या सामन्यात माझ्या दोन्ही संघांना विजय मिळाला. खेळाडूंमध्ये त्यादिवशी उत्तम ताळमेळ होता.

शाळा तपासनीस तेथे आले होते. त्यांनी आमची सामुहीक अभिनय गीते ऐकली. ती पण चांगली होती.

आमच्या खेड्यातील वर्तन शैली नमुनेदारच आहे. अंतर्गत शिस्तीचा त्यात पूर्ण अभाव आहे. त्यांच्या वर्तनाची शैली अमूर्त असते. त्यात निश्चित असे काही सांगता येत नाही. हेच तर मला फार आवडते. पण माझ्या म्हणण्याशी लोक फारसे सहमत नसतात म्हणून मी हे मत माझ्यापाशीच ठेवते. पुढे काय होईल त्याबद्दल उत्सुकता वाटत रहाते. आज्ञाधारकता ? छे ! ही गोष्ट आमच्या खेड्यातील लोकांमध्ये आढळतच आहे. कधी कधी शाळेत दिसते. पण नेहमी नाही ! ही एक विस्मयकारक गोष्ट आहे.

आज माझ्या डायरीतील नोंदी खूपच विस्कळीत वाटत असल्या तरी मला चालतील. लिहिल्या जात आहेत हेच खूप आहे.दिग्दर्शनाचा हा सप्ताह मला चांगलाच थकवणारा ठरला. 'पुसी विलो' या गाण्यासाठी 'पुसी विलो'ची वेल मी फळ्यावर रेखाटली. त्यासाठी मला तासंतास उभे रहावे लागले. शिवाय इहाका पुस्तक क्रमांक एकची नमुना प्रत करण्यासाठी तीन दिवस आणि तीन रात्री जागून काढल्या होत्या.

जगभरातल्या फिल्मस पहाण हा आनंद मनात मावेनासा होता. च्युईंगगम खाणा-या टोळ्या मागच्या सीटवर नाहीत. मुलांच्या बडबडीचा त्रास नाही. सुरूवातीच्या वेळी आईस्क्रिमच्या कागदांचा आवाज नाही. आणि सिनेमा संपल्यावर थंडीत परतण्याचा त्रास नाही. माझ्या सारख्या हळव्या स्वभावाच्या बाईला ही अतुलनिय आनंदाची बाब होती. जलशासाठी केलेली मेहनत सत्कारणी लागली.

आज तर अडीच तास त्याचा पुरस्कार मिळाला.

हल्ली सायंकाळी मी थकून गेलेली असते. पाच वर्षाच्या मावरी मुलांच्या एकदम ओघ सुरू झालाय. ज्यांनी अगदी लहान मुलांना सांभाळले आहे अशा दाईंनाच खरे म्हणजे माझ्या थकव्याचे कारण समजू शकेल. त्यांचे बूट एकेक टन वजनाचे आहेत. आणि त्यांचे चित्त एका ठिकाणी रहाण्याचा काळ फक्त दहा मिनीटे आहे. त्यांचे आवाज जंगली बैलासारखे आहेत. आणि त्यांना शिकवणे ही अजब अनुभूती आहे. अनेक आठवडे त्याने तुमचे ऐकावे हे शिकवण्यातच जातात. प्रत्यक्ष शिकवणे तर दूरच ! युरोपियन शिस्तीच्या चिमट्यात पकडण्यापूर्वी मावरी योद्धे कसे असतील याची कल्पना यावी असेच ते आहेत. अर्थात ते सर्वची सर्व याच प्रकारचे आहेत असे नाही. पण वाईविनीचा भाऊ, माताव्हेरोचा भाऊ, लैलाचा भाऊ, पुईयाचा मुलगा, बेबचा चुलत भाऊ, छोटी बेटी, लहानी वी मार्डी हे जर असले तर..... अरेच्या! तामाती लॅरीला तर मी विसरलेच होते!

बेबच्या चुलत भावाला सगळे सेवेन म्हणतात. या सगळ्या छोट्या प्राण्यांना मी बाहेर ढकलले होते. तोच पॅची अचानक परतला.

“हॅंडरसनताई सेवेननी माझ्या पोटात गुद्दा मारला. ” वाईविनीचा भाऊ खास तिच्या शैलीत चित्कारला.

“तू इथे माझ्या जवळच थांब बर. ”

“पॉली, बाहेर जाऊन बघ बर तर काय झालय. ” मी ब्लेझर शिवत बसलेल्या पॉलीला सांगितले.

“सेवेननी वाईविनीच्या भावाला काठीने मारलय” हॅंडरसनताई पॉलीचा अहवाल.

तेवढ्यात पम्मी धावत आली.“हॅंडरसनताई माताव्हेरोचा भाऊ बेबचा पुतण्या सेवेनशी मारामारी करतोय. ”

“छान ! ”

ब्रूसचा हातात कु-हाड घेऊन प्रवेश. “हँडरसनताई मी ही कु-हाड इथे आत ठेवू ? सेवेन यांनी वी ला मारू बघतोय. ”

“ चालेल. दरवाज्याच्या मागे ठेवून दे. कॉलीन, जरा बाहेर जाऊन आपला हा नवा गोतावळा काय करतोय हे बघतेस का ? ”

माताव्हेरो व त्याचा भाऊ गर्द हिरव्या रंगाचे ब्लेझर घालून आले होते. आपला गणवेश पिवळा व खाकी रंगाचा आहे हे माहित असलेल्या माताव्हेरोला जरा अवघडल्यासारखे झाले होते. अर्थात तो व त्याचे आजोबा आमचे अध्यक्ष यांना काही सांगण कठीणच होत.

“हँडरसन, आपल्या शाळेचा गणवेश तर हिरव्या रंगाचा केला तर काय होईल ? ”

हेलन धावपळ करीत सोमवारी शाळेत आली व कॉलीनला भेटली. “बर्न्सताई, मंगळवारच्या सेंट्रलशी होणा-या सामन्यात मी खेळायच आहे का ? ”

कॉलीन व मी हेलनच्या हट्टीपणाला आळा घालण्यात यशस्वी झाल्या सारखे दिसत होते. पण मंगळवारचा सामना पुढे ढकलला होता. आता शुक्रवारी आम्ही या स्पर्धेच्या पूर्व विजेत्या पाकीपाकीशी टक्कर घेणार होतो. सकाळी जेव्हा केंनी हे मुलींना सांगितले तेव्हा सर्व खेळाडूंमध्ये एक भितीची लहर येऊन गेली. आमच्या संघाचे आता पानिपत होणार असे मला वाटत होते. या सामन्याआधी खूप सराव करावा असे मला वाटत होते. पण ते काही जमले नव्हते.

आधीचे सर्व सामने आम्ही जिंक्ले होते हे खरे, पण ही फारच प्रविण मुल होती. घोटून घेतलेले तंत्र, ताळमेळ आणि कौशल्य याच बळावर त्यांच्यावर मात करण शक्य होत. आणि खेळ वेगवान हवा. आमचा संघ खेळतोय बरा पण त्याचा मध्य अजून कमजोर आहे. हेलन परतल्याने मी खूश झाले. के तिच्याशी काय बोलले माहित नाही पण तेव्हा पासून तिच्यात अगदी आमूलाग्र परिवर्तन झाले आहे. ती अगदी शांत व आज्ञाधारक बनली आहे. हीच का ती हेलन अस वाटतय !

काल अरोहाला मी गावात पाहिलं. पॅरिसच्या झाडांनी बहरलेल्या रस्त्यावर उगवलेल्या फुलासारखी ती दिसत होती. माओरीपेक्षा ती जरा उजळ आहे. ती अगदी सुरेख दिसत होती. सुंदर कपडे घातले होते. आणि गर्भार होती ! ही आमची तेरा वर्षाची शाळेची विद्यार्थीनी. तिच्या एका बाजूला एक बाई बाबा गाडी ढकलत चालली होती. ती बहुधा तिची आई असावी. दुस-या बाजूला एक रूबाबदार तरूण होता. तो बहुधा त्या बाईचा जावईच असणार. काही लोक असेही जगतात. त्याचा अर्थ लावण्याची डोके फोड तूम्हीच करा !

“कॉलीन मी तुला एक आव्हान देते” मी कॉलीनला म्हणाले. “आपल्या या नव्या गोतावळयाला आज तू शिकव बर ! ”

सोळा वर्षाची कॉलीन हसत हसत पण आत्मविश्वासाने म्हणाली. “आणि जर मी त्यांचा वर्ग घेऊन दाखवला तर ? ”

“House, truck,Daddy या शब्दातील सर्व अक्षर शिकवायची आहेत. या नव्या गोतावळ्यानी काल माझ ो प्राण अगदी कंठाशी आणले होते. रात्रीच मी ठरवले उद्या हा गोतावळा कॉलीनच्या स्वाधीन करायचा. तुला हे सारे किती वेळात जमते तेही मी पहाणार आहे. ”

शाळेची घंटा वाजून काही वेळ होऊन गेले होता. पण आमचा नवा गोतावळ्याने त्याकडे लक्षही दिले नव्हते. कॉलीनने घडळ्याकडे नजर टाकली. दोन वाजून वीस मिनिटे झालीत.

“हं ! हेच ते ! घंटा झाली दोन दहाला. कुठे आहेत मंडळी ? आणि बाहेर जाऊन त्यांना पकडून आणल तर तो नियमभंग ठरेल. आधीच सांगून ठेवतेय. ”

कॉलीन या परिस्थितीने जराही विचलित झाली नाही. “रांगी” तीने माझ्या पाच वर्षीय मुलांमधील सर्वात सुस्त मुलीला हाक मारली.“जा बर आपल्या वर्गातील बच्चे कंपनीला घेऊन ये! त्यांना सांग धडा सुरू होतोय. ”

रांगीला धडा म्हणजे काय हेही ठावूक नव्हते. कारण तीचे इंग्रजी फारच कच्चे होते. शिवाय मुलांना काही काम सांगितले आणि ते झालय असा माझा तरी काही अनुभव नव्हता. पण जाऊ द्या. ही कॉलीनची डोकेदुखी आहे. मी हसले,“दोन वीस होऊन गेलेत” मी म्हणाले.

कुणीही आत फिरकले सुध्दा नाही. जीन व पॉलकडे बोट दाखवित मी म्हटले “तू त्यांना या कामी लावू शकतेस” त्या दोघी शिवणकाम करीत बसल्या होत्या.

“पॉली” कॉलीन जरा तिला चुचकारत म्हणाली. “जा बर. सर्व छोट्यांना आत घेऊन ये. मला त्यांना नवीन धडा शिकवायचा आहे. ”

मग सावकाश प्रत्येक जण स्वतःला लागेल तेवढा वेळ घेत वर्गात दाखल झाले. वाटेत त्यांची धकाबुक्की झाली. कॉलीन त्यांना बसवत होती. “त्यांनी बूट काढायला हवेत. आणि प्रत्येकाने खडू, फळा व डस्टर घ्यायला हवे. त्यांच्या ऐवजी तू स्वतः हे काम करणे किंवा मनाई करणे हे नियमाविरूद्धचे वर्तन समजले जाईल ! ” मी म्हणाले.

“सर्वांनी आपापले बूट काढा आणि इथे येऊन बसा बर ! ” कॉलीन उंच स्वरात म्हणाली. “सगळ्यांनी आपापल्या पाट्या पेन्सीली  व पाटीपुसणे घ्या बर. ”

मी शांत चित्ताने पुढची गंमत पाहू लागले. आणि खरेच पुढची गंमत अनुभवतांना खूप मजा आली. अनेकदा मी मोठ्याने हसते. कॉलीनचा स्वर उंचावत गेला. पण तिने एक उत्तम पाठ घेतला खरा. तिच्या वयाच्या मानाने तर खरेच चांगला. सर्वांनी काम केले. ती एकदाही चिडून काहीवाही बोलली नाही.

“पण काल माताव्हेरोचा भाऊ वर्गात होता. आज तो आलेला नाही हे लक्षात घ्यायला हव. ” मी म्हणाले.

“पण माताव्हेरोचा भाऊ मी सांगितलेले सर्व करतो. ”

“ठीक  आहे. पण बेबचा चुलतभाऊ सेवेन बघ. झोपलाय तो. याचा अर्थ तुझा पाठ कंटाळवाणा झाला असावा. ”

“पण तो तर खेळायला जाण्यापूर्वीपासून पेंगत होता. त्याच्या झोपण्याला मी जबाबदार नाही. ”

“हेही खरच आहे. मीही त्याला पेंगतांना पाहयलय ! ”

“वी, सेवेनला उठव. ”

“नको, नको ! झोपलाय याबद्दल माझी मुळीच तक्रार नाही! उलट यातील आणखी काही जण गाढ झोपावेत असच मला वाटत. ”

“मी सर्व पत्र पाहिलीत हॅंडरसनताई ”

मी घडयाळ्यात पाहिले. वीस मिनिट. आता सर्वांना बूट घालून त्याच्या वस्तू ठेवून देऊन या खिडकीतून बाहेर घेऊन जा. ”

सगळ्यांनी पटापट सर्व काही केले. इतकी झटपट काम करणं मी पूर्वी पाहिलच नव्हत. “आता हा नवा गोतावळा तूच सांभाळायचास. मी आपले जुने सभ्य स्त्री पुरूष घेते. ”

“मग मी तुमच्या काळ काम वेगाची नोंद ठेवीन ! ” कॉलीन उद्याच्या पाठाच्या कल्पनेने मी आजच खचले. मला आठवल आज वाईविनीचा भाऊही आलेला नव्हता.

“त्यांनी त्याचा अभ्यास पूर्ण केलाय. ” कॉलीन म्हणाली.

“अर्थात ! मी त्यांना तस वळणच लावलय. ” मी उतरले.

अच्छा ! उद्या वाईविनीचा भाऊ येईल. सेवेन जागा असेल माताव्हेरोचा भाऊ येईल म्हणजे मग …

"कॉलीन, मी आता घरी जाते. खूप थकलेय. आपल्या गावातला संघ अ व ब संघाशी खेळायला ४.३० ला येणार आहे. तू हे सर्व आवरून घे. "

पॉली आपला ब्लेझर शिवत होती. लोटस तिचा खिसा लावत होती. फ्रँसिस नेहाला पियानोचा पाठ देत होती. रेरेमोना आणि एडना चित्र रंगवत होते. वरच्या वर्गातील मुले गोष्ट लिहित होते. मार्क त्याच्या मावशीला पत्र लिहित होता. हे तर यात आलेच नाही. शिवाय पॅची ... ...

आमच्या गावातील युवक संघाच्या टिमशी आमच्या शाळेच्या टिमशी एक सराव सामना मी जरा घाईघाईनेच आयोजित केला होता. एक दिवसाची पूर्वसूचना तशी पुरेशी होती. युवक संघामध्ये बे, रेप्स, काहू आणि तिती हे 'हॉक बे' साठी खेळणारे खेळाडू नसावेत अशी मी आशा करत होते.

युवक मंडळी मला आवडते पण आमचे अध्यक्ष पीटर यांचे मात्र त्याविषयी बरे मत नाही. गावातील सोळा वर्षाच्या मुलींना कुमारवयात माता बनण्याची पाळी या युवक मंडळमुळेच येते असे त्यांचे मत होते.

"या युवा मंडळाचा उद्देश तरी काय आहे? " मी विचारले. "तरुणांना एकत्र आणणे हाच, " त्यांनी अगदी खर्जात सांगितले.

मला गेल टमाटीची आठवण झाली. सोळाव्या वर्षी लादलेल्या विवाह बंधनामुळे रडणारी. व्हेरेपारीताची स्मशानात पहुडलेली जुळी आठवली आणि शहरात काल भेटलेली मेडोनाही आठवली.

"एकत्र" मी त्याचाच शब्द पुन्हा उच्चारला.

काही काळ मी संन्यासावस्थेत असल्यासारखीच वागत होते. पण युवा मंडळाशी झालेल्या सामन्यात मी पंच म्हणून काम पाहिले तेव्हा मला याचे आश्चर्यच वाटत राहिले. जर हे जीवन नसेल तर मग जीवन कसे असेल ? जर या मावरीशाळेतल्या घमासान वातावरणात माझा जीवनाशी सामना होणार नसेल तर मग तो कुठे होणार ?

जर स्वत:ला पूर्ण विसरुन जाणे ही आयुष्याची कसोटी असेल तर मी नुकताच १/२ तास तरी तो अनुभव घेतला.

सुरुवातीला मला शिट्टी मिळविण्यासाठी झगडावे लागलें. शिट्टी कॅरोलीनने कडे होती आणि तीने पंच बनण्याचे ठरविले होते. मी शुक्रवारच्या सामन्यासाठी सराव म्हणून हा सामना ठेवला होता. मुलींना शिकवण्यासाठी, तयारी करुन घेण्यासाठीच तर हा सामना होता. मी आधी तिला सामन्याची सुरुवात करु दिली आणि मग त्यांच्या इतक्याच उत्साही स्वरात मोठ्याने ओरडत शिट्टी मागितली. ती क्षणाभर ताठरली. स्वत:शीच पुटपुटली पण मी दुर्लक्ष केले. युवा मंडळात दोन मुले म्हणजे चांगली मोठी माणसेच होती. शिवाय काहू होताच.

तो तर ‘हॉक्स बे’ कडून खेळतो. शेवटी ९-२ असा गुण फलक होता. त्याचा वेग अवर्णनिय होता. चेंडू एकमेंकांकडे सोपविण्यातली त्यांची चपळाई थक्क करणारी होती.

मध्यंतरात कॅरोलीन रितसर तक्रार घेऊन आली. ती म्हणाली “इथे नियमांची उघड पायमली होते आहे. ” तिच्या या अमेरिकन वाक्प्रचाराने मी चमकले, असे वाक्प्रचार तर मीही वापरत नाही.

मी म्हणाले, “ठिक आहे. मी लक्ष ठेवीन. ” मग उर्वरित खेळाच्या कुणालाही काही गडबड करता आली नाही.

युवा मंडळाचे खेळाडू आमच्या मुलींच्या डोक्यावरुन उड्या मारीत होते. ते दृष्य तुम्ही पहायलाच हवे होते.

मी त्यांच्या खेळाचे कौतुक केले. ते मावरी तरुण खरेच कुणालाही आवडावे असेच होते. त्यांनी प्रेम प्रकरणात गुंतले. काही गैर नव्हते. पण दारुत मात्र त्यांनी गुंतू नये असे वाटते.

सुरेख मजबूत, उंच, बांध्याची चपळ आणि सुसंस्कृत तरुण मुलें.

मी शिशुकक्षात जाण्यापूर्वी शेवटचा चहा घेत होते. तेवढ्यात पाऊलेटने जेनची चिठ्ठी आणून दिली.

प्रिय हॅंडसनताई,

“मी आज पाळी पाळीच्या खेळात खेळू शकणार नाही. मला दुहेरी न्यूमोनिया झाला आहे. ”

जेनची चिठ्ठी वाचल्यानंतर माझ्या मनात फक्त तिच्या आजाराचाच विचार घोळू लागला. माझ्या माहितीप्रमाणे दुहेरी न्यूमोनिया झालेल्या व्यक्तीला चिठ्ठी लिहिण्याइतकी शक्ती उरत नाही. म्हणजे हा कदाचित वेगळा प्रकार असेल!

ज्या दिवशी पाळी पाळीचा सामना होता. त्यादिवशी सकाळपासून रिमझिम पाऊस सुरु झाला. बारा वाजेपर्यत ढगाळलेले आकाश निवळण्याचे चिन्हे दिसेनात तेव्हा के नी फोन करून सामना पुढे ढकलण्याची सूचना केली. पण एक वाजता तुफान पावसात एक बस शाळेत घुसली तेव्हा सगळे स्तब्ध होऊन पहात राहिले.

**आम्ही**

**पाकीपाकीचा**

**पराभव केला.**

हा पाकीपाकीचा संघ कधीच पराभूत झालेला नव्हता. हेस्टींग्ज विभागात ते अजिंक्य मानले जात असत.

आता माझ्या पिवळ्या जर्सी नव्या विजेत्या आहेत.

कधी कधी स्वप्न सत्यात अवतारतात ती अशी.

अर्थात कष्टाशिवाय, मेहनतीशिवाय नाहीच.

पाकीपाकीचा संघ परतल्यावर पिवळ्या जर्सीचा घोळका माझ्या भोवती जमला. नऊ सावळे चेहरे आनंदाने चमकत होते. माझे अभिनंदन करीत होते. तुम्ही छान शिकवता हे आता आम्हाला पटले. आता आम्ही तुमचे ऐकू! ते गुणगुणत होते.

मी खूपच आनंदले होते.

त्यादिवशी सायंकाळी बाजारात गेले, तेव्हा मला सगळीकडे पिवळाच रंग दिसत होता. माझी नित्याची दुखणीही पळून गेली होती.

मला सर्व रंगात पिवळा रंगच आवडतो. वाचनाच्या प्रश्नांत मी पुन्हा गुंतून गेले आहे. लेखनात मला रस असला तरी तो बाजूला ठेवून मी वाचनाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले आहे. मी आनंदी माझ्या शिशू शाळेत मुलांना ज्यात मनापासुन रस आहे. उत्सुकता आहे. त्याच शब्दांचा वापर करते आहे. आणि पुन:पुन्हा हेच स्पष्ट होते आहे की मुलांना खेचून होणारे बांधून ठेवणारे शब्द दोनच क्षेत्रांशी संबधित असतात.भय वा लैंगिक जाणिव. चुंबन हा शब्द मी वर्गात वापरला तेव्हा मला पहिल्यांदा हे जाणवले. पाच वर्षाच्या मावरीमुलं ही शब्दाने उत्तेजित झाले चर्चा करु लागले. तो शब्द शोधण्यासाठी ते पुस्तकाकडे वळले. दुस-या दिवशी मला त्यांनी त्याचे स्पेलींग आपल्या अजून पाठ असल्याचे सांगितले.

यातून मला एक शोध लागला. प्रखर भावनिक साह्चयाने शब्द निवडण्याचा अशी मुख्य भावना आहे. भितीची असा घाबरलेला. हा एकच मोठा शब्द मला त्यावेळी आठवला. एवढा मोठा शब्द पहिल्यांदाच शिकवावा की नाही हे कळत नव्हते, पण मोठा असला तरी हाच शब्द सोपा आहे. हे मला माहीत होते. मी तोच वापरायला सुरुवात केली, आणि मला आश्चर्यकारक अनुभव आला. दुस-या जोतदार भावनेशी लैंगिकतेशी जोडलेला चुंबन हा शब्दही घाबरलेल या शब्दापुढे मागे पडला नवागतांनी हा शब्द झटकन आत्मसात केला. मला आणखी एक नवी गोष्ट जाणवली. हुषार नवागत मावरीमुले स्वत:शीच घाबरलेला या शब्दांची उजळणी करतात.

रडणे हा तिसरा शब्द.

घाबरणे आणि रडणे या दोन शब्दांनी मला त्या भावनेच्या दोन अंगातील कार्यकारण भावही सांगता येत होता. भिणे आणि म्हणून रडणे. चुंबन या शब्दाशी जोडलेला असाच शब्द असू शकतो की प्रेम ! पण प्रेम हा शब्द त्यांनी फारच क्वचित वापरल्याचे आढळले. त्यामुळे तो कधी मीही वापरला नव्हता. आता सोमवारी मी तो वापरायचे ठरविले.

वाचनात मंदगतीने प्रगती करणा-या नवागतांना अखेर वाचता येऊ लागले. ते खालील शब्दांचे कार्डस वापरु लागले.

हे शब्द अजूनही वापरात आहेत. या शब्दांपुढे हे शब्द वाचून ओळखणा-या मुलांची संख्या दिली आहे.

| | |
|---|---|
| पहिली परीक्षा | दुसरी परीक्षा |
| फुटबॉल - ३ | घाबरणे हा शब्द शिकवल्यावर |
| मारणे - १ | चुंबन - ७ |
| लढणे - १ | हाका - ४ |
| चुंबन - ७ | रडणे - ५ |
| रडणे - ५ | घाबरणे - ९ |
| हाका - ६ | |

संभाव्य निष्कर्ष

१) क्रियापदाचे भूतकाळ वाचन रुपच शिकवणे जास्त सोपे जाते. म्हणजे साध्या वाक्यात त्याला इतर काही जोडावे लागत नाही. उदा. 'क्राय' हे रुप वापरायचे ठरले तर 'रांगी विल क्राय' असे लिहावे लागेल. 'विल' हे शिकणे समजणे अवघड आहे.त्यापेक्षा 'रांगी क्राईड' 'मम्मी कीसड मी' हे सोप आहे.

२) या शब्दांसोबत चित्र दाखवणे हा अगदी गुन्हाच आहे. कारण याची चित्र तर प्रत्येक मुलाच्या मनात तयारच असतात. ती खास त्यांची चित्र आहेत, त्यात भावनिक रंग आहेत. म्हणूनच मी शब्दांबरोबर कधीही चित्र देतच नाही.

३) Come आणि look यावर आमची पहिली तीन पुस्तके आधारलेली आहेत. आणि हे सर्वात कमजोर शब्द आहेत. 'जेनेट आणि जॉन' यांचे हे इंग्लीश.

४) माझ्या हातून एक भयंकर घोटाळा झाला. माझी पहिली मावरी पुस्तक मी या आदर्शवत व शास्त्रीय पद्धतीने तयार केलेल्या इंग्लीश पुस्तकांवर आधारली. ये, पहा, आणि या पुस्तकांमागे अभ्यासपूर्ण संशोधन असेल असे मी गृहितच धरले होते.

५) मावरीमुलांना दुस-यांच्या चुकांची किंमत मोजावी लागते. बालवाडीत त्यांची जी दोन तीन वर्ष जातात त्याचे पडसाद पुढे सहावी सातवी पर्यंत ऐकू येत रहातात. आणि चौदा पंधरा वर्षाचे होई पर्यंत ते चक्रव्यूहात पूर्ण अडकतात. व्यवहारात अपयशी ठरतात आणि शेवटी उपद्रवी म्हणून गणले जाऊ लागतात.

हे एक वाचन कार्ड आहे. पाच वर्षाच्या एका मावरीमुलाला अंततः हे पूर्ण वाचता येऊ लागले. हे शब्द तो पहाताक्षणी ओळखतो, वाचतो, समजतो.

Daddy - डॅडी बाबा

Mummy- मम्मी आई

Ihaka - इहाका मावरीनाव

Hit - हिट मारणे

Cried - क्राईड रडणे

Kiss - किस चुंबन

Ihaka Cried - इहाका क्राईड - इहाका रडला.

Mummy Kissed Ihaka - मम्मी किसड इहाका - आईने इहाकाची पपी घेतली.

Daddy hit Ihaka - डॅडी हिट इहाका - बाबांनी इहाकाला मारले.

Ihaka Cried - इहाका क्राईड - इहाका रडला.

Kiss Ihaka Mummy - किसड मम्मी इहाका. इहाकाने आईची पपी घेतली.

यावर प्रश्न विचारले तर त्याला समजतात. पण या आणि पहा यावर तो सहा आठवडे अडला होता.

Mummy - आई हा एक शब्द असू शकतो.

I & me - मी आणि स्वत: हे शब्द असू शकतात. यावर आधारीत कार्डस बनवले जातील. क्रियापद ही वाक्यच असतात. या सोबत कुठेही चित्र नसले.

रचना - कविता

दिती - हाईन मला म्हणाला

*-इकडे बघ*

*तीने एक केक पाहिला*

*तेव्हा रोनीने आम्हाला मारले.*

*मेरी म्हणाली काई शिजवली आहे.*

*लवकर या*

*नाहीतर उशीर होईल.*

मार्की - *आई आणि बाबा*

*मला वेलिंग्टनला घेऊन आले.*

*मी रस्त्यावर दोन पोलिस पाहिले.*

*तिथे काहीतर अपघात झाला होता.*

मातावहेरो-

*-काल मी घरी आले*

*उशीरा*

*मला माझ्या भावाने लपवले*

*मग मी रडायला लागलो*

*मग मी झोपलो*

*मला लिहायचा कंटाळा आलाय*

*एवढचं.*

इरिनी -

*-माझे वडील दारु प्याले.*

*तो सगळी बीअर एकटाच प्याले.*

*आणि आम्हाला पार्टी दिली.*

ही आमच्या प्रयोगातील मुले आहेत. मला आशा आहे. की मावरीमुलांना बालवाडीत तीन वर्ष घालविण्याचे कारण नाही. दोन वर्षातही ते बालवाडीचे शिक्षण पूर्ण करु शकतात. के आज दुपारी माझ्याबरोबर होते. त्यांना ही शक्यता फारच कमी वाटते तथापि रेरेमोना तर आता तयार झाली आहे. वाईवानी जवळपास आहे. अर्थात अजून अर्धवर्ष जायचे आहे. आता ते वाक्य शिकत आहेत. त्यांची अशी कल्पना आहे. की ओळीच्या शेवटी पूर्ण विराम दिलाच पाहिजे. मग वाक्य अर्ध राहिले तरी चालेल!

रोंगो ही थिरकत्या पावलांची नाचरी मुलगी, मोठ्या मोठ्या अक्षरात फळ्यावर लिहिते आहे. सर्वांनी वाचावे म्हणून.

*-आई रडते आहे.*

*कारण बाबाने तीला तोंडावर फटका मारला.*

*आई आज नॅनीच्या घरी चालली आहे.*

*बाबा रागावले आहेत.*

रोंगो सुंदर कपडे घातलेली डोक्यावरचे रेशमी केस नीट विंचरलेली मुलगी लिहीते आहे. मी तिला आणखी लिहिण्यासाठी कागद दिला.

*-बाबा संतापले म्हणून मीही संतापले होते.*

*कारण बाबा नशेत होते मग त्यांनी रोंगोला मारले.*

रोंगो ही सगळ्यांची लाडकी मावरीमुलगी आहे. असे मला वाटत होते. पण तिला मी कागद पेन्सील दिल्यावर तीने जे लिहिले ते पाहून माझा भ्रम दूर झाला.

*-मी उठलो.*

*शाळेत जायला तयार झालो.*

*मी घाईघाईने आपटले.*

*कारण बाबा नाराज होते.*

*आणि ते चिडल्यासारखे दिसत होते.*

*गो-या डेनिसने आपल्या वहीत लिहिले होते.*

*-मला तिरस्कार वाटतो.*

*आकाशात उंच जायला*

*मृत्यूनंतर.*

*मला आकाश आवडत नाही*

*कारण ते खूपच*

*उंच आहे.*

*मी काल बोलणे खाल्ले*

*कारण माझे*

*सँडल ओले होते.*

माझा शुद्ध मावरीमुलगा टेम वळणदार अक्षरात लिहितो.

*-काल रात्री*

*मी पलंगावरून पडलो*

*म्हणून बाबांनी*

*आईला सरकायला सांगितले.*

इरिनीची नजर नेहमी मोठ्यांच्या संबंधावर असते. ती लिहिले.

*-माझी आई*

*काकांबरोबर अंत्यविधीला*

*जाणार आहे.*

*ते ६ वाजताच्या बसने गेले.*

*ते उतपेणीला गेले.*

*मला माहित नाही कोण वारले ते.*

*ती उद्या*

*येणार आहे.*

*ती आली की*

*गावात मांस आणयला जाईल.*

*आई बाबाना म्हणाली*

*मला ते पैसे द्या नाहीतर*

*मी तुम्हाला बडवून काढीन!*

*बाबांनी आईला शिव्या दिल्या*

*पैसे ही दिले*

*आम्ही पार्टी केली*

*सर्व बीअर एकटे बाबाच प्याले*

*नशेत बुडाले.*

इरिनीला मीच वही आणून दिली आहे. कारण तिचे सर्व पैसे वडिलांच्या व्यसनात भस्म होतात. या वहीत ती लिहिते.

आईने मला मारले.आणि पेपर आणायला सांगितले.मग मी पेपर आणला आईला दिला. मग मी बाबांना सांगितले की पेपर आईकडे आहे.त्यांनी मला पेपर आणायला सांगितले.

“मिसेस हँडसन, सेवेनकडे एक सुरा आहे. आणि तो माझ्या पोटाला भोक पाडतोय. ”

“कॉलीन, जा बरं त्या सेवेनला निशस्त्र कर. ”

“मिसेस हँडरसन मी आरोग्य शिबिराला गेल्यावर मिस बर्न्सला पत्र लिहिणार आहे. ”

“वाईवानी ! मला वाटलं की तू मला पत्र लिहिशील. ”

“तुम्हाला लिहिण नाही जमणार तुमच नाव खूप मोठ आहे. ”

“मिसेस हँडरसन तुम्ही बोकोचे स्पेलिंग कसे लिहितात ? ”

“का बर ? तू काय लिहिते आहेस ? ”

“त्याने मला बोकोवर मारले”

“कॉलीन, बोको म्हणजे काय ? ”

“इरिनी, पेन्सीलीसाठी चार पेन्स आणलेस का ? ”

“माझ्या आईकडे नाहीत चार पेन्स”

“कॉलीन, याच घरी गेल्या आठवड्यात जुगार आणि दारुवर ऐंशी पौंड उडविले गेले ! मुलांचे हातखर्चाचे पैसे बोनस सर्व काही संपले. ”

“मिसेस हॅंडरसन मला लिहायचा कंटाळा आला आहे. ”

“मग ‘मला कंटाळा आला आहे’ हेच लिही बर”

“मिसेस हॅंडसन, तुम्ही म्हणाला होता की मला पियानो वाजवायला मिळेल म्हणून”

“हो तर ”

“मग मी आता पियानो वाजवू का ? ”

“तुझ लिखाण झाल का ? ”

“नाही. ”

“संपव ते आधी, मग तुला पियानो वाजवायला मिळेल”

“कॉलीन, ही मुल माझ्या नावावर जे सांगतात ते खरेचं मी म्हणालेली असते का ग ? ”

“ब-याच अंशी ”

“सर्व नाही”

“नाही सगळच नाही”

“मी अस काही म्हणाल्याच तू ऐकल आहेस की जे नंतर मला नाकाराव लागल. ”

“हो ! ”

“मिसेस हॅंडरसन माझी पियानो वाजवायची वेळ आहे. ”

“वाजव मग. पहिल्यांदा सर्व स्वरांच्या गतीचा अभ्यास कर”

“मिसेस हॅंडसन, मी माझ काम संपवल की मला पियानो वाजवायला मिळेल अस तुम्ही म्हणाला होता”

“नाही. मी मुळीच अस म्हणाला होता. ”

“होयच मुळी. तुम्हीच म्हणाला होतात”

“कॉलीन, मी म्हणाले होते असे ? ”

“मी ऐकले होते खरे”

“सर्व बच्चे कंपनी इकडे या”

“हे फळ्यावरच पुसीच चित्र ठेवू की पूसू ? ”

“मिसेस हँडरसन पियानोच्या मागच्या फळ्यावर मी काढलेल चित्र पहा”

“मॅरिऑन दोन्ही हातांनी स्वरपट्या दाब”

“मी दुपारी रंगकाम करु शकेल अस तुम्ही म्हणाला होता”

“खर आहे. काढ तर तुझे रंग”

“माझ्याकडे कागद नाहीत”

“मला वाटत मी तुला कागद आणायला सांगितल होते”

“कुणी तरी चोरले”

“मॅरिऑन, चुकीची बोट वापरली आहेस तू एक दोन तीन आणि मग अंगठा”

“बेट्टी रडतेय”

“का बर ? जेनी, ही शिवण अगदी कडेने घालायची आहे”

“सेवेनने तिच्या डोक्यावर वाळू टाकली”

“कॉलीन, सेवेनला आण वर”

“हा शब्द काय आहे ! ”

“मधोमध बिटवीन”

“अधोमध अटवीन”

“बिटवीन. सर्व लहानग्यांना मी इकडे यायला सांगितलेय विकी, ब्लॉसम तुम्ही त्यांना इकडे आण तर”

“मला माझी पेन्सील सापडत नाहीये”

“कॉलीन, मी न सांगितलेल काहीही ते करत आहेत अस तू कधी पाहलय ? ”

“कधी कधी”

“कुणीतरी माझी पेन्सील घेतलीय”

“ कुणीतरी घेतली अस म्हणू नकोस मी हरवली अस म्हण”

“बी टीमचा कर्णधार कोण असणार आहे हँडसनताई”

“माझी पेन्सील हरवलीय”

“पण मी तुला एक आज सकाळीच दिली होती”

“बी टीमच कर्णधार कोण ठरवलय मिसेस हँडरसन”

“अजून मी ठरविलेल नाही”

“तुम्ही हिराणीची निवड केली होती”

“नक्कीच नाही”

“बर मग कोण ? ”

“मी नंतर ठरवेन. कॉलीन जेमची ती शिवण पहा”

“माझी पेन्सील हरवलीय ! ”

“सुरेख मॅरिऑन. ”

“आपण कर्णधार निवडायचा का ? ”

“नाही, मीच निवडेन. जे सरावाला वेळेवर येते आणि फुगुन बसत नाही, अशा कुणाला तरी निवडेन. ”

“तुम्ही हिराळीची निवड केली होती. ”

“मी कर्णधार म्हणून कुणालाही निवडलेल नाही, कॉलीन तुला काय वाटत. ”

“तुम्ही हिराळीला निवडलं होत ! ”

“हा आला सेवेन, मिसेस हँडसन. ”

“नाही, खरंच नाही. ”

“मी तरी म्हणतांना ऐकलय. ”

“सेवेन इथ कशाला आलाय ! ”

“मला अद्याप पेन्सील मिळालेली नाहीय. ”

“इरिनीला कुणी पेन्सील उसनी देऊ शकतय का ? ”

“ही घे इरिनी. ”

“स्पर्धेसाठी ‘ए’ टीमचा कर्णधार कोण आहे ? ”

“मी निवडीन कुणाला तरी तो पर्यंत तुम्ही वाट नाही पाहू शकत. ”

“श्री. हँडरसन यांना कर्णधाराचे नाव हवे होते, म्हणजे त्यांना प्रवेश अर्ज पाठविता येईल. ”

“हेच ते कुटुंब कॉलीन जे ज्याच्याकडे पेन्सीलीला पैसे नाहीत पण दारु जुगारात मात्र ८४ पौंड उधळता येतात. ”

“आता मी माझ काम संपवलय, आता मी पियानो वाजवू ? ”

“‘ए’ टीमचा कर्णधार कोण हँडरसन ताई. ”

“हा सेवेन आलाय हँडरसन ताई. ”

“मिसेस हँडरसन मला काही नवीन संगीत शिकवता ? ”

“बेट्टी रडतेय. ”

“ही पेन्सील मोडली हँडरसनताई. ”

“मी रंगांचे मिश्रण करुन बसलोच पण माझ्याकडे कागदच नाही. ”

“आता सर्व बाहगोपाळांनी आपापली पाटी पेन्सील आणि फडके घेऊन माझ्याकडे यायच. या आणि सतरंजीवर बसा बर. ”

“फळ्याच्या मागे मी जे केलय ते पहायला तुम्ही येतायं ना ताई ? ”

“या पुसीच मी काय करु ? मिसेस हँडरसन ? ”

“श्रीमती हँडरसन ? ”

“श्रीमती हँडरसन ? ”

“कॉलीन आमच्या वर्गात सर्वसामान्य शहाणपणाचा पुरवठा करीत असते, त्याची आमच्याकडे अगदी कमतरता होती. शहाणपण आता तिच्यामुळे शहाणपणात आम्ही बरेच संतुलीत आहोत! ” मी श्री. लॉपडेल आणि श्री. ट्रेमेनना सांगत होते.

“आणि श्रीमती हँडरसन तुम्ही काय पुरवता वर्गात,? ” त्यापैकी एकाने विचारले.

देवा रे ! आता माझा लौकीक या सोळाव्या वर्षीच्या पोरीवर अवलंबून आहे तर ! मी तिच्याकडे वळून म्हणाले

“कॉलीन मी काय करते ग ? ”

कॉलीन उंच आहे तिने तिच्या उंचीवरुन या प्रश्नाचा विचार केला, आणि म्हणाली.

“श्रीमती हॅंडरसन या वर्गात संयमाचा पुरवठा करतात! ”

माताव्हेरोचे आजोबा आणि आमचे अध्यक्ष पीटर हे काल शाळा सुटल्यावर चहाला आले. दमलेले असावेत. ते ६५ वषार्चे गृहस्थ आहेत. १६० किलो वजनाचे आणि टक्कल पडलेले. अगदी सर्वोत्तम मावरीगृहस्थांमधील ते सर्वोत्तम आहेत. तत्ववादी धार्मिक मनुष्य.

“कसे आहात तुम्ही ? ” मी जरा चिंतेने विचारले.

“पुढच्या वळणावर जायला तयार आहे, ” पुढच्या वळणावर ख्रिश्चनांचे कब्रस्तान होते.

“का बर ? ”

“माझ्यात आता शक्ती उरलेली नाही. ”

“डॉक्टर काय म्हणाले गेल्यावेळी ? ”

“मी ३ आठवड्यापासून डॉक्टरकडे गेलोच नाही. ”

“तुम्हाला बरे वाटत नाही का ? ”

“या सर्दीपासून माझी सुटकाच होत नाहीय. ”

“ही खरेच आश्चर्यकारक गोष्ट आहे. इतक्या कडक पत्थ्यपाण्यावर असूनही त्यांना सर्दी होतेच कशी ? ” मी केना म्हणाले.

“तुम्ही बटाटे का खात नाही मॅटेरिना ? ” के म्हणाले.

“ मला वाटत तुमच्यात प्रेरणेचा अभाव आहे, अलिकडे तुम्ही आम्हाला भेटायलाही कुठे आलात ? ” मी म्हणाले.

“मी गेल्या रविवारी आलो होतो, पण तुम्ही सगळेजण कामात होता. ”

“पण आमच्यासाठी तर प्रत्येक दिवस रविवारच असतो. ”

“मी आता खरेच त्या वळणासाठी तयार आहे. माझी कब्रर खणण्याइतकी ही शक्ती माझ्यात उरलेली नाही. पण वाटत लाकडाच्या ढिगा-यावर घरातलं रॉकेल शिंपडल तरी माझे काम होईल.”

मी त्यांच्यासाठी खास चहा ओतला.

मार्क कटर सध्या माझ मन व्यापून उरलाय. मार्क कटरच्या आईला आम्ही कुणीच पसंत नाही. तिच्यामते तो फारच घाई करतो. माझ्या वाचन शिकविण्याच्या पद्धतीत काही तरी गंभीर चूक आहे. मी तर या टिकेने स्तंभितच झाले, जेव्हा लिखाणाची वेळ आली तेव्हा मी मार्कला म्हणाले

“तू कागद पेन्सील घेऊच नकोस. खडू फळ्यावरच काम भागव. ” त्याच्या शेजारी टेमकडे कागद पेन्सील होती.

“मी आईला सांगेन ती कदाचित मला कागद पेन्सील घेऊन देईल,” मार्क म्हणाला.

“कदाचित ती देणारही नाही. ”

तो खूपच अस्वस्थ झाला, मी त्याला समजावल्यावर तो उल्हासित झाला, पण आज तो शाळेत आलाच नाहीय. मी अत्यंत अस्वस्थ आहे. मला माझीच लाज वाटते आहे. मी खरेच वाईट शिक्षक आहे. त्यादिवशी दुपारी मी खरे तर मार्कला सांगणार होते, तुझी आई म्हणतेय ते खरे आहे. नवे पुस्तक आणायची गरज नाहीय. यामुळे मी व आई याविषयी त्याच्या मनात निर्माण झालेले द्वंद्व तरी संपले असते. पण मी विसरले. माझा छोटासा मार्क बाळ.

“हेलन पुढच्यावेळी शहरात बास्केटबॉलच्या सामना असेल तेव्हा तू खाकी रंगाचा स्कर्ट घातलेला हवा. विकत आण , उसना आण, काहीही कर. पण सर्व जण याच पोषाखात हवेत. ”

दोन वर्षात हेलनसाठी काहीही घेतल नव्हत, गणवेषाकडे दुर्लक्षच करण्यात आलं.

“कॉलीन, हँडरसन साहेबांना सांग की मी तुला पहिलीतून दुसरीसाठी सोडू शकत नाही. अजून या नवागतांशी नात जुळलेल नाही तोपर्यंत तरी. ”

जेवतांना मी मुख्याध्यापकांना म्हणाले, “ती कु-हाड तुम्ही कुठेतरी बंदीस्त जागेत ठेवू शकाल का ?

“ कु-हाङ?”

“सेवेन त्याने इतरांना धमकावतो. ”

“हँडसनताई सेवेन आम्हाला कु-हाडीने मारतोय ”.

“कॉलीन ! कु-हाड ! सेवेन !! ”

गेल्या आठवड्यापासून वसंताचे आगमन झाले होते. माझ्या मनात चंडोलचे (लार्क) गीत वाजवण्याची इच्छा झाली. मुल त्यावेळी गोंगाट करीत आपापल्या गोष्टी लिहित होते. एकाएकी वसंताचे वारे संचारले. खिडकीतून आत पसरलेल्या उन्हानेही काही त्स्फूर्ती दिली आणि मी पियानोकडे धावले. लार्कच्या गीताच्या

सुरावटी वाजवू लागले. त्यानंतर जे झाले त्याच वर्णन करायला योग्य शब्दच नसल्याने मी त्याला शिक्षणच म्हणते!

हा शूबर्टच्या संगीताचा शतकानुशतके चालणारा प्रभाव होता की माझ्या मनातला उल्हास त्या संगीताला रसभरीत करीत होता हे सांगण कठीण आहे. किं वा प्रचंड थंडी नंतर वसंताच्या आगमनाची पूर्व सूचना म्हणून ते घडले असेल. त्यावेळी ते घडायचेच होते म्हणून घडले असे म्हणू या.

माझ्या उजव्या बाजूने पिवळ्या रंगाची चमक उठली. मी पाहिले टवीनी नाचू लागली होती.मी थरारले तो काही हूला किंवा तत्सम स्थानिक नाच नव्हता. आधुनिक कलाप्रकार म्हणून शिकवल्या जाणा-या भावदर्शी नृत्याप्रमाणे ते होते. पण ते आदिम काळापासून सुरु असणारे नृत्य होते. संगीताच्या तालाशी ते अचूक जुळत होते आणि संगीताचे भाव अभिव्यक्त करणारे होते. दुसरी टवीनी उठली व नाचू लागली. त्या एकमेंकांसमवेत नाचू लागल्या, त्यांचे छोटे हात शरीर सार व्यक्त करीत होते. ते सावळे आत्मे जर्सीमुळे पिवळ्या बाकोळ्यासारखे भासत होते.

कधी कधी सर्व संयोग जुळून येतात. विश्वास बसू नये अशी गोष्ट होती. टेबलावर रोल भरलेला कॅमेरा ठेवलेला होता.

“हे घे कॉलीन आणि लवकर फोटो काढ. ” पण घाईगर्दीचे कारण नव्हते. रोनाल्ड उठला, माताव्हेरो, ती लहानशी तमाती मुलगी रीती, आणि हाईन हेही सामिल झाले. ते एक अपूर्व सुंदर दृष्य होते. झुलणारे,गिरक्या घेणारे झुकणारे. शूबर्टच्या संगीताप्रमाणे वळणारे .

त्यांनी हे संगीत पूर्वी कधीही ऐकलेले नव्हते. या पद्धतीने ते कधी नाचलेही नव्हते ते सर्वस्वी उत्स्फूर्त नृत्य होते. जैव आविष्कार होता.

मी श्रेयाची सर्व फुल शूबर्टला वाहिली पण त्यातून एक स्वत:साठी वाचवलेही.

आता आठवलं कॅमेरा होता तसेच फोटो काढले गेले. त्यात काही बदल न करताच फोटो काढल्याने ते अस्पष्ट आले. पण तरीही काही फारस नुकसान झालं नाही. कॉलीन आज कॅमेरा टराडेलला घेऊन गेली. फिल्म डेव्हलप करायला.

“काल माझ्या तमिती मुलाला टॉमने मारले. ”

मी मुख्याध्यापकांना जेवणाचे वेळी सांगत होते.

“का बर ? ”

“त्याच ऐकलं नाही म्हणून. विचार करा. तमिती मूल कुणाची आज्ञा पाळेल ? तमिती मुलांना जन्मापासून बंडखोरपणा शिकवला जातो. हे तुम्ही त्यांच्या जडणघडणीकडे पाहून वा त्यांचे वर्तन पाहून सांगू शकता. मी

अत्यंत काळजीपूर्वक तिला साधारण आज्ञापालन करण्याकडे घेऊन येते आहे. त्याचा विश्वास जिंकून. तसा तो जंगली वाटला तरी अगदी लाजाळू आहे. एखाद्या ओपॉसम (एक ) सारखा कोमल.

टॉमने स्वत:च मला हे काही दिवसांपूर्वी सांगितले होते. "तामिती हे माणसाचीच काय देवाची ही आज्ञा पाळत नाहीत. शिक्षकाची तर बातच सोडा ! " मी सारवासारव करीत म्हणाले. त्यानंतर मला इतकी वैतागले की मी तो विषयच बदलला.

त्याने माताव्हेरोलाही मारले. कारण काय तर तो या लबाड म्हणाला. या शब्दावर शाळेत बंदी आहे. पण ही बंदी मी या लहानग्यांना अजून समजावून सांगितलेललीच नव्हती. माताव्हेरो हल्ली खूपच चांगला वागतोय, खरं तर एकाग्रपणे काही कारण त्याला खूपच जड जात. माझ्याही हातून माताव्हेरोवर झालेल्या अन्यायाबद्दल मी आधी सांगितलच आहे. त्याच्या लिखाणावरून असे दिसतेय की घरीही त्याला भरपूर मार मिळत असावा.

कटर बाईंचा अप्रिय विषय संपवण्यापूर्वी आणखी एक गोष्ट सांगायला हवी. डेनिस आणि मार्क ही आमच्या वर्गातील दोन गोरी मुलं मैलभर अंतरावर जवळजवळच रहातात. दिवसातून दोनदा त्यांना घ्यायला त्यांच्या घरच्या गाड्या येतात पण ते कधीही एका गाडीने मात्र जात नाहीत ! यात डेनिसच्या कुटुंबाला काही अडचण नाहीय.

आज सकाही मी शिकवायला सुरूवात केली.

"हार्क हार्क द लार्क"

"हार्क हार्क द लार्क" मी परत म्हणाले.

मार्क त्याच्या बुटांचा आवाज करीत वर्गात चालत होता तर बाकी मुल घोकत होती.

"क्लक क्लक द लार्क आणि हॉर्क हार्क द क्लार्क ! "

<u>कॉलीनला चिठ्ठी</u>

कॉलीन,

मी आज येऊ शकणार नाही. टेमला पुस्तकांच्या मांडणीवरील निळ्या बॉक्समधील जुने निळे मावरीपुस्तक देशील का ? पुस्तक मिळाले नाही तर तो निराश होईल. आज हाका नृत्य घेऊ नकोस. त्याने ते फारच उत्तेजित होतात. शिवाय ते एका खास प्रसंगासाठी मी राखून ठेवलय.

शुक्रवारी मुलांनी सुरू केलेले निबंध मी परत करते आहे. आपण काय लिहित होतो याची त्यांना अजून आठवण असेल अशी आशा आहे. खेळाच्या तासाला सी टीमशी बोल. बुधवारी स्पर्धेच्या दिवशी पिवळ्या जर्सी घालून येण्याची आठवण जरूर करून दे. जेवणाच्या सुटी नंतर गोष्ट आणि चित्रकला घेतली तर बरे होईल. विषय अजून तोच 'क्लक क्लक द लार्क' मन:पूर्वक आभार !

उद्या हेस्टींगमध्ये प्राथमिक शाळांच्या राज्य पातळीवरील स्पर्धा आहेत. गेल्या वेळच्या विजेत्या पाकीपाकीला आम्ही पंधरा दिवसांपूर्वीच हरवल होते. पण त्यानंतर मी आजारीच पडले. आमच्या संघाची तयारी, सराव काहीही करून घेता आले नाही. पण मला त्याची फिकीर नव्हती. मी शिकवलेल्या तंत्राने आता मूळ धरल असणार व मुले आपल सातत्य राखून तयार असणार अशी मला उमेद होती. तरीही आज मी कशीबशी शाळेत आले. मुलांना खेळाचा सरावासाठी मैदानावर नेल आणि मला धक्काच बसला. अरेरे ! मी घोटून घेतलेल तंत्र, चापल्य, खाचा खोचा सार काही नाहीसे झालेल होते! मला तर ते पाहून मूर्च्छाच यायची बाकी राहिली.

दु:खाने मी सर्वांना स्पष्टपणे बजावले. “मला वाटले होते की उद्याच्या सामन्यासाठी आपली तयारी उत्तम असेल. पण मी आजच तुम्हाला सांगून ठेवते. आपण हरलो आहोत. सर्वस्व गमावलय. ”

## *आम्ही स्पर्धा जिंकलो !*

ते पाऊण मैलाचे बास्केटबॉल कोर्ट हजारो निळ्या गणवेष परिधान केलेल्या मुलींनी लहरत होते. त्यात मी माझ्या पिवळ्या जर्सी घातलेल्या २७ मुलींना सोडले. वितळलेल्या सोन्यासारख्या गर्दीतून वहात त्या विरुध्द बाजूच्या तिस-या व चौथ्या क्रमांकाच्या कोर्टवर पोचल्या. त्यातच त्या नऊ जणीही होत्या ज्या एका कोर्ट वरून दुस-या कोर्टवर प्रतिस्पर्ध्यावर मात करीत अंतिम कोर्टवर खेळून अजिंक्यपद पटकावणार होत्या.

सर्वत्र एकच प्रश्न होता ही पिवळी टीम कोणाची ? ही माझी ए टीम होती.

भरल्या स्वरात मी म्हणाले “रोंडा जरा जोरात घोषणा तर दे. फर्नहील आगे बढो ! ”

तिने ललकारी दिली “बढो फर्नहील. ”

“नेट्टा, पॉली, लोटस तुम्हीही जरा घोषणा द्या. ”

“बढो फर्नहील बढो ! ”

आता आमचा अ संघ विश्रांती न घेता पाचही सामना खेळत होता. त्यांची उर्जा संपत आली होती आणि त्यांच्या खास ग्रामिण बाजात ते चिडचिड व्यक्त करू लागले होते. त्यामुळे खेळा वरची पकड ही निसटू लागली होती. जेव्हा खेळ शीगेला पोचला तेव्हा मी मैदानावर धाव घेतली. “डेला जास्त लांबवर चेंडू फेकू नकोस. ” मी दबक्या सवरात सांगितले. बॉल मागे धावत मी तातू जवळ पोचले. ती चेंडू जाळ्यात टाकण्यासाठी नेम धरत होती. “शांतपणे टाक. घाई करू नकोस. ” मी म्हणाले.

त्या सूचनांप्रमाणे वागत होत्या. अस बाहेरून सामना चालू असतांना शिकवण नियमबाह्य आहे. हे मला आठवले पण माझा जन्म नियम मोडण्यासाठीच झाला होता. मैदानाबाहेरून काय मी तर मैदानात घुसून सूचना

करीत होते. “जीन, तातू, रोंडाचा नाद सोडा. तुम्ही स्वत:च गोल करा. ” त्यांनी सगळ्यांनी माझी ही कुजबुज ऐकली.

वेळ संपत आली होती. पंच शिट्टी वाजवायला उत्सूक होते. आणि आम्ही अजूनही पिछाडीवर होतो. काहू धावत आला आणि ओरडला. “सांभाळ, कुठे चेंडू टाकते आहेस पाऊलेट्टी. ” सगळ्यांनीच ते ऐकल.

पटापट तीन गोल झाले आणि शिट्टी वाजली. खर तर हा सामना सहजपणे जिंकता आला असता पण दोन अडचणी होत्या.

१ ) आमची सर्वोत्तम खेळाडू मरीऑन खेळू शकत नव्हती.

२ ) पंच सुरूवाती पासूनच या जंगली मावरींच्या विरूद्ध होते.

मला वाटले काहूच्या उपस्थितीमुळेच आम्ही सर्व अडथळे ओलांडू शकलो.

मी घरी परतले. आता बरे होईपर्यंत अंथरूण सोडायचे नाही असे मी ठरवले पण घरी परतताच के नी एक पत्र हाती दिले. ते शाळा तपासनिसांचे पत्र होते.

१३ ऑगस्ट रोजी तुमच्या शाळेची तपासणी करण्यासाठी आम्ही येणार आहोत.

म्हणजे आता मला माझ्या नवीन निरीक्षण - निष्कर्षांवर आधारीत नवीन वाचन पद्धती विषयी लिहायलाच हवे. उत्तम कागदावर लिहून सजवून बाईंड करायला हवे. मावरी प्राथमिक पुस्तकाचा तिसरा भाग पूर्ण करायला हवा. चौथा भागही शक्यतो पूर्ण करता आला तर पहायला हवे.

## सहज वर्तन व्यवहार

या मुलांमध्ये रक्तांमांसापेक्षा संगीत आणि नृत्यच जास्त आहे. यालाच मी जीवनाच्या बेबंद उत्स्फूर्त वर्तन व्यवहाराचा आविष्कार असे म्हणते.

सहजता याचा अर्थ जिथे सर्वात बलीष्ठ प्रेरणा इतर क्षीण प्रेरणांमधून मुसंडी मारून पुढे येते. गर्दराईत वाढणा-या झाडांचा मी विचार करते. त्यात सर्वात बलशाली झाडालाच सूर्यप्रकाश मिळतो. मुलांच्या मनाविषयीही तसेच होते. तेथे बलीष्ठ जीवन प्रेरणा डोकेवर काढतातच मग आम्हाला भलेही ते अवेळी वाटो. यामुळे मुले साचेबंद तर नक्कीच होणार नाहीत. बाकी काय व्हायचे होवो! मी याला जीवनाची बेबंद शैली म्हणते कारण यातून फुलणारे जीवन कसे असेल याची आपण कधीच पूर्व कल्पना करू शकत नाही. ही अमूर्त आणि सहज जीवनशैली. अमूर्त व सहज किं वा या दोन्हीचा एकजीव परिणाम.

मला खरे तर हेच हवय, पण तरी मनात अनेक शंका दाटून येतात. इग्लंडमध्ये नील नावाचा एक माणूस अशीच शाळा चालवतो, पण माझी शाळा तितकी वाईट होऊ नये असे मला वाटते. परवाच माझी मुल जेव्हा उत्स्फूतपणे नाचू लागली. ( म्हणजे अजूनही नाचतातच ) सेवेनेने जेव्हा कु-हाड उचलली, तेव्हा मला याची

झलक दिसली किंवा माझी तमाती मुले जेव्हा शिक्षकांना साफ धुडकावून लावतात. गोंगाट, कोलाहल, आवाज किंवा अचानक पसरणारी शांतता. दरवाजावर थाप पडताच धावत सुटणारी मुल, भोकांड पसरून रडणे, बेंबीच्या देठापासून गाणे, नाचणे हे सर्व आविष्कार येथे आहेत कारण ते सहज जीवन व्यवहार आहेत.

शाळा तपासनीस या आठवड्यात येणे अपेक्षित आहे. आता बुधवारचे पावणे नऊ वाजले आहेत. मला सोमवारी थोडे बरे वाटत होते. मंगळवारीही एवढी खराब नव्हते. पण आज मात्र अगदीच गलितगात्र झाले आहे. चिंतीत आहे. अस्वस्थ आहे. अजूनही मी माझी पांढरी जर्सी घालून तयार आहे. कुठल्याही कठीण प्रसंगाला मी ही पांढरी जर्सी घालूनच समोरी जाते. तीन दिवस ती अगदी स्वच्छ ठेवण अवघड होते. माझ्या काळ्या बुटाचे पांढरे सोल मी तीन दिवसांपासून स्वच्छ ठेवलेत असे मी यापूर्वी कधीच केलेल नव्हते. कमरेला मावरीपट्टे आवळून मी तयार होते. अस्वस्थ होऊ नका अस कुणीही सांगण्याचा काहीच फायदा नव्हता. कारण हे तर माझ्या भूतकाळाचे भूत होते ! आमच्या पिढीतल्या सर्वच शिक्षकांना शाळा तपासणीच्या वेळी त्याच्या शिक्षकांच्या ताण तणाव व शाळा तपासनिसांच्या दरा-याचा उग्र गंध आठवत असणार. गेल्या अठरा महिन्यात मिस्टर टी नी मला किती सांभाळून घेतले आहे त्याच्या मला याक्षणी पूर्ण विसर पडला आहे. त्यांनी आस्थापूर्वक दिलेले प्रोसाहन माझा विश्वास जिंकण्यासाठी निश्चयाने केलेले प्रयत्न . पण हे सर्व काही ते भूतकाळातील शाळा तपासनीचे भयकारी भूत गिळून टाकते. मी चांगली शिक्षिका आहे असा आत्मविश्वास असता तर किती बरे झाले असते! पण चांगली तर सोडाच पण जिचा धाक वाटावा अशीही मी नाही. खरे तर मी शिक्षिकाच नाही. एक अर्धवट मूर्ख व्यक्ती आहे. जिला मुलांमध्ये मोकळे सोडून दिलय. मी जर इतर शिक्षिकांसारखे नीटनेटक कार्य-विवरण तक्ते ठेवले असते, मांडणी केली असती, त्याच्यासारखे शिकवले असते तर किती बरे झाले असते. निदान बहूसंख्य शिक्षिकांच्या समूहाचा आधार झाला असता पण ही एकटेपणाने, बेगुमानपणे चालल्याची किंमत आता चुकवावी लागणारच आहे. गेले पाच सहा दिवस मी तयार करत असलेल्या वाचन योजनेकडे नजर टाकली तरी मी ज्याला एकटेपणाने चालणे म्हणते ते तुम्हाला समजेल. पण तरी मला हेच करायला हवे. आणि मी हे जे काही करते आहे. त्यावर माझा विश्वास आहे. रांगेतून बाहेर पाऊल टाकण्याचा सर्वांनाच हे अशी किंमत द्यावी लागते. पण मी आता थकलेय. आणि या वयात ही किंमत चुकवणे जड जातय. पण शेवटी मला तेच केल पाहिजे ज्यावर माझा विश्वास आहे. नाहीतर काहीच न केलेल बर. जीवन किती छोटे आहे. इतर शिक्षक व्यवस्थित वेळापत्रक आखून शिकवतात. पण माझ्यातर गणिताचया तासाला गणित सोडवता सोडवता मुल उठून नाचू लागतात. मी गाफिल असते. माताव्हेरो एकदम हाका नृत्यासाठी सरसावतो. एडमंस बर्क कमी कमी आजच्या दिवसतरी माझ्या बरोबर रहा बाबा !

दुपारच्या काही वेळा अशा असतात त्यावेळी मी शिकवू शकत नाही. ही त्यातलीच एक वेळ आहे. आपण अगदी नेटाने सतत काम करीत असलो तरी त्यातही चढ उतार अनुभवाला येतातच. कधी प्रयत्नाचे शिखर येते.

तर कधी खोल खाई. आसपास भरपूर गजबज गोंगाट आहे. मुल चित्र काढता आहेत. गाता आहेत. ओरडत आहेत. पण मी मात्र निरूत्साहाच्या खाईत अडकली आहे.

मी काही सतत अश्रू ढाळत भूतकाळाकडे टक लावून पहाणा-यांपैकी नाही. आयुष्यात आता जगण्यासारखे राहिले नाही असे म्हणून कुढणे मला जमत नाही. मी त्या त्या क्षणांचा वापर करते. त्यातून मला आयुष्याचा अर्थ उमगला आहे. पुढच्या आयुष्यात अनेक खोल द-यातून जावे लागेल.पण जेव्हा जेव्हा मी शिखर गाढले तेव्हा तेव्हा मी स्वत:ला बजावले “माझ्या यापूर्वीच्या व पुढे येणा-या आयुष्याचे सार्थक या अदभूत क्षणात सामावले आहे. ” असे अनेक क्षण मी अनुभवले व विसरलेही आहे. पण त्यात्या वेळी मी जे स्वत:ला बजावले ते मात्र मी कधीही विसरलेली नाही, व विसरणार ही नाही. त्यामुळेच माझा आत्मविश्वास दृढावला. भविष्यात काय घडेल ते मला ठावूक नाही पण माझे आजवरचे जीवन कृतार्थ झाले आहे. असे मी त्या क्षणांमुळे नक्की म्हणू शकले कितीही खोल खाईतून जावे लागले तरी.

गेल्याच आठवड्यात एका मित्राने लिहिले होते “या चाळीस वर्षात तर संघर्ष करावाच लागेल. जीवनाच्या अंताचा आरंभ झाला तरी मी आजवर जीवनाची प्रतीक्षाच करीत राहिलो. मी काय करू शकलो असतो याचा विचार मनात येताच मला जाणवते, औषध घेण्याची वेळ झाली आहे ! ”

अर्थात माझ्या मित्राच्या आयुष्यातही साफल्याची, कर्तृत्वाची शिखर आली होती हे मी जाणते.

दुसरा एक मित्र लिहितो, “आता भूतकाळाचा तो चंदेरी वर्खही गळून पडू लागला आहे. आता खरे तर मी मरण्च पावलो आहे. कारण भूतकाळाचा रंग गंध हरवला तर मग जगायसाठी उरेलच काय ”

फ्रॅाईड म्हणतो तसा जीवन काही फार सार्थ आहे असे नाही पण जे काही आहे ते तेवढेच आपल्यापाशी आहे !

माझ्याही आयुष्यातील खूप काही भूतकाळात हरवत चालले आहे. पण ते निदान आयुष्यात काही घडले तरी आणि त्या क्षणांनी माझ्या आयुष्याला एक प्रयोजनही दिल!

जीवन हे मला कधी कधी पक्ष्यांच्या उड्डाणा सारख वाटत. एका दिशाहीन वादळाशी झुंजत उडणारा आत्मा. ते वादळ शांत होते तेव्हा पक्षी थोड्या निवांतपणे धरतीवर विसावतो. पुन्हा पुन्हा येणा-या वादळात झेप घेण्यापूर्वी मिळालेल्या त्या विसाव्याच्या क्षणात मला आयुष्यात अर्थ गवसतो. या विसाव्याच्या क्षणांच्या दरम्यान सगळ्यांसारखच मलाही खूप झगडाव लागल पण त्या वादळाशी मुकाबला करतांना खाली आपल्याला विसाव्यासाठी धरती आहे. हा विश्वास मनात होता. व त्यामुळे उडण्याची उभारी मिळत होती. जीवनाचा अर्थ माझ्या डोळ्यांनीच प्रत्यक्ष पाहिला होता.

वय वाढत जाते तशी त्या क्षणांची उंची कमी होत नाही पण त्यांचे स्वरूप मात्र बदलत जाते. जीवनाला परिपक्वता येत जाते. आपण दुस-या आत्म्याशी संयोग पावतो एवढेच नाही तर जीवनाशी संयोग पावतो. सकाळी खिडकीतून बाहेर नजर टाकताच काळ्या कुट्ट ढगांच्या पार्श्वभूमीवर उजळलेले रंग जीवनाची जाणीव जागवतात. जीवनाची उत्कट जाणीव कामक्रिडेतील झपूर्झा अवस्थेसारखीच असते. त्यात साक्षात्काराची चमक तशीच असते. तशीच तीव्र वेदना असते आणि तशीच तीव्र प्रेरणाही असते आणि तरीही ती थोडी वेगळी असते. तरूणपणी मी अशावेळी मला 'देवाचे' दर्शन झाले असे म्हणत असे मी पाहिला तो चेहरा देवाचा होता की नाही हे मला माहित नाही पण मी जे काही पाहिलं त्यानी माझ्या श्वासांना एक प्रयोजन प्राप्त करून दिले.

किथने चहा आणला तेव्हा मी खिडकीच्या पडद्याच्या छीद्रातून बाहेरच्या काळ्या झाडाचे विविध आकार पहात होते. पार्श्वभूमिवर नवे आकाश. खिडकीचा पडदा दूर सारून मी बाग न्याहाळू लागले. मग रस्त्या पलिकडेची शेते, मैदान दूरवरच्या टेकड्या आणि छायेसमान भासणारे पर्वत हे सर्व आसपास आहे आणि मी त्याचेच एक अंग आहे याची मी पुन:पुन्हा खात्री करून घेत होते. या विलक्षण जीवनाचा आणखी एक दिवस!

बुधवारी सकाळी ही मंडळी अद्याप का आली आली नाही ते मला समजल. माझी योजना अद्याप अपूर्ण होती. मी गरम पाण्यात पाय शेकत. मोपांसाच्या विचारात गढले होते.

“शब्दांना आत्मा असतो, पण शब्द जोपर्यंत अचूक डौलदारपणे आपले स्थान घेत नाहीत तोपर्यंत तो प्रकट होत नाही. ”

माझ्या पुस्तकाच्या प्रारंभी हे उर्धृत केले आहे. मला खूप बरे वाटले. सर्वच गोष्टींना काहीना काही कारण असते. तसे या सुंदर सकाळचेही काही कारण असेलच .

मी माझी पांढरी जर्सी धुतली. बुटाचे पांढरे सोल धुतले. शाळेत निघालेल्या कैंना निरोप दिला.

“आरोग्य शिबीरात गेलेल्या वाईवानी कडून मला काहीच पत्र आलेले नाही. तीने पत्र टाकायचे वचन दिले होते. ” मी कॉलीनला विचारले.

“ती शेवटी काय म्हणाली हे तुला ऐकायचय ? ” कॉलीन म्हणाली.

“काय?”

“ती म्हणाली की तुझी हनुवटी खूप निमुळती आहे ! ”

विकी : मी सापळ्याला फारच घाबरतो. त्यात नुसती हाडेच हाडे असतात!

सेवेन : मला अळ्यांची भिती वाटते.

लॅरी : मी भूताला भितो.

बेट्टी : मी ही भूताला भितो.

विकी : मी भूताला घाबरतो. भूते आपल्याला सगळ्यांना खाऊन टाकतात.

रांगी : मी पोलिसला घाबरतो. ते खाटकाच्या सु-याने मला ठार मारतात.

मरे : मी इंजिनाला घाबरतो ते मला जाळून टाकते.

बेट्टी : मी भूताला भितो. ते आपल्याला खाऊन टाकले.

शुक्रवारची सकाळी या सत्राचा शेवट.

सकाळी आठ वाजता शाळेत निघालेल्या शाळेच्या हेडमास्तरांना मी विचारले "इतक्या पावसात ती मंडळी खरेच येतील असे तुम्हाला वाटते का ? तेही सत्राच्या शेवटच्या दिवशी ? "

"आपण येणार अस त्यांनी स्वतःहूनच सांगितला होत त्यामुळे ते त्यांना येण भागच आहे, अस मला तरी वाटते. "

माझ्या काळ्या बुटांचे पांढरे तळ मी आज साफ करणार नाही. पांढ-या जर्सीच्या बाह्याही शुभ्र नाहीत. माझ्या वाचनमालेवर पुन्हा एकवार नजर फिरवणही मी टाळले. आठवड्याची इस्त्रीची कामही अर्धी पूर्वीच केली. केंना मी शुभ्रेच्छाही दिल्या नाहीत. मला जाणवणारी लय काही सुचवत होती.

श्री. ट्रेमेन मुळे आठवड्याभर, बूट, कपडे यांची स्वच्छता करण्याचा जो त्रास मला झाला त्याबद्दल मी त्यांना माफ करीन. माझ्या वाचनमालेची पूर्तता करण्याचा जो तणाव त्यांच्यापुढे निर्माण झाला त्याबद्दलही मी त्यांना क्षमा करीन. तपासनिसांच्या सहजभावाला विरोध करणारी मी कोण ? मी स्वतःतर हेच शिकवते !

पण इस्त्रीची कामे अर्धवट राहिल्याबद्दल मात्र मी त्यांना माफ करणार नाही. आणि ती पांढरी जर्सी मी पुन्हा घालणार नाही.

बॉस्केटबॉलचा सामना जिंकल्याबद्दल सर्व खेळांडूंना चित्रपट दाखवायचे मी कबूल केले होते. त्यानुसार आज रात्री मी त्यांना घेऊन जाणार आहे. देव माझे रक्षण करो ! वॉर्नर ब्रदर्सचा 'द फ्लेम अँड द ॲरो' हा रंगीत चित्रपट आम्ही पहाणार आहोत. देव दयेने मी यातून सुखरूप पार पडो अशी मी प्रार्थना करते !

## सुट्टी !

माझे विचाराचे तारू कुठल्याही अन्य दिशेने भरकटण्यापूर्वी एक गोष्ट सांगून मी मनावरचे ओझे हलके करू इच्छिते. मला बाजारात श्रीमती कटर भेटल्या. भेटल्या म्हणजे मी दुकानात होते. त्यांनी बाहेरूनच मला पाहिले. आणि तोंड फिरवले. मार्कचे तोंडही त्यांनी दुसरीकडे फिरवले जेणे करून त्यानी मला पाहू नये. मला हे खूपच खटकल बोचले. कारण त्यावेळी माझ्या समवेत एक मावरी मैत्रिणही होती. श्रीमती कटरना शाप द्यावा अशी तीव्र इच्छा झाली!

सुटट्या संपल्यावर पहिल्यादिवशी शाळेच्या पाय-यावरच मार्क माझी वाट पहात होता. ( मी थोडी उशीराच पोचले ) मी आज गेले तेव्हा तो माझ्या जवळ आला आणि माझे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन काही काळ उभा राहिला.

मी माझ्या बदामी रंगाच्या कोटावर वापरण्यासाठी एक मावरीपद्धतीचा भडक रंगाचा पट्टा बनवला. लाल, बदामी व काळ्या रंगाच्या धाग्याने त्यावर वेलबुट्टी काढली होती. वाईओमातीनीच्या समाजमंदीरात आहे. तशी हे न्युझीलंडमधील सर्वात सुंदर समाजमंदिर आहे. हा कमरबंद सगळ्यांच्या नजरेत भरतो. इतका की तो वापरणेच कठीण व्हावे. पण खूपच थोड्यांना या पट्टयाच महत्व समजत होते. स्थानिक संस्कृतीचा युरोपिअन संस्कृतीनी केलेला तो स्वीकार होता. अर्थात काहींना तरी हे समजले यातच मला समाधान आहे. त्याची दखल तर घेतली गेलीच. रस्त्यातल्या लोकांना ते नेहमी पेक्षा वेगळ भडक आणि विचित्र वाटत असावे. पण त्यामागील भावनेचा सर्वांनी आदरपूर्वक स्वीकार केला. हा संस्कृतीसंगम होता. माझा पट्टा हा संस्कृतीसंगमाचे प्रसादचिन्ह होता. अर्थात केवळ यामुळेच लोकांनी तो स्वीकारला असे नाही. त्याला एक कलात्मक मूल्यही होते. सगळ्या लोकांकडून त्याचा स्वीकार होणे याची मला फार फार गरज होती. हा कमरबंद वापरतांना मला जे धैर्य एकवटावे लागले तसे एरवी काहीही वापरतांना लागले नव्हते. वेलींग्टनला जातांना कुणास ठाऊक कशामुळे पण मला हा कमरबंद वापरावा असे वाटले. ही कठीण परीक्षाही सोपी झाली याचे कारण काय आहे. सांगू ? त्या पट्टयाकडे पहाणा-या मावरींच्या नजरा हे.त्या नजरांमध्ये मला माझ्या धैर्याचे पारितोषिकही मिळाले. वुलवर्थमधील त्या मावरी मुलीने मला ज्या उत्साहाने मदत केली ते पहाण्यासारखे होते. तिच्या डोळ्यात तुम्ही पहायला हव होत. ती माझ्याकडे अशी पहात होती जणू मी तिच्या स्वप्नातील राजकुमारच आहे! माझ्या समवेत असलेली माझी मैत्रीण तर मंत्रमुग्ध झाली. हे पाहून एक मावरी महिला वेटर आपले काम बाजूला ठेवून माझ्याकडे पहात बसली! रस्त्याच्या दुस-या बाजूला उभी असलेली एक मावरी व्यक्ती अचानक रस्ता ओलाडुंन माझ्या बाजूला आली ! वसंतातील ती सकाळ एक रोमांचकारी अनुभव ठरली.

एकटे विहरणे पुरे. आता मूळ मुद्याकडे परतू या. त्या दिवशी टॉमला आम्ही सुलेखनाचे पाठ देण्यासाठी बोलावल. पाठ छानच झाले. कॉलीन आणि मी त्यातून बरेच काही शिकलो.

माझ्या वर्गातल्या छोट्या गो-या डेनिसला औदासिन्याच्या झटक्याने दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. प्लॅकेट पद्धतीने मुलांना वाढविण्याचा हा परिणाम आहे.(न्यूझीलँडचे गव्हर्नर जनरल प्लॅकेट यांच्या नावाने ओळखली जाणारी ही बालसंगोपनाची पध्दत आहे. यामुळे मुले शारीरीक दृष्ट्या बळकट होतात पण मानसिक दृष्ट्या मात्र त्याचे विपरित परिणाम दिसून आले आहेत.) त्याची आई अधिकाधिक पैसे मिळविण्यात गुंतलेली असते. ती मुलाला काठीने बडवत असे. माझ्या शब्दांच्या प्रयोगाचे वेळी तो मला म्हणाला होता मी कशालाच घाबरत नाही. फक्त खुले आकाश सोडून ! पण त्याची आई तर सांगत होती तो कोंबड्यांना ही घाबरतो म्हणून.

माझ्रया शाळेतील ह्या मनोविकाराने ग्रस्त असलेल्या गो-या मुलांना काही दिवस स्वत:जवळ ठेवाव अस मला वाटले. गोरा जून अद्यापही सुटीवर आहे. मीच त्याला तस सांगितल होत.

वाहतूक शाखेचे निरिक्षक काल आल होते. आमची मुल पूलावरून जाताना पादचारी मार्गावरून सायकल का चालवितात असे तो विचारत होता. आमच्या मुलांविषयी प्रश्नच खूप आहे. उत्तर काही नाही !

प्रोफेसर वेली एकदा म्हणाले "नीटनेटकेपणा शिक्षणाला मारक आहे. "

"काय ? परत सांगा ! "मी .

"व्यवस्थितपणा हा शिक्षणाला मारक गुण आहे. मी स्वत:अगदी गबाळग्रंथी होतो. "

"आम्हाला तर व्यवस्थितपणाला वेळच नसतो. एवढ सगळ सामान शोधायच वापरायच त्याकडे लक्ष द्यायच हेच किती अवघड आहे. मला फक्त एक फळी आणि खडू द्या. "

सर्व शिक्षक वरवरच्या देखाव्यावर जास्त भर देतात. आणि शिक्षणाचा आत्माच हरवून जातो. कुशाग्रबुद्धीच्या मुलांचे अक्षरही सुंदर असते असे मी तर क्वचितच पाहिले आहे. खरे तर जे सुंदर लेखन करू शकतात ते बहुद्या दुस-याची नक्कल करत असतात. मुले जेवढी सृजनशील, कलावंत असतील तेवढी ती लिखाणाच्या झटापटीत असफल ठरतात. उदा. आमचा माताव्हेरो. मी तरी त्याला एक तल्लख बुद्धीचा सर्जनशील मुलगा मानते.

हस्ताक्षराची मी फारशी चिंता करीत नाही. मला वाटते चिांता वाटते ती मुलांच्या असंबद्ध लेखनाची. अशा असंबद्ध वाक्यांमध्ये बहुधा वर्गात त्यावेळी शिकवली जाणारे शब्द ओवलेले असतात. हे फारच वाईट लक्षण आहे.` विस्कळीत लेखनाची ही प्रारंभिक लक्षणे आहेत. लिखाण हे एकत्र गुंफलेल असल पाहिजे. सुरूबद्ध आणि विकसित होणारी कल्पना. प्रत्येक शब्द एका मोठ्या सुंदर रचनेचा जैव घटक असलाच पाहिजे. अत्यावश्यक भाग. अभेद्य भाग. रोज सकाळी गप्पांच्या तासानंतर माझी छोटी सेना -अगदी पाच वर्षापर्यंतचीही- त्यांच्या जवळपासच्या घटनेविषयी लिहू लागते. या लिखाणातील सर्व शब्द त्यांनी निवडलेले असतात. त्यांच्या कोवळ्या मनात फुलणा-या कल्पनेचे घटक असणारे, त्यांना अपरिहार्य वाटणारे त्यांचे शब्द. ते जे लिहितात त्याला एक आंतरीक संगती असते. ती त्यांच्या मनातील कल्पना असते. शिक्षकांच्या मनातील नव्हे. अव्यक्त कल्पना व्यक्त करण्याचे प्रमाण वाढत जाणे म्हणजे शिक्षण. त्या फुलणा-या कल्पना असायला हव्यात. यात अर्थात नवीन काही नाही. हेच सर्व आजच्या शिक्षणाचा पाया आहे.

वसंतागीतांचे बरोबर तरंगत येणारे संगीत ऐकत मी खालच्या खेड्याकडे पहात होते. तिथे समाजभवनाचा ओसरीजवळ गावातील युवक संघ आजच्या सामन्याचा सराव करीत होता. सुरेल गाण होते. खूप वेगळेही होते. हॉकी सामन्याच्या वेळी आम्ही ऐकलेल्या गाण्यांपेक्षा वेगळे. बीअर घेत घेत केलेले बीअर गीत. ज्याला तीन मोठे

कर्णे जोडलेले आहेत अशा माइकवर गाणे सुरु आहे. आवाज दूरवर पोचावा म्हणून हे कर्णे इमारतीच्या वरती लावलेले होते. आनंदाच्या, उत्साहाच्या वातावरणात तेही सहनीय होते. पण ही तर स्पर्धेच्या पहिल्या दिवसाची सांयंकाळ आहे. कर्णकर्कश आवाजाचा मारा दुस-या दिवशीही झेलणे तसे फारस कठीण गेले नाही. दुस-या रात्री देखील गाण सुरू राहिले तेव्हा मात्र त्याचा दर्जा घसरू लागला. हाच प्रकार तिस-या दिवशीही सुरूच राहिला. मला तर या गाण्यात काही अर्थ वाटत नव्हता. पण तरीही मी ते स्वीकारले. कारण जगा आणि जगू द्या या सिद्धांतावर माझा विश्वास होता! तिस-या दिवशीही हा घोष सुरू झाला तेव्हा मात्र माझ्या युरोपिअन सहनशक्तीचा अंत झाला होता !

हॉकी या खेळाच्या नावाने ही सर्व धमाल चालते. पण इथे हॉकी केवळ एकत्र जमायचे निमित्त मात्र आहे. आणि एकत्र याचा अर्थ इथे शब्दशःच घ्यायचा. माझ्या एक मित्रांनी हॉकीचे सामने पाहीले. पण मी त्याला बिअरचे सामनेच म्हणते. तिथे रात्रभर पिणे आणि गाणे सुरू असते. मला या रात्र रात्र चालणा-या खाण्यापिण्याच्या पार्ट्या वर्ज्य आहेत असे नाही. पूर्वी आम्ही जेव्हा लांब रहात होते. तेव्हा आम्हीही अशा मेजवान्या दिल्या होत्या पण त्यावेळी ध्वनिवर्धक कर्णे नव्हते !

एकत्र येणे मावरींच्या सामुदायिक जीवनाबाबत सर्वच जण जाणतात. नवीन सांस्कृतिक वातावरणात बीअर आणि इतर गोष्टींशी माझ काही भांडण नाहीय. पिप्रिकामध्ये एक म्हातारीने मला सांगितले होते. “मला माझ्या त-हेने आनंद घेता यायला हवा ! ” तिला काय म्हणायचे होते ते मी समजू शकत होते.

आणि पोलिस? ते तर स्वतःच बीअरचा पुरवठा करीत होते! हे अगदी खरे आहे. मी अगदी शपथपूर्वक सांगू शकते.

पण सर्व अंधा-या रात्रींतही एक प्रकाशमान तारा असतोच. त्या सतत वहाणा-या संगीत रात्रीत अचानक एकदा मला जाग आली ती पहाडी आवाजाच्या पुरूषी स्वराने. आवाज हळू हळू भरदार होत उंच पट्टीत पोचला. तापर्यंत मला पूर्ण जाग आली नव्हती. गायक काहू होता. तो त्या खेड्यात समोरच्या जनसमुदायासाठी गात होता. त्याचा आवाज उडणा-या सोनेरी पक्षासारखा वाटत होता. वर वर जाणारा ते गीत मी पूर्वी कधीही ऐकलेल नव्हते. गीत आपल्या परमोच्च पातळीवर पोचले. गाण्याची सम गाठण्याची काहूची एक विशेष शैली होती. एक फिरत, एक तराणा आणि मग एक तीव्र तान.

ते संगीत एका दारूड्याविषयीचे होते पण त्यांनी मला जो आनंद दिला तो मी मरेपर्यंत विसरू शकणार नाही.

आता बास्केट बॉलची स्पर्धा संपली आहे. त्यामुळे मी वाद्यवृंदाचा सराव सुरू करू शकते. आमच्या या वाद्यवृंदाचा उद्देश्य सामाजिक जास्त आहे. सांगितिक कमी ! आणि हे समजण्या सारखही आहे. अर्थात तरीही

त्यात कमी अधिक प्रमाणात संगीत तर असतेच. यावर्षी पूर्वी पेक्षा जास्त चांगल संगीत असेल असे वाटते. कधीतरी सुरूवात होतेच.

ज्या मुलांना मी शिकवते त्यांच्याशी माझे जणू लग्नच लागते! याचा शोध गेल्यावर्षी मी वाद्यवृंदाची सुरूवात केली तेव्हा पासूनच मला आला. मला जे हवे ते त्यांच्या कडून करून घ्यायचे असेल तर ते माझ्यासारखे व्हायला हवेच होते. खरे तर त्याहीपेक्षा जास्त काही तरी. माझेच अभिन्न अंग व्हायला हवे. हे सरावाचे तास हळूहळू मला शिकवत जातात. मला हे उमगल की एका सुरेख वाद्यमेळासाठी आम्ही परस्परात मिसळण किं वा एकमेंकांसारख होण किती आवश्यक असते. प्रत्यक्षातही त्यांना एकमेंकांजवळ व माझ्याजवळ असावेचं लागते. सरावाचे वेळी पियानो जवळ कोंडाळे जमे. आम्हाला एकत्र यावेच लागते असे मी म्हटल तरी खरे म्हणजे ते सक्तीने नाही तर सहजपणे होत असे. मी त्यांना प्रेक्षकांकडे तोंड करून बसवत असे पण शेवटी ते पुन्हा माझ्या भोवती फेर धरीतच असत. एकमेकांत गुंफलेली गुंतलेली अगदी लग्न बंधनासारखी !

संगीताचें कित्येक नियम आम्ही बिनदक्कतपणे मोडून टाकले. उदा. सुंदर स्वरमेळासाठी प्रेक्षकांकडे तोंड करून गायला हवे. हे सुरूवातीला मलाही कळले नव्हते. युवा मंडळीच्या एका कार्यक्रमात व्हेरेपारीताच्या जुळ्यांच्या स्मृत्यर्थ शोकगीत गायले जात होते. त्यावेळी त्यांना प्रेक्षकांकडे पाहून गायची इतकी लाज वाटली की ते एकमेकांकडे तोंड करून गोलात उभे राहिले आणि गायले. त्यांच्याकडून मी हा धडा शिकले आणि तोच किता पुढे गिरवला.

मी काय सांगत होते बर ? हां, माझ्या वाद्यवृंदाशी लागलेले माझे लग्न. हे संगीताशिवाय अन्य कुठल्याच माध्यमातून मला उमगले नसत. शिकवतांना मला हा अनुभव कधी आला नाही. पण आता एकदा हे उमगल्यावर मला अन्य क्षेत्रातही त्याचा प्रत्यय येऊ लागला आहे. माझ्या शिशुकक्षातही अगदी लग्न नाही पण साखरपुडा तरी नक्की अनुभवायला येतो! मी जे काही त्यांना करायला सांगते. त्यासाठी ते माझ्या भोवती जमतात. शरीराने आणि आत्म्याने मी त्यांना माझ्या जवळ घेते. त्यांना ते समजत नाही पण मला समजते. ते माझे अंगच बनूव जातात. एखाद्या प्रियकरासारखे. अर्थात सुरूवात थोडी वेगळी होते. आधी किंचित अविश्वासाने , संशयाने चाचपणी होते. मग हळूहळू स्वीकार होतो. कधी कधी जलद गतीने हे संमीलन होते. त्यातून एक पूर्णत्व, एक स्वरमेळाची आभा चमकू लागते. एक शांती अनुभवायला येते.

आणि या संमीलनातून काय जन्मते? वाद्यवृंदात संगीत आणि शिशुकक्षात शिक्षण. सकाळीच या अमर जन्माच्या वेदना सुरू होतात. आणि सांयकाळी विश्राम पावतात.

आता जेव्हा मी याकडे लग्न सदृष्य बंधनासारखे पाहू लागले तेव्हा तो अवघड उंचसखाल मार्ग मला सोपा वाटू लागला.

हे शब्द खूप मोठे वाटतात का ? अनिर्बंध, प्रचंड. पण त्याखाली एक खोल अर्थ दडलेला आहे. ही माझ्या आणि त्यांच्या जीवनाची एकात्मिक सायुज्यता आहे.

प्रेमाच्या खेळाचे सर्व नियमा या आत्मिक मीलनाला देखील लागू पडतात. यात फक्त दोनच व्यक्ती सामावू शकतात. एकाच्याही जीवनात तिसरा प्रविष्ट झाला की पहिले मीलन भंग पावते. प्रेम नेहमीच निष्ठेला बाधा आणते.जोपर्यंत मुलांचे चिंत्त अन्य विषयात गुंतलेले असते तोपर्यंत मी त्याला काहीच शिकवू शकत नसे. हे उमजले नव्हते तो पर्यंत मी रेटून प्रयत्न करीत असे. पण त्यातून विसंवादी सूर उमटत. कधी कधी तर एकमेकांविषयी घृणा निर्माण होत असे. मला याचा त्रास होत असे. पण आता मी भंग पावलेल्या प्रेमामागे धावत नाही. शांत रहाते. जोपर्यंत नव्या प्रेमाची चाहूल लागत नाही तोपर्यंत.

आता या त-हेने विचार करू लागल्यावर मला भूतकाळातल्या अनेक घटनांचा अन्ययार्थ लागू शकतो आहे. जो त्यावेळी मला उमगला नव्हता.शीत सांयकाळी माझ्या छोट्याश्या खोलीत माझ्या समोर जाजमावर बसलेल्या आमच्या अ संघाशी मी किती तरी वेळा बोलत बसे. अगदी क्षुल्लक गोष्टीपासून महत्त्वाच्या निर्णयापर्यंत सर्व विषयाची तपशीलवर चर्चा चाले. खेळतांनाचे कपडे, वर्तन,खेळतांना पाळावयाचे नियम. सारसार. त्यावेळी अर्थात मला हे ठाऊक नव्हते की या नात्यांला काय म्हणावे. ते लग्नच तर होत! ज्यावेळी त्या अगदी अत्युच्य कामगिरी करीत होत्या तेव्हाही मला ते समजले नव्हते. पण आता समजलय उमजलेय.

संम्मीलन. माझ्या मन:चक्षू समोर स्पष्टपणे दिसणारा जोमदार शब्द. सभोवताल कितीही विस्तृत असो वा अस्पष्ट असो. कारण आत्म्याला सघनाकाराचे बंधन थोडेच आहे? उगमाचे क्षेत्र कितीही लहान असले तरी त्याची व्याप्ती थोडीच तेवढीच रहाते? जीवाचे भाव सर्वत्र सारखेच असतात. व्देष, दया, तिटकारा, सहानुभूति, आनंद, मृत्यू, कष्ट किंवा शांती. सर्वत्र हे भाव सारखेच असतात. जीवनाची संपूर्णता एका कोप-यात ही व्यक्त होते. आणि भव्यतेतही. अचानक फ्लबर्ट मनात आला. कदाचित यामुळेच कदाचित तो इतक्या लहान वयात मेंदूतील रक्तस्त्रावाने मरण पावला असावा. त्याच्या गावा पलिकडचे, घरापलिकडचे जग त्याने त्याच्या साहित्यातून निर्माण केले. तुम्ही कदाचित गावात मादाम बोव्हारीचे काय असे विचाराल. ते तर नॉर्मंडीच्या बौद्धीक क्षितिजा पलिकडेचे होते. आणि सॅलमबो मधील विदीर्णता विखंडन ..असो.

मला याचाच आनंद आहे की मला शेवटी हे उमगले की काहीही करण्यासाठी त्याच्याशी लग्नच लागावे लागते. आणि इथे पोचल्यावर मला अवचित अनेक सहकारी भेटले आंद्रे गिडे मला आठवला.

"मी एकटा असतो तेव्हा माझे जीवन अतिशय संथ झाल्यासारखे भासते. इतके की असे वाटते थांबेलच. अस्तित्व संपण्याच्या किनारीपर्यंत मी जातो. माझे हदय हे सह अनुभूतिवरच चालते. मी इतरांच्या मधूनच जगतो.

त्यांच्याकडून जीवन मिळवतो. मी जेव्हा माझ्यातून बाहेर पडतो तेव्हाच खरे तर मी पूर्ण उर्मीने जगतो. त्यातून मग मी काय बनतो हे गौण आहे. ”

आयर्लंडच्या उभारणी बाबत एका सहका-याला लिहितांना यीटस लिहिले.

“तुमच्या जीवन लहरीची एक कसोटी आहे. त्यांनी आसपासचा विसंवाद शोषून एक धून तयार केली पाहिजे. आयर्लंडचे दु:ख तू आत्मसात कर मग तू खरा लोककवी होशील. नव्या बंडाच कवी. ”

लग्न करते आणि आत्मसात करते हे तसे समानार्थीच शब्द म्हणावे लागतील.

बबर हा जर्मन माणूस शिकवण्याला ‘अध्यापनिक संभोगच’ म्हणतो.

शब्द वेगवेगळे आहेत पण त्याचे प्राणतत्व एकच आहे. मी शिकवते म्हणजे मी विद्यार्थ्यांशी लग्नच करते.

मला इतके काही सांगायचे आहे की मी आता सांगणे थांबावतेच. या डायरीतील हे शेवटचेच लिखाण. याची पातळी आता माझ्याही डोक्यावर चालली आहे.

लिखाणाचा उद्देश खरे तर आधीच पूर्ण झालाय. मी माझ्या व्यवसायात एकटी होते. एकटेपण मला जाणवत होते. मला काही तरी आंतरीक शोधाची गरज होती. तो मला लागला. आता माझे एकाकीपण दूर झाले.

थांबण्यापूर्वी मी शेवटच्या आठवड्यातील शिकवतांना काही आलेले जोमदार व सहजभाव मांडण्याचा प्रयत्न करते. घटना जेव्हा घडतात. तेव्हा त्या नोंदविण्याइतका वेळ आपल्यापाशी नसतो. पण तरीही मी ते चित्र उभ करायला प्रयत्न करीन. अंतचंक्षूसमोर एकटलेली ती भावदृष्यांची गर्दी, व्यक्त होण्यासाठी संधी ठरवतील त्यांच्या भावनिक आवेगानुसार आपोआपच ठरेल.

सर्वात स्पष्ट चित्र आहे. माझ्या शिशुकक्षातील श्री. ट्रेमेन यांचे. ते हळूवारपण म्हणता आहेत. “मला तू बोललेल ऐकायच आहे. ” त्या सर्वांतून मला हेच ऐकू आलय. ते आले त्या गुरूवारी झालेल्या बॅलेच्या गाण्यांमधून आरपार होत हे शब्द माझ्यापर्यंत पोचले. त्याच्याबरोबर विद्यापीठातील अध्यासानाचे व्याख्यातेही मला भेटण्यासाठी आले होते. पण तरीही ट्रेमेनचे हे साधे शब्द माझ्या मनात गुंजत राहिले. एक तीव्र भावानुभव.

आलेले अतिथी कोण आहेत ते ट्रेमेननी मला आधी सांगितले नाही. ते माझ्या प्रवेशपुस्तकांसाठी आले होते. त्यांच्याशी मी उत्तेजित होऊन बोलू लागले आणि मग त्या शिशुकक्षात मी त्यांना मूल शब्दावलीच्या प्रयोगाविषयी एक व्याख्यानच ठोकले. त्याच्या तपशीलात मी जात नाही. कारण ते माझ्या मावरीशिशुशाळेचे प्राथमिक पुस्तकात आले आहे. हे पुस्तक आता प्रकाशकाच्या प्रतिक्षेत आहे.

त्या गचाळ पोर्चमध्ये ट्रेमेनना चहा देत मी म्हणाले “तुम्ही आलात की मला बोलायला उद्युक्त करता. मग मी बोल, बोल बोलते आणि नंतर मलाच माझी लाज वाटू लागते. ”

मंद स्मित करीत ट्रेमेन म्हणाले, “मला शांत राहून खूप काही शिकता येते असा माझा नेहमीचा अनुभव आहे. ”

“हे काही विशेष सरकारी पाहूणे तर नाहीत ना ? ”

“छे ! छे ! ! ”

“माहिती असलेले बरे. म्हणजे मग चहाचा पेला पहिल्यांदा तुम्हाला दिला पाहिजे. ट्रेमेन साहेबांची तर ही खास पद्धत आहे. ते नेहमी अगदी महत्त्वाच्या पाहुण्यांना अचानक घेऊन येतात. मला जर ते आधी कळलं तर मी आधीच पोबारा करीन हेही खरंच! ”

ट्रेमेन साहेब हे ऐकून अधिकच जोरात हसले. मी त्यांच्या हास्याचे कारण शोधू लागले. कदाचित त्यांनी माझ्या बोलण्याचा काही वेगळाच अर्थ लावला असावा. जेव्हा ते जायला निघाले तेव्हा मी त्यांना म्हणाले.

“खर तर मी मावरीमधील बाल गुन्हेगारीवृत्तीशी देखील लढते आहे. ”

“तुम्ही जे काही करीत आहात त्याबद्दल मनःपूर्वक आभार. ”

“तुमच्याशी बोलतांना खरोखर आनंद वाटला” ते म्हणाले. याच दिवशी मावरीमुलांसाठी तयार केलेल्या वाचनमालेची प्रत मी यांच्या हाती दिली. कडाक्यांच्या थंडीत ते बाहेर उभे होते. उंच बांध्याचे आणि रूंद खांद्याचे व्यक्तीमत्व. त्यांनी पान उलटली, चाळली. मोपांसाचे ते सुंदर शब्द वाचले. विचार करीत त्यांनी पहिल्या पृष्ठावरील हाका चित्रावरून बोट फिरवले. “वा !” ते उदगारले त्या थंड सकाळी माझ्या कामाला दुस-याने इतक्या तरलतेने समजून घेण ही मोठीच घटना होती. माझ्या अथक परिश्रमांना मिळालेला तो सर्वात मोठा पुसस्कार पारितोषिक होते.

## ***<u>स्मरण यात्रा</u>***

“काय झाल ? अरे झाल काय ? बछड्या ! ”

मी गुडघ्यावर बसून त्याच्या एवढी झाले. त्याची हनुवटी बोटांनी वर उचलली. त्याच्या भु-या डोळ्यांतून बांध फुटला आणि अश्रू वाहू लागले.

“काही लोकांनी निष्कारण माझा किल्ला मोडून टाकला. काही लोकांनी. ”

मी शिशुवर्गातील छोट्या खुर्चीवर बसून त्याला मांडीवर घेतल. आपल्या हनुवटीने त्याच डोक खाली दाबत म्हणाले.

“अरे! पुरे! पुरे! जरा बघ तर! छोट्या पिला. ” पण ही तर आता केवळ एक स्मृती आहे. एक वर्ष जुनी.

“श्रीयुत हेडरसन आहेत का ? ”फोनच्या दुस-या टोकाला असलेल्या पुरूषाचा प्रश्न. एक वर्ष झालऽ. आणि मी खरच राजीनामा दिला आहे.

“ते तर शाळेत आहेत ते नऊ पर्यंत परततील काही निरोप आहे का ? ” मी .

“शिशुकक्षातील माझ्या तक्तपोशी बाबत विचारायच होते हॅंडसनबाई. ”

“नवीन इमारतीतील तक्तपोशीचे काम करणारे कारागिर तुम्हीच का ? ”

“होय माझे नाव रॅंडल ”

“अजून ही तक्तपोशी पूर्वापणे वाळलेली नाही. अस मी ऐकलय. मुले आज तरी आत गेलेली नाहीत. मुख्याध्यापकांनी त्यांना परवानगी दिली नाही. तुम्ही दिलेला वॉर्निशचा शेवटचा हात अजून वाळलेला नाही. ”

“मुलांनी आज जाऊच नये ! ती वाळेलेली नाही ! ”

“मुख्याध्यापकांनी आज सकाळी सहा वाजता वर्गात दोन शेगड्या पेटवून ठेवल्या होत्या. त्यामुळे आतला ओलसरपणा जाईल या आशेने. पण तरीही अजून ओलसरपणा कायमच आहे. अर्थात शिक्षक पायमोजे घालून आत गेले होते. पायमोजे घालून गेल्याने त्या तक्तपोशीचे काही नुकसान तर होणार नाही ना ? ”

“नाही, नाही ! पायमोजे असले तर काही नुकसान नाही होणार. ही हवा कशी आहे तुम्ही पहाताच आहात. त्यामुळे तक्तापोशी सुकत नाहीय. काही दिवसांपूर्वी दिलेला वॉर्निशचा हात अजून सुकलेला नाही असे माझ्या माणसांनी सांगितल. मुलांना तेथे जाता येत नाहीय याचे मला वाईट वाटतय. ”

“खर तर स्थिती तुम्हाला वाटते त्याहून वाईट आहे. शाळा तपासनीस गुरूवारी आणि शुक्रवारी शाळा तपासनीसाठी येणार आहोत. नवे शिक्षक मान मोडून काम करीत आहेत. नव्या जागेत एवढी सगळी हलवाहलवी आणि नव्याने मांडामांड करावी लागणार आहे. आणि त्यांना तर मुलांना वर्गात नेताही येत नाहीय. ”

“तक्तपोशी सुकलेली नाही म्हणून अस होतय. हॅंडरसनताई या दमट हवेने ती सुकत नाहीय! ”

“या सर्व हवेचा तो परिणाम आहे मला ही ठावूक आहे. माझे कपडे कितीतरी वेळ बाहेर सुकत घातले तरी वाळले नाही. शेवटी घरात ठेवून वाळवावे लागले ! ”

“अडचणी यायला लागल्या की एकदमच येतात ! ”

“मुख्याध्यापकांनी नव्या शिक्षकांसमवेत काय नवीन योजना आखलीय हे मला माहित नाही पण बहुधा ते उद्या आत जातील. जर दिवसभर शेगड्या पेटवून ठेवल्या आणि मूल चटईवर बसली तर काय हरकत आहे ! ”

“मुले पायमोजे घालून आत जाऊ शकतात”

“पायमोजे ? तीच तर अडचण आहे. त्यांना सर्वांकडे मिळून अर्धा डझन पायमोजेही नसतील. जर उघड्या पावलांनी आत गेले तर तक्तपोशी खराब होईल का ? ”

“नाही उघड्या पायांनी आत गेल तर चालेल”

“त्यांनी काही फर्निचरही आत नेलय आज टेबल आणि खुर्च्या. ”

“बापरे ! तुम्हाला तर माहितच आहे. मुल खुर्च्याची कशी ओढा ताण करतात ते ! ”

“मुल खाली सतरंजीवरच बसतील. ”

“सतरंजीवर बसणार असतील तर ठीक आहे ! ”

आताशा मी रोज सकाळी नायलॉनचे माजे घालतेच असे नाही. खर तर मला ज्या गोष्टींचा मनस्वी कंटाळा आहे. त्यात सकाळी नायलॉनचे मोजे घालून शाळेला जावे लागणे हे आहे. इतर बायका त्यावेळी पायात सपाता घालून इस्त्री करीत असतात, पण आज सकाळी मी मोजे घातले. चेह-याला पावडर लावली. केस रिबीनने मागे बांधले. वर्षभरापूर्वी सारखे, जेव्हा मी हेडमास्तरांच्या मागोमाग तासाभराने शाळेत पोचत असे. त्यांच्या कामात काही मदत करीत असे. मला माझे बछडें त्यांच्या नव्या वर्गात शिरतांना पहायचे होते. पायमोजे घालून वा त्याशिवाय. माझ्या बरोबर वा माझ्या शिवाय. ते जेव्हा बाहेरच जमले होते. तेव्हा मी बूट काढून नुसते मोजे घालून त्या तक्तपोशीवर गेले.

तुम्ही या नवीन खोल्या पहायला हव्या होत्या.

माझ्या छोटुल्यांच्या चित्रचौकटीतूनच त्या थेट अवतरल्या होत्या. फक्त त्यांना पाय नव्हते. विकी आणि मोही आपल्या चित्रातल्या घरांना कायम पाय काढत असत. काही भाग पिवळा वर निळा, लाल दरवाजे. आपल्या अंधा-या खोलीत बसून शाळेची वास्तुरचना ठरवणा-या कुठल्याही वास्तुरचनाकाराला ही बाल मानसिकता समजू शकेल का ? आतमध्ये पुस्तकाची कपाटे रांगेने मांडलेली होती. त्यांना देवालाही कल्पना करता येणार नाहीत इतक्या असंख्य रंगाने रंगविलेले होते. भिंतीवरील चित्रचौकटी थेट पाच वर्षाच्या मावरीमुलांनी रंगविल्यासारख्या होत्या. फळ्याच्या वरच्या बाजूला एका बाल गीतांचे वॉलपेपर्स लावलेले होते. तर दुस-या बाजूला काऊबॉईज आणि रेड इंडियन्स रंगविलेले वॉलपेपर्स. क्या बात है! शिशुवर्गात काऊ बॉईज आणि रेड इंडियन्स ! छत हलक्या चमकदार पिवळसर छटेने रंगलेले. उत्तर दिशेची एक पूर्ण भिंत काचेचीच होती. त्यातून अक्रोडाचे झाड दिसत होते. ते काढू नये यासाठी जणू काही वास्तूरचनाकार आग्रही होते. या वास्तुरचनाकाराने सारे काही मुलांच्या चित्रबहीतूनच उचलेले होते. किंवा त्यापासून स्फुर्ती घेतलेली होती. वास्तुविशारदांविषयी माझ्या मनातील आदर वाढला.

मुलांना हे आवडल होत. मला आवडल यातच सार काही आले असे वास्तुकारांनी हेडमास्तरांनी सांगितल होते.

आणि ही फरशी म्हणावी की आरसे ? तीच्यात आसपासचे आणि वरचे सर्व काही प्रतिबिंबित होत होते. त्यामुळे रंगांच्या लाखो गुणित प्रतिमा वातावरण भारून टाकीत होत्या. फोनवर माझ्याशी काल बोलणारा तो माणूस किती विलक्षण कलाकार होता. ही फरशी ( तक्तपोशी ) ही त्याची लाडकी निर्मिती होती.

मी माझ्या छोटुल्यांची वाट पहात होते. ते प्रार्थनेच्या हॉलमधून कधी येतील असे मला झाले होते. त्यांना पाहून आता किती काळ लोटला होता. त्या आश्चर्यकारक फरशी वरून चालत मी दुस-या खोलीकडे वळले. तेथील काचेच्या भिंतीतून पूर्वीची शाळेची जागा दिसत होती. आता ती भुईसपाट झाल्याने तो जमीनीचा तुकडा आसपासचा हिरवळीत उठून दिसत होता.

मी माझ्या मनात ती जुनी डुगडुगणारी शाळा पहात होते. वसंतात दाटलेल्या धुक्याला भेदून ती माझ्या मनात साकारते. आढ्याच्या फळ्यांमधून सॅमी गोगलगायी आमच्यावर पडत असत. खोलीतील फरशीवरून उठलेल्या धुळीने सूर्यकिरणाचे रूपांतर चमकदार सळ्यांमध्ये केले होते. जणू ते हातात पकडणे शक्य आहेत असे वाटावे.फरशी वरुन उठणारी धूळ. इतक्या दाट धुळीच्या फरशीवरून, बाकांवरून सैरभैर फिरणारी, अखंड बडबड करणारी मुलं खोली चैतन्याने भरुन टाकत होती. दहा मुलांना एकावेळी रंगकाम करता येईल एवढ्या मोठ्या चित्र फलकावर मोठी मोठी फुल रंगविलेली होती. तीथे मुल भिरभिरत नाच करीत होती. मातीतून नित्य नवे अद्‌भुत आकार घडत होते. कधी कधी रागाच्या भरात त्यांना ते छोटे हात तोडून टाकत आणि ते जणू स्मशान बने. पाण्याचे छोटे ओहळ अडवून बंदर तयार होई. फळ्यावर विमाने घोंघावू लागत. चित्रविचित्र लिपीतले विलक्षण शब्द खालच्या फळ्यावर निर्हेतुकपणे रंगवले जात, मुले गात, ओरडत,हसत आहेत. संसर्गा सारखे पसरणारे ते रडणे, हसणे, मध्येच वाईविनीचा छोटा भाऊ मला ओरडून सांगतो आहे. “त्यांनी कुधीतरींनी माझा किल्ला उगाचच तोडून टाकलाय !” ब्लिडींग हॉर्ट हसतांना इतक्या जोराने मान हलवत होता की ती तुटून जाईल असेच वाटत होते. तामातीचा कुत्रा तिच्या कुशीत शिरून लाड करून घेण्यासाठी घोटाळतो आहे. मांजर हळूच शिरकाव करतय, जिंजर कोंबडा इकडे तिकडे टोचा मारत काहीतरी महत्त्वाची गोष्ट शोधत होता. आदिवासींच्या एकत्र येण्याचा झोपड्यांची चित्रे, गाव, भूत आणि मोठ्या पायांची माणसांची चित्र.चुंबन घेणा-यांची चित्र. आणि शब्द, बीअर,लोकर कातरणीच्या ठिय्या, कबरस्तान,जंगली डुकर,चघळायच्या गोड गोळ्या असे अनेक शब्द इथे पुन:पुन्हा उच्चारले जात. अगदी स्वत:चे स्वतः लिहितांनाही मावरी मुल ते पुटपुटत लिहितात. आवाज उंचावत जातात. भांडतांना, वाचतांना, हसतांना, गातांना, रडतांना किंवा नॅनीचे स्पेलिंग काय विचारतांना. आणि आमची फरशी ?ती तुम्ही खरच पहायलाच हवी होती. दहा मुल एकावेळी चित्र फलकासमोर बसत. आणि

मग खाली रंगाच्या ठिपक्यांची रांगोळी बने. ती कधीकधी बाहेरच्या पानगळीपेक्षाही जास्त सुशोभित दिसे. पानगळीचा ऋतुच जणू तिथून जातांना आपल्या ब्रशचे फटकारे ओढून गेलाय असे वाटावे. आणि आवाज,गोंगाट खळाळता प्रवाहच असे. मला वाटे की ती शाळा म्हणजे समुद्रावर हिंदोळत असलेली, खचाखच भरलेली एखादी नौकाच आहे जणू.

"काय झाल काय छोट्या ? " मला पुन्हा ऐकू आले.

"माझा ना किल्ला कुणीतरी तोडून टाकला म्हणून"

तो, तो तिथे दिसतो आहे माझा बछडा!

आली बाबा मुल शेवटी.

तरूण शिक्षिका दाराशीच थांबली होती. तिला तिचा चेहरा आहे. आवाज आहे. आणि तिची स्वतःची कार्यशैली आहे.

ती ठामपणे, पूर्ण आत्मविश्वासाने पायात सपाता घालून दरवाजापाशी उभी आहे.

"आता ज्यांनी बूट घातले असतील त्यांनी ते काढून ठेवा आणि शांतपणे आत या" तीने सांगितले. "खुर्च्या, टेबल यांना ढकलून हलवू नका. खालच्या फरशीवर ओरखडे उमटणार नाहीत याची काळजी घ्या. तुमचे बूट आणि दप्तर असे इथून पोर्चमध्ये आणा. ते मी सांगते त्या ठिकाणी ठेवा. "

मी नव्या शेगडी शेजारी उभी राहून त्यांना आत येतांना पहात होते. ही सगळी मुलं नवीनच होती. मुख्याध्यापकांनी मला याची काहीच पूर्व कल्पना दिली नव्हती. जुन्या पैकी फक्त वनपिंट, ब्लॉसम, ब्लीडींग हार्ट व नूकू एवढेच दिसत होते. चौघांनीही नेमलेल्या आयात पुस्तकांतून काही वाचणे कधीच जमले नव्हते. ते वर्गात आल्याचे मी पाहिले. पुसी मांजर आता कधीही येऊन टपकेल. ती जणू काय शाळेच्या पटावर होती. तमातीचा कुत्रा दिसत नाही ? त्याची प्रेमाची भूक भागवायला कुठे अन्यत्र तर गेला नाही ? आणि जिंजर रूस्टर .. त्याने शाळा सोडली असे सांगू नका .. ! आणि सॅमी गोगलगाईला या नव्या छताविषयी काय वाटतय ? मी त्यांच्या पाठीमागे स्वतः हिंडत होते. केवळ पायमोजे घालून. काल फोन केलेल्या तक्तपोशीवाल्या माणसाने हे पाहिले तर तो काय खूश होईल.

बाहेरच्या ओसरीत सर्व खिळ्यांना एकेक सुंदर चित्र टांगलेले होते. शब्द स्पष्ट करणारे मी त्या चित्रांकडे अनावर उत्सुकतेने पाहिले. माकड, खलाशी, मुलगा, पाणी आणि या सर्वांसोबत सुंदर बूट घातलेले, केस विंचरलेले, इस्त्रीच्या कपड्यातली गोरी मुलं ! मी सचिंत होऊन खेड्यातली चित्र कुठे दिसतात ते पाहू लागले. घोटुलच्या झोपड्या, नॅनी, जंगली डुकर, अनवाणी पायाने हिंडणा-या, काळ्याभोर केसांच्या काळसर मुलांची चित्र.

मी शांतपणे त्या खोलीमधून फिरू लागले. शांत आणि संथ. मोहीच्या भूतापेक्षाही संथ. दुस-या खोलीत बालवाडी दोनमध्ये. आता त्यासाठी दोन शिक्षिका आणि दोन वर्ग होते. इथे मला त्यावेळची छोटी चिमुरडी भेटतील. होय आहेत ती इथे. सगळी मोठी  झालेली आहेत. पण ते माझ्याकडे धावत का येत नाहीत ? मला आपल्या हातांच्या विळखा का घालत नाहीत ? माझे रंगीत खडू,पेन, बॉक्स पळवत का नाहीत ? वाईविनीचा छोटा भाऊ रडक्या स्वरात मला ओरडून अजून सांगत कसा नाही की “माझा ना किल्ला कुणीतरी तोडून टाकला म्हणून”

ते सर्व शांतपणे एकाचवेळी उभे राहिले व म्हणाले “सुप्रभात, मिस हँडरसन. ”

त्यांची चटपटीत तरूण शिक्षिका त्यांना म्हणाली “विकी, आता आम्हाला तक्तपोशीवर ओरखडा न उमटता खुर्चीवर कसे बसायचे ते दाखव पाहू. ”

ते चित्रांचा घोडा कुठे ठेवणार आहेत? आणि वाळूचे काय ? मी विस्मयाने पाहू लागले. ते जेव्हा पाणी भरून तसराळे आणतील तेव्हा काय होईल? पण त्यांनी ते आणलच नाही. ना घोडा, ना रंग ना पाणी, शिक्षिकेने आधीच तयार केलेले काही तक्ते तेथे लावून ठेवले होते. छापील अक्षरांचे उत्कृष्ठ प्रदर्शन. ते सर्व वर्णाक्षरानुसार लावलेले. आयात केलेल्या पुस्तकातून घेतलेले. मी या वर्णनमालेत पा हा शब्द शोधू लागले पण तो तेथे नव्हता. घाईघाईने मी M च्या यादीचं meeting House शोधू लागले. नॅनी नव्हती. K मध्ये kiss नव्हता. G कुठाय? G च्या यादीत Ghost तर असायलाच हवे. नाहीय! G च्या यादीत Ghost नाहीय? आमच भूत नाहीय! हे भूत माओरीच्या जीवनाला भारून टाकले.अस्ताव्यस्त करते. त्याच्या देवादीकांच्या भल्यामोठ्या संख्येवर मात करून त्यांना पछाडते. ते भूत इथे नव्हतेच! वनपिंट आणि ब्लींडिंग हार्ट हे आता त्यांची नैसर्गिक शब्दावली वापरत असतील. ते आता वाचू लागले असतील. काय सुंदर स्वच्छ छपाईतली वळणदार अक्षर आणि चित्र आहेत. मुलांनी काढलेल्या चित्रांपेक्षा किती सुबक.

तेथून सर्वांनी नजर चुकवून शांतपणे बाहेर पडण्यापूर्वी मी या शाळेवर एक अखेरचा दृष्टीक्षेप टाकला. शिक्षिका अजून त्यांना टांगलेल्या शब्दावली वरून शब्द शिकवित होती. आता निघायला हव. त्या चकचकीत तक्तपोशीकडे, भिंती एवढ्या खिडकीकडे मी पाहिल आणि मग वॉलनटच्या झाडाजवळील आता पाडलेला माझ्या शाळेकडे पाहिले. ती आता तेथे नव्हती हे खरे. समूळ नष्ट झाली होती. पण तरीही तिथला गोंगाट, खडबडीत जमीन, वितळलेले बर्फ, धुके, माझ्या मनात घर करून बसले होते. ती मूळ शब्दावली जी माझ्या मुलांइतक्यात उत्स्फूर्ततेने तयार केली होती. एक एक ठोकळा रचत, मनो-यावर मनोरा चढवत. कमानी, जिने यांची रचना करत आणि आता इथून या सुंदर आधुनिक दिमाखदार खिडकीतून मला फक्त एक गवत उगवलेला जमीनीचा तुकडा दिसतोय !

मी एक दीर्घ सुस्कारा सोडला. सर्वत्र शांतता आणि स्वच्छता होती. मी काही म्हणायचा बोलायचा प्रयत्न केला. शेवटी मी मुख्याध्यापकांची पत्नी होते. आणि पूर्वाश्रमीची या शाळेची शिक्षिका होते. त्या प्रसंगाला साजेसे आणि उत्साहवर्धक असे मी काय बोलू शकत होते ? मुल अजूनही शांतपणे त्या चित्रांसमोर चित्रासारखी उभी होती. त्यांची शिक्षिका त्यांना उद्देशून बोलत होती. मी काही बोलायचा प्रयत्न केलाही पण कंठ दाटून आला. जणू काही कुणाचे तरी काळेभोर चिमुकले डोळे भरल्या गळ्याने मला सांगत होते. “कुणीतरी माझ्या किल्ला लष्ट केलाय. उगाच कुणीतरी केलाय. ” मला काहीच बोलता येईना. मी वळले आणि दरवाजाकडे गेले. बूट घातले आणि घरच्या रस्त्याला लागले. रस्त्यावर पानगळीचा सडा पडलेला होता. माझ्या लहानग्यांनी नुकतीच रंगांची पखरण केली असावी तसा.

घरात शिरताच मी सवयीने चहाच्या किटलीचे बटन दाबले. स्वयंपाकघरात येताच मी उगाचच आरशा समोर उभी राहिले. सकाळीच धुतलेले माझे केस पाहू लागले. पानगळीवर पाच वर्षाच्या लहानग्याचे अश्रूबिंदू चमकतांना दिसत होते.

“कुणीतरी माझा किल्ला मोडून टाकलाय उगाच. कुणीतर .. .. ”

( तुझे सर्व अश्रू त्याचा एक शब्दही पुसू शकणार नाहीत ! )